# केंद्र शासन पुरस्कृत इंदिरा आवास योजनेचे मुल्यमापन -

# एक अभ्यास, सन २००८ ते २०१४

## विशेष संदर्भ - मुळशी तालुका, जिल्हा पुणे

एम. फिल. (विद्यानिष्णांत) पदवीकरीता शोधप्रबंध


संशोधक

अमर अशोक ढाले

मार्गदर्शक

डॉ. उदयराव जगदाळे

प्राध्यापक

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, समाजकार्य विभाग, पुणे.



समाजकार्य विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

गुलटेकडी, पुणे - ३७

एप्रिल २०१८

# घोषणापत्र

मी खाली सही करणार श्री. अमर अशोक ढाले असे घोषित करतो / करते की, केंद्रशासन पुरस्कृत इंदिरा आवास योजनेचे मुल्यमापन - एक अभ्यास, सन २००८ ते २०१४ विशेष संदर्भ- मुळशी तालुका, जिल्हा पुणे नावाचा प्रकल्प अहवाल प्रा. उदयराव जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन समाजकार्य विद्यानिष्णांत अभ्यासक्रमाच्या परिपूर्ततेसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करीत आहे. सदर संशोधन कार्य पूर्णतः माझे स्वतःचे मूळ काम असून कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करण्यात आलेली नाही. दुय्यम तथ्य स्त्रोतांचा योग्य संदर्भ व उल्लेख संदर्भसूचीमध्ये केलेला आहे.

संशोधक विद्यार्थ्याची स्वाक्षरी

ठिकाण :- पुणे

दिनांक :- 08 / 05 / २०18

स्वाक्षरी :

..................

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
# Tilak Maharashtra Vidyapeeth
(Declared as Deemed University under section 3 of UGC Act 1956 vide Notification No.F-9-19/85-U-3 dated 24 April 1987 by the Government of India).
Vidyapeeth Bhavan, Mukundnagar, Gultekdi, Pune-411037.

Tel: 91-020-24261856, 24403000 Fax: 91-020-24266068, 2440310
Email : registrar@tmv.edu.in Website: www.tmv.edu.in


# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, केंद्रशासन पुरस्कृत इंदिरा आवास योजनेचे मुल्यमापन - एक अभ्यास, सन २००८ ते २०१४ विशेष संदर्भ- मुळशी तालुका, जिल्हा पुणे हाप्रकल्प अहवाल श्री/श्रीमती अमर अशोक ढाले या विद्यार्थ्याने / विद्यार्थिनीने माझ्या मार्गदर्शनाखाली समाजकार्य विद्यानिष्णांत अभ्यासक्रमाच्या परिपूर्तीसाठी केलेला आहे. सदर प्रकल्प अहवाल टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, समाजकार्य विभागास सादर केला जात असून हा प्रकल्प यापूर्वी दुसऱ्या कोणत्याही विद्यापीठास किंवा शैक्षणिक संस्थेस सादर केलेला नाही.

ठिकाण:- पुणे
..........................

दिनांक :- ०४/०५/२०१८

संशोधन मार्गदर्शकाची स्वाक्षरी

# ऋणनिर्देशन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य विद्यानिष्णांत अभ्यासक्रमाच्या परिपुर्तीसाठी म्हणून हा शोध प्रबंध सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. प्रस्तुत प्रबंध विषयाचा अभ्यास करत असताना गेल्या काही वर्षापासून अनेकांनी, अनेक परीने विविध स्वरूपाची मदत केली. अनेकांचे प्रोत्साहन, सहकार्य लाभले त्यामुळे प्रबंधाची पूर्तता होऊ शकली. या सर्वांच्या सहकार्याशिवाय प्रबंध पुर्ण होणे अशक्य होते त्यामुळे या सर्वांचे ऋणनिर्देश करणे मला अगत्याचे वाटते.

सदर शोध प्रबंध सादर करण्यास टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व समाजकार्य विभागाने मला जी संधी दिली त्याबद्दल प्रथमतः मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा व समाजकार्य विभागाचा ऋणी आहे. माझे मार्गदर्शक डॉ. उदयराव जगदाळे, प्राध्यापक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, समाजकार्य विभाग, पुणे यांचे बहुमोल मार्गदर्शन, ज्ञान, सहकार्य व प्रोत्साहनामुळे हा शोध प्रबंध व्यवस्थितपणे सादर करता आला. त्यांनी वेळोवेळी केलेल्या अचूक व योग्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा मनःपुर्वक आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील समाजकार्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रकाश यादव सर व सहाय्यक प्राध्यापक श्रीमती कार्तिकी सुबकडे मॅडम यांनी प्रबंध प्रगती बाबत केलेली सतत विचारपूस व मार्गदर्शन मला प्रेरणादायी वाटत असे. तसेच समाजकार्य विभागातील इतर सहाय्यक प्राध्यापक यांचे प्रोत्साहन मला मार्गदर्शक ठरले. या सर्वांनी माझ्या संशोधन कार्यात दाखविलेला माझ्यावरील विश्वास मला सुखकारक वाटतो. याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

संशोधन विषयाची निवड करताना तसेच संशोधन अभ्यासाच्या प्रत्येक टप्प्यावर मला मार्गदर्शन व सहकार्य करणारे श्री. ए.बी.वराळे, निवृत्त अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व डॉ सुमंत पांडे, सहाय्यक प्राध्यापक, यशदा

यांचा मी खूप आभारी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मला 'मुल्यमापन' या विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त झाले आहे त्यामुळे मी त्यांचा सदैव आभारी राहीन. तसेच संशोधन अभ्यासासाठी आवश्यक ती दुय्यम साधने उपलब्ध करुन देण्यामध्येही डॉ. सुमंत पांडे, सहाय्यक प्राध्यापक, यशदा, पुणे यांचे मला मोठे सहकार्य लाभले आहे. त्याचबरोबर पंचायत समिती, मुळशी येथील विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्या मदतीने ग्रामपंचायत निहाय सविस्तर माहिती मिळाली आहे. त्याचा फायदा संशोधन अभ्यासासाठी उपयुक्त ठरला आहे. संशोधनाच्या कामी माझे मित्र श्री. गणेश शितोळे याने मला केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

तसेच माझ्या शोध प्रबंधाच्या अगदी सुरुवातीपासून ते संशोधन पूर्णत्वास जाईपर्यंत वेळोवेळी मला सहकार्य करणारी व मला प्रेरणा देणारी माझी पत्नी श्रीमती. अर्चना अमर ढाले यांचाही मी मनापासून आभारी आहे. माझ्या संशोधन अभ्यासाच्या प्रत्येक कामात, प्रत्येक क्षणी त्यांनी मला सहकार्य केले आहे. त्यांचे सहकार्य व प्ररेणा यामुळेच मी माझा शोध प्रबंध पूर्ण करु शकलो.

सर्वात शेवटी ज्यांच्यामुळे मी इथपर्यंत शिक्षण घेऊ शकलो, एम.फील पदवीसाठी प्रबंध सादर करु शकलो ते माझे आई-वडील यांचा मी मनापासून खुप आभारी असून त्याबद्दल मी त्यांचा सदोदीत ऋणी आहे.

तसेच मला या शोध प्रबंधासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या, ज्ञात व अज्ञात सर्व लहान-मोठ्यांचा मी मनापासून आभारी आहे.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | घोषणापत्र | |
| | प्रमाणपत्र | |
| | ऋणनिर्देशन | |
| | अनुक्रमणिका | |
| | सारणी व आलेख सूची | |
| | **प्रकरण पहिले :संशोधन विषयाची ओळख** | **१** |
| १ | प्रस्तावना | १ |
| १.१ | 'घर' : अर्थ व प्रकार | १ |
| १.२ | 'घर' ही संकल्पना | ३ |
| १.३ | स्वतःचे घर किंवा निवारा : मानवी मुलभूत गरज | ४ |
| १.४ | 'निवाऱ्याची सुविधा' एक मुलभूत हक्क :<br>आंतरराष्ट्रीय - राष्ट्रीय पार्श्वभूमी | ५ |
| १.५ | निवाऱ्याची सुविधा : भारतातील प्रयत्न | ७ |
| १.६ | इंदिरा आवास योजना : पार्श्वभूमी व सविस्तर माहिती | ८ |
| १.७ | महाराष्ट्रातील आवासाच्या योजना : संक्षिप्त आढावा | १५ |
| १.८ | इंदिरा आवास योजना : राष्ट्रीय तसेच राज्य स्तरीय मुल्यमापन अहवाल | १७ |
| १.९ | सारांश | १९ |
| १.१० | संदर्भ | १९ |
| | **प्रकरण दुसरे: संदर्भ साहित्याचा आढावा** | २१ |
| २ | प्रस्तावना | २१ |
| २.१ | संदर्भ साहित्य : शासन निर्णय, पुस्तके व वेबसाईटस् | २१ |
| २.२ | इंदिरा आवास योजना : राष्ट्रीय व राज्य स्तरीय<br>मुल्यमापन अहवाल | २६ |
| २.३ | सारांश | ३० |
| | **प्रकरण तिसरे : संशोधन पध्दती** | ३१ |
| ३ | प्रस्तावना | ३१ |
| ३.१ | समस्या सूत्रण | ३१ |
| ३.२ | अभ्यास विषयाची व्याप्ती | ३२ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३.३ | संशोधन अभ्यासाचे महत्त्व | ३३ |
| ३.४ | अभ्यास विषयाचे क्षेत्र : मुळशी तालुका (पुणे जिल्हा) | ३४ |
| ३.५ | संकल्पनांच्या कार्यवाहीच्या व्याख्या | ३५ |
| ३.६ | अभ्यास विषयाची चलपदे | ३६ |
| ३.७ | संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये | ३६ |
| ३.८ | संशोधन अभ्यासाची गृहितकृत्ये | ३६ |
| ३.९ | संशोधन प्रश्न | ३७ |
| ३.१० | अभ्यास विषयाची नितीमुल्ये | ३७ |
| ३.११ | संशोधन आराखडा | ३७ |
| ३.१२ | नमुना आराखडा | ३८ |
| ३.१३ | माहिती संकलन : साधने व माहितीचे स्त्रोत | ४० |
| ३.१४ | माहिती संकलन : दुय्यम साधने | ४३ |
| ३.१५ | प्रकरणीकरण | ४३ |
| ३.१६ | सारांश | ४४ |
|  | **प्रकरण चौथे : माहितीचे सारणीकरण व विश्लेषण** | ४५ |
| ४ | प्रस्तावना | ४५ |
| ४.१ | सर्वसाधारण कौटुंबिक माहिती | ४५ |
| ४.२ | इंदिरा आवास योजनेची लाभार्थी निवड प्रक्रिया | ५० |
| ४.३ | मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकाम प्रक्रिया | ५५ |
| ४.४ | घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची सामाजिक स्थिती | ७९ |
| ४.५ | घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबाची आर्थिक स्थिती | १०८ |
| ४.६ | योजनेसंदर्भात लाभार्थ्यांच्या समस्या | ११६ |
| ४.७ | योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेच्या समस्या | ११७ |
| ४.८ | सारांश | ११८ |
|  | **प्रकरण पाचवे : निष्कर्ष, गृहितकृत्यांची पडताळणी, शिफारशी व संशोधन अभ्यासाचा सारांश** | ११९ |
| ५ | संशोधन अभ्यासातील निष्कर्ष : प्रस्तावना | ११९ |
| ५.१ | लाभार्थी कुटुंबाच्या सर्वसामान्य स्थिती विषयक निष्कर्ष | ११९ |
| ५.२ | योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रियेसंबंधीत निष्कर्ष | १२० |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.३ | योजनेच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत निष्कर्ष | १२१ |
| ५.४ | घरकुल प्राप्त लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थितीविषयी निष्कर्ष | १२६ |
| ५.५ | घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबाच्या आर्थिक स्थितीविषयी निष्कर्ष | १३१ |
| ५.६ | योजनेसंदर्भात घरकुल प्राप्त लाभार्थ्यांच्या प्रमुख समस्या : निष्कर्ष | १३३ |
| ५.७ | योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेच्या समस्या : निष्कर्ष | १३४ |
| ५.८ | गृहितकृत्यांची पडताळणी | १३५ |
| ५.९ | प्रमुख शिफारशी | १४२ |
| ५.१० | सारांश | १४४ |
| ५.११ | संशोधन विषयाचा सारांश | १४५ |
| | **परिशिष्ठे** | |
| अ | संदर्भ सूची | १५० |
| ब | मुळशी तालुका नकाशा | १५२ |
| क | लाभार्थ्यांची मुलाखत अनुसूची | १५३ |
| ड | ग्रामसेवकांसाठी मुलाखत अनुसूची | १६३ |
| इ | विस्तार अधिकारीसाठी मुलाखत अनुसूची | १६५ |
| ई | निरीक्षण सूची | १६७ |
| उ | कुटुंब तक्ता | १६९ |

# सारणी व आलेख सूची

## अ) सारणी सूची


| सारणी क्र. | सारणीचे शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | योजने अंतर्गत केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा (२००८-१२) | १२ |
| १.२ | योजने अंतर्गत केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा (२०१३ पासून पुढे) | १२ |
| ४.१ | लाभार्थी कुटुंबांचा सामाजिक प्रवर्गानुसार तपशील | ४६ |
| ४.२ | लाभार्थी कुटुंबांचा धर्मनिहाय तपशील | ४७ |
| ४.३ | इंदिरा आवास योजनेच्या माहितीचा स्त्रोत | ५० |
| ४.४ | ग्रामसभेत प्रतिक्षा यादी संदर्भात झालेल्या चर्चेचा तपशील | ५२ |
| ४.५ | घरकुल बांधकामासंबंधी करारनामा तपशील | ५५ |
| ४.६ | घरकुल बांधकामासाठी प्राप्त रक्कमेचा तपशील | ५९ |
| ४.७ | घरकुल बांधकामासाठी प्राप्त रक्कमेचा टप्पेनिहाय तपशील | ६० |
| ४.८ | घरकुल बांधकामातील लाभार्थी हिस्सा तपशील | ६१ |
| ४.९ | अनुदान प्राप्तीसाठी लाभार्थी बँक खात्याचा तपशील | ६३ |
| ४.१० | शौचालय बांधकामासाठी आर्थिक स्त्रोताचा तपशील | ६६ |
| ४.११ | घरकुल बांधकामाविषयी लाभार्थी प्रशिक्षणाचा तपशील | ६८ |
| ४.१२ | घरकुल बांधकामाविषयी मिळालेल्या मार्गदर्शनाचा तपशील | ६९ |
| ४.१३ | घरकुलाचे बांधकाम कोणामार्फत पुर्ण करण्यात आले | ७० |
| ४.१४ | घरकुल  बांधकामाविषयी मिस्त्री प्रशिक्षणाचा तपशील | ७१ |
| ४.१५ | घरकुल  बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र प्राप्तीचा तपशील | ७२ |
| ४.१६ | घरकुल बांधकामासंबंधीत प्रत्यक्ष निरीक्षणात आलेल्या घटकांचा तपशील | ७३ |
| ४.१७ | घरकुल लाभापूर्वीचा लाभार्थी निवाऱ्याचा तपशील | ८० |
| ४.१८ | घरकुल लाभापूर्वीचा शौचालय सुविधेचा तपशील | ८५ |
| ४.१९ | घरकुल लाभापूर्वीचा न्हाणीघर सुविधेचा तपशील | ८७ |
| ४.२० | घरकुल लाभापुर्वीची पिण्याच्या पाण्याची उपलब्ध सुविधा | ९१ |
| ४.२१ | घरकुल लाभापुर्वी स्वयंपाकासाठी उपलब्ध सुविधेचा तपशील | ९५ |
| ४.२२ | घरकुलातील वीज सुविधेच्या उपलब्धतेचा स्त्रोत | ९६ |
| ४.२३ | घरकुल लाभापुर्वी वीजेच्या उपलब्ध सुविधेचा तपशील | ९९ |
| ४.२४ | घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबांच्या सद्य शैक्षणिक स्थितीचा तपशील | १०२ |
| ४.२५ | लाभार्थी कुटुंबातील सदस्यांच्या वयोगटानुसार शैक्षणिक स्थितीचा तपशील | १०३ |

| सारणी क्र. | सारणीचे शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.२६ | घरकुलाचा मुलांच्या शिक्षणासाठी झालेला उपयोग | १०४ |
| ४.२७ | घरकुल लाभापुर्वी मुलांच्या शिक्षणासाठी उपलब्ध सुविधेचा तपशील | १०६ |
| ४.२८ | ६ ते २३ वयोगटातील मुलांच्या रोजगार स्थितीचा तपशील | ११० |
| ४.२९ | सद्यस्थितीत कुटुंबातील सदस्यांच्या रोजगार स्वरुपाचा तपशील | १११ |
| ४.३० | घरकुल लाभापूर्वी कुटुंबांच्या रोजगार स्वरूपाचा तपशील | ११३ |
| ४.३१ | लाभार्थी कुटुंबातील काम करणाऱ्या सदस्यांच्या वेतनाचे स्वरूप | ११५ |

## ब) आलेख सूची


| आलेख क्र. | आलेखाचे शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.१ | लाभार्थ्यांचा लिंगनिहाय तपशील | ४८ |
| ४.२ | लाभार्थी कुटुंबातील सदस्यांचा लिंगनिहाय तपशील | ४९ |
| ४.३ | पात्रता निकषानुसार लाभार्थ्यांचा संख्यात्मक तपशील | ५३ |
| ४.४ | लाभार्थी घरकुल मंजुरीचा वर्षनिहाय तपशील | ५७ |
| ४.५ | घरकुल बांधकाम क्षेत्रफळासबंधी तपशील | ५८ |
| ४.६ | घरकुल बांधकामासाठी लागलेला कालावधी | ६५ |
| ४.७ | शासनाकडून उपलब्ध झालेल्या पर्यायी रस्ता/पायवाटेच्या सुविधेचा तपशील | ८१ |
| ४.८ | घरकुलात शौचालयाची सुविधा व वापर यासंबंधीचा तपशील | ८३ |
| ४.९ | पिण्यायोग्य पाण्याच्या उपलब्ध स्त्रोतांचा तपशील | ८९ |
| ४.१० | निर्धुर चूलीच्या उपलब्धतेचा तपशील | ९३ |
| ४.११ | सद्यस्थितीत घरकुलात स्वयंपाकासाठी उपलब्ध सुविधेचा तपशील | ९४ |
| ४.१२ | सामाजिक सुरक्षेसंबंधीत इतर योजनांच्या लाभाचा तपशील | १०१ |
| ४.१३ | लाभार्थी कुटुंबातील सदस्यांच्या रोजगार स्थितीचा तपशील | १०८ |

# प्रकरण पहिले
# संशोधन विषयाची ओळख

## १ प्रस्तावना :

'स्वतःचे घर' ही मानवाची मुलभूत गरज आहे व या गरजेच्या पुर्ततेसाठी माणूस सतत प्रयत्नशील असतो. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला निवाऱ्याची सुविधा उपलब्ध होईल ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. यानुसार समाजातील अनुसूचित जाती व जमातीचे सदस्य, दुर्बल, दुर्लक्षित, वंचित घटक आणि दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचित जाती व जमातीतील गरिब कुटुंबांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळवून देण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक घरकुल प्रकल्प राबविण्यात आले आहेत. त्यापैकी भारतातील 'इंदिरा आवास योजना' ही सर्वात व्यापक व अत्यंत महत्त्वाची घरकुल योजना आहे. त्यामुळे संशोधन अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या या योजनेची पार्श्वभूमी व त्यासंबंधीत महत्त्वाच्या बाबींची माहिती घेणे महत्त्वपूर्ण ठरते.

यानुसार घराचे अर्थ व प्रकार, घराची संकल्पना, व्यक्तीच्या जीवनातील घराचे महत्त्व, तसेच योजनेची पार्श्वभूमी व व्याप्ती, लाभार्थी गट, योजनेतील महत्त्वाचे घटक, योजनेतील आर्थिक तरतुद व कार्यकारी यंत्रणा, भारतात तसेच महाराष्ट्रात राबविण्यात आलेल्या इतर घरकुल योजनांची माहिती, संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने योजनेचे महत्त्व, अभ्यास विषयाची व्याप्ती, अभ्यास निवडीचे क्षेत्र व अभ्यासाची नितीमूल्ये इ. ची सविस्तर मांडणी सदर प्रकरणामध्ये करण्यात आली आहे.

## १.१ 'घर' : अर्थ व प्रकार :

'घर' या शब्दाचा विचार केल्यास केवळ चार उभ्या भिंती व त्यावर छप्पर अशी मर्यादित प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहते. मात्र त्यापलीकडेही 'घर' या शब्दाचे खुप वेगवेगळे व व्यापक अर्थ व्यक्त होत असल्याचे दिसून येते. जसे की, मराठी भाषेतील 'घर' या शब्दासाठी इंग्रजी भाषेत 'HOME' व 'HOUSE' असे दोन शब्द असून त्यातून घराचे वेगवेगळे अर्थ स्पष्ट होताना दिसतात. 'HOME' म्हणजे व्यक्ती व त्याच्या कुटुंबाचे राहण्याचे ठिकाण वा स्वतःचे घर असा अर्थ निघतो, तर 'HOUSE' म्हणजे विशिष्ट कामासाठी बांधलेली इमारत, रंगमंदिर, घराणे, घर पुरविणे, थिएटर या सर्वांचा अर्थ घर

असा होतो. त्याचबरोबर जर या दोन शब्दांचा व्यापक अर्थ विचारात घेतला तर 'HOME' या शब्दातून 'व्यक्तीचे आनंददायी जीवन (Happiness) व्यथीत करण्याचे ठिकाण' असा अर्थ व्यक्त होतो, तर 'HOUSE' या शब्दातून 'व्यक्तीच्या संरक्षणासाठी (Protection) गरजेचे असलेले ठिकाण' असा अर्थ व्यक्त होतो. म्हणजेच ज्या व्यक्ती वा कुटुंबाकडे स्वतःचे घर नाही त्यांच्यासाठी घर म्हणजे त्यांची गरज व सरंक्षणासाठी अत्यंत आवश्यक असते. त्याचबरोबर ज्या व्यक्तींकडे हक्काचा निवारा आहे त्यांच्यासाठी घर म्हणजे आंनददायी व आरामदायी जीवन जगण्याची जागा असा अर्थ असतो. त्याचप्रमाणे साधारणपणे इंग्रजी भाषेत असे म्हणतात की, 'Buy a Home' and 'Sell a house'. [१]

थोडक्यात 'घर' म्हणजे असे ठिकाण की, ज्याद्वारे व्यक्तीस नैसर्गिक घटक वा आपत्तीपासून संरक्षण मिळते. तसेच ज्या ठिकाणी व्यक्ती आपला आहार, विश्रांती, मनोरंजन, पालनपोषण, आरोग्य, शिक्षण, उत्पन्न इ. दैंनदिन दिनचर्या पूर्ण करु शकतो. त्याचबरोबर प्रेम, राग, काळजी, आनंद, दुःख यांसारख्या या भावनात्मक बंधाने एकमेकांशी जोडल्या गेलेल्या व्यक्तीसोबत एकत्रितपणे राहू शकतो व या भावनांची देवाण-घेवाण करु शकतो असे ठिकाण म्हणजेच घर.[१]

### १.१.१ घरांचे प्रकार :

व्यक्तीच्या जीवनात संरक्षण, आनंद मिळविणे, दैनदिन गरजांची तसेच भावनिक सहवास मिळविण्याचे ठिकाण म्हणजे घर. त्यानुसार 'घर' हे ठिकाण वेगवेगळ्या प्रकारचे असते. प्रामुख्याने यामध्ये व्यक्तीच्या आर्थिक कुवतीप्रमाणे घरांचे कमी, मध्यम व उच्च दर्जाचे घर असे प्रकार पडताना दिसून येतात. मात्र प्रामुख्याने घरांची दोन प्रकारात विभागणी केली जाऊ शकते ती म्हणजे कच्चे घर व पक्के घर.

**अ)** **कच्चे घर** : तात्पुरत्या स्वरुपातील निवाऱ्याची व्यवस्था. या घराच्या बांधकामामध्ये प्रामुख्याने उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा जास्त वापर केलेला असतो. यामध्ये गवत, बांबू, लाकूड, पेंढा व कोरडी पाने, चिखल तसेच अतिशय स्वस्त व सहज उपलब्ध होणाऱ्या सामग्रीचा वापर केलेला असतो. घराचे छप्पर हे हलक्या दर्जाचे असते. अशा घराच्या बांधकाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याने घरांची वारंवार डागडूजी व पुर्नबांधकाम करावे लागते. अशी घरे प्रामुख्याने अतिशय दुर्गम, ग्रामीण तसेच आदिवासी भागात पहावयास मिळतात.

तंबू, तांडा किंवा काफला, अतिशय थंड प्रदेशातील 'इग्लू' सारखी घरे तसेच झोपडी इ. प्रकारची घरे ही तात्पुरत्या स्वरुपातील सुविधेसाठी असल्याने त्यांचा समावेश 'कच्चे घर' या प्रकारात होतो.

**ब)** **पक्के घर** : मजबूत, भरीव व कायमस्वरुपी निवाऱ्याची व्यवस्था. पक्क्या घरांची बांधकामे ही विशिष्ट तंत्रज्ञान वापरुन केलेली असतात. मजबूत लाकूड, दगड, वीटा, सिमेंट-कॉंक्रीट, चिकनमातीच्या व नक्षीच्या फरशी, लोखंड व स्टीलसारख्या धातुंचा वापर करुन मजबूत, टणक व दिर्घकाळ टिकाऊ स्वरुपात घरांचे बांधकाम करण्यात येते. अशी घरे अधिक दिमाखदार, मोहक व आकर्षक दिसतात. पक्क्या घरांचे बांधकाम मजबूत व टिकाऊ असल्याने अशा घरांची वारंवार डागडुजी व पुर्नबांधणी करावी लागत नाही. अनेक वर्षे अशी घरे चांगल्या स्थितीत टिकून राहतात.

प्रामुख्याने बंगला, फॅल्टस्, कॉटेजस्, व्हीलाज् इ. प्रकारच्या घरांचा समावेश पक्क्या घरांमध्ये होतो.[२]

## १.२ **'घर' ही संकल्पना** :

'घर' ही मानवी अस्तित्वाची व उत्कृष्ठ जीवन जगण्याची एक मूलभूत गरज आहे. घर केवळ वैयक्तिक कुटुंबासाठीच नव्हे तर समाजासाठी देखील असते. मुलतः घरे नैसर्गिक घटकांपासून निवारा देतात. एक निवासाचे ठिकाण म्हणून ते व्यक्तीस संरक्षण देते. व्यक्तीच्या सुस्थितीकरीता घर महत्त्वपूर्ण असून व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी ते अत्यावश्यक ठरते. केवळ निवारा व निवास या पलिकडे जाऊन अंतिमतः 'स्वतःचे घर' असण्याची प्रत्येक व्यक्तीची इच्छा असते. ही इच्छा व्यक्तीस मालकी हक्काची व प्रतिष्ठेची जाणीव करून देते, मानसिक समाधान देते, आत्मविश्वास वाढविते. स्वतःचे एक आरामदायी घर असणे ही अंतरिक इच्छेची पूर्तता असून ती नेहमी व दिर्घकाळ उराशी बाळगलेली इच्छा असते. व्यक्तीची इच्छा व पसंतीला आकार देऊन घर हे कुटुंबाला आणि सामाजिक जीवनाला आकार देते.

हक्काचा निवारा प्राप्त झाल्यास व्यक्तींच्या सामाजिक व आर्थिक विकासास चालना मिळते. तसेच व्यक्तीच्या अनेक गरजा व समस्यांचे निवारण होते. समाजातील आर्थिक स्तरानुसार उच्च व मध्यम वर्गीय कुटुंबे काही प्रयत्नाअंती आपल्या 'स्वतःच्या घराचे' स्वप्न पूर्ण करताना दिसून येतात. मात्र या दोन्ही स्तरांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या

अत्यंत मागासलेला, दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा एक सर्वात खालचा स्तर समाजात पहावयास मिळतो. अशा दुर्बल घटकातील व्यक्तींच्या जीवनात 'घर' या घटकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे खऱ्या अर्थाने अशा कुटुंबाना स्वतःचे हक्काचे घर प्राप्त झाले तर त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन घडून येऊ शकते.

समाजातील दुर्बल घटकांना स्वतःचे घर प्राप्त झाल्याने त्यांना स्थिर स्वरुपाचे जीवन लाभते. उदरनिर्वाहासाठी कुटुंबांचे वारंवार होणारे स्थलांतर थांबते व स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. इतर उत्पन्नाच्या साधनांमध्ये वाढ होऊन परिणामी त्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे कुटुंबाच्या राहणीमानात तसेच आर्थिक स्थितीत सुधारणा घडून येण्यास सुरुवात होते. अशा स्थिर स्वरुपाच्या शाश्वत जीवनपध्दतीमुळे व्यक्तीस समाजात विशिष्ट दर्जा प्राप्त होऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात समावेश होण्याची संधीही मिळते.

घरामुळे व्यक्ती व त्याच्या कुटुंबास राहण्यासाठी हक्काची जागा मिळते. मात्र घराबरोबरच कुटुंबाला शुध्द व नियमित पिण्याच्या पाण्याची सुविधा, व्यक्तिगत किंवा सार्वजनिक शौचालये व त्याचा वापर, घरामध्ये निर्धुर चुली अथवा गॅसजोडणी, घरातील तसेच आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता, सांडपाण्याचा योग्य निचरा, घरात वीज, पादचारी मार्ग, रस्ते/जोड रस्ते व इतर भौतिक सोईसुविधाही ओघाने उपलब्ध होतात. यामुळे कुटुंबांना स्थिर स्वरुपाची जीवनपध्दती प्राप्त होते. उपलब्ध सोईसुविधांमुळे व्यक्तिगत व सार्वजनिक आरोग्यामध्ये सुधारणा घडून येते. तसेच कुटुंबातील स्त्रीयांना सामाजिक सुरक्षितता प्राप्त होते. थोडक्यात स्वतःचे घर प्राप्त झाल्याने कुटुंबाना चांगले पर्यावरण, आरोग्य, सुरक्षितता व स्थैयाची हमी मिळते.[३]

म्हणूनच स्वतःचे घर हे प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात खूप महत्त्वाची भूमिका बजावते. घर जसे व्यक्तीच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये महत्त्वाचे योगदान देते तसेच देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीमधील महत्त्वाचा निकष म्हणूनही घर महत्त्वाचे ठरते.

### १.३ स्वत:चे घर किंवा निवारा - मानवी मुलभूत गरज :

अन्न, वस्त्र, निवारा ह्या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत व त्याचबरोबर त्या मानवाच्या मुलभूत हक्कामध्ये देखील समाविष्ट आहेत. व्यक्तीच्या जीवनात विश्रांतीचे, संरक्षणाचे ठिकाण म्हणून घर हे अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडते. त्यानुसार

समाजातील प्रत्येक व्यक्तीला निवारा मिळणे गरजेचे ठरते. परंतु सर्वच व्यक्तींचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होतेच असे नाही. यामध्ये प्रामुख्याने वाढती लोकसंख्या, जागेचा अभाव, आर्थिक कमतरता, शासकीय यंत्रणांची उदासिनता इ. व यासारख्या इतर अनेक अडचणी असल्याचे आपल्याला पहावयास मिळते. त्यामुळे ज्यांच्याकडे स्वतःचे घर नाही असे लोक हे आपल्या आर्थिक स्थितीनुसार स्वतःच्या निवाऱ्याची तात्पुरती व्यवस्था करताना दिसून येतात. जसे की, मध्यमवर्गीय लोक हे भाडे तत्त्वावर घर घेतात, आर्थिक स्थिती बिकट असणारे लोक झोपडपट्टीमध्ये, पत्र्यांचे शेड तसेच मोडक्या व कच्च्या घरांमध्ये राहतात. भटंकती स्वरुपाचे जीवन जगणारे लोक मिळेल त्या जागी तंबू अथवा पाल मांडून त्यात राहतात. अगदीच वाईट स्थितीतील लोक रस्त्यांच्या कडेला उघड्यावर राहत असल्याचे दिसून येते.

व्यक्तीला राहण्यासाठी निवारा मिळणे हे महत्त्वाचे असतेच परंतु निवारा म्हणजेच 'घर' हे व्यक्तीच्या स्वतःच्या मालकीचे वा हक्काचे असणे ही बाब अत्यंत महत्त्वाची असते. कारण घर जर व्यक्तीच्या स्वतःच्या मालकीचे असेल तर त्यातून मिळणारे आत्मीक समाधान व्यक्तीसाठी अधिकच सुखकारक असते. म्हणूनच 'हक्काचा निवारा' ही प्रत्येक व्यक्तीला मुलभूत गरज परिपूर्ण होणे महत्त्वाचे ठरते.

### १.४ 'निवाऱ्याची सुविधा' एक मुलभूत हक्क : आंतरराष्ट्रीय - राष्ट्रीय पार्श्वभूमी

निवाऱ्याची सुविधा मिळविणे हा व्यक्तीचा मुलभूत हक्क आहे. यासाठी आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय पातळीवर कायदेशीर वा नैतिक स्वरुपाची तरतुद असल्याचे दिसून येते. 'संयुक्त राष्ट्र संघटने'तील सदस्य राष्ट्रांनी १९४८ मध्ये एकूण ३० कलमांचा 'मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा' तयार केला व १० डिसेंबर १९४८ रोजी तो स्वीकरला. या जाहिरनाम्यातील कलम ३ ते २१ मध्ये नागरी व राजकीय हक्कांची कलमे असून या कलमांची अंमलबजावणी राष्ट्रांवर बंधनकारक आहे. तसेच कलम २२ ते ३० मध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा समावेश आहे. 'भारत' या संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य राष्ट्र असल्याने या जाहिरनाम्यातील अटींनुसार त्याचा स्वीकार करणे भारतावरही बंधनकारक होते.[४]

सदर जाहिरनाम्यातील १२ व २५ ही दोन कलमे संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. कलम १२ नुसार कोणत्याही व्यक्तीचे खाजगी, कौटुंबिक आयुष्यात मनमानी हस्तक्षेप करता येणार नाही तसेच व्यक्तीचा सन्मान व प्रतिष्ठा यावर अतिक्रमण

करता येणार नाही. तर कलम २५ नुसार प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे व आपल्या कुटुंबाचे आरोग्य व कल्याण साधण्यासाठी आवश्यक जीवनमान राखण्याचा अधिकार आहे व यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकिय सेवा व सामाजिक सेवांचा समावेश होतो. थोडक्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील मानवाच्या किमान मुलभूत गरजांचा विचार करुन त्यासाठी कायदेशीर व नैतिक तरतुद करण्यात आल्याचे दिसून येते. यातील कलम २५ हे राष्ट्रावर बंधनकारक नसले तरी त्याची अंमलबजावणी करणे हे सदस्य राष्ट्रांचे नैतिक कर्तव्य असल्याचे स्वीकारण्यात आले. यानुसार 'निवारा' हा प्रत्येक व्यक्तीचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील 'सर्वसमावेशक' हक्क असल्याचे स्पष्ट होते.[४]

भारत हा 'संयुक्त राष्ट्र संघटनेचा' सदस्य राष्ट्र आहे. त्यामुळे १९४८ मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने व्यक्तीच्या मुलभूत हक्कांचा स्वतंत्र भाग आपल्या राज्यघटनेत समाविष्ट केला. भारतीय घटनेने दोन भागात मानवी हक्कांची तरतुद केली आहे. यानुसार भारतीय राज्यघटनेच्या विभाग तीन मधील मुलभूत हक्कांमधील कलम २१ अंतर्गत व्यक्तीस 'जीविताचा हक्क' बहाल करण्यात आला आहे. त्या अंतर्गत 'निवाऱ्याचा हक्क' समाविष्ट असून तो संशोधन अभ्यासाच्या दृष्टीन महत्त्वपूर्ण आहे. यानुसार प्रत्येक व्यक्तीच्या निवाऱ्याची सोय करणे किंवा स्वतःचे घर उपलब्ध करुन देणे ही शासनाची कायदेशीर जबाबदारी आहे.[५]

तसेच भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागामध्ये कलम ३६ ते ५१ 'अ' मध्ये मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आली आहेत. देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमता नष्ट करुन कल्याणकारी राज्य निर्मितीसाठी मार्गदर्शक तत्त्वे महत्त्वाची ठरतात. त्या अनुषंगाने समाजातील दुर्बल घटकांचे हितरक्षण महत्त्वाचे आहे. म्हणूनच मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला. मार्गदर्शक तत्त्वे ही शासनावर नैतिक व राजकीय दृष्ट्या बंधनकारक असतात. मार्गदर्शक तत्त्वांतील कलम ३९ 'अ' नुसार देशातील सर्व नागरिकांना समान न्यायाची हमी देणे, तसेच कलम ४६ नुसार समाजातील अनुसूचित जाती, जमाती व इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक, आर्थिक विकासाला विशेष हातभार लागेल व त्यांचे सामाजिक अन्याय व शोषणापासून संरक्षण करणे इ. महत्वपूर्ण तत्त्वांचा समावेश आहे. थोडक्यात मार्गदर्शक तत्त्वांनुसार समाजातील अनुसूचित जाती व जमाती, मागासलेले, दुर्बल, दुर्लक्षित घटक जे आपल्या मुलभूत हक्कांपासून वंचित राहतात त्यांच्या विकासासाठी शासनास सतत प्रयत्नशील रहावे लागते.[५]

एकूणच ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला निवारा मिळणे हा मुलभूत हक्क आहे. त्याचप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांनुसार ते शासनावरील नैतिक बंधन असल्याचेही दिसून येते. त्यामुळेच भारतात राष्ट्रीय स्तरावर समाजातील अनुसूचित जाती व जमाती मागासलेले, दुर्बल, दुर्लक्षित घटकांसाठी तसेच ग्रामीण भागातील लोकांसाठी १९९६ मध्ये 'इंदिरा आवास योजना' शासनाने सुरु केली असल्याचे आपणास दिसून येते.

## १.५ निवाऱ्याची सुविधा : भारतातील प्रयत्न

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने २६ जाने. १९५० रोजी 'भारतीय राज्यघटना' स्वीकारली व त्याअनुषंगाने मानवी मुलभूत गरजा व हक्कही. त्यानुसार घटनेतील 'निवाऱ्याची सुविधा' या तत्वानुसार तत्कालीन परिस्थितीनुसार देशातील आवासाच्या योजना किंवा त्यासंबंधी शासकीय प्रयत्नांची पार्श्वभूमी जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

भारतात राष्ट्रीय पातळीवर गृहनिर्माणाची सुरुवात ही प्रामुख्याने १९४७ नंतर म्हणजेच भारत स्वतंत्र झाल्यानंतर झाली होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतात निर्वासितांच्या पुनर्वसनाचा खूप मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे निर्वासितांच्या पुनर्वसनासह देशात 'सार्वजनिक गृहनिर्माण कार्यक्रम' सुरू करण्यात आला. या अंतर्गत १९६० पर्यंत उत्तर भारताच्या विविध भागांमध्ये ५ लाख कुटुंबांना घरे पुरविण्यात आली. तसेच १९५७ मध्ये 'समाज विकास चळवळी' चा एक भाग म्हणून देश पातळीवर व्यक्तींना व सहकारी संस्थांना प्रत्येक घरामागे रू. ५०००/- पर्यंत कर्ज पुरविण्याचा 'ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रम' सुरू करण्यात आला होता. या योजनेअंतर्गत ५ व्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत (१९७९) देशात केवळ ६७००० घरे बांधून झाली. १९८० मधील 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम' यातील 'वेतन रोजगार कार्यक्रम' व 'ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम' १९८३ या दोन्ही कार्यक्रमांतर्गत शासनाने घराचे बांधकाम करण्यास परवानगी दिलेली होती.

भारतामध्ये घरकुल बांधकामाच्या विविध योजना राबविल्या जात होत्या मात्र या संदर्भात कोणतेही सामाईक मापदंड नव्हते. पुढे जून १९८५ मध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबे, अनुसूचित जाती व जमाती आणि वेठबिगारमुक्त कामगार यांच्यासाठी घरे बांधण्यासाठी निधी राखून ठेवण्यात आला. त्याद्वारे 'ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी कार्यक्रमा'ची उपयोजना म्हणून 'इंदिरा आवास योजने'ला सुरुवात झाली.

एप्रिल, १९८९ मध्ये पुर्वीची 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना' व 'ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी योजना' या दोन्ही योजना एकत्रीत करून 'जवाहर रोजगार योजना'(जेआरवाय) सुरु करण्यात आली. त्यामुळे 'ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी कार्यक्रमा'ची उपयोजना म्हणून राबविण्यात येणारी 'इंदिरा आवास योजना' ही 'जवाहर रोजगार योजने'ची उपयोजना म्हणून राबविण्यास सुरुवात झाली. सदर 'जवाहर रोजगार योजने' अंतर्गत अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व वेठबिगार मुक्त कामगार यांच्या घरांसाठी ६% निधीचे वाटप करण्यात येत होते.[३]

## **१.६ इंदिरा आवास योजना : पार्श्वभूमी व सविस्तर माहिती**

राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर समाजातील अनुसूचित जाती व जमाती मागासलेले, दुर्बल, दुर्लक्षित घटकांसाठी विशेषतः ग्रामीण भागासाठी राबविण्यात येणारी 'इंदिरा आवास योजना' ही एक व्यापक स्वरुपाची योजना आहे. सदर योजनेची सविस्तर पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे.

सन १९८९ मध्ये 'जवाहर रोजगार योजने'ची उपयोजना म्हणून 'इंदिरा आवास योजना' राबविली जात होती. पुढे १९९१-९२ मध्ये तीचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करण्यात आले. यात १९८५ ते १९९२ या कालावधीत बांधलेल्या घरकुल बांधकामांचा दर्जा व लाभार्थ्यांचे योजनेबाबतचे समाधान याचा अभ्यास करण्यात आला. मुल्यमापन अहवालाच्या शिफारशीनुसार बिगर अनुसूचित जाती व जमातीतील दारिद्रय रेषेखालील कुटुंबानाही घरकुलांचा लाभ देण्याची आवश्यकता होती. म्हणून १९९३-९४ मध्ये योजनेअंतर्गत बिगर-अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी अतिरिक्त ४% निधीचा वापर करण्यास परवानगी देऊन योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली. म्हणजेच या योजनेअंतर्गत घरांसाठी राखून ठेवलेल्या निधीत १०% पर्यंत वाढ करण्यात आली.

'इंदिरा आवास योजना' ही 'जवाहार रोजगार योजने' ची उपयोजना असताना अनुसूचित जाती व जमाती तसेच वेठबिगार मुक्त कामगार यांच्यासाठी ६% व बिगर अनुसूचित जाती व जमातीसाठी ४% असे एकूण १०% एवढ्याच निधीच्या वाटपाची मर्यादा होती. परंतु देशातील गरिबी कमी करण्यासाठी, विविध ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांचा लाभ लाभार्थ्यांना मिळणे शक्य व्हावे यासाठी तसेच गरिब कुटुंबाना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी १ जानेवारी १९९६ पासून 'इंदिरा आवास योजना' ही एक स्वतंत्र योजना तयार करण्यात आली. देशातील ग्रामीण दारिद्रय निर्मुलनाचा मोठा भाग

म्हणून ग्रामीण विकास मंत्रालयातर्फे ‘इंदिरा आवास योजना’ हा एक मोठा कार्यक्रम संपूर्ण भारतात राबविण्यास सुरुवात झाली.[३]

**१.६.१ योजनेचे मुख्य उद्दिष्ट्य** :

अनुसूचित जाती व जमातीचे सदस्य, मुक्त वेठबिगार आणि ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचित जाती व जमातीच्या गरीब व्यक्ती यांना सहाय्यक अनुदान देऊन त्यांच्या राहत्या घराच्या बांधकामासाठी मदत करणे हे योजनेचे मुळ उद्दिष्ट्य आहे.

**१.६.२ विशेष लाभार्थी निवडीचा प्राधान्यक्रम** :

- आदिम जमाती (माडिया, गोंड, कोलम, कातकरी इ.)
- वनहक्क कायद्याचे लाभार्थी
- अस्वच्छ व्यवसाय करणारे/डोक्यावर मैला वाहून नेणारे
- मुक्त केलेले वेठबिगार कामगार
- कठिण परिस्थितीला तोंड देणाऱ्या महिला : उदा. विधवा, परित्यक्ता, अत्याचार ग्रस्त महिला, ज्यांचा पती ३ वर्षापासून बेपत्ता आहे अशा महिला, महिला कुटुंब प्रमुख असेलेली कुटुंबे, एकच मुलगी असणारे कुटुंबे इ.
- शारिरीक व मानसिक विकलांगता (किमान ४०%)
- तृतीय पंथी
- पोलिस, सैन्य व अर्ध सैनिक दलातील शहीदांचे वारसदार (बिगर दारिद्रय रेषेखाली नसले तरीही)
- ज्या कुटुंबातील सदस्य कर्करोग, कुष्ठरोग व एड्स संर्सगित आहेत असे सदस्य
- उर्वरित प्रतिक्षा यादीतील नावे इ.[३]

**१.६.३ योजनेचा विशेष प्रकल्प** :

सदर योजनेच्या नियतवाटपाच्या ५% नियतवाटप खालील घटकांसाठी राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना राखीव निधी म्हणून ठेवता येतो.

अ. नैसर्गिक आपत्ती ग्रस्तांचे पुनर्वसन

ब. दंगली व हिंसाचार ग्रस्तांचे पुनर्वसन

क. वेठबिगार कामगार व अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाचे पुनर्वसन

ड. व्यवसायामुळे विशिष्ट आजारांना बळी पडणारी कुटुंबे आणि विशिष्ट भूप्रदेशात पसरणारे आजार उदा. काळा आजार इ.

इ. वन हक्क कायदा २००६ चे लाभार्थी

ई. आंतरराष्ट्रीय सीमा निर्धारण करताना पुनर्वसित करावी लागणारे कुटुंबे

उ. नवीन तंत्रज्ञानाचा प्रायोगिक तत्त्वावर वापर (उदा. स्वस्त व पर्यावरण पूरक घरे)[३]

**१.६.४ योजनेतील घटक** :

'इंदिरा आवास योजने'ची अंमलबजावणी करताना केंद्र शासनाने तयार केलेल्या मार्गदर्शिकेनुसार लाभार्थ्यांना खालील स्वरुपात साहाय्य करण्यात येते.

**अ)** **नवीन घरे बांधण्यासाठी सहाय्य** : मैदान, डोंगराळ, आणि दुर्गम क्षेत्रांमधील लाभार्थ्यांना नवीन घरे बांधण्यासाठी सहाय्य करण्यात येते. योजनेअंतर्गत 'नविन घर' याचा अर्थ, शौचालय वगळून किमान २० चौ.मी. चे बांधकाम क्षेत्र असलेले घर असा असेल. तसेच, पक्के घर म्हणजे असे की जे, वापरामुळे व हवामान विषयक स्थितींसह, नैसर्गिक शक्तीमुळे होणाऱ्या सर्वसाधारण झीज-तुटीमध्ये, वाजवी देखभाल करुन देखील कमीत कमी ३० वर्षांसाठी टिकून राहण्यास सक्षम असेल. ३० वर्षांपर्यंत टिकण्याची क्षमता साध्य करण्यास मदत करणाऱ्या कोणत्याही बांधकाम तंत्रज्ञानाचा शासन स्विकार करु शकेल, त्यात विशिष्ट नमुन्यांमध्ये बांधलेल्या चिखल व बांबूच्या घरांचाही समावेश असेल.

थोडक्यात आजुबाजूच्या परिसराच्या नैसर्गिक व हवामान विषयक स्थितींचा सारासार विचार करुन, बचावात्मक व पक्क्या स्वरुपात किमान ३० वर्षापर्यंत योजनेअंतर्गत बांधण्यात आलेले नविन घर हे सुस्थितीत राहील, असा अर्थ सदर योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या 'नविन व पक्के घर' याचा निघतो.

**ब)** **कच्च्या किंवा मोडकळीस आलेल्या घरांची सुधारणा (दर्जावाढ)** : यामध्ये छताची, भिंतीची सुधारणा व तत्सम गोष्टींची दुरुस्ती करणे/बदल करणे यांचा अंतर्भाव

होतो. सुधारणेमध्ये, साहित्यांचा पुनर्वापर करता येईल. अतिरिक्त साहित्याचा वापर करणे, साहित्य बदलणे, टिकावुपणा वाढविण्याकरिता संरचनेत बदल करणे आणि उत्तम कारागिरी यांद्वारे वाजवी देखभाल करुन किमान ३० वर्षांपर्यंत घर टिकू शकते.

**क)** **घराच्या जागांची तरतूद** : भूमिहीन गरीब लोक हे अत्यंत दुर्बल असून ते बेघर (निराश्रित) असतात तसेच घर बांधण्यासाठी त्यांच्याकडे जमीनही नसते ही दुहेरी गैरसोय त्यांना सोसावी लागते. अशा लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा पुरविण्यास सहाय्य देण्यात येते.[३]

वरील अटी पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यास सहाय्यभूत ठरणे हा शासनाचा उद्देश आहे.

**१.६.५ योजनेअंतर्गत घरकुलांचे बांधकाम व बांधकाम विषयक मानके** :

योजनेअंतर्गत सपाट व टिकाऊ साहित्याचे छप्पर, नमुनेदार बांधकाम संरचना असलेले विटा व सिमेंट काँक्रेट सारख्या पारंपारिक साधनांचा वापर करुन केलेले एक दर्जेदार पक्क्या स्वरुपाचे घर. तसेच चांगल्या दर्जाच्या बांधकाम पध्दतीमध्ये नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हायब्रिक वॉल, रॅट-ट्रफ बाँड, जाळीची भींत, फिलर स्लॅब, कमानी, चौकट विरहीत दरवाजे व खिडक्या, रुब्बेल मॅसोनरी, विशिष्ट नमुन्यात झालेले बांबूचे, चिखलाचे, फर्निचरमधील बांधकाम इ. चा समावेश होऊ शकतो.

तसेच घराचे बांधकाम हे नैसर्गिक पर्यावरणाशी सुसंगत असेल. त्यानुसार नैसर्गिक आपत्ती प्रवण क्षेत्रात आपत्ती निवारक वैशिष्ट्ये असलेले घराचे बांधकाम असेल. नैसर्गिकदृष्ट्या आवश्यक असल्यास घरांना प्लॅस्टरिंग व रंगकाम केलेले असेल. विकलांग व्यक्तींच्या दृष्टीने घरामध्ये सुरळीत व मुक्तपणे ये-जा करता येईल अशी संरचना असेल. उपजीविकेची कामांसाठी पुरेशी जागा, वऱ्हांडा, घर माथ्यावर जाण्यासाठी जिन्याची सोय असू शकेल.

वरील सर्व घटकांचा विचार करुन व जी घरे साधारण देखभाल करुन कमीत-कमी ३० वर्षापर्यंत टिकू शकतात अशी घरे या योजनेअंतर्गत अपेक्षित आहेत.[३]

### १.६.६ योजनेच्या अंमलबजावणीकरीता केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा :

योजनेअंतर्गत २००८ ते २०१३ या कालावधीत केंद्र व राज्य शासनामार्फत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या लाभाचे स्वरुप (रक्कम) खालीलप्रमाणे होते.

**सारणी क्र. १.१**

**योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा (सन २००८ ते २०१२)**

| अ. क्र. | घटक/बाब | अनुदान रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | केंद्रशासन अनुदान (रुपये ४५,०००/- मध्ये ७५% प्रमाणे) | ३३,७५०/- |
| २ | राज्यशासन अनुदान (रुपये ४५,०००/- मध्ये २५% प्रमाणे) | ११,२५०/- |
| ३ | राज्य अतिरिक्त हिस्सा | २३,५००/- |
| ४ | लाभार्थीचा हिस्सा (मजुरी स्वरुपात) | १,५००/- |
| **एकूण** | | **७०,०००/-** |

योजनेअंतर्गत सन २०१३-१४ पासून केंद्र व राज्य शासनामार्फत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या लाभाचे स्वरुप (रक्कम) खालीलप्रमाणे आहे.[६]

**सारणी क्र. १.२**

**योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा (सन २०१३ पासून पुढे)**

| अ. क्र. | घटक/बाब | अनुदान रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | केंद्रशासन अनुदान (रुपये ७०,०००/- मध्ये ७५% प्रमाणे) | ५२,५००/- |
| २ | राज्यशासन अनुदान (रुपये ७०,०००/- मध्ये २५% प्रमाणे) | १७,५००/- |
| ३ | राज्य अतिरिक्त हिस्सा | २५,०००/- |
| ४ | लाभार्थीचा हिस्सा (मजुरी स्वरुपात) | ५,०००/- |
| **एकूण** | | **१,००,०००/-** |

### १.६.७ योजनेअंतर्गत बांधकामाचे टप्पे व निधी वितरण :

एकूण ३ टप्प्यामध्ये निधीचे वितरण करण्यात येते ते पुढीलप्रमाणे :

**प्रथम टप्पा :** घराचा करारनामा झाल्यानंतर २५% रक्कम वितरित करण्यात येते.

**दुसरा टप्पा** : लिन्टेल लेवेलपर्यंत बांधकाम पूर्ण झाल्यावर ६०% पर्यंत रक्कम वितरित करण्यात येते.

**तिसरा व अंतिम टप्पा** : शौचालयासह घरकुल बांधकाम पूर्ण करुन घर राहण्यायोग्य झाल्यावर (यामध्ये प्लास्टर, फरशी इ. आवश्यक नाही) घरकुलाची उर्वरित रक्कम वितरित करण्यात येते.

थोडक्यात योजनेअंतर्गत घरकुल बांधकाम एकूण १८ महिन्यात पूर्ण करणे गरजेचे आहे. यामध्ये पहिला हप्ता दिल्यापासून ९ महिन्यात लिन्टेल पर्यंत बांधकाम पुर्ण व दुसरा हप्ता दिल्यापासून पुढील ९ महिन्यात घरकुल पुर्ण होणे आवश्यक आहे. अशा प्रकारे वरील टप्प्यानिहाय घरकुल बांधकामाचा निधी वितरित करण्यात येतो.[३]

### १.६.८ योजनेची कार्यकारी यंत्रणा : पंचायतराज यंत्रणाची भुमिका

योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हा पातळीवर पंचायतराज ही महत्त्वपुर्ण अशी कार्यकारी यंत्रणा आहे. तसेच या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये ग्राम पंचायतींना अत्यंत महत्त्वाची भुमिका आहे.

**अ) ग्राम पंचायत : भुमिका**

- लोकांमध्ये योजनेसंबंधी जनजागृती करणे.
- लाभार्थ्यांची निवड सूची अंतिम करण्यासाठी ग्रामसभेत मंजुरी घेणे.
- स्वतःची घरे बांधू न शकणारी कुटुंबे ग्रामसभेत निश्चित केले जातात व अशा लाभार्थ्यांना वेळेत घरे बांधण्यास अशासकीय संघटना व नागरी समाज संघटना ग्रामसभेमार्फत निश्चित केल्या जातात.
- गावस्तरावर राबविण्यात येणाऱ्या इतर योजनांचे एकत्रीकरण करणे.
- योजनेचे सामाजिक लेखा परीक्षण करणे.
- योजना कार्यवाहीसाठी ग्रामपंचायतीत एक विशेष कार्य समिती स्थापन करणे.

**ब)** **पंचायत समिती : भुमिका**

- घरकुल बांधकाम साहित्य व तंत्रज्ञानाच्या संबंधात तांत्रिक सहाय्य पुरविणे.
- लाभार्थ्यांच्या घरकुलासंबंधीत समस्यांचे निवारण करणे.
- योजनेचे क्षेत्रस्तरीय सनियंत्रण व अहवाल जिल्हा परिषदेस सादर करणे.

**क)** **जिल्हा परिषद :**

- सदर योजनेच्या मार्गदर्शक सचूनेनुसार विविध तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जात आहे किंवा नाही हे पाहणे.
- योजना अंमलबजावणीचे सनियंत्रण व सुरळीत निधी वाटपाची खात्री करणे.
- योजनेअंतर्गत निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे.[३]

अशा प्रकारे देशातील विशेषतः ग्रामीण भागाकरीता 'इंदिरा आवास योजना' ही सर्वसमावेशक अशी महत्त्वाची घरकुल योजना ठरली आहे. सदर योजनेमध्ये समाजातील सर्व जाती-जमाती, दारिद्रय रेषेखालील, वंचित, दुर्लक्षित घटकांचा समावेश केलेला आहे. ही योजना भारतातील सर्व राज्यांमध्ये राबविली जात आहे.

**१.६.९ इंदिरा आवास योजना : भारतातील कामगिरी (आकडेवारी) :**

ग्रामीण विकास विभाग, भारत सरकार मार्फत २०१४ मध्ये योजनेची कामगिरी व योजनेतील बदलांविषयी माहिती देण्यासाठी Briefing Book तयार करण्यात आले होते. त्यातील उपलब्ध आकडेवारी नुसार योजनेअंतर्गत १९९६ ते जुलै २०१४ पर्यंत भारतामध्ये एकूण ३२०.५५ लाख कुटुंबाना घरे पुरविण्यात आलेली आहेत. त्यासाठी रुपये १,०५,५१८.८५ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली. तसेच सन २००७ ते २०१४ या कालावधीत योजनेअंतर्गत भारतात एकूण १९५.१३ लाख घरकुलांचे उद्दिष्ट्य साध्य करावयाचे होते. यानुसार १९५.१३ लाख घरकुलांपैकी १६४.४५ लाख घरकुलांचे उद्दिष्ट्य पुर्ण झाले आहे. सदर आकडेवारीवरुन स्पष्ट होते की, 'इंदिरा आवास योजना' समाजातील दुर्बल घटकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत आहे.[७]

## १.७ महाराष्ट्रातील आवासाच्या योजना : संक्षिप्त आढावा

संपुर्ण महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागातील दुर्बल घटकांसाठी व्यापक स्वरुपाची केंद्र शासन पुरस्कृत 'इंदिरा आवास योजना' राबविली जात आहे. परंतु या योजने व्यतिरिक्त महाराष्ट्रात ग्रामीण भागातील दुर्बल घटकांसाठी शासकीय विभागांमार्फत आवासाच्या वेगवेगळ्या योजना राबविल्या जात आहेत किंवा पूर्वी राबविल्या गेल्या आहेत. सदर योजनांचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे आहे.

### १.७.१ महाराष्ट्र राज्य : गृहनिर्माण विभाग

राज्यात 'इंदिरा आवास योजने' सारख्या योजनांचा लाभ राज्यातील दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील अल्प उत्पन्न गटातील ज्या कुटुंबाना मिळू शकला नाही, त्यांच्यासाठी विशेष घरकुल बांधणीच्या योजना राबविण्याचे राज्य शासनाने २००५ मध्ये ठरविले. त्यानुसार राज्यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत योजना राबविण्यात येत आहेत. राज्य शासनाच्या गृहनिर्माण विभागामार्फत ग्रामीण भागाकरिता आजवर पुढील योजना राबविण्यात आल्या किंवा येत आहेत.

अ) **राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र १** : राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील बेघर/कच्चे घर धारकांसाठी शासनाने दिनांक २० एप्रिल २००६ अन्वये ही योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाकरिता ५१,५१० घरकुले बांधण्याचे ठरविण्यात आले होते.[८]

ब) **सुवर्ण महोत्सवी ग्रामीण निवारा हक्क मोहिम** : 'राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र. १' चा सुधारित व दुसरा टप्पा म्हणून ही मोहिम राबविण्यात आली. या नुसार ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाकरिता २००९ ते २०१२ या कालावधीत प्रतिवर्षी २१,००० घरकुले बांधण्याचे ठरविण्यात आले होते.[८]

क) **राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र २** : ही योजना राज्य शासनामार्फत २७ ऑगस्ट २००८ मध्ये सुधारित स्वरुपात राबविण्यात आली. या योजनेत घरकुलाचे बांधकाम लाभार्थ्यांने स्वतः करावयाचे होते. तसेच रुपये १,००,०००/- प्रती लाभार्थी याप्रमाणे एकूण १,२५,००० घरकुले दोन वर्षात बांधण्यात येणार होती.[८]

### १.७.२ आदिवासी विकास विभाग :

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठी पुढील घरकुल योजना राबविल्या जात आहेत.

**अ)** **शबरी आवास योजना** : शासननिर्णय क्र. २०१२/प्र.क्र.३८(भाग १)/का-१७, दिनांक २८ मार्च २०१३ अन्वये आदिवासी क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या व आदिवासी बाह्य क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ही योजना राबविली जात आहे.[८]

**ब)** **पारधी विकास कार्यक्रम** : आदिवासी उपयोजनेअंतर्गत 'पारधी समाजातील लाभार्थ्यांकरिता घरकुल बांधकाम' करणे हा उपक्रम राबविला जात आहे. तसेच शासननिर्णय क्र. घरकुल २०१६/प्र.क्र. ३७/का-१७, दिनांक २७ मे २०१६ नुसार या कार्यक्रमाखाली मंजुर केलेली घरकुले 'शबरी विकास योजने'च्या निकषानुसार बांधण्याचे सुचविण्यात आले आहे.[८]

### १.७.३ सामाजिक न्याय विभाग :

सामाजिक न्याय विभागामार्फत ग्रामीण भागामध्ये आवासासंबंधीत पुढील योजना सद्यस्थितीत राबविण्यात येत आहे.

**अ)** **रमाई आवास योजना** : महाराष्ट्रात दि. ९ मार्च २०१० पासून ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचीत जाती व नवबौध्द नागरिकांना स्वतःच्या जागेवर २६९ चौ.फुटाचे पक्के घर बांधण्यासाठी अनुदान दिले जाते. तसेच २०१० ते २०१२ या कालावधीत दारिद्रय रेषेखालील बेघर कुटुंबाच्या प्रतिक्षा यादीतील अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्यक्रमाने योजनेचा लाभ देण्यात आला आहे. यामुळे काही जिल्ह्यातील प्रतिक्षा यादीतील अनुसूचित जातीचे लाभार्थी संपुष्टात आले आहेत.[८]

### १.७.४ इंदिरा आवास योजना व महाराष्ट्र :

महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण विकास विभागामार्फत ही योजना राबविण्यात येते. सदर योजना केंद्रशासन पुरस्कृत असून यामध्ये राज्य शासनाचा २५% हिस्सा आहे. महाराष्ट्रात मुंबई शहर व मुंबई उपनगर ही दोन महानगरे वगळता ३४ जिल्हे, ३५१ तालुके व २८,००० ग्रामपंचायती मार्फत ही योजना राबविली जात आहे.[३]

जणगणना अहवाल २०११ नुसार महाराष्ट्रामधील ५४.७७% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते.[९] तसेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये बहुतांश कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहेत. अशा कुटुंबांची आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक परिस्थिती बिकट असते. अशा कुटुंबाचे 'स्वतःचे घर' नसल्याने ते झोपडीत किंवा पडक्या घरामध्ये राहताना दिसून येतात. यामुळे त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेस तडा जातो. अशा कुटुंबांना सुध्दा उत्कृष्टरित्या जीवन जगण्याची गरज आहे. त्यांना 'स्वतःचे घर' मिळावे व त्यांच्या आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक परिस्थितीमध्ये बदल व्हावा या कारणास्तव महाराष्ट्रात ही योजना महत्त्वाची आहे.

### १.७.५ इंदिरा आवास योजना : महाराष्ट्रातील कामगिरी (आकडेवारी)

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत १९९६ ते जुलै २०१४ पर्यंत महाराष्ट्र राज्यात एकूण १६,२६,६०९ कुटुंबाना घरकुलांचा लाभ देण्यात आला आहे. सदर योजने अंतर्गत केंद्राकडून सन २००८ ते २०१४ या कालावधीत महाराष्ट्रासाठी एकूण ९,५६,५४२ घरांचे उद्दिष्ट्य देण्यात आले होते. त्यापैकी ८,१३,४०० इतक्या घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सदर योजना महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील समाजातील दुर्बल घटकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.[१०]

अशा प्रकारे महाराष्ट्रात ग्रामीण भागातील दुर्बल घटकांसाठी आवासाच्या विविध योजना राबविल्या गेल्या किंवा जात असल्या तरी लाभधारकांच्या संदर्भात प्रत्येक योजनेअंतर्गत काही मर्यादा असल्याचे दिसून येते. काही विशिष्ट घटकातील लाभार्थ्यांसाठीच संबंधित योजना मर्यादित आहेत. मात्र 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत समाजातील सर्वच दुर्बल घटकांचा विचार करण्यात आलेला आहे. म्हणूनच ही योजना महाराष्ट्रातील तसेच भारतातील आवासाची सर्वात व्यापक व महत्त्वपूर्ण योजना आहे. तसेच पुणे जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून यामध्ये जुन्नर, आंबेगाव, मावळ, राजगुरुनगर, वेल्हा व मुळशी या तालुक्यांतील सह्याद्री डोंगर रांगाच्या काही भागातच विविध आदिवासी जमातीची कुटुंबे आढळतात.[११]

### १.८ इंदिरा आवास योजना : राष्ट्रीय तसेच राज्य स्तरीय मुल्यमापन अहवाल

भारतात 'इंदिरा आवास योजने'ची सुरुवात झाल्यानंतर राष्ट्रीय स्तरावर तसेच काही निवडक राज्यांमध्ये योजनेचे मुल्यमापन करण्यात आले होते. मात्र यामध्ये महाराष्ट्र

राज्याचा समावेश नसल्याचे दिसून येते. सदर मुल्यमापन अहवालाची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था व पंचायतराज यांच्यामार्फत सन २००५ मध्ये भारतातील १० राज्यांमध्ये 'इंदिरा आवास योजने'चे मुल्यमापन करण्यात आले होते. हे मुल्यमापन १९९९ ते २००४ या कालावधीपुरते मर्यादित होते. सदर मुल्यमापनासाठी महाराष्ट्रातील केवळ वर्धा व नांदेड या दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली होती.[१२]

पुढे भारत सरकारच्या नियोजन विभागामार्फत राष्ट्रीय स्तरावर २०१३ मध्ये भारतातील १२ राज्यांमध्ये 'इंदिरा आवास योजने'चे मुल्यमापन करण्यात आले होते.[१३] यामध्ये प्रामुख्याने उत्तराखंड, पंजाब, केरळ, कर्नाटक, ओरिसा, बिहार, राजस्थान, गुजरात, आसाम, नागालँड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या राज्यांचा समावेश होता. यामध्ये मात्र महाराष्ट्र राज्याचा अंतर्भाव नव्हता. सदर अहवालामध्ये १२ राज्यातील योजनेची कार्यवाही, लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीतील बदल, योजनेची फलनिष्पत्ती इ. चे सविस्तर विश्लेषण देण्यात आले आहे.

तसेच भारतातील काही निवडक राज्यांनी स्वतंत्ररित्या 'इंदिरा आवास योजने'चे मुल्यमापन केले आहे. यामध्ये हरियाणा राज्यामध्ये २००८ ते २०११ मध्ये झालेल्या घरकुलांचा परिणाम (Impact Study) अभ्यासण्यात आला होता.[१४] तसेच मेघालय राज्यामार्फत सदर योजने अंतर्गत २०११-१२ पर्यंत पुर्ण झालेल्या (११ वा पंचवार्षिक आराखडा) घरकुलांचे मुल्यमापन करण्यात आले आहे. या मुल्यमापन अहवालामध्ये काही वेगळे मुद्दे अभ्यासण्यात आलेले होते. जसे की, 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या महिला लाभार्थ्यांचे प्रमाण, त्यामध्ये विवाहित महिला, विधवा महिला तसेच पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे असलेल्या घरकुलांचे प्रमाण इ.[१५]

सदर मुल्यमापन अहवालावरुन भारतातील इतर राज्यांमधील 'इंदिरा आवास योजने'ची कार्यवाही, योजना अंमलबजावणीतील त्रुटी, योजना यशस्वी करण्यासाठी प्रामुख्याने करण्यात आलेले प्रयत्न इ. विषयी माहिती उपलब्ध होते. मात्र अशा स्वरुपात आजवर महाराष्ट्रात 'इंदिरा आवास योजने'चे सविस्तर मुल्यमापन झालेले आढळून येत नाही. यातून महाराष्ट्रामध्ये लाभार्थ्यांना योजनेचा कसा व किती फायदा झाला, त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत नेमकी कोणते बदल घडून आले हे अभ्यासणे अत्यंत

गरजेचे आहे हे लक्षात येते. त्यामुळे महाराष्ट्रात सदर योजनेचे मुल्यमापन होणे आवश्यक असून त्यादृष्टीने संशोधन अभ्यास विषयाचे महत्त्व अधोरेखित होते.

## १.९ सारांश :

सदर प्रकरणामध्ये घराचा अर्थ व प्रकार, घराची संकल्पना, व्यक्तीच्या जीवनातील घराचे महत्त्व या संदर्भातील विवेचन देण्यात आले आहे. प्रामुख्याने इंदिरा आवास योजनेची सविस्तर माहिती प्रकरणात देण्यात आली आहे. त्यामध्ये योजनेची पार्श्वभूमी, लाभार्थी गट, योजनेतील महत्त्वाचे घटक, आर्थिक तरतुद व कार्यकारी यंत्रणा याचा समावेश आहे. तसेच अनुसूचीत जाती व जमाती, दुर्बल, दुर्लक्षित, वंचित घटक व दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचीत जाती व जमातीतील कुटुंबांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळवून देण्यासाठी शासकीय स्तरावर राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणातील एकदंरीत विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, महाराष्ट्रात आजवर 'इंदिरा आवास योजने'चे सविस्तर मुल्यमापन झालेले नसून हे मुल्यमापन होणे अत्यंत आवश्यक आहे.

## १.१० संदर्भ:


१. घराचा अर्थ : http://en.wikipedia.org, http://www.quora.com,

२. घराचे प्रकार Let's Learn: Types of Houses, shyamathanniyil.blogspot.com

३. ग्रामीण विकास मंत्रालय, ग्राम विकास विभाग, नवी दिल्ली (१९९८), "इंदिरा आवास योजना : मागदर्शक सूचना", भारत सरकार, नवी दिल्ली मार्फत.

४. Human Rights - United Nations - "मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा" www.un.org, http://hi.wikipedia.org

५. तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर (जाने २०११), "भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया - खंड १", युनिक अॅकॅडमी प्रकाशन, पुणे.

६. ग्रामप विकास व जलसंधारण विभाग (२०१३), यांचे शासन निर्णय क्र.ईआयो-२०१३/प्र.क्र. २९६/योजना-१०, दिनांक ७ नोव्हेंबर २०१३.

७. Ministry of Rural Development, GoI (July 2014), "IAY Briefing Note" www.iay.nic.in

८. आवासाच्या विविध योजना : शासकीय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या आवास योजनांची माहिती. www.maharahtra.gov.in, www.rdd.maharashtra.in

९. Census of India (जनगणना अहवाल) २०११, www.censusindia.gov.in

१०. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद (२०१४-१५), पुणे. "इंदिरा आवास योजना : प्रगती अहवाल" (संख्यात्मक), सन २००६ ते २०१४.

११. List of Block Having Scheduled Area in Maharashtra, sr.no. District full Scheduled Area portly Rajbhavan Maharashtra. rajbhavan-maharashtra.gov.in

१२. NIRD, Ministry of Rural Development, GoI (2005), "Implementation of IAY : Issues and Achievement : A Nation-Wide Study", Hyderabad. www.nird.org.in

१३. Program Evaluation Organization, Planning Commission, GoI, New Delhi (2013), "Evaluation Study of Indira Awaas Yojna", New Delhi.

१४. Department of Economics and statistical Analysis, Haryana State (2011), "Evaluation Study of Indira Awaas Yojna 2007-2011", Haryana.

१५. Program Implementation and Evaluation Department of Meghalaya (2012), Evaluation Study on "Indira Awaas Yojna(IAY)" In Meghalaya.

# प्रकरण दुसरे
# संदर्भ साहित्याचा आढावा

## २ प्रस्तावना :

सदर संशोधन अभ्यासात योजनेअंतर्गत पुर्ण झालेल्या घरकुलांचे मुल्यमापन करण्यासाठी दुय्यम स्त्रोत म्हणून अनेक संदर्भ साहित्यांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने योजनेशी संबंधीत संशोधन अहवाल, शासननिर्णय, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील कायदेशीर तरतुदी संबंधीत साहित्य, विविध शासकीय योजनांचा तपशील, शासकीय वेबसाईट्स तसेच अभ्यासाशी संबंधीत व उपयुक्त इतर वेबसाईटस् इ. दुय्यम सामग्रीचा समावेश आहे. यानुसार सदर संदर्भ साहित्य व त्यातील सविस्तर माहितीचा तपशील पुढे देण्यात आलेला आहे.

## २.१ संदर्भ साहित्य : शासन निर्णय, पुस्तके व वेबसाईटस्

### २.१.१ आवासाच्या विविध योजना : शासकीय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या आवास योजनांची माहिती www.maharahtra.gov.in, www.rdd.maharashtra.in

**‘ग्रामविकास व पंचायतराज विभाग’**

महाराष्ट्र राज्यात विविध शासकीय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या आवासाच्या योजनांची माहिती सदरील वेबसाईटवरून घेण्यात आली आहे. जसे की, सामाजिक न्याय विभागामार्फत राबविली जाणारी ‘रमाई आवास योजना’, आदिवासी विभागामार्फत चालविली जाणारी ‘शबरी आवास योजना’ व ‘पारधी विकास कार्यक्रम’, गृहनिर्माण विभागामार्फत राबविलेली ‘राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना १ व २’, ‘सुवर्ण महोत्सवी ग्रामीण निवारा मोहीम’ इ. योजनांची तपशीलवार माहिती प्राप्त झाली. तसेच या सर्व योजनांच्या तुलनेत ‘इंदिरा आवास योजने’चे महत्त्व व सर्वसमावेशकता लक्षात येण्यास मदत झाली.

सदर संदर्भ साहित्यातून उपलब्ध झालेल्या सर्व माहितीची सविस्तर मांडणी संशोधन अभ्यासाच्या प्रस्तावनेमध्ये करण्यात आली आहे. याआधारे महाराष्ट्रात राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनांची पार्श्वभूमी लक्षात आली व त्याचा उपयोग संशोधन अभ्यासासाठी करण्यात आला आहे.

### २.१.२ Census of India (जनगणना अहवाल) २०११, www.censusindia.gov.in

जनगणना अहवाल हा माहितीचा वैध स्त्रोत मानला जातो. त्यानुसार संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक असे ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण, दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण तसेच आदिवासी जाती व जमातींच्या लोकसंख्येचे प्रमाण इ. विषयी माहिती घेण्यासाठी जनगणना अहवाल अभ्यासण्यात आला. तसेच प्राप्त आकडेवारीचा संशोधन अहवालात आवश्यक ठिकाणी उपयोग करण्यात आला आहे.

### २.१.३ डॉ. प्रदिप आगलावे (२०१५), "सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र प तंत्रे", श्री संत प्रकाशन, नागपूर.

संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची संशोधन अभ्यास पध्दती ठरविण्यासाठी वरील संदर्भ साहित्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. कोणत्याही विषयाचे संशोधन हे शास्त्रीय पध्दतीने होणे आवश्यक असते. संशोधन अभ्यासाच्या विशिष्ट पध्दती वा पायऱ्यांनुसार संशोधन करणे आवश्यक असते. त्यासाठी संशोधनाची पध्दती अभ्यासण्यात आली. त्या आधारे संशोधन अभ्यासांतर्गत संशोधनाचा आराखडा, नमुना आकार, नमुना निवड, तथ्य संकलनाची साधने व तंत्रे इ. बाबी शास्त्रीय पध्दतीने ठरविण्यात आल्या आहेत.

### २.१.४ ग्रामीण विकास मंत्रालय, ग्राम विकास विभाग, नवी दिल्ली (१९९८), "इंदिरा आवास योजना : मागदर्शक सूचना", भारत सरकार, नवी दिल्ली मार्फत.

**मागदर्शक सूचनेतील, पान क्र. २-** '१ जानेवारी १९९६ पासून इंदिरा आवास योजना ही एक स्वतंत्र योजना करण्यात आली. आता हा कार्यक्रम, गरिबी मोठ्या प्रमाणात कमी करण्याच्या, आणि विविध ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांचा लाभ त्यांना मिळणे शक्य व्हावे यासाठी गरीब कुटुंबाना प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या दृष्टीने, ग्रामीण दारिद्रय निर्मूलनाच्या मोठ्या धोरणाचा भाग म्हणून ग्रामीण विकास मंत्रालयाचा मोठा कार्यक्रम झाला आहे'.

भारतात १९९६ मध्ये 'इंदिरा आवास योजना' ही स्वतंत्र योजना म्हणून राबविण्यास सुरुवात झाली. संबंधीत योजनेची अंमलबजावणी विषयी स्पष्टता यावी या उद्देशाने १९९८ मध्ये भारत सरकारद्वारा 'मार्गदर्शक सुचना' नामक एक पुस्तिका तयार करण्यात आली. सदर मार्गदर्शिका ही संशोधन अभ्यासासाठी अत्यंत उपयुक्त ठरली. सदर

मार्गदर्शिकेमधून 'इंदिरा आवास योजने'पुर्वी भारतात घरकुलासंबधी राबविण्यात येणाऱ्या शासकीय कार्यक्रमाची माहिती मिळाली. यामध्ये 'सार्वजनिक गृहनिर्माण कार्यक्रम', ४ थ्या पंचवार्षिक योजनेतील 'घरांची जागा नी बांधकाम सहाय्य योजना' इ. योजनांची माहिती प्राप्त झाली. सदर संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यास 'घर' ही संकल्पना, घराचे महत्व, 'घर' ही एक मानवी अस्तित्वाची व उत्कृष्ट जीवन जगण्याची एक मूलभूत गरज आहे याचे महत्त्व संशोधकाच्या लक्षात आले.

तसेच 'इंदिरा आवास योजने'ची ऐतिहासिक पार्श्वभूमी, योजनेची वैशिष्ट्ये व योजनेचा लक्ष्य गट, योजनेचे घटक, निधीचा आकृतीबंध, निधीचे वाटप, प्रशासकीय खर्च, विशेष प्रकल्प, योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे टप्पे व अंमलबजावणी यंत्रणा इ. घटकांची माहिती संशोधकास मिळाली. या घटकामध्ये मुख्यत्वेकरून घरकुल वाटप करण्यासाठी कुटुंब निश्चितीचे निकष व घरकुल वाटपाची कार्यपध्दती समजली. योजनेअंतर्गत निधीचा आकृतीबंध तसेच बांधकामाचे टप्पे व टप्पेनिहाय निधीचे वाटप याबाबत माहिती मिळाली. वरील सर्व घटकांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत कोणकोणती यंत्रणा काम करते व त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या इ. घटकांची सविस्तर माहिती प्राप्त झाली.

एकूणच 'इंदिरा आवास योजने'विषयी नेमकी व सविस्तर माहिती सदर मार्गदर्शिकेमधून मिळाली. त्यामुळे संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये, लाभार्थी निवड, अभ्यास क्षेत्र निवड, अभ्यासाची व्याप्ती इ. ठरविण्यासाठी मार्गदर्शिकेचा उपयोग झाला. त्याचबरोबर संशोधन अभ्यासांतर्गत योजनेचे मुल्यमापन कोणकोणत्या घटकांच्या आधारे करण्यात यावे यासंबंधी सविस्तर माहिती प्राप्त झाली.

२.१.५ **घराचा अर्थ** : http://en.wikipedia.org, http://www.quora.com

**घराचे प्रकार** **Let's Learn**: Types of Houses, shyamathanniyil.blogspot.com

संशोधनाचा विषय 'निवारा' किंवा 'घर' याशी संबंधीत आहे. त्यामुळे घराचा नेमका अर्थ, घराचे प्रकार याची संशोधकास माहिती असणे आवश्यक होते. सदर संदर्भ साहित्यातून घराचे वेगवेगळे अर्थ समजण्यास मदत झाली. घरांचे प्रमुख प्रकार कच्चे घर व पक्के घर तसेच त्यातील विविध उपप्रकारांची सविस्तर माहिती मिळाली. प्राप्त माहितीचा समावेश अभ्यास विषयाच्या प्रस्तावनेमध्ये करण्यात आला आहे.

**२.१.६ ग्रामप विकास व जलसंधारण विभाग (२०१३), यांचे शासन निर्णय क्र.ईआयो-२०१३/प्र.क्र. २९६/योजना-१०, दिनांक ७ नोव्हेंबर २०१३.**

**शासन निर्णय, पान क्र.१**- 'इंदिरा आवास योजनेअंतर्गत सन २०१३-१४ पासून घरकुलाच्या अनुदानात वाढ करणे व त्या अनुषंगाने राज्यहिस्सा तसेच राज्य अतिरिक्त हिस्सा निश्चित करण्याबाबत'.

सदर शासन निर्णयानुसार 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत नविन घरकुल बांधकामासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानात केंद्र सरकारने वाढ केल्याचे सुचित केले आहे. यानुसार १ एप्रिल २०१३ पासून नविन घरकुल बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा मिळून रु. १,००,००० इतकी रक्कम लाभार्थ्यांना मिळू लागली. यामुळे संशोधन अभ्यास करताना २०१२ पुर्वीच्या व २०१३ नंतरच्या लाभार्थ्यांना मिळालेल्या अनुदानाची माहिती घेण्याच्या दृष्टीने शासन निर्णय महत्त्वाचा ठरतो.

**२.१.७ Human Rights - United Nations** - "मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा" www.un.org, http://hi.wikipedia.org

व्यक्तीला प्राप्त असलेले 'मुलभूत हक्क' व त्यातील 'निवाऱ्याचा हक्क' यास आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमी असल्याचे सदर संदर्भ साहित्यातून निदर्शनास येते. १९४५ मध्ये स्थापन झालेल्या 'संयुक्त राष्ट्र संघटने'च्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी 'मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा' स्वीकारला. हा जाहिरनामा संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक करण्यात आला होता.

त्यानुसार भारतातही वैश्विक जाहिरनाम्याची अंमलबजावणी करण्यात आली. त्याची परिणीती म्हणजेच भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश असल्याचे संबंधीत संदर्भ साहित्यातून निदर्शनास आले. या जाहिरनाम्यातील कलम १२ व २५ हे संशोधन अभ्यास विषयाशी संबंधीत आहे. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा निवारा मिळविण्याचा हक्क आहे व ही शासनाची नैतिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट होते. जे संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. तसेच सदर संदर्भ साहित्याचा संशोधन विषयाच्या प्रस्तावनेसाठी उपयोग करण्यात आला आहे.

२.१.८ **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद** (२०१४-१५), **पुणे**. "**इंदिरा आवास योजना** : **प्रगती अहवाल**" (**संख्यात्मक**), **सन २००६ ते २०१४.**

या अहवालामध्ये पुणे जिल्हा व त्यातील मुळशी तालुक्यातील 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत २००८ ते २०१४ या कालावधीत बांधकाम पुर्ण झालेल्या घरकुलांची आकडेवारी नमूद करण्यात आलेली आहे. ज्या माहितीच्या आधारे संशोधकाने संशोधन अभ्यासाचा नमुना आकार व नमुना निवड निश्चित केली आहे. म्हणजेच सदर अहवालातील आकडेवारी संशोधन अभ्यासाच्या संशोधन पध्दतीसाठी महत्त्वाची ठरली. त्याप्रमाणे सदंर्भ साहित्यातून 'इंदिरा आवास योजने' ची महाराष्ट्रातील व्याप्ती संशोधकाच्या लक्षात येण्यास मदत झाली.

त्यानुसार पुणे जिल्ह्यात २००८ ते २०१४ मध्ये एकूण ३७,१४४ घरांचे उद्दिष्ट्य देण्यात आले होते. त्यापैकी ३५,५८८ घरांचे बांधकाम पुर्ण करण्यात आले आहे. मुळशी तालुक्यामध्ये ८५७ घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले आहे. या सर्व बाबींची माहिती सदर संदर्भ साहित्यातून घेण्यात असून ही सर्व माहिती संशोधन अभ्यासाची प्रस्तावना व संशोधन पध्दती ठरविण्यासाठी उपयुक्त ठरली आहे.

२.१.९ **List of Block Having Scheduled Area in Maharashtra,** sr.no. District full Scheduled Area portly Rajbhavan Maharashtra. rajbhavan-maharashtra.gov.in

संशोधन अभ्यासासाठी क्षेत्रनिवडी करीता सदर संदर्भ साहित्याचा उपयोग महत्त्वपुर्ण ठरला. संबधीत संदर्भ साहित्यातून शासकीय स्तरावर निश्चित केलेले महाराष्ट्रातील व प्रामुख्याने पुणे जिल्ह्यातील आदिवासी तालुके व आदिवासी क्षेत्रे याविषयी माहिती प्राप्त झाली. योजनेअंतर्गत देण्यात आलेले लाभार्थी निवडीचे सर्व पात्रता निकष पूर्ण करणारा मुळशी तालुका (क्षेत्र) निवडण्याकरिता सदर संदर्भ साहित्याचा अधिक उपयोग झाला.

२.१.१० **Ministry of Rural Development, GoI (July 2014), "IAY Briefing Note"** www.iay.nic.in

**Briefing Note मधील**, **पान क्र. १** - 'The Indira Awaas Yojana (IAY) is a flagship scheme of the Ministry of Rural Development to provide houses to below poverty line (BPL) families in the rural areas. Under IAY, since inception, 320.55 lakh houses have been constructed, incurring an expenditure of Rs. 1,05,518.85 corers'.

सदर संदर्भ साहित्य म्हणजे 'इंदिरा आवास योजने'चा २००७ ते २०१४ या कालावधीतील भारतातील 'प्रगती अहवाल' आहे. या अहवालामध्ये १९९६ ते जुलै २०१४ या कालावधीतील घरकुल बांधकामाचे ठरविलेले उद्दिष्ट्ये व त्यापैकी बांधून पूर्ण झालेल्या घरकुलांची आकडेवारी देण्यात आलेली आहे. सदर आकडेवारीवरुन योजनेची भारतातील व्याप्ती तसेच योजनेची भौतिक कामगिरी लक्षात येते. सदर अहवाल 'इंदिरा आवास योजने'च्या प्रगतीचा आढावा व आकडेवारी मिळविण्याच्या दृष्टीने संशोधन अभ्यासासाठी उपयुक्त ठरलेला आहे.

### २.१.११ तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर (जाने २०११), "भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया - खंड १", युनिक ॲकॅडमी प्रकाशन, पुणे.

**भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया - खंड १, पान क्र. ५८**- 'कलम २१ नुसार कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपध्दतीखेरीज कोणत्याही व्यक्तीचे जीवित व व्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही'.

अन्न व वस्त्र याप्रमाणेच 'स्वतःचे घर' किंवा 'निवारा' ही मानवाची मुलभूत गरज आहे. तसेच 'निवाऱ्याची सुविधा' मिळविणे हा मानवाचा मुलभूत हक्क आहे याबाबतचा तपशील तसेच व्यक्तीचे इतर मुलभूत हक्क (भाग तीन) व मार्गदर्शक तत्त्वे (भाग चार) यांचा सविस्तर परिचय सदर संदर्भ साहित्यातून प्राप्त झाला.

घटनेतील कलम २१ मानवाच्या जीविताच्या हक्काशी संबंधीत आहे. त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीला 'निवाऱ्याची सुविधा' मिळविण्याचा हक्क असल्याचे नमुद आहे. तसेच मार्गदर्शक तत्त्वातील कलम ३९ 'अ' समान न्यायाची हमी देते. कलम ४६ समाजातील अनुसूचित जाती, जमाती व इतर दुर्बल घटकांचा शैक्षणिक, आर्थिक विकास साधणे व त्यांचे सामाजिक अन्याय व शोषणापासून संरक्षण करण्यासाठी महत्त्वाचे ठरते. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला 'स्वतःचे घर वा निवारा' मिळेल यासाठी कायदेशीर तरतुद व शासनाची तशी नैतिक जबाबदारी असल्याचे सदर संदर्भ साहित्यातून लक्षात आले.

## २.२ इंदिरा आवास योजना : राष्ट्रीय व राज्य स्तरीय मुल्यमापन अहवाल

'इंदिरा आवास योजने' संबंधीत राष्ट्रीय स्तरावरील तसेच काही राज्यांनी केलेल्या मुल्यमापन अहवालांचा समावेश सदर संदर्भ साहित्यामध्ये होतो. राष्ट्रीय स्तरावर काही निवडक राज्यांचा अभ्यास व काही राज्यांनी स्वतंत्ररित्या केलेला अभ्यास याद्वारे

योजना कितपत यशस्वी झाली, योजना अंमलबजावणीतील त्रुटी, योजना यशस्वी करण्यासाठी प्रामुख्याने करण्यात आलेले प्रयत्न इ. विषयी अत्यंत महत्त्वाची व संशोधन अभ्यासासाठी उपयुक्त अशी माहिती संशोधकास प्राप्त झाली आहे. या संदर्भ साहित्याविषयी (मुल्यमापन अहवाल) माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**२.२.१ Department of Economics and statistical Analysis, Hariyana State (2011), "Evaluation Study of Indira Awaas Yojna", 2007-2011.**

**मूल्यमापन अहवाल, पान क्र.** ७- 'Objective of the Evaluation Study: whether the funds are being properly utilized by the beneficiaries or not'.

भारतातील हरियाणा राज्यामध्ये २००७-०८ ते २०१०-११ मध्ये झालेल्या घरकुलांचा परिणाम अभ्यासण्यात (Impact Study) आला होता. हरियाणा राज्यातील 'इंदिरा आवास योजने'च्या परिणामात्मक अभ्यासात लाभार्थी निवड प्रक्रिया मार्गदर्शक सूचनेनुसार झाली आहे का?, योजनेचे उद्दीष्ट्ये पुर्ण केले आहेत का?, निधीचे वितरण वेळेत लाभार्थ्यापर्यंत पोहचले का?, लाभार्थ्यांनी तो निधी घरकुलासाठीच वापरला आहे का?, घराचे बांधकाम मार्गदर्शक सूचनेनुसार झाले आहे का? या सर्व प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या अहवालाचा वापर संदर्भ साहित्य म्हणून संशोधनासाठी करण्यात आला आहे. ज्याचा संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये तसेच मुलाखत अनुसूचीतील प्रश्न ठरविण्यासाठी संशोधकास उपयोग झाला आहे.

**२.२.२ NIRD, Ministry of Rural Development, GoI (2005), "Implementation of IAY : Issues and Achievement : A Nation-Wide Study", Hyderabad.** www.nird.org.in

**मूल्यमापन अहवाल, पान क्र.५३**- 'Ten Major state viz. Andhra Pradesh, Tamil Nadu, Karnataka, Maharashtra, Rajasthan, Haryana, U.P, Bihar, West Bengal and Orissa have been covered for the study'.

राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था व पंचायतराज यांच्यामार्फत सन २००५ मध्ये भारतातील १० राज्यांमध्ये 'इंदिरा आवास योजने'चे मुल्यमापन करण्यात आले होते. हे मुल्यमापन १९९९ ते २००४ या कालावधीपुरते मर्यादित होते व या मुल्यमापनात महाराष्ट्र राज्याचा समावेश होता. यामध्ये महाराष्ट्रातील वर्धा व नांदेड या दोन जिल्ह्यांची

मुल्यमापनासाठी निवड करण्यात आली होती. त्यामुळे सदर मुल्यमापन अहवाल हा संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

सदर अहवालामुळे 'इंदिरा आवास योजने'ची महाराष्ट्रातील पार्श्वभूमी लक्षात आली. तसेच १९९६ ते २००६ या कालावधीतील योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यापुढील घरकुलांचे उद्दिष्ट्य व बांधून पुर्ण झालेल्या घरकुलांची आकडेवारी उपलब्ध झाली. तसेच संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने योजनेच्या कार्यवाही संदर्भात कोणकाणते घटक अभ्यासणे गरजेचे आहे याची माहिती सदर अहवालातून मिळाली.

सदर मुल्यमापन हे १९९९ ते २००४ या कालावधीपुरते मर्यादित आहे. भारताच्या नियोजन विभागाने २०१३ मध्ये योजनेचे मुल्यमापन केले होते परंतु त्यात महाराष्ट्राचा समावेश नव्हता. म्हणजेच २००४ नंतर महाराष्ट्रामध्ये योजनेचे मुल्यमापन झालेले नाही ही महत्त्वाची बाब लक्षात आली. ही माहिती संशोधन अभ्यासाअंतर्गत मुल्यमापनाचा कालावधी ठरविण्यासाठी उपयोगी ठरली. त्याचबरोबर संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, व्याप्ती व अभ्यासाचे क्षेत्र ठरविण्याच्या दृष्टीने या अहवालाची प्रस्तावना, उद्दिष्ट्ये, निष्कर्ष अतिशय उपयुक्त ठरली आहेत.

### २.२.३ **Program Evaluation Organization, Planning Commission, GoI, New Delhi (2013), "Evaluation Study of Indira Awaas Yojna" New Delhi.**

**मूल्यमापन अहवाल, पान क्र. १२**- 'IAY is a flagship scheme of the Ministry of Rural Development to provide houses to below poverty line (BPL) families in the rural areas. It has been in operation since 1985-86. Present study is an evaluation of the implementation and impact of this housing scheme'.

सदर संदर्भ साहित्याचा उपयोग संशोधकास प्रामुख्याने मूल्यमापनाची दिशा, संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये तसेच संशोधन अभ्यासाची व्याप्ती ठरविण्यासाठी झाला. भारत सरकारच्या नियोजन विभागामार्फत २०१३ मध्ये भारतातील १२ राज्यांमध्ये 'इंदिरा आवास योजने'चे मुल्यमापन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्र राज्याचा अंतर्भाव नव्हता.

तसेच सदर मुल्यमापन अहवालाची उदिष्ट्ये, मूल्यमापनासाठी विचारात घेतलेले लाभार्थी संबंधीत सामाजिक व आर्थिक घटक, मूल्यमापनाचे निष्कर्ष व शिफारशी या संबंधी आवश्यक माहिती प्राप्त झाली. ज्यामुळे संशोधकास योजनेचे मुल्यमापन नेमके

कसे केले जावे, मूल्यमापनामध्ये कोणते महत्त्वाचे घटक अभ्यासले गेले पाहिजेत याची माहिती मिळाली (पान नं-**XI** व **XIII**, पान नं-२, ८, १२७ ते १३५). एकूणच सदर संदर्भ साहित्यामुळे संशोधकाला स्वतःच्या मुल्यमापन अभ्यासासाठी योग्य दिशा मिळाली.

### २.२.४ Program Implementation and Evaluation Department of Meghalaya (2012), Evaluation Study on "Indira Awaas Yojna(IAY)" In Meghalay.

**मूल्यमापन अहवाल, पान क्र.३१**- 'Specific Objective of the Study are: To examine the present ratio of allotment of IAY houses for women beneficiaries in terms of married women, widows and joint names'.

भारतातील मेघालय राज्यामार्फत 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत २०११ - १२ पर्यंत पुर्ण झालेल्या (११ वा पंचवार्षिक आराखडा) घरकुलांचे मुल्यमापन करण्यात आले आहे. या मुल्यमापन अहवालामध्ये काही वेगळे मुद्दे अभ्यासण्यास मिळाले. जसे की, 'इंदिरा आवास योजने'अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या महिला लाभार्थ्यांचे प्रमाण. त्यामध्ये विवाहित महिला, विधवा महिला तसेच पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे असलेल्या घरकुलांचे प्रमाण इत्यादी.

विशेषतः महिला लाभार्थ्यांमध्ये झालेले सामाजिक व आर्थिक बदल, महिला लाभार्थ्यांचे योजनेबाबतचे मत, लाभार्थी निवडीपासून ते घरकुल बांधकामाचा कालावधी इ. बाबींचा अंतर्भाव मुल्यमापन अभ्यासातील उद्दिष्ट्यांमध्ये करण्यात आला होता. यानुसार संशोधकास सदर घटकांचा विचार करण्यासंदर्भात नवीन माहिती मिळाली. ज्याचा उपयोग संशोधन अभ्यासात करण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील सर्व मुल्यमापन अहवालातून संशोधकास वेगवेगळ्या गोष्टी अभ्यासण्यास मिळाल्या. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात योजनेचे मुल्यमापन करण्यासाठी संशोधकास एक दिशा प्राप्त झाली आहे. सदर मुल्यमापन अहवालीतील बाबींचा सारासार विचार करुन संशोधकाने मुल्यमापनासाठी आवश्यक घटकांचा समावेश आपल्या संशोधन अभ्यासामध्ये केलेला आहे. तसेच वरील सर्व मुल्यमापन अहवालातील माहितीच्या आधारे संशोधक स्वतःच्या मुल्यमापन अभ्यासात आढळून आलेल्या घटकांचा तुलनात्मकरित्या अभ्यास करु शकतो व स्वतःच्या मुल्यमापन अभ्यासाची विश्वासार्हता देखील तपासून पाहू शकतो.

## २.३ **सारांश** :

संशोधन अभ्यासासाठी वापरण्यात आलेले सर्व संदर्भ साहित्य संशोधकास मार्गदर्शक ठरले आहेत. संदर्भ साहित्यांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, महाराष्ट्रामध्ये इंदिरा आवास योजनेचे सविस्तर मुल्यमापन झालेले नाही. म्हणूनच महाराष्ट्रातील सदर योजनेचे मुल्यमापन हे संशोधन अभ्यासाचा विषय म्हणून महत्त्वाचे व अधिक उपयुक्त ठरणारे आहे. तसेच संदर्भ साहित्यांमध्ये काही मुल्यमापन अहवालाचा समावेश आहे. त्यामुळे योजनेचे मुल्यमापन नेमके कसे केले जावे, मूल्यमापनामध्ये कोणते महत्त्वाचे घटक अभ्यासले गेले पाहिजेत याची महत्त्वपूर्ण माहिती मिळाली आहे. त्यादृष्टीने योजनेचे मुल्यमापन करताना विषयाची प्रस्तावना, उद्दिष्ट्ये व गृहितकृत्ये ठरविणे तसेच संशोधन पध्दती, विषयाची व्याप्ती व क्षेत्र निवड करणे अशा प्रत्येक टप्प्यावर सर्व संदर्भ साहित्यांचा खूप उपयोग झाला आहे.

# प्रकरण तिसरे
# संशोधन पध्दती

**३. प्रस्तावना :**

संशोधन अभ्यासात पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील २००८ ते २०१४ या कालावधीतील केंद्रशासन पुरस्कृत 'इंदिरा आवास योजने'चे मूल्यमापन करण्यात आले आहे. यासाठी संशोधनातील आवश्यक सर्व पायऱ्यांचा अवलंब करुन विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. सदर संशोधन अभ्यासाची पध्दती या प्रकरणामध्ये स्पष्ट करण्यात आली आहे.

**३.१ समस्या सूत्रण :**

स्वातत्र्य प्राप्ती नंतर भारतामध्ये घरकुल बांधकामाच्या विविध योजना राबविण्यात आल्या परंतु त्या संदर्भात काणतेही सामाईक मापदंड नव्हते. १ जानेवारी १९९६ रोजी इंदिरा आवास योजना एक स्वतंत्र योजना राबविण्यास सुरूवात झाली. यासाठी सामाईक मापदंड ठरविण्यात आले. सदर योजनेअंतर्गत १९९६ ते जुलै २०१४ पर्यंत भारतामध्ये एकूण ३२०.५५ लाख कुटुंबाना घरे पुरविण्यात आली. तसेच सन २००७ ते २०१४ या कालावधीत योजनेअंतर्गत भारतात १६४.४५ लाख घरकुलांचे उद्दिष्ट्य पुर्ण करण्यात आले. त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये एकूण ८,१३,४०० इतक्या कुटुंबांना घरकुलाचा लाभ देण्यात आला. सदर आकडेवारीवरुन स्पष्ट होते की, 'इंदिरा आवास योजना' समाजातील दुर्बल घटकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची योजना आहे.

राष्ट्रीय स्तरावर सन २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था व पंचायतराज यांच्यातर्फे योजनेचे मुल्यमापन करण्यात आले होते. त्यामध्ये महाराष्ट्रातील वर्धा व नांदेड या दोन जिल्ह्यांचाच समावेश होता. तद्नंतर मात्र महाराष्ट्रात सदर योजनेचे सविस्तर मुल्यमापन झाल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे महाराष्ट्रात इंदिरा आवास योजनेची मार्गदर्शक सूचनेनुसार अंमलबजावणी झाली आहे किंवा नाही, योजनेचा लाभार्थ्यांना झालेला फायदा तसेच घरकुल लाभामुळे लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये झालेले बदल अभ्यासणे अत्यंत गरजेचे आहे.

## ३.२ अभ्यास विषयाची व्याप्ती :

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत समाजातील सर्वच दुर्बल, वंचित घटकांचा वा लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे व त्यानुसार पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येत आहे. म्हणून 'इंदिरा आवास योजना' ही भारतातील ग्रामीण भागातील आवासाच्या संदर्भात एक व्यापक स्वरुपाची योजना आहे.

सदर योजना भारतात व महाराष्ट्रात १९९६ सालापासून राबविली जात आहे. परंतु संशोधन अभ्यासासाठी २००८ ते २०१४ या कालावधीतील नविन घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. कारण सदर योजनेची लाभार्थी निहाय सविस्तर माहिती साठवून ठेवण्यासाठी केंद्र पातळीवर 'Awaassoft' नावाचे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. त्याअंतर्गत गावपातळीवरील प्रत्येक लाभार्थीनिहाय सविस्तर माहिती व आकडेवारी अद्यायावत केली जात आहे. त्यानुसार या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मुळशी तालुक्यातील २००८ पासून २०१४ पर्यंत सर्व लाभार्थ्यांची तपशीलवार माहिती उपलब्ध झाली आहे. तसेच 'इंदिरा आवास योजने'चा परिणाम अभ्यासण्याच्या (Impact Study) दृष्टीने २००८ ते २०१४ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था व पंचायतराज यांच्यातर्फे सन २००५ मध्ये योजनेचे मुल्यमापन करण्यात आले होते. त्यामध्ये महाराष्ट्रातील वर्धा व नांदेड या दोन जिल्ह्यांचाच समावेश होता. सदर मुल्यमापनानंतर म्हणजेच २००५ नंतर महाराष्ट्रात 'इंदिरा आवास योजने'चे मुल्यमापन झालेले दिसून येत नाही. तसेच आजवर महाराष्ट्रातील पुणे जिल्हा व जिल्ह्याचे तालुकानिहाय मुल्यमापन झालेले नाही. त्यामुळे सदर संशोधन अभ्यासासाठी पुणे जिल्हा निवडण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये सर्वच १३ तालुक्यामध्ये ही योजना राबविण्यात येते. परंतु सदर संशोधन अभ्यासाची व्याप्ती पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यापुरती मर्यादित आहे. मुळशी तालुक्यामध्ये अनुसूचीत जाती व जमाती, दारिद्रय रेषेखालील खुल्या वर्गातील गरीब कुटुंबे अशा तिन्ही प्रवर्गातील कुटुंबे पहावयास मिळतात. म्हणून संशोधन अभ्यासासाठी मुळशी तालुक्याची निवड करण्यात आली आहे.

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत प्रामुख्याने नविन घरे बांधणे, कच्च्या व मोडकळीस आलेल्या घरांची सुधारणा (दर्जावाढ) आणि घरांच्या जागांची तरतूद करणे या तीन घटकांतर्गत लाभार्थ्यांना सहाय्य केले जाते. यानुसार सदर योजनेअंतर्गत मुळशी

तालुक्यामध्ये २००८ ते २०१४ या कालावधीत सर्व लाभार्थ्यांना नविन घरे बांधण्यासाठी सहाय्य पुरविण्यात आले आहे. यानुसार मुळशी तालुक्यातील उपलब्ध आकडेवारीनुसार २००८ ते २०१४ मध्ये एकूण १,०२० घरकुले (नविन घरे) मंजुर करण्यात आली होती व त्यापैकी ८५८ घरकुलांचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. सदर संशोधन अभ्यासामध्ये मुळशी तालुक्यात २००८ ते २०१४ या कालावधीत नविन घरकुले बांधून पुर्ण झालेल्या लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

योजनेअंतर्गत सन २००८ ते २०१४ या कालावधीत नविन घरकुल प्राप्त लाभार्थ्यांचीच निवड उत्तरदाते म्हणून करण्यात आली आहे. योजनेची अंमलबजावणी करणारे शासकीय अधिकारी हे उत्तरदाते असतील. सदर संशोधन अभ्यास घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासणे यापुरताच मर्यादित राहील. एकूणच मुळशी तालुक्यातील २००८ ते २०१४ या कालावधीतील योजनेचे लाभार्थी, मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकाम प्रक्रिया तसेच लाभार्थी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती ही सदर संशोधन अभ्यास विषयाची व्याप्ती आहे.

### ३.३ **संशोधन अभ्यासाचे महत्व** :

सन १९९६ पासून 'इंदिरा आवास योजना' भारतात तसेच महाराष्ट्रात सुरु झाली आहे. योजना सुरु झाल्यानंतर सन २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था व पंचायतराज यांच्यामार्फत देशातील १० राज्यांमध्ये योजनेचे मुल्यमापन करण्यात आले होते. सदर १० राज्यांमध्ये महाराष्ट्रातील वर्धा व नांदेड या दोनच जिल्ह्यांचा समावेश होता. तसेच या मुल्यमापनात १९९९ ते २००४ या कालावधीत लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांचा समावेश होता. पुढे सन २०१३ मध्ये भारताच्या नियोजन विभागामार्फत सदर योजनेचे मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यमापनामध्ये भारतातील एकूण १२ राज्यांचा समावेश होता. परंतु त्या १२ राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश नव्हता. म्हणजेच या राष्ट्रीय स्तरावरील मुल्यमापन अहवालावरुन हे स्पष्ट होते की, सन २००४ नंतर महाराष्ट्रामध्ये 'इंदिरा आवास योजने'चे मुल्यमापन झालेले नाही.

त्यामुळे २००४ नंतर महाराष्ट्रातील योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया, योजनेअंतर्गत बांधून पूर्ण झालेल्या घरकुलांची आजची स्थिती, घरकुलाचा लाभार्थ्यांना झालेला फायदा, लाभार्थी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती, लाभार्थ्यांच्या समस्या तसेच क्षेत्रीय स्तरावर उद्भवणाऱ्या समस्या इ. चा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

जेणेकरून योजनेच्या मुल्यमापन अभ्यासात आढळून येणाऱ्या सकारात्मक तसेच नकारात्मक बाबी, योजनेतील त्रुटी वा समस्या याबाबत शासनास योग्य शिफारशी सुचविता येतील.

तसेच शासनाचा सामाजिक न्याय व सबलीकरण विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, जिल्हा परिषद व पंचायत समिती इत्यादींना या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास सदर संशोधन अभ्यास उपयुक्त ठरेल. दारिद्रय रेषेखालील कुटुंबांबरोबर काम करणाऱ्या अशासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या दृष्टीने देखील हा संशोधन विषय महत्वाचा ठरेल. तसेच भविष्यात संबंधित विषयात संशोधन अभ्यास करु इच्छिणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना संदर्भासाठीही उपयोगी ठरेल. म्हणूनच महाराष्ट्रातील 'इंदिरा आवास योजने' चे मूल्यमापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

### ३.४ अभ्यास विषयाचे क्षेत्र निवड : मुळशी तालुका (पुणे जिल्हा)

महाराष्ट्रातील एकूण ३४ जिल्ह्यांमध्ये 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत घरकुलांचा लाभ दिला असून पुणे जिल्हा यातील एक जिल्हा आहे. सदर संशोधन अभ्यासासाठी पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्याची निवड करण्यात आली आहे. इंदिरा आवास योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमाती तसेच समाजातील दुर्बल, दुर्लक्षित व दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचित जाती-जमातीच्या गरीब व्यक्ती योजनेच्या लाभासाठी पात्र ठरतात. त्यामुळे योजनेच्या लाभार्थी निकषानुसार सर्व गटातील लाभार्थी मुळशी तालुक्यामध्ये असल्याचे आपणास पहावयास मिळते.

२०११ च्या जनगणने नुसार मुळशी तालुक्याची एकूण लोकसंख्या १,७१,००६ इतकी आहे. एकूण लोकसंख्येपैकी १५ टक्के लोक शहरी भागात व ८५ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. तसेच मुळशी तालुक्यात विविध जाती-धर्माचे लोक राहतात. त्यामध्ये अनुसूचित जातीचे १०.६ टक्के लोक राहत आहेत. तसेच पुणे जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून यामध्ये जुन्नर, आंबेगाव, मावळ, राजगुरुनगर, वेल्हा व मुळशी या तालुक्यांतील सह्याद्री डोंगर रांगाच्या काही भागातच विविध आदिवासी जमातीची कुटुंबे आढळतात. त्यामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार मुळशी तालुक्यात ४.३ टक्के लोक अनुसूचित जमातीचे आहेत.

तसेच मुळशी तालुक्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण १५ ते २० टक्के आहे. इंदिरा आवास योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटंबांना प्राधान्याने लाभ दिला

जातो. यामध्ये खुल्या वर्गातील गरीब कुटुंबे, अनुसूचीत जाती व जमातीतील कुटुबांचा प्राधान्याने विचार केला जातो. अशा प्रकारे प्रमुख तिन्ही प्रवर्गातील कुटुंबे आपणास मुळशी तालुक्यामध्ये पहायला मिळतात. त्यामुळे मुळशी तालुक्यात योजनेच्या सर्व प्रवर्गातील घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती योग्यरित्या अभ्यासता येऊ शकेल.

तसेच मुळशी तालुका हा पुणे शहरापासून अवघ्या ४५ कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे संशोधन अभ्यास करताना प्राथमिक माहिती गोळा करणे, अभ्यासाच्या कोणत्याही टप्प्यावर त्याठिकाणी जाण्यासाठी तसेच इतर सर्व सुविधा सहजपणे उपलब्ध होऊ शकतात. या कारणास्तव तसेच संशोधन अभ्यासासाठी लागणारा वेळ, पैसा व श्रम या दृष्टीकोनातून विचार करता पुणे जिल्ह्यातील ‘मुळशी तालुका’ हे अभ्यास विषयाचे क्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे.

## ३.५ संकल्पनांच्या कार्यवाही व्याख्या :

### ३.५.१ इंदिरा आवास योजना :

ग्रामीण भागातील अनुसूचित जाती-जमाती, मागासलेले, दुर्बल तसेच दुर्लक्षित घटकांना घरकुल बांधकामासाठी सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन देणे होय.

### ३.५.२ केंद्र शासन पुरस्कृत योजना :

ग्राम विकास विभाग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मार्फत राबविण्यात येणारी इंदिरा आवास योजना होय.

### ३.५.३ मुल्यमापन :

इंदिरा आवास योजनेची कार्यवाही व योजनेची फलनिष्पत्ती जाणून घेणे होय.

### ३.५.४ मुळशी तालुका :

मुळशी तालुका हा महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेला येतो. मुळशी तालुक्याची हद्द ही पुणे जिल्ह्यातील पूर्वेकडील हवेली, दक्षिणेला वेल्हा, उत्तरेस मावळ व पश्चिमेकडील रायगड जिल्ह्यातील सुधागड इत्यादी तालुक्यांशी भिडलेली आहे.

### ३.५.५ **सामाजिक स्थिती** :

वीज, पिण्याचे पाणी, घरकुलापर्यंत जाण्यासाठी पायवाट किंवा रस्ता, शौचालय, न्हाणीघर, सांडपाण्याची व्यवस्था, स्वयंपाकासाठी वापरावयाची साधने (निधुर्र चूल किंवा गॅस) इ. पायाभूत सुविधा. तसेच कुटुंबांचे व प्रामुख्याने महिलांचे सरंक्षण, कुटुंबांची शैक्षणिक स्थिती म्हणजे सामाजिक स्थिती होय.

### ३.५.६ **आर्थिक स्थिती** :

घरकुल प्राप्त कुटुंबातील कमावते सदस्य, उपलब्ध उत्पन्नाची साधने, वेतनाचे स्वरुप, कुटुंबांचे मासिक उत्पन्न म्हणजे आर्थिक स्थिती होय .

### ३.६ **अभ्यास विषयातील चलपदे** :

सदर संशोधन अभ्यास विषयातील चलपदे पुढीलप्रमाणे आहेत.

| **अवलंबित चल** | **परावलंबित चल** |
|---|---|
| १. घरकुल | सामाजिक स्थिती |
| २. व्यवसाय | आर्थिक स्थिती |

### ३.७ **संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये** :

१. योजनेअंतर्गत मुळशी तालुक्यातील लाभार्थी निवड प्रक्रियेबाबत माहिती घेणे.

२. योजनेअंतर्गत मार्गदर्शक सूचनांप्रमाणे घरकुल बांधकाम प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे किंवा नाही याचा शोध घेणे.

३. घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासणे.

४. योजनेसंदर्भात लाभार्थ्यांच्या अडचणी जाणून घेणे.

५. योजनेची अमंलबजावणी करणाऱ्या यंत्रणेस आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

### ३.८ **संशोधन अभ्यासाची गृहीतकृत्ये** :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितकृत्ये विचारात घेण्यात आली आहेत.

१. मुळशी तालुक्यात योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड व घरांचे वाटप हे मार्गदर्शक सूचनेनुसार झाले आहे.

२. घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत काही घटकांची मार्गदर्शक सूचनेनुसार अंमलबजावणी झालेली नाही.

३. घरकुल प्राप्त झाल्यामुळे लाभार्थी कुटुंबांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून येण्यास मदत झाली आहे.

## ३.९ संशोधन प्रश्न :

१. योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रियेचे स्वरुप कसे आहे?

२. योजेनच्या पात्रता निकषानुसार लाभार्थ्यांची निवड झाली आहे किंवा नाही?

३. घरकुल बांधकामासंदर्भात योजनेच्या मार्गदर्शक सूचना कोणत्या आहेत?

४. योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले आहे/नाही?

५. योजनेअंतर्गत घरकुल प्राप्तीमुळे लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत कोणते बदल घडून आले आहेत?

६. योजनेचा लाभ घेताना लाभार्थ्यांना कोणकोणत्या समस्या आल्या?

७. योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या कार्यकारी यंत्रणेस कोणत्या समस्या येतात?

## ३.१० अभ्यास विषयाची नितीमूल्ये :

सदर संशोधन अभ्यासामध्ये उत्तरदात्यांची वेळ व विश्वास संपादन करुन व त्यांच्या पूर्व संमतीनेच माहिती घेण्यात आली आहे. माहिती घेताना उत्तरदात्यांचा ऐच्छिक सहभाग घेण्यात आला आहे. तसेच उत्तरदात्यांना कोणत्याही प्रकारची हानी पोहचणार नाही याची खात्री बाळगण्यात आली होती. प्राप्त होणाऱ्या माहिती विषयी पूर्णतः गोपनियता पाळण्यात आली आहे. त्याचप्रमाणे माहिती घेताना उत्तरदात्यांनाही प्रश्न विचारण्याची मुभा देण्यात आली व त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

## ३.११ संशोधन आराखडा :

संशोधन अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे. सदर संशोधन अभ्यासामध्ये ‘इंदिरा आवास योजने’ अंतर्गत २००८ ते २०१४ कालावधीतील घरकुल प्राप्त लाभार्थी गट, घरकुल बांधकामाचे टप्पे व मार्गदर्शक सूचनांनुसार घरकुलाचे बांधकाम, लाभार्थी कुटुंबाची सामाजिक व आर्थिक स्थिती इ. सर्व

बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. यानुसार संशोधन अभ्यासात आढळून आलेल्या सर्व वस्तुस्थितींचे वर्णनात्मक विवेचन करण्यात आले आहे.

याकरिता संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, नमुना निवड पध्दती, माहिती संकलनाची साधने व माहिती संकलन, माहितीचे वर्गीकरण, सारणीकरण, विश्लेषण व निष्कर्ष इ. पायऱ्यांच्या आधारे संशोधन अभ्यास करण्यात आला आहे.

### ३.१२ नमुना आराखडा

प्रस्तुत संशोधन अभ्यासातंर्गत पुढील नमुना आराखडा वापरण्यात आलेला आहे.

#### ३.१२.१ समग्र (Universe) :

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात 'इंदिरा आवास योजने'अंतर्गत २००८ ते २०१४ या कालावधीत सर्व लाभार्थ्यांना नविन घरे बांधण्यासाठी सहाय्य पुरविण्यात आले आहे. यानुसार योजनेअंतर्गत नविन घरकुलांचा लाभ मिळालेले व ज्यांची घरकुले बांधून पूर्ण झालेली आहेत अशा लाभार्थ्यांची यादी मुळशी पंचायत समिती मधून घेण्यात आली. प्राप्त यादीनुसार मुळशी तालुक्यामध्ये एकूण ८५८ लाभार्थ्यांची नविन घरकुले बांधून पुर्ण झालेली आहेत. जे अभ्यास विषयाचे समग्र आहे.

#### ३.१२.२ नमुना आकार :

**अ) घरकुल लाभार्थी** :

सन २००८ ते २०१४ या कालावधीत योजनेअंतर्गत नविन घरकुलाचा लाभ मिळालेला व ज्यांचे घरकुल बांधून पुर्ण झाले आहे असेच लाभार्थी संशोधन अभ्यासाचा 'लक्ष्य गट' म्हणून निश्चित करण्यात आला आहे. ज्या लाभार्थ्याच्या नावे घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे असा व्यक्ती म्हणजेच 'योजनेचा लाभार्थी' हा सदर संशोधन अभ्यासाचा एकक मानण्यात आला आहे.

मुळशी तालुका पंचायत समितीकडून प्राप्त यादीनुसार २००८ ते २०१४ या कालावधीत नविन घरकुलाचे बांधकाम पूर्ण झालेले एकूण ८५८ लाभार्थी आहेत. यानुसार ८५८ घरकुल लाभार्थ्यांपैकी संशोधन अभ्यासासाठी आवश्यक लाभार्थ्यांचा नमुना आकार ठरविण्यासाठी :

i) Robert V. Krejcie & D. W. Morgan (1970). Determining Sample Size for Research Activities. Educational and Psychological Measurement, 30,607-610

ii) Sample Size Calculator, Created by J Manno, Director Student Affairs Planning & Assessment Lehigh University, Bethlehem PA, Spring 2013 (www.surveysystem.com)

यांनी विकसित केलल्या वरील नमुना आकार तंत्राचा वापर करण्यात आला. या नमुना आकार तंत्रानुसार ८५८ घरकुल प्राप्त लाभार्थ्यांपैकी ११५ लाभार्थी म्हणजे एकूण उपलब्ध संख्येच्या १३ टक्के इतका नमुना आकार ठरविण्यात आला.

### ३.१२.३ नमुना निवड पध्दती

**अ) घरकुल लाभार्थी :**

मुळशी तालुक्यातील २००८ ते २०१४ या कालावधीत योजनेअंतर्गत नविन घरकुलाचा लाभ मिळालेल्या व घरकुल बांधून पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांची गावनिहाय यादी गट विकास अधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाली. त्यानुसार लाभार्थी निवडीसाठी संभाव्यता नमुना निवड पध्दती (Probability Sampling) वापरण्यात आली आहे. या पध्दतीमधील साधा यादृच्छिक नमुना पध्दती व त्याअंतर्गत नियमित अंकन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. सदर नमुना निवड पध्दतीच्या सहाय्याने एकूण ११५ घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सदर लाभार्थ्यांकडून संशोधनासाठी आवश्यक प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली.

**ब) शासकीय अधिकारी :**

संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने इंदिरा आवास योजनेशी संबंधीत शासकीय अधिकाऱ्यांकडून माहिती घेणे आवश्यक होते. यासाठी गैर-असंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील (Non-Probability Sampling) सहेतुक नमुना निवड पध्दतीचा (Purposive Sampling) अवलंब करण्यात आला आहे.

**१) ग्रामसेवक :**

ग्रामपंचायत स्तरावर 'ग्रामसेवक' हा प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत असतो. त्यामुळे गावपातळीवर 'इंदिरा आवास योजने'च्या कार्यवाहीची जबाबदारी ग्रामसेवकावर आहे. त्यानुसार योजनेच्या कार्यवाही संबंधीत प्राथमिक माहिती

ग्रामसेवकांकडून घेण्यात आली आहे. उदा. लाभार्थ्यांची निवड, निधीचे वितरण, प्रशिक्षण, योजनेच्या कार्यवाहीतील प्रमुख समस्या इ.

योजनेअंतर्गत २००८ ते २०१४ या कालावधीत नविन घरकुल बांधून पुर्ण झालेल्या ११५ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. यानुसार प्रत्यक्ष माहिती संकलन करताना सदर ११५ लाभार्थी हे मुळशी तालुक्यातील विविध गावांमध्ये विखुरलेले असल्याचे निदर्शनास आले. त्यापैकी ५ गावातील ग्रामसेवकांची संशोधन अभ्यासासंबंधी प्राथमिक माहिती घेण्यासाठी निवड करण्यात आली.

२) **विस्तार अधिकारी (पंचायत)** :

तालुका स्तरावर 'इंदिरा आवास योजने'च्या कार्यवाहीची जबाबदारी विस्तार अधिकारी यांच्यावर आहे. त्यानुसार मुळशी तालुक्यातील विस्तार अधिकारी यांच्याकडून संशोधन अभ्यास संबंधीत आवश्यक प्राथमिक माहिती घेण्यात आली.

### ३.१३ माहिती संकलन : साधने व माहितीचे स्त्रोत

प्रस्तुत संशोधनाकरिता प्राथमिक आणि दुय्यम आधार सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्याचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

#### ३.१३.१ प्राथमिक साधने व माहितीचे स्त्रोत :

प्रस्तुत संशोधन अभ्यास विषयानुसार घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी (पंचायत) तसेच जिल्हा स्तरीय सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रिया, योजनेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे घरकुलाचे बांधकाम पुर्ण झाले आहे किंवा नाही, घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती, लाभार्थी व योजनेच्या कार्यकारी यंत्रणेस आलेल्या विविध समस्या इ. विषयी प्राथमिक माहिती घेण्यात आली. प्राथमिक माहिती संकलित करण्याकरीता मुलाखत अनुसूची, कुटुंब तक्ता, निरीक्षण अनुसूची ही प्राथमिक साधने वापरण्यात आली आहेत. त्याचे सविस्तर स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

अ) **मुलाखत अनुसूची** :

संशोधन अभ्यासामध्ये प्राथमिक माहिती संकलनासाठी मुलाखत अनुसूची वापरण्यात आली. मुलाखत अनुसूची प्रामुख्याने घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी, ५

ग्रामसेवक, विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्याकडून माहिती घेण्यासाठी वापरण्यात आली आहे. प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी संशोधकाने स्वतः प्रत्यक्ष क्षेत्रभेट दिलेली आहे. योजनेचे लाभार्थी, संबंधीत शासकीय अधिकारी यांच्याशी स्वतः चर्चा करुन त्यांच्याकडून मिळालेली माहिती अनुसूचीमध्ये भरलेली आहे.

**ब) निरीक्षण अनुसूची :**

क्षेत्रभेटी दरम्यान प्रत्यक्ष निरीक्षणात आलेल्या सर्व बाबींची नोंद करण्यासाठी निरीक्षण अनुसूची तयार करण्यात आली होती. यासाठी अनियंत्रित निरीक्षण प्रकारातील असहभागी निरीक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला. या अनुषंगाने प्राथमिक माहिती गोळा करत असताना प्रत्यक्ष निरीक्षणातून निदर्शनास येणाऱ्या सर्व घटकांची नोंद निरीक्षण अनुसूचीमध्ये करण्यात आली. ज्यामध्ये प्रामुख्याने घरकुलासंबधीत भौतिक घटकांचे निरिक्षण समाविष्ट आहे.

**क) कुटुंब तक्ता :**

'इंदिरा आवास योजने'अंतर्गत ज्याच्या नावे घरकुलाचा लाभ मिळालेला आहे तीच व्यक्ती योजनेचा प्रमुख लाभार्थी ठरते. परंतु घरकुलाचा लाभ हा लाभार्थ्यांप्रमाणे कुटुंबातील सर्व सदस्यांनाही होत असतो. तसेच लाभार्थ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासताना केवळ लाभार्थ्यांपुरते मर्यादित न राहता त्यामध्ये संपूर्ण कुटुंबाचा समावेश होतो. त्यामुळेच लाभार्थी कुटुंबातील एकूण सदस्य संख्या, त्यांची शैक्षणिक स्थिती, त्यांचे रोजगार व उत्पन्नाची स्थिती याचबरोबर कुटुंबाची जात, धर्म, स्थलांतराची स्थिती इ. बाबी जाणून घेण्याकरीता कुटुंब तक्ता तयार करण्यात आला. प्रत्यक्ष क्षेत्रभेटी दरम्यान निवडलेल्या ११५ लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेली कौटुंबिक माहिती संशोधकाने सदर कुटुंब तक्त्यामध्ये भरुन घेतली आहे.

**३.१३.२ प्राथमिक साधनांची पुर्वचाचणी :**

संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये व गृहितकृत्यांनुसार प्राथमिक माहिती संकलनासाठी मुलाखत अनुसूची, कुटुंब तक्ता व निरीक्षण अनुसूची तयार करण्यात आली होती. तयार केलेल्या अनुसूचीतील प्रश्नानुसार योग्य व अचूक माहिती मिळते किंवा नाही, विचारण्यात आलेल्या प्रश्नांची मांडणी व क्रम बरोबर आहे किंवा नाही हे आवश्यक होते. अनुसूचीमध्ये संशोधन अभ्यासानुसार आवश्यक सर्व प्रश्न समाविष्ट आहेत किंवा नाही तसेच अनुसूचीतील प्रश्नांची उत्तरे देताना उत्तरदात्याला अडचण येते

का?, यासारख्या सर्व बाबींची पुर्वचाचणी घेणे आवश्यक होते. त्यानुसार संशोधकाने स्वतः क्षेत्रभेट देऊन प्राथमिक साधनांची पुर्वचाचणी घेतली.

पूर्वचाचणीसाठी मुळशी तालुक्यातील कासारसाई, चाले, जावळी, व लवळे या गावांमध्ये जाऊन नविन घरकुल बांधून पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांशी चर्चा केली व प्राथमिक साधनांची पडताळणी करण्यात आली. पुर्वचाचणीत आढळून आलेल्या त्रुटी दूर करुन मुलाखत अनुसूची, कुटुंब तक्ता व निरीक्षण अनुसूचीमध्ये आवश्यक बदल करण्यात आले. तसेच संशोधन अभ्यासाचे मार्गदर्शक, विद्यापीठातील विभाग प्रमुख यांच्याशी चर्चा करुन आवश्यक दुरुस्त्या करण्यात आल्या. तसेच नविन प्रश्न अनुसूचीत समाविष्ट करुन अनुसूचींस अंतिम स्वरुप देण्यात आले.

### ३.१३.३ **मुलाखत अनुसूचीची वैशिष्ट्ये** :

- मुलाखत अनुसूचीतील सर्व प्रश्न हे बंदिस्त व वैकल्पिक स्वरुपाचे होते.
- अनुसूचीतील प्रत्येक प्रश्न सुटसुटीत व सोप्या भाषेत विचारण्यात आलेला होता.
- अनुसूचीतील सर्व प्रश्न हे संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार विचारण्यात आले होते व प्रश्नांचा क्रमही उद्दिष्टांनुसार ठेवण्यात आला होता.
- वस्तुनिष्ठ माहिती मिळविण्यासाठी अनुसूचीमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे स्वरुप हे वस्तुनिष्ठच होते.
- अनुसूचीची मांडणी, मोकळी जागा, टंकलेखन इ. सर्व बाबी आकर्षक दिसतील याचा विचार करुन अनुसूची तयार करण्यात आली.

### ३.१३.४ **प्रत्यक्ष माहिती संकलन** :

मुळशी तालुक्यातील १५ गावातील नविन घरकुले बांधून पूर्ण झालेल्या एकूण ११५ लाभार्थ्यांकडून प्राथमिक माहितीचे संकलन करण्यात आले आहे. संशोधकाने स्वतः तसेच इतर दोन सहकाऱ्यांच्या मदतीने लाभार्थ्यांकडून प्राथमिक माहिती गोळा केली आहे. माहिती संकलनासाठी मदत घेण्यात आलेले सहकारी हे संशोधन अभ्यास विषयाची परिपूर्ण माहिती असलेले होते. ते सामाजिक क्षेत्राशी संबंधीत असल्याने त्यांना विषयाचे पुरेसे ज्ञान होते. तसेच ग्रामसेवक, विस्तार अधिकारी (पंचायत), सहाय्यक प्रकल्प

अधिकारी (जिल्हा परिषद) इ. शासकीय अधिकाऱ्यांशी संशोधकाने स्वतः चर्चा करुन प्राथमिक माहिती मिळविली आहे.

### ३.१३.५ माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण :

संशोधन अभ्यासासाठी प्राथमिक माहितीचे संकलन झाल्यानंतर प्राप्त माहितीची पडताळणी करण्यात आली. विखुरलेल्या स्वरुपातील माहितीला व्यवस्थित क्रमबध्द व मर्यादित करण्यात आले. त्यानंतर उपलब्ध माहितीचे 'एक्सेल' सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सारणीकरण करण्यात आले. सारणीकरणाद्वारे प्राप्त माहितीस अधिक स्पष्ट व समजण्यायोग्य बनविण्यात आले. गुणात्मक व संख्यात्मक आधारावर माहितीचे वर्गीकरण, सारणीकरण व विश्लेषण करण्यात आले आहे.

## ३.१४ माहिती संकलन : दुय्यम साधने

दुय्यम आधार सामग्रीमध्ये संशोधन अभ्यासासाठी उपयुक्त असे विविध संशोधन अहवाल, शासननिर्णय, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील कायदेशीर तरतुदी, विविध शासकीय योजनांचा तपशील, शासकीय वेबसाईट्स तसेच अभ्यासाशी संबंधीत व उपयुक्त बेवसाईटवरील माहिती, इ. संदर्भ साहित्यांचा समावेश आहे. तसेच सहाय्यक प्रकल्प अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून योजनेसंदर्भात व संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक माहिती घेण्यात आली आहे.

## ३.१५ प्रकरणीकरण :

संशोधन अभ्यास विषयाची स्वतंत्र प्रकरणाद्वारे सविस्तर मांडणी करण्यात आलेली आहे. यानुसार पुढील प्रकरणांमध्ये अभ्यास विषयाची विभागणी केलेली आहे.

**प्रकरण पहिले** : संशोधन अभ्यास विषयाची ओळख

**प्रकरण दुसरे** : संदर्भ साहित्याचा आढावा

**प्रकरण तिसरे** : संशोधन पध्दती

**प्रकरण चौथे** : माहितीचे सारणीकरण व विश्लेषण

**प्रकरण पाचवे** : निष्कर्ष, गृहितकृत्यांची पडताळणी, शिफारशी व संशोधन विषयाचा सारांश

**प्रकरण सहावे** : सारांश

### ३.१६ **सारांश** :

सदर प्रकरणामध्ये 'इंदिरा आवास योजने'च्या मुल्यमापनाकरीता वापरण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचे सविस्तर विश्लेषण देण्यात आलेले आहे. सदर संशोधन अभ्यासासाठी शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करुन समस्यासूत्रण, अभ्यास विषयाचे महत्त्व, विषयाची व्याप्ती व मर्यादा, उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, नीतिमुल्ये, अभ्यासाचे क्षेत्र, नमुना आराखडा, माहिती संकलनाची साधने व प्रक्रिया इ. घटक ठरविण्यात आले आहेत. त्यानुसार सर्व घटकांची सविस्तर माहिती या प्रकरणात देण्यात आलेली आहे.

# प्रकरण चौथे
# माहितीचे सारणीकरण व विश्लेषण

## ४ प्रस्तावना :

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत सन २००८ ते २०१४ या कालावधीमध्ये नविन घरकुले बांधून पूर्ण झालेले लाभार्थी हे संशोधन अभ्यासाचा 'लक्ष्य गट' आहेत. संशोधन अभ्यासासाठी मुळशी तालुक्यातील २००८ ते २०१४ या कालावधीतील ११५ 'घरकुल लाभार्थी' इतका नमुना आकार ठरविण्यात आलेला आहे. त्यानुसार ११५ लाभार्थ्यांकडून संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार आवश्यक प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली. तसेच योजनेची कार्यवाही व त्यातील अडचणी संबंधीत शासकीय अधिकारी यांच्याकडून प्राथमिक माहिती गोळा करण्यात आलेली आहे. प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीचे सविस्तर विश्लेषण या प्रकरणामध्ये करण्यात आले आहे.

## ४.१ सर्वसाधारण कौटुंबिक माहिती :

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत मुळशी तालुक्यातील नविन घरकुल बांधून पुर्ण झालेल्या ८५८ लाभार्थ्यांपैकी ११५ लाभार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेण्यात आली. त्यांच्याकडून कुटुंबाविषयी सर्वसाधारण माहिती 'कुटुंब तक्ता' यामध्ये भरून घेण्यात आली. सदर माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

### ४.१.१ लाभार्थी कुटुंबाच्या स्थलांतराची स्थिती :

मुळशी तालुक्यात २००८ ते २०१४ या कालावधीत 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत नविन घरकुलांचा लाभ देण्यात आलेले ११५ (१०० टक्के) लाभार्थी हे तेथील स्थायिक आहेत. म्हणजेच लाभार्थ्यांमध्ये एकही हंगामी स्थलांतरीत लाभार्थी किंवा कुटुंबे असल्याचे दिसून येत नाही.

### ४.१.२ कुटुंबाची सामाजिक प्रवर्गानुसार माहिती :

ग्रामीण भागामध्ये विविध जाती व धर्माची कुटुंबे दिसून येतात. इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दारिद्रय रेषेखालील अनुसूचीत जाती-जमाती व इतर मागासवर्गीय तसेच बिगर अनुसूचीत जाती-जमातीतील गरीब कुटुंबे यांना लाभ देण्याबाबात प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे. यानुसार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचा सामाजिक प्रवर्गानुसार तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१**

**लाभार्थी कुटुंबांचा सामाजिक प्रवर्गानुसार तपशील**

| अ. क्र. | सामाजिक प्रवर्ग | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ११ | ९ % |
| २ | अनुसूचित जमाती | ३ | ३ % |
| ३ | इतर मागासवर्गीय | २४ | २१ % |
| ४ | खुला प्रवर्ग | ७७ | ६७ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१ वरुन असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांमध्ये खुल्या प्रवर्गातील एकूण ७७ (६७ टक्के) लाभार्थी असून हे प्रमाण सर्वाधिक आहे. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील २४ (२१ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती या प्रवर्गातील लाभार्थ्यांचे प्रमाण अनुक्रमे ११ लाभार्थी (९ टक्के) व ३ लाभार्थी (३ टक्के) आहे.

### ४.१.३ कुटुंबाची धर्मनिहाय माहिती :

मुळशी तालुक्यात २००८ ते २०१४ या कालावधीत नविन घरकुलांचा लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांमध्ये विविध धर्मीय लाभार्थ्यांचा समावेश आहे. याचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२**

**लाभार्थी कुटुंबांचा धर्मनिहाय तपशील**

| अ. क्र. | लाभार्थी कुटुंबाचा धर्म | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | १०० | ८७ % |
| २ | मुस्लिम | ५ | ४ % |
| ३ | बौध्द | १० | ९ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२ वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी १०० (८७ टक्के) लाभार्थी हे हिंदू धर्मीय, ५ (४ टक्के) लाभार्थी मुस्लिम धर्मीय व १० (९ टक्के) लाभार्थी हे बौध्द धर्मीय आहेत. एकूण लाभार्थ्यांमध्ये हिंदू धर्मीय लाभार्थी कुटुंबांची संख्या अधिक असून त्यानंतर बौध्द व मुस्लीम धर्मीय कुटुंबांची संख्या येते.


लाभार्थी कुटुंबाची धर्म निहाय व सामाजिक प्रव्रर्गानुसार प्राप्त माहितीची (सारणी क्र. ४.१) तुलना केल्यास असे दिसून येते की, हिंदू धर्मामध्ये ‘खुला तसेच इतर मागासवर्गीय’ या प्रवर्गातील कुटुंबातील लाभार्थ्यांचा सर्वाधिक समावेश आहे. ‘इतर मागासवर्गीय’ प्रवर्गात मुस्लिम धर्मीय कुटुंबांचा समावेश आहे. तसेच ‘अनुसूचीत जाती’ प्रवर्गात बौध्द धर्मीय कुटुंबांचा समावेश आहे.

### ४.१.४ योजनेचे लाभार्थी : लिंगनिहाय तपशील

'इंदिरा आवास योजने'च्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलाचा लाभ देण्यात येणारा लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील असावा तसेच प्रामुख्याने महिलांना प्राधान्य देण्यात यावे असे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार मुळशी तालुक्यात नविन घरकुलाचा लाभ देण्यात आलेल्या एकूण ११५ लाभार्थ्यांमध्ये स्त्री-पुरूष लाभार्थी प्रमाण किती आहे हे पुढील आलेख क्र. ४.१ मध्ये दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.१**

**लाभार्थ्यांचा लिंगनिहाय तपशील**





आलेख क्र. ४.१ मध्ये दर्शविल्यानुसार ११५ लाभार्थ्यांपैकी ८१ (७० टक्के) पुरुष लाभार्थी असून ३४ (३० टक्के) स्त्री लाभार्थी आहेत. यावरून असे दिसून येते की, एकूण लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण अधिक आहे. असे असले तरी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्राधान्यक्रमाने महिलांनाही योजनेचा लाभ देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

### ४.१.५ लाभार्थी कुटुंबातील सदस्यांची लिंगनिहाय माहिती :

योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ हा कुटुंबातील एका सदस्याच्या नावावरच दिला जातो. परंतु घरकुलाचा लाभ हा लाभार्थ्याबरोबर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला समप्रमाणात होत असतो. त्यामुळे लाभार्थी कुटुंबातील एकूण किती सदस्यांना घरकुलाचा लाभ झाला आहे हे जाणून घेण्यात आले. त्यानुसार ११५ लाभार्थी कुटुंबातील सदस्यांची लिंगनिहाय माहिती पुढील आलेख क्र. ४.२ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**आलेख क्र. ४.२**

**लाभार्थी कुटुंबातील सदस्यांचा लिंगनिहाय तपशील**




आलेख क. ४.२ वरुन हे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबामध्ये एकूण ४८४ सदस्य असून या सर्व कुटुंब सदस्यांची निवाऱ्याची मुलभूत गरज पुर्ण झाल्याचे दिसून येते. एकूण ४८४ सदस्यांपैकी पुरूष सदस्य संख्या २४४ (५०.४१ टक्के) व स्त्री सदस्य संख्या २४० (४९.५८ टक्के) आहे. म्हणजेच योजनेचा लाभार्थी म्हणून कुटुंबातील एकच सदस्य जरी असला तरी प्रत्यक्षात ‘घरकुल’ हे कुटुंबातील सर्वच सदस्यांसाठी (४८४ सदस्य) उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येते.

- **योजनेच्या उद्दिष्ट्यांनुसार प्राप्त माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण :**

### ४.२ इंदिरा आवास योजनेची लाभार्थी निवड प्रक्रिया :

योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रिया मार्गदर्शक सूचनेनुसार होणे अपेक्षित आहे. यामध्ये योजनेविषयी जनजागृती करणे, लाभार्थ्यांना इतर योजनांमधून घरकुलाचा लाभ मिळालेला नसावा याची खात्री करणे, लाभार्थी पात्रतेचे निकष व प्रतिक्षा यादीचे वाचन यानुसार प्राधान्यक्रमाने लाभार्थ्यांची निवड करणे यासांरख्या सूचनांच्या आधारे लाभार्थी निवड प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. यानुसार मुळशी तालुक्यातील लाभार्थी निवड प्रक्रियेसंबंधी प्राप्त प्राथमिक माहितीच्या आधारे पुढे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

### ४.२.१ इंदिरा आवास योजना : माहितीचा स्त्रोत (जनजागृती माध्यम)

'इंदिरा आवास योजने'चा लाभ लोकांना घेता यावा यासाठी सदर योजनेची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. त्यामुळे गावपातळीवर योजनेविषयी माहितीचा प्रसार व प्रचार हा प्रामुख्याने ग्रामसभा, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पंचायत समिती, प्रसार माध्यमे इ.द्वारे होणे अपेक्षित आहे. यानुसार सदर योजनेची माहिती लाभार्थ्यांना कोठून मिळाली हे जाणून घेण्यात आले. याबाबत लाभार्थ्यांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण पुढील सारणीमध्ये देण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४.३**

**इंदिरा आवास योजनेच्या माहितीचा स्त्रोत**

| अ. क्र. | माहितीचा स्त्रोत (जनजागृती माध्यम) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसेवक | ५० | ४३ % |
| २ | ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य | ४७ | ४१ % |
| ३ | ग्रामसभा | १८ | १६ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.३ वरुन असे स्पष्ट होते की, योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ मिळत आहे याची माहिती ग्रामसेवकांकडून मिळाल्याचे ५० (४३ टक्के) लाभार्थ्यांनी सांगितले असून हे प्रमाण सर्वाधिक आहे. योजनेविषयीची माहिती ग्रामसेवक तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्यामार्फत मिळाली असे सांगणारे ४७ (४१ टक्के) लाभार्थी आहेत. उर्वरित १८ (१६ टक्के) लाभार्थ्यांना ग्रामसभेमध्ये योजनेविषयी माहिती मिळाली आहे.

मुळशी तालुक्यात प्रामुख्याने ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य यांच्यामार्फत सदर योजनेची जनजागृती मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

### ४.२.२ इतर घरकुल योजनांचा लाभ : तपशील

इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभ देण्यात येणाऱ्या लाभार्थ्यास यापुर्वी किंवा सद्यस्थितीत इतर कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ मिळालेला नसावा असे योजनेच्या मार्गदर्शक सुचनेमध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. याबाबत मुळशी तालुक्यातील लाभार्थ्यांची स्थिती जाणून घेण्यात आली. यानुसार एकाही लाभार्थ्यास पुर्वी किंवा सद्यस्थितीत इतर कोणत्याही योजनेतून घरकुलाचा लाभ मिळालेला नाही.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचीत जाती व नव बौध्द कुटुंबाना घरकुलांचा लाभ देण्यासाठी ‘रमाई आवास योजना’ राबविली जाते. तसेच आदिवासी जमातीच्या कुटुंबांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी ‘शबरी आवास योजना’ व ‘पारधी विकास कार्यक्रम’ राबविला जात आहे. यानुसार मुळशी तालुक्यात इतर शासकीय विभागामार्फत घरकुलाचा लाभ दिलेल्या अनुसूचीत जाती व जमातीच्या कुटुंबांना ‘इंदिरा आवास योजने’चा लाभ दिलेला नाही. म्हणजेच मुळशी तालुक्यात ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांची निवड ही योग्य प्रकारे झालेली आहे.

### ४.२.३ लाभार्थ्यांचा ग्रामसभेतील सहभाग :

इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड ही ग्रामसभेमध्येच केली जाते. यादृष्टीने ग्रामसभा अतिशय महत्त्वाची असून सदर योजनेची पारदर्शकता ग्रामसभेमधून दिसून येते. योजनेची माहिती, लाभार्थी निवड प्रक्रिया व घरकुलांचे वाटप या सर्व बाबी ग्रामसभेतच पार पाडल्या जातात. त्यामुळे लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळविण्यासाठी ग्रामसभेत उपस्थितीत राहणे आवश्यक असते. यानुसार प्राप्त माहितीच्या आधारे योजनेअंतर्गत लाभ घेतलेले सर्व ११५ (१०० टक्के) लाभार्थी ग्रामसभेमध्ये सहभागी होत असल्याचे दिसून येते. थोडक्यात इंदिरा आवास योजनेमुळे ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांचा सहभाग वाढत असल्याचे सकारात्म चित्र दिसून येत आहे.

### ४.२.४ ग्रामसभेत योजनेअंतर्गत प्रतिक्षा यादी संदर्भात चर्चा :

इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड ही ग्रामसभेमध्येच केली जाते. योजनेच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये दिलेल्या निकषांच्या आधारे प्राधान्य क्रमाने प्रतिक्षा यादी तयार केली जाते व तीचे वाचन केले जाते. तसेच पात्र लाभार्थ्यांची प्रत्येक आर्थिक वर्षात घरकुलासाठी निवड केली जाते. यानुसार ग्रामसभेत दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादीनुसार चर्चा झाली होती किंवा नाही याविषयी लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली. त्या संदर्भातील माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४.४**

**ग्रामसभेत प्रतिक्षा यादी संदर्भात झालेल्या चर्चेचा तपशील**

| अ. क्र. | प्रतिक्षा यादी संदर्भात चर्चा झाली | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १०७ | ९३ % |
| २ | नाही | २ | २ % |
| ३ | माहिती नाही | ६ | ५ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.४ वरुन असे दिसून येते की, ग्रामसभेत प्रतिक्षा यादी संदर्भात चर्चा झाली होती असे सांगणारे १०७ (९३ टक्के) लाभार्थी आहेत. ग्रामसभेत प्रतिक्षा यादी संदर्भात चर्चा झाली नाही असे २ (२ टक्के) लाभार्थी सांगितले असून याविषयी काहीच माहिती नाही असे सांगणारे ६ (५ टक्के) लाभार्थी आहेत.


ग्रामसभेत प्रतिक्षा यादी संदर्भात चर्चा झाली नाही तसेच काहीच माहिती नसणारे लाभार्थी केवळ ८ टक्के आहेत. ग्रामसभेत प्रतिक्षा यादीसंदर्भात चर्चा झाली असे म्हणणारे सर्वाधिक ९३ टक्के लाभार्थी आहेत. यावरून असे दिसून येते की, ग्रामसभेत प्रतिक्षा यादी संदर्भात चर्चा केली जाते. त्यामुळेच प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांचे नाव, क्रमांक व घरकुल मंजुर झाल्याचे वर्ष इ. विषयी माहिती मिळालेले लाभार्थी अधिक आहेत. तसेच मुळशी तालुक्यात योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ग्रामसभेमध्येच लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादीनिहाय निवड केली जाते किंवा जात आहे हे स्पष्ट होते.

### ४.२.५ योजनेअंतर्गत पात्रता निकषावर आधारित लाभार्थ्यांची निवड :

'इंदिरा आवास योजने'च्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थी पात्रतेचे निकष ठरविण्यात आले आहे. या निकषांनुसारच लाभार्थ्यांची निवड होणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर योजनेअंतर्गत मुळशी तालुक्यात निवडण्यात आलेल्या पात्र लाभार्थ्यांचा तपशील पुढील आलेख क्र. ४.३ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.३**

**पात्रता निकषानुसार लाभार्थ्यांचा संख्यात्मक तपशील**




आलेख क्र. ४.३ वरुन स्पष्ट होते की, मुळशी तालुक्यात घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी सर्वाधिक १०१ (८८ टक्के) लाभार्थी हे दारिद्रय रेषेखालील इतर प्रवर्गातील आहेत. अनुसूचित जातीचे ११ (९ टक्के) लाभार्थी असून अनुसूचित जमातीचे ३ (३ टक्के) लाभार्थी आहेत. सदर लाभार्थी प्रवर्गाचा विचार करता योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पात्रता निकषांच्या आधारावरच लाभार्थ्यांची निवड झाल्याचे दिसून येते.

मुळशी तालुक्यात एकूण लाभार्थ्यांमध्ये दारिद्रय रेषेखालील खुला व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील लाभार्थी सर्वाधिक आहेत व त्यानंतर अनुसूचीत जाती व जमातीचे लाभार्थी आहेत.

### ४.२.६ इंदिरा आवास योजना : घरकुल लाभाचे घटक

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत एकूण तीन घटकांतर्गत घरकुलाचा लाभ दिला जातो. यामध्ये नविन घरे बांधण्यासाठी सहाय्य, कच्च्या व मोडकळीस आलेल्या घरांची दुरुस्ती (दर्जावाढ) तसेच बेघर असल्याने जागा संपादीत करून त्यावर घराचे बांधकाम करणे या तीन घटकांतर्गत लाभार्थ्यांना सहाय्य केले जाते.

प्राप्त माहितीच्या आधारे योजनेअंतर्गत मुळशी तालुक्यात २००८ ते २०१४ या कालावधीत ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांना स्वतःच्या जागेवर नवीन घरांचे बांधकाम करण्यासाठी सहाय्य मिळालेले आहे. म्हणजेच मुळशी तालुक्यात स्वतःची जागा उपलब्ध असणाऱ्या स्थानिक लाभार्थ्यांना नविन घरकुल बांधण्यासाठी लाभ दिला आहे.

## ४.३ मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकाम प्रक्रिया :

मुळशी तालुक्यात स्वतःची जागा उपलब्ध असणाऱ्या स्थानिक लाभार्थ्यांनाच नविन घरकुल बांधण्यासाठी योजनेअंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे. सदर योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ देताना तसेच घरकुल बांधकामासंबंधीची विशिष्ट मानकेही निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकामाशी संबंधीत सर्व प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. मुळशी तालुक्यात योजनेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे घरकुल बांधकाम प्रक्रिया पुर्ण झाली आहे किंवा नाही हे अभ्यासणे सदर संशोधन अभ्यासाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट्य आहे. त्यानुसार घरकुल प्राप्त लाभार्थ्यांकडून प्राथमिक माहिती घेण्यात आली आहे. लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे सविस्तर विश्लेषण पुढे देण्यात आले आहे.

### ४.३.१ घरकुल बांधकाम मुदतीत पूर्ण करण्यासंबंधीत करारनामा :

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडलेल्या लाभार्थ्यांकडून घरकुल बांधकाम मुदतीत पुर्ण करण्यासंदर्भात रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येतो. यानुसार मुळशी तालुक्यातील लाभार्थ्यांकडून रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात आला आहे किंवा नाही याबाबतची स्थिती पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आली आहे.

**सारणी क्र. ४.५**

**घरकुल बांधकामासंबंधी करारनामा तपशील**

| अ. क्र. | स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात आला | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आहे | ३२ | २८ % |
| २ | नाही (याबाबत काहीही माहिती नाही) | ८३ | ७२ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.५ वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त ११५ पैकी केवळ ३२ (२८ टक्के) लाभार्थ्यांनी रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात आल्याचे सांगितले आहे. परंतु करारनाम्याची प्रत लाभार्थ्यांकडे उपलब्ध नाही. तसेच स्टॅम्प पेपरवर करारनामा केलेला नाही किंवा याबाबत काहीही माहिती नसलेले ८३ (७२ टक्के) लाभार्थी आहेत व हे प्रमाण सर्वाधिक आहे.

सर्वाधिक लाभार्थ्यांनी करारनामा झाला नसल्याचे किंवा याविषयी काहीच माहिती नसल्याचे सांगितले आहे. याबाबत ग्रामसेवक व पंचायत समिती अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता, त्यांच्या मते प्रत्येक लाभार्थ्यांची स्वाक्षरी अथवा अंगठ्याचा ठसा असलेले रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवरील करारनामे तयार आहेत. सर्व करारनामे पंचायत समिती स्तरावर प्रत्येक लाभार्थ्यांच्या नावे स्वतंत्र फाईलमध्ये ठेवण्यात आलेले आहेत. ग्रामीण पातळीवरील बहुतांशी लाभार्थी हे निरक्षर व ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाचे वयस्क व्यक्ती असतात. अशा लाभार्थ्यांना कागदपत्रांच्या पूर्ततेसंबधीत सर्व बाबी लक्षात येत नाही. त्यामुळे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असते परंतु लाभार्थ्यांना याबाबत काही सांगता येत नाही असे ग्रामसेवकांनी सांगितले.


सदर घटकाबाबत मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेची कार्यवाही झाल्याचे दिसून येत असले तरी प्रत्यक्षात मात्र ७२ टक्के लाभार्थ्यांमध्ये याविषयी जागृती नसल्याचे दिसून येते. करारनामा का व कधी केला जातो, त्याची आवश्यकता याबाबत लाभार्थी अनभिज्ञ असल्याचे दिसून येते. लाभार्थी वयस्क किंवा निरक्षर असले तरी कार्यकारी यंत्रणेकडून लाभार्थ्यांना किमान माहिती देणे किंवा समजावून सांगितले जात नसल्याचे दिसून येते. तसेच एकाही लाभार्थ्याकडे करारनाम्याची छायांकित प्रत दिसून आलेली नाही. एकूणच याविषयी लाभार्थ्यांमध्ये जाणीवजागृतीचा अभाव दिसून येतो.

### ४.३.२ लाभार्थीनिहाय घरकुल मंजुरीचे वर्ष :

संशोधन अभ्यासाचे २००८ ते २०१४ या कालावधीतील नविन घरकुल बांधून पुर्ण झालेले लाभार्थी हेच 'लक्ष्यगट' आहेत. मार्गदर्शक सूचनेनुसार ठरलेल्या कालावधीत घरकुल बांधून पूर्ण झाले आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी लाभार्थ्यांना घरकुल कधी मंजुर झाले होते हे जाणून घेणे आवश्यक ठरते. यासंबंधीत प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील आलेख क्र. ४.४ मध्ये देण्यात आले आहे.

**आलेख क्र. ४.४**

**लाभार्थी घरकुल मंजुरीचा वर्षनिहाय तपशील**





आलेख क्र. ४.४ वरुन असे स्पष्ट होते की, प्रामुख्याने २०१३-१४ या वर्षामध्ये घरकुल मंजुर झालेले ५१ (४४ टक्के) लाभार्थी असून ते सर्वाधिक आहेत. २०१२-१३ या वर्षात २७ (२४ टक्के) लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झालेले आहे. तसेच २०११-१२ व २०१०-११ मध्ये अनुक्रमे २९ (२५ टक्के) व ८ (७ टक्के) लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झालेली आहेत. थोडक्यात २०१३-१४ या वर्षात सर्वात जास्त लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झाले असल्याचे दिसून येते.

### ४.३.३ घरकुलाचे क्षेत्रफळ :

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार २६९ चौ.फु. क्षेत्रामध्ये घरकुलाचे बांधकाम होणे आवश्यक आहे व त्याअनुषंगाने लाभार्थ्यांना अनुदान देण्यात येते. यानुसार मुळशी तालुक्यात लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम २६९ चौ.फु. क्षेत्रामध्ये झाले आहे किंवा नाही हे जाणून घेण्यात आले. याबाबतचा तपशील पुढील आलेख क्र. ४.५ मध्ये देण्यात आलेला आहे.

**आलेख क्र. ४.५**

**घरकुल बांधकाम क्षेत्रफळासबंधी तपशील**




सोबतचा आलेख क्र. ४.५ वरुन असे स्पष्ट होते की, सर्वाधिक १०८ (९४ टक्के) लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम हे २६९ चौ.फु. क्षेत्रापेक्षा अधिकच्या जागेत झालेले आहे. उर्वरित ७ (६ टक्के) लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम २६९ चौ.फु. क्षेत्रामध्ये झालेले आहे. मार्गदर्शक सूचनेनुसार १०० टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम २६९ चौ.फु. क्षेत्रामध्ये पुर्ण झाल्याचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात मात्र १०८ लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम हे २६९ चौ.फु. पेक्षा जास्त क्षेत्रामध्ये झालेले आहे.

याबाबत लाभार्थ्यांशी चर्चा केली असता, कुटुंबातील सदस्यांची संख्या, त्यानुसार सदस्य व वस्तुंसाठी लागणारी जागा, घरातील मोकळीकता, सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमासाठी लागणारी जागा इ. दृष्टीने २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल हे कुटुंबांसाठी पुरेसे ठरत नाही. त्यामुळे स्वतःच्या जागेवर अधिक पैसे खर्च करुन व कर्ज काढून गरजेनुसार घराचे बांधकाम केले असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.

### ४.३.४ घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना प्राप्त रक्कम :

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या लाभाचे स्वरुप रू. ६८५००/- इतके होते. सन २०१३-१४ पासून केंद्र व राज्य शासनामार्फत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या लाभाचे स्वरुप रू. ९५०००/- इतके करण्यात आले आहे. त्यानुसार ११५ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्राप्त झालेल्या रकमेचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.६**

**घरकुल बांधकामासाठी प्राप्त रक्कमेचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल बांधकामासाठी प्राप्त झालेली रक्कम | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रू. ६८५००/- | ६४ | ५६ % |
| २ | रू. ९५०००/- | ५१ | ४४ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.६ वरुन स्पष्ट होते की, सन २०१० ते २०१३ मधील एकूण ६४ (५६ टक्के) लाभार्थ्यांना प्रति घरकुल रू. ६८५००/- प्रमाणे घरकुलाची रक्कम देण्यात आली आहे. तसेच २०१३-१४ मधील ५१ (४४ टक्के) लाभार्थ्यांना प्रति घरकुल रू. ९५०००/- प्रमाणे घरकुलाची रक्कम देण्यात आली आहे. एकूणच योजनेअंतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाची रक्कम प्राप्त झाली आहे.

### ४.३.५ घरकुल बांधकामासाठी देण्यात आलेल्या रकमेचे टप्पे :

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये घरकुल बांधकामासाठीची रक्कम लाभार्थ्यांना तीन टप्प्यांमध्ये देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी किती टप्प्यात रक्कम प्राप्त झाली याची माहिती घेण्यात आली होती. प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आली आहे.

**सारणी क्र. ४.७**

**घरकुल बांधकामासाठी प्राप्त रक्कमेचा टप्पेनिहाय तपशील**

| अ. क्र. | **घरकुल बांधकामासाठी प्राप्त रक्कमेचे टप्पे** (२०१३ पुर्वी व २०१३ नंतरचे लाभार्थी) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तीन टप्प्यात रक्कम प्राप्त | ११३ | ९८% |
| २ | तीन पेक्षा कमी (दोन टप्प्यात) | २ | २% |
| **एकूण** | | **११५** | **१००%** |

सारणी क्र. ४.७ वरुन असे स्पष्ट होते की, सर्वाधिक ११३ (९८ टक्के) लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी एकूण तीन टप्प्यात रक्कम प्राप्त झालेली असून हे प्रमाण जास्त आहे. तसेच केवळ २ (२ टक्के) लाभार्थ्यांच्या मते त्यांना तीन पेक्षा कमी म्हणजेच दोन टप्प्यात रक्कम प्राप्त झाली असून हे प्रमाण नगण्य आहे. योजनेअंतर्गत २ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी दोन टप्प्यात रक्कम प्राप्त झाली आहे. याबाबत ग्रामसेवकाशी चर्चा केली असता, त्यांच्यामते काही तांत्रिक व आर्थिक अडचणींमुळे लाभार्थ्यांना दोन टप्प्यात रकमेचे वाटप करण्यात आले होते. असे असले तरी लाभार्थ्यांना घरकुलाची मंजुर असलेली पूर्ण रक्कम देण्यात आली आहे.

थोडक्यात योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार घरकुल बांधकामासाठीची रक्कम सर्व लाभार्थ्यांना एकूण तीन टप्प्यात देण्यात आली आहे हे स्पष्ट होते.

### ४.३.६ घरकुल बांधकामातील लाभार्थी हिस्सा :

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार घरकुल बांधकामासाठी लाभार्थी हिस्सा म्हणून लाभार्थ्यांनी किमान रक्कम खर्च करावयाची आहे. त्यानुसार सन २०१३ पुर्वी घरकुल बांधकामातील लाभार्थी हिस्सा हा रू. १५००/- होता तो सन २०१३ नंतर रू. ५०००/- करण्यात आला आहे. म्हणजेच शासकीय अनुदानाशिवाय लाभार्थ्याने स्वतः किमान रक्कम खर्च करुन घरकुलाचे बांधकाम पुर्ण करावयाचे आहे. यानुसार लाभार्थ्यांनी स्वतः केलेल्या खर्चाचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.८**

**घरकुल बांधकामातील लाभार्थी हिस्सा तपशील**

| अ. क्र. | घरकुल बांधकामातील लाभार्थ्याचा हिस्सा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रक्कम रु. १० हजार ते ५० हजार | ५५ | ४८ % |
| २ | रक्कम रु. ५० हजार ते १ लाख | ३३ | २९ % |
| ३ | रक्कम रु. १ लाख ते ४ लाख | ११ | ९ % |
| ४ | शासकीय अनुदानातूनच बांधकाम पूर्ण केले | १६ | १४ % |
| | **एकूण** | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.८ वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त एकूण ११५ लाभार्थ्यांपैकी सर्वाधिक ५५ (४८ टक्के) लाभार्थ्यांनी घरकुल बांधकामासाठी रु. १० हजार ते ५० हजार इतकी रक्कम खर्च केलेली आहे. घरकुल बांधकामासाठी रु. ५० हजार ते १ लाख इतकी रक्कम खर्च करणारे ३३ (२९ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच रक्कम रु. १ लाख ते ४ लाख या दरम्यान खर्च केलेले एकूण ११ (९ टक्के) लाभार्थी आहेत. शासनाकडून मिळालेल्या रक्कमेतच घरकुलाचे बांधकाम पुर्ण करणारे १६ (१४ टक्के) लाभार्थी आहेत.

मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांनी शासकीय अनुदान व्यतिरिक्त स्वतःचा हिस्सा म्हणून किमान रक्कम (रु. १५०० ते रु. ५०००) खर्च करावयाची होती. प्रत्यक्षात मात्र मार्गदर्शक सूचनेत दिलेल्या रकमेपेक्षा कितीतरी पटीने अधिक रक्कम लाभार्थ्यांना खर्च करावी लागली आहे. घरकुल बांधकामासाठी स्वतःचा हिस्सा खर्च करणारे एकूण ८६ टक्के लाभार्थी असून हे प्रमाण जास्त आहे. लाभार्थ्यांनी

खर्च केलेली रक्कम ही रु. १०००० पासून रु. ४ लाखापर्यंत आहे. तसेच उर्वरित १४ टक्के लाभार्थ्यांनी मिळालेल्या अनुदानाच्या रकमेतूनच जमेल त्या पध्दतीने घरकुल बांधकाम पूर्ण केले आहे. हे प्रत्यक्ष निरीक्षणातही दिसून आले आहे.

याबाबत लाभार्थ्यांशी केलेल्या चर्चेवरुन असे दिसून येते की, योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना केवळ २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल बांधकामासाठी अनुदान दिले जाते. मात्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या रकमेमध्ये २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुलाचे बांधकाम पूर्ण होत नसून मिळणारे अनुदान कमी पडत आहे. तसेच २६९ चौ.फु. क्षेत्रातील घर हे कुटुंबाच्या सर्वांगिण गरजेनुसार पुरेसे ठरत नाही (वरील आलेख क्र. ४.५ चे स्पष्टीकरण). त्यामुळे सर्वाधिक १०८ (९४ टक्के) लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम हे २६९ चौ.फु. पेक्षा अधिकच्या क्षेत्रामध्ये झालेले आहे.

अशा प्रकारे २६९ चौ.फु. क्षेत्रातील तसेच त्यापेक्षा अधिकच्या जागेत घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी सर्वाधिक ९९ (८६ टक्के) लाभार्थ्यांना बँकेचे कर्ज काढावे लागले आहे. या ९९ लाभार्थ्यांपैकी ५ ते ६ लाभार्थी असेही आहेत की, ज्यांनी आपल्या उत्तम आर्थिक स्थितीनुसार स्वतःची अधिकाधिक रक्कम खर्च करुन प्रशस्त घर बांधले आहे. परंतु खरोखरच आर्थिक स्थिती बिकट असलेल्या लाभार्थ्यांना बँकेचे कर्ज काढून घराचे बांधकाम पुर्ण करावे लागले आहे. त्यामुळे एकीकडे घरकुल प्राप्त झाले असले तरी त्यासाठी लाभार्थ्यांना कर्जबाजारी व्हावे लागल्याचे दिसून येते. तसेच घरकुल बांधकामासाठी मिळणारे अनुदान हे पुरेसे नसल्याचे ग्रामसेवकांनीही सांगितले आहे.

**४.३.७ अनुदान प्राप्तीसाठी सरकारी बँकेत खाते उघडणी :**

'इंदिरा आवास योजने'अंतर्गत घरकुल बांधकासासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान हे लाभार्थ्यांच्या नावे बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते. त्यामुळे अनुदानाचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. याबाबतचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आलेला आहे.

**सारणी क्र. ४.९**

**अनुदान प्राप्तीसाठी लाभार्थी बँक खात्याचा तपशील**

| **अ. क्र.** | **लाभार्थ्यांचे बँक खाते** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | सरकारी बँकेत स्वतःच्या नावे खाते उघडले आहे | ११३ | ९८ % |
| २ | नातेवाईकांच्या नावावरील सरकारी बँकेतील खात्यात अनुदान जमा करुन घेण्यात आले | २ | २ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.९ वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त एकूण ११५ लाभार्थ्यांपैकी ११३ (९८ टक्के) लाभार्थ्यांनी सरकारी बँकेत स्वतःचे खाते उघडलेले आहे. उर्वरित २ (२ टक्के) लाभार्थ्यांचे स्वतःच्या नावे बँकेत खाते नव्हते परंतु नातेवाईकांच्या नावे सरकारी बँक खात्यामध्ये अनुदान जमा करून घेण्यात आले होते. याबाबत ग्रामसेवकांशी चर्चा केली असता, बँकेत खाते उघडण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता वेळेत होऊ शकली नव्हती व अनुदान तातडीने जमा करावयाचे असल्याने लाभार्थ्यांच्या नातेवाईकांच्या नावे बँक खात्यात अनुदान जमा करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

एकूणच मार्गदर्शक सूचनेप्रमाणे लाभार्थ्यांच्या नावे सरकारी बँकेत खाते उघडण्यात आले व खात्यात योजनेचे अनुदान जमा करण्यात आल्याचे स्पष्ट होते.

### ४.३.८ मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकामाचे टप्पे :

'इंदिरा आवास योजने'च्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रामुख्याने घरकुल बांधकामाचे महत्त्वाचे दोन टप्पे आहेत. या टप्प्यांनुसारच लाभार्थ्यांना घरकुलाचे अनुदान दिले जाते. अनुदानाचा पहिला हप्ता मिळाल्यापासून ९ महिन्यात लिंटेनपर्यंत बांधकाम पुर्ण करणे (पहिला टप्पा) तसेच दुसरा हप्ता मिळाल्यापासून ९ महिन्यात शौचालयासह बांधकाम पुर्ण होणे अपेक्षित आहे (दुसरा टप्पा). एकूण १८ महिन्यामध्ये घरकुलाचे बांधकाम पूर्ण होणे आवश्यक आहे. याआधारे मुळशी तालुक्यातील लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामाच्या टप्प्यांचे स्वरुप जाणून घेण्यात आले.

प्राप्त माहितीच्या आधारे असे दिसून येते की, मुळशी तालुक्यात ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम मार्गदर्शक सूचनेतील टप्प्यांनुसार पूर्ण झालेले नाही. तर सर्व लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम हे १८ महिन्यापेक्षा कमी कालावधीमध्ये पूर्ण झालेले आहे. त्यामुळे या घटकांबाबत मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योजनेची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही.


याबाबत लाभार्थी व ग्रावसेवकांशी चर्चा करण्यात आली. त्यांच्या मते प्रामुख्याने २६९ चौ.फु. घरकुलाचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी ५ ते ६ महिन्यांचा कालावधी पुरेसा असतो. तसेच पहिला हप्ता मिळाल्यानंतर घरकुलाचे बांधकाम सुरु केल्यावर ते पुर्ण झाल्याशिवाय थांबविणे शक्य होत नाही. तसेच शासनाकडून मिळणारा निधी वेळेत प्राप्त होत नाही त्यामुळे लाभार्थी स्वतः कडील पैसा व बँकेतून कर्ज काढून बांधकाम पूर्ण करुन घेतात. शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर ठरलेल्याप्रमाणे तीन टप्प्यांमध्ये लाभार्थ्यांना अनुदान दिले जाते असे ग्रामसेवकांनी सांगितले. म्हणजेच आर्थिक कारणामुळे घरकुलाचे बांधकाम हे मार्गदर्शक सूचनेतील टप्प्यांनुसार पूर्ण करण्यात अडचण येत असल्याचे दिसून येते.

### ४.३.९ घरकुल बांधकामाचा प्रत्यक्ष कालावधी :

'इंदिरा आवास योजने'अंतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार एकूण १८ महिन्यामध्ये घरकुलाचे बांधकाम पुर्ण करणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात मात्र १८ महिन्यापेक्षा कमी कालावधीतच लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे घरकुल बांधकाम पुर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना प्रत्यक्षात किती कालावधी लागला याची माहिती पुढील आलेख क्र. ४.६ मध्ये देण्यात आली आहे.

**आलेख क्र. ४.६**

**घरकुल बांधकामासाठी लागलेला कालावधी**




आलेख क्र. ४.६ वरुन असे दिसून येते की, घरकुलाचे बांधकाम तीन महिन्यामध्ये पूर्ण झालेले सर्वाधिक एकूण ५० (४३ टक्के) लाभार्थी आहेत. घरकुलाचे बांधकाम ४ ते ६ महिने कालावधीमध्ये पुर्ण करणारे ४८ (४२ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच ७ ते ९ महिने कालावधीत घरकुल बांधून पुर्ण झालेले १५ (१३ टक्के) लाभार्थी असून घरकुल बांधकामासाठी १० ते १३ महिन्याचा कालावधी लागला असे २ (२ टक्के) लाभार्थी आहेत.

यावरून असे दिसून येते की, साधारणपणे ३ ते ६ महिने कालावधीमध्ये घरकुल बांधकाम पुर्ण करणारे लाभार्थी जास्त असून त्याचे प्रमाण ८५ टक्के आहे. २६९ चौ.फु. घरकुलाचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी अधिकाधिक ५ ते ६ महिन्यांचा कालावधी पुरेसा असतो असे लाभार्थी व ग्रामसेवकांनी सांगितले. पहिला हप्ता प्राप्त झाल्यावर घरकुलाचे बांधकाम सुरु केल्यानंतर ते पुर्ण झाल्याशिवाय थांबविणे शक्य होत नाही. तसेच शासनाकडून वेळेत निधी उपलब्ध होण्यास येणाऱ्या अडचणी या कारणांमुळे घरकुलाचे बांधकाम मार्गदर्शक सूचनेत दिलेल्या कालावधीपेक्षा (१८ महिने) कमी कालावधीत पूर्ण होत असल्याचे दिसून येते.

### ४.३.१० घरकुलातील शौचालय बांधकामासाठी आर्थिक सहाय्याचा स्त्रोत :

'इंदिरा आवास योजने'च्या मार्गदर्शक सूचनेनुसार शौचालयासह घरकुलाचे बांधकाम पुर्ण करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय शेवटचा हप्ता लाभार्थ्यांना दिला जात नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना प्राधान्याने केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनांच्या माध्यमातून (Convergence) घरकुलामध्ये शौचालय बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य पुरविण्यात येण्यासंबंधी शासनाच्या स्पष्ट सूचना आहेत. त्यानुसार घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना शौचालय बांधकामासाठी आर्थिक सहाय्य कोठून प्राप्त झाले याविषयीचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१०**

**शौचालय बांधकामासाठी आर्थिक स्त्रोताचा तपशील**

| अ. क्र. | शौचालय बांधकामाचा आर्थिक सहाय्य स्त्रोत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निर्मल भारत अभियान (आत्ताचे स्वच्छ भारत मिशन) | ५२ | ४५ % |
| २ | इंदिरा आवास योजनेअंतर्गत | ६० | ५२ % |
| ३ | ग्रामपंचायतीकडून वस्तीवर सार्वजनिक शौचालय बांधून देण्यात आलेली आहे | ३ | ३ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१० वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त सर्वच ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांनी शौचालये बांधलेली आहेत. यामध्ये ११२ लाभार्थी असे आहेत की, ज्यांनी घरकुलात व्यक्तीगत शौचालय बांधली आहेत. तर उर्वरित ३ लाभार्थ्यांनी वस्तीवर सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध असल्याचे सांगितले आहे.

यानुसार सर्व लाभार्थ्यांना शौचालय बांधकामासाठी आर्थिक सहाय्य कोठून मिळाले याबाबत माहिती विचारण्यात आली होती. यातील ५२ (४५ टक्के) लाभार्थ्यांना निर्मल भारत अभियान (स्वच्छ भारत मिशन) अंतर्गत शौचालय बांधकामासाठी लाभ मिळालेला आहे. तसेच ६० (५२ टक्के) लाभार्थ्यांनी इंदिरा आवास योजनेच्या प्राप्त रकमेतूनच शौचालयाचे बांधकाम केलेले आहे. उर्वरित ३ टक्के लाभार्थी ग्रामपंचायतीने वस्तीवर स्वनिधीतून बांधून दिलेल्या सार्वजनिक शौचालयांचा वापर करत आहेत.

थोडक्यात वरील स्पष्टीकरणावरुन असे दिसून येते की, सर्व लाभार्थ्यांना शौचालय बांधण्यासाठी शासकीय योजनेअंतर्गतच लाभ मिळालेला आहे. परंतु योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थ्यांना शौचालय बांधकामासाठी केंद्र व राज्य सरकारच्या इतर योजनेच्या माध्यमातून (Convergence) व त्यातही प्रामुख्याने निर्मल भारत अभियानातून आर्थिक लाभ मिळावा. तसेच 'इंदिरा आवास योजने'अंतर्गत प्राप्त निधीचा उपयोग प्रामुख्याने घरकुल बांधकामासाठी करण्यात यावा. प्रत्यक्षात मात्र ४५ टक्के लाभार्थ्यांनाच निर्मल भारत अभियानातून शौचालय बांधकामासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध झाले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, मुळशी तालुक्यातील उर्वरित ५५ टक्के लाभार्थ्यांना शौचालय बांधकामासाठी इतर योजनेच्या माध्यमातून व प्रामुख्याने निर्मल भारत अभियानांतर्गत आर्थिक सहाय्य मिळाल्याचे प्रमाण कमी आहे.

### ४.३.११ घरकुल बांधकामाविषयी लाभार्थ्यांना प्रशिक्षण :

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत मार्गदर्शन सूचनेनुसार घरकुल बांधकामाची पध्दती, बांधकामाशी संबंधीत आर्थिक व्यवहार व आवश्यक साहित्य खरेदी प्रक्रिया, निर्धुर चुलीचे महत्त्व, संकल्प चित्राप्रमाणे घराचे बांधकाम इ. बाबत सविस्तर प्रशिक्षण लाभार्थ्यांना देणे आवश्यक आहे. त्यामुळे मुळशी तालुक्यात घरकुल बांधकामाविषयी प्रशिक्षण देण्यात आले होते किंवा नाही याची लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली. प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.११**

**घरकुल बांधकामाविषयी लाभार्थी प्रशिक्षणाचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल बांधकामासंदर्भात प्रशिक्षण देण्यात आले | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६६ | ५७ % |
| २ | नाही | ४९ | ४३ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.११ वरुन असे स्पष्ट होते की, घरकुल बांधकामाविषयी प्रशिक्षण मिळाले असल्याचे सर्वाधिक ६६ (५७ टक्के) लाभार्थ्यांनी म्हटले आहे. तसेच उर्वरित ४९ (४३ टक्के) लाभार्थ्यांनी घरकुल बांधकामाविषयी प्रशिक्षण मिळाले नसल्याचे सांगितले. एकूण लाभार्थ्यांपैकी सर्वाधिक ६६ लाभार्थ्यांना प्रशिक्षण मिळाल्याचे दिसून येते. असे असले तरी प्रत्यक्षात लाभार्थ्यांच्या मते घरकुलाचे क्षेत्रफळ, आर्थिक लाभाची रक्कम व त्याचे टप्पे इ. बाबत पंचायत समिती स्तरावर फक्त माहिती देण्यात आली होती. तसेच घरकुल बांधकामाविषयक प्रशिक्षण न मिळालेले ४९ लाभार्थी आहेत. त्यापैकी काही लाभार्थी हे प्रशिक्षणास उपस्थित नव्हते तर काही लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत स्तरावरुन प्रशिक्षणाविषयी काहीच माहिती देण्यात आली नसल्याचे सांगितले.

तसेच पंचायत समिती स्तरावर सर्व लाभार्थ्यांना एक दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आल्याचे ग्रामसेवकांनी सांगितले. प्रत्यक्षात मात्र केवळ ६६ लाभार्थ्यांना प्रशिक्षण मिळाल्याचे दिसून येते. याबाबत पंचायत समिती स्तरावर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी असे सांगितले की, गावनिहाय लाभार्थ्यांची संख्या जास्त असते व योजनेअंतर्गत येणारा निधी हा पुरेसा नसतो त्यामुळे सर्वच लाभार्थ्यांसाठी सविस्तर प्रशिक्षणाचे आयोजन करणे शक्य होत नाही. त्यामुळे वेळोवेळी लाभार्थ्यांना मार्गदर्शन/माहिती देण्याचा प्रयत्न केला जातो.

यावरून असे दिसून येते की, योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मुळशी तालुक्यात लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासंबंधी सर्व घटकनिहाय प्रशिक्षण देण्यात आलेले नाही.

### ४.३.१२ घरकुल बांधकामविषयी लाभार्थ्यांना मिळालेले मार्गदर्शन :

'इंदिरा आवास योजने'च्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर लाभार्थ्यांना गरजेनुसार तसेच वेळोवेळी ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य व तालुका स्तरावरील यंत्रणा इ. मार्फत मार्गदर्शन केले जाणे अपेक्षित आहे. यानुसार घरकुल बांधकामाबाबत लाभार्थ्यांना कोणाचे मार्गदर्शन मिळाले याची माहिती घेण्यात आली. त्याचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१२**

**घरकुल बांधकामाविषयी मिळालेल्या मार्गदर्शनाचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल बांधकामाविषयी मिळालेले मार्गदर्शन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसेवक | ६८ | ५९ % |
| २ | ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य | ४७ | ४१ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१२ वरील माहितीच्या आधारे असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त लाभार्थीपैकी ६८ (५९ टक्के) लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम पुर्ण करण्याबाबत ग्रामसेवकाकडून वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले आहे. ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य यांच्याकडून घरकुल बांधकामासंबंधी मार्गदर्शन मिळालेले ४७ (४१ टक्के) लाभार्थी आहेत. म्हणजेच सर्वच ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांना ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य यांच्याकडून मार्गदर्शन मिळालेले आहे. तसेच तालुका स्तरीय अंमलबजावणी यंत्रणेमार्फत एकाही लाभार्थ्यास मार्गदर्शन मिळाल्याचे दिसून येत नाही.

### ४.३.१३ घरकुलाचे बांधकाम कोणामार्फत पुर्ण करण्यात आले :

योजनेअंतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार २६९ चौ.फु. क्षेत्रामध्ये घरकुल संकल्प चित्राप्रमाणे प्रशिक्षित व अनुभवी मिस्त्रीकडून घरकुलाचे बांधकाम करुन घेणे अपेक्षित आहे. तसेच घरकुल बांधकामामध्ये लाभार्थी स्वतः श्रमदान करु शकतो. यानुसार मुळशी तालुक्यातील लाभार्थ्यांनी कोणामार्फत घरकुलाचे बांधकाम पुर्ण केले आहे याचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१३**

**घरकुलाचे बांधकाम कोणामार्फत पुर्ण करण्यात आले**

| अ. क्र. | घरकुलाचे बांधकाम कोणामार्फत पूर्ण केले गेले | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मिस्त्री कडून | ११३ | ९८ % |
| २ | स्वतः श्रमदान करुन व इतर मजुरांच्या मदतीने | २ | २ % |
| **एकुण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१३ वरुन असे स्पष्ट होते की, एकुण ११३ (९८ टक्के) लाभार्थ्यांनी मिस्त्री मार्फत संकल्प चित्राप्रमाणे घरकुलाचे बांधकाम पुर्ण केले आहे. उर्वरित २ (२ टक्के) लाभार्थ्यांनी मजुरांच्या मदतीने व स्वतः श्रमदान करून घरकुलाचे बांधकाम पुर्ण केले आहे. यावरुन मार्गदर्शक सूचनेनुसार सर्वाधिक ९८ टक्के घरकुलांची बांधकामे ही मिस्त्री मार्फत पुर्ण करण्यात आल्याचे स्पष्ट होते.

### ४.३.१४ घरकुल बांधकाम : मिस्त्रीचे प्रशिक्षण

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलांचे बांधकाम मिस्त्रीकडून करुन घेण्यात यावे. तसेच बांधकामासंबंधी आवश्यक घटकांचे मिस्त्रीला प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. यानुसार मिस्त्रींच्या प्रशिक्षणासंबंधी लाभार्थ्यांशी चर्चा करण्यात आली. चर्चेचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१४**

**घरकुल बांधकामाविषयी मिस्त्री प्रशिक्षणाचा तपशील**

| अ. क्र. | मिस्त्रीला प्रशिक्षण देण्यात आले | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नाही | ७८ | ६८ % |
| २ | माहिती नाही | ३७ | ३२ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१४ वरुन असे स्पष्ट होते की, घरकुल बांधकामासंदर्भात मिस्त्रींना प्रशिक्षण देण्यात आलेले नाही असे म्हणणारे सर्वाधिक ७८ (६८ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच मिस्त्रीला प्रशिक्षण देण्यात आले आहे किंवा नाही याबाबत काहीच माहिती नसल्याचे ३७ (३२ टक्के) लाभार्थ्यांनी म्हटले आहे.

याबाबत ग्रामसेवक व पंचायत समिती स्तरीय वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता असे सांगण्यात आले की, केंद्र व राज्य सरकारच्या इतर योजनेच्या माध्यमातून (Convergence) तरतुद करुन मिस्त्रींना प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. मात्र इतर योजनेमधील व इंदिरा आवास योजनेतील निधीची कमतरता तसेच विखुरलेल्या मिस्त्रींना एकत्रित करुन त्यांच्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करणे शक्य होत नाही किंवा झालेले नाही. म्हणजेच मुळशी तालुक्यात घरकुलांचे बांधकाम मिस्त्रीमार्फत पूर्ण करुन घेतले असले तरी बांधकामाविषयी मिस्त्रींना प्रशिक्षण देण्यात आलेले नाही.

### ४.३.१५ घरकुल बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र :

मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकाम पूर्ण झाल्याचे उपअभियंता यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र लाभार्थ्यांना देणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांना सदर प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे किंवा नाही याबाबतचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१५**

**घरकुल बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र प्राप्तीचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळाले | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १९ | १७ % |
| २ | नाही (याबाबत काहीही माहिती नाही) | ९६ | ८३ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१५ वरून असे स्पष्ट होते की, 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत घरकुल बांधकाम पुर्ण झाल्यानंतर उपअभियंता यांचेकडून पुर्णत्वाचा दाखला मिळाला आहे असे १९ (१७ टक्के) लाभार्थ्यांनी सांगितले. परंतु त्यांच्याकडे दाखल्याची प्रत उपलब्ध नाही. सर्वाधिक ९६ (८३ टक्के) लाभार्थ्यांनी पुर्णत्वाचा दाखला मिळालेला नाही किंवा याबाबत काहीही माहिती नसल्याचे सांगितले आहे.

याबाबत ग्रामसेवक व पंचायत समिती अधिकारी यांच्याशी केलेल्या चर्चेनुसार असे स्पष्ट होते की, प्रत्येक लाभार्थ्यांच्या नावे उपअभियंता यांच्या स्वाक्षरीचा घरकुल पुर्णत्वाचा दाखला तयार आहे. सर्व दाखले पंचायत समिती स्तरावर प्रत्येक लाभार्थ्यांच्या नावे स्वतंत्र फाईलमध्ये ठेवण्यात आलेले आहेत. तसेच ग्रामीण पातळीवरील बहुतांशी लाभार्थी हे निरीक्षर व ६० पेक्षा अधिक वयाचे वयस्क व्यक्ती आहेत. अशा लाभार्थ्यांना कागदपत्रांच्या पूर्ततेसंबधीत सर्व बाबी लक्षात येत नाही. सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असते परंतु त्यांना त्याविषयी काहीही सांगता येत नाही असे ग्रामसेवकांनी सांगितले.

यावरुन असे दिसून येते की, मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेची कार्यवाही झालेली आहे. परंतु प्रत्यक्षात सर्वाधिक ८३ टक्के लाभार्थ्यांनी पुर्णत्वाच्या दाखल्याविषयी काहीही माहिती नसल्याचे सांगितले. तसेच लाभार्थी वयस्क किंवा निरक्षर असले तरी पुर्णत्वाच्या दाखल्याचे महत्त्व याविषयी कार्यकारी यंत्रणेकडून लाभार्थ्यांना किमान माहिती दिली जात नाही किंवा समजावून सांगितले जात नसल्याचे दिसून येते. तसेच एकाही लाभार्थ्याकडे पुर्णत्वाच्या दाखल्याची छायांकित प्रत दिसून आलेली नाही. एकूणच बांधकाम पुर्णत्वाच्या दाखल्याविषयी लाभार्थ्यांमध्ये जाणीव जागृतीचा अभाव दिसून येतो.

### ४.३.१६ निरीक्षण सूची : मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलासंबंधीत घटक

संशोधन अभ्यासांतर्गत लाभार्थ्यांकडून प्राथमिक माहिती गोळा करत असताना घरकुल बांधकामासंबंधी काही घटकांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले होते. प्रत्यक्ष निरीक्षणात आलेल्या घटकांची नोंद निरीक्षण सूचीमध्ये करण्यात आली होती. त्या आधारे मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकामसंबंधी सर्व घटकांची कार्यवाही पुर्ण झाली आहे किंवा नाही याबाबतचा तपशील प्राप्त झाला आहे. प्राप्त माहितीचे सविस्तर विश्लेषण पुढील सारणीमध्ये देण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४.१६**

**घरकुल बांधकामासंबंधीत प्रत्यक्ष निरीक्षणात आलेल्या घटकांचा तपशील**

| अ. क्र. | बांधकामसंबंधीत निरीक्षणातील घटक | आहे (संख्या) | टक्केवारी % | नाही (संख्या) | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| १ | घराचे स्वरुप व्यक्तीगत | ११५ | १०० % | ०० | ०० % |
| २ | घरामध्ये लाभार्थी स्वत: राहत | ११५ | १०० % | ०० | ०० % |
| ३ | घराच्या दर्शनीय भिंतीवर ऑईलपेंटने योजनेचे नामफलक करण्यात आले | ६६ | ५७ % | ४९ | ४३ % |
| ४ | घराचे बांधकाम नैसर्गिक आपत्तीपासून बचावात्मक स्वरुपाचे | ११५ | १०० % | ०० | ०० % |
| ५ | घरकामासाठी स्थानिक हवामानास अनुरुप साहित्य तसेच संरचनेचा वापर केला | ११५ | १०० % | ०० | ०० % |
| ६ | घराच्या भिंती (विटा व सिमेंट काँक्रेट) पक्क्या स्वरुपाचे | ११५ | १०० % | ०० | ०० % |
| ७ | घराचे छप्पर सपाट व टिकाऊ साहित्याचे | ११५ | १०० % | ०० | ०० % |
| ८ | किमान घराच्या छताला प्लॅस्टर करण्यात आले | ५१ | ४४ % | ६४ (पत्र्याचे छप्पर) | ५६ % |
| ९ | घराला बाहेरुन प्लॅस्टर करण्यात आले | ९६ | ८३ % | १९ | १७ % |
| १० | घराचे रंगकाम करण्यात आले | ९४ | ८२ % | २१ | १८ % |

| अ. क्र. | बांधकामसंबंधीत निरीक्षणातील घटक | आहे (संख्या) | टक्केवारी % | नाही (संख्या) | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|
| ११ | घरापुढे वऱ्हांडा | १०७ | ९३ % | ८ | ७ % |
| १२ | घरामध्ये फरशी/कोबा | १०७ | ९३ % | ०८ | ०७ % |
| १३ | घरातील दरवाजे व खिडक्यांना शटर बसविलेले | ७९ | ६९ % | ३६ | ३१ % |
| १४ | नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने (हायब्रिक वॉल, रॅट-ट्रफ बाँड, जाळीची भिंत, फिलर स्लॅब इ.) घराचे बांधकाम झालेले | ०० | ०० % | ११५ | १०० % |
| १५ | घराबाहेर उपजिवीकेची कामे करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध | ९४ | ८२ % | २१ | १८ % |
| १६ | विकलांग व्यक्तींच्या दृष्टीने घरामध्ये सुरळीत व मुक्तपणे ये-जा करण्याकरिता व्यवस्था | ११५ | १०० % | ०० | ०० % |
| १७ | घराजवळील परिसर स्वच्छता | १०८ | ९४ % | ७ | ६ % |
| १८ | घराभोवती किमान १० झाडे लावण्यात आली | १०१ | ८८ % | १४ | १२ % |
| १९ | घराजवळील गटारे बंदिस्त | ३२ | २८ % | ८३ | ७२ % |

सारणी क्र. ४.१६ मध्ये नमुद असलेल्या घटकांची योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अंमलबजावणी झालेली आहे किंवा नाही याचे सविस्तर विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

१) घरकुलाचा लाभ देण्यात आलेल्या सर्व (१०० टक्के) लाभार्थ्यांनी व्यक्तीगत स्वरुपाची घरे बांधल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आले. लाभार्थी कुटुंबामध्ये सरासरी ४ ते ६ सदस्य असून या सर्वांसाठी घरकुल उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येते.

२) घरकुल लाभार्थी स्वतः त्या घरकुलाचा वापर करत असावा हे आवश्यक आहे. त्यानुसार घरकुल लाभार्थी स्वतः सदर घरकुलामध्ये राहत असल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आले. थोडक्यात योजनेअंतर्गत बांधलेल्या घरकुलांचा कोठेही

गैरवापर झालेला नाही. जसे की, भाडे तत्त्वावर घर देणे, घराची विक्री करणे वगैरे. म्हणजेच घरकुलाचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थी व त्याच्या कुटुंबांला मिळत आहे.

३) योजनेनुसार घरकुलाच्या दर्शनीय भिंतीवर ऑईलपेंटने 'इंदिरा आवास योजने'चे कायमस्वरुपी नामफलक करणे आवश्यक आहे. यानुसार ६६ (५७ टक्के) घरकुलांच्या दर्शनीय भिंतीवर योजनेचे नामफलक दिसून आले. मात्र त्यातील काही घरांवरील नामफलक तात्पुरत्या स्वरुपात लिहीले असल्याचे दिसून आले. उर्वरित ४९ (४३ टक्के) लाभार्थ्यांच्या घरकुलांमध्ये योजनेचे नामफलकच नव्हते.

४) घरकुल प्राप्त ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांच्या घराचे बांधकाम हे नैसर्गिक आपत्तीपासून बचाव होऊ शकेल असे आहे. तसेच मुळशी तालुक्यात आदिवासी क्षेत्र व डोंगरी भागात पावसाचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे आवश्यकतेनुसार तेथील घरांची रचना व बांधकाम झाल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आले आहे.

५) सर्व लाभार्थ्यांच्या (१०० टक्के) घरकामासाठी स्थानिक हवामानास अनुरुप साहित्य तसेच संरचनेचा वापर केला असल्याचे दिसून आले. प्रामुख्याने डोंगरी व आदिवासी भागामध्ये तेथील हवामानाचा विचार करुन आवश्यक साहित्य व स्थानिक उपलब्ध साहित्यांचा वापर बांधकामासाठी करण्यात आला आहे.

६) घरकुल प्राप्त सर्व ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांच्या घरकुलाच्या भिंती विटा व सिमेंट काँक्रेटच्या सहाय्याने बांधलेल्या आहेत. म्हणजेच सर्व घरकुलांच्या भिंती पक्क्या स्वरुपात बांधलेल्या दिसून आल्या आहेत.

७) सर्व घरकुल लाभार्थ्यांच्या (१०० टक्के) घराला छप्पर असून ते सपाट व टिकाऊ साहित्याचे असल्याचे दिसून आले.

८) मार्गदर्शक सूचनेनुसार किमान घराच्या छताला प्लॅस्टर करणे आवश्यक आहे. त्यानुसार ५१ (८३ टक्के) लाभार्थ्यांच्या घराच्या छताला प्लॅस्टर असल्याचे दिसून आले. उर्वरित ६४ (५६ टक्के) लाभार्थ्यांच्या घराला पत्र्याचे छप्पर असल्याचे प्लॅस्टर करण्यात केलेले नाही. पत्र्यांचे छप्पर असले तरी ते मजबुत असून दिर्घकाळ टिकू शकतील या स्वरुपाचे आहेत.

९) मार्गदर्शक सुचनेनुसार घरकुलाला बाहेरुन प्लॅस्टर असणे आवश्यक आहे. यानुसार ९६ (८३ टक्के) लाभार्थ्यांच्या घराला बाहेरुन प्लॅस्टर करण्यात आलेले

असून हे प्रमाण जास्त आहे. अद्यापही १९ (१७ टक्के) लाभार्थ्यांच्या घराला बाहेरुन प्लॅस्टर केलेले नाही. पैशा अभावी काम अपुर्ण असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले आहे.

१०) घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ९४ (८२ टक्के) लाभार्थ्यांच्या घराला रंगकाम करण्यात आले आहे. उर्वरित २१ (१८ टक्के) लाभार्थ्यांच्या घराचे रंगकाम झाले नसल्याचे दिसून आले.

११) मार्गदर्शक सूचनेनुसार घरातील सदस्यांना विश्रांतीसाठी घराबाहेर बसता येईल, मुलांना खेळण्यासाठी जागा मिळले, तसेच इतर कामे करता यावीत यादृष्टीने घरापुढे वऱ्हांडा असणे आवश्यक आहे. त्यानुसार १०७ (९३ टक्के) लाभार्थ्यांच्या घरापुढे वऱ्हांडा असल्याचे दिसून आले. उर्वरित ८ (७ टक्के) लाभार्थ्यांच्या घरापुढे वऱ्हांडा नसल्याचे दिसून आले.

१२) घरामध्ये फरशी/कोबा असलेले १०७ (९३ टक्के) लाभार्थी आहेत. मात्र अद्यापही घरात फरशी/कोबा नसून शेणामातीचे सारवण केले जाते असे ८ (७ टक्के) लाभार्थी आहेत. आर्थिक अडचणीमुळे घरासंबंधीत कामे पुर्ण झाली नसल्याचे दिसून येते.

१३) घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ७९ (६९ टक्के) घराच्या दरवाजे तसेच खिडक्यांना शटर बसविलेले दिसून आले. उर्वरित ३६ (३१ टक्के) लाभार्थ्यांच्या घरात दरवाजे तसेच खिडक्यांना शटर बसविलेले नव्हते. याबाबत घर बांधून झाल्यानंतर उर्वरित कामांकडे पुन्हा लक्ष दिले नसल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.

१४) नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घराचे बांधकाम झालेले (हायब्रिक वॉल, रॅट-ट्रफ बाँड, जाळीची भिंत, फिलर स्लॅब इ.) एकही घरकुल दिसून आलेले नाही. सर्व १०० टक्के घरकुले ही उपलब्ध साधनसामग्रीच्या सहाय्याने बांधण्यात आली आहेत.

१५) मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थ्यांना उपजिवीकेची कामे करता यावीत यादृष्टीने घरकुलाच्या आवारात पुरेशी जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. यानुसार एकूण ९४ (८२ टक्के) लाभार्थ्यांच्या घरकुलापुढे पुरेशी जागा उपलब्ध असल्याचे दिसून आले. उर्वरित २१ (१८ टक्के) लाभार्थ्यांच्या घरकुलापुढे उपजिवीकेची कामे करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. यामध्ये प्रामुख्याने जे लाभार्थी

गावांमध्ये राहतात त्यांना घरकुलाबाहेर आवश्यक एवढी जागा उपलब्ध होत नसल्याचे दिसून येते.

१६) सर्व १०० टक्के घरकुलांमध्ये विकलांग व्यक्तींच्या दृष्टीने सुरळीत व मुक्तपणे ये-जा करण्याची व्यवस्था व पुरेशी मोकळी जागा असल्याचे दिसून आले.

१७) कुटुंबांचे आरोग्य तसेच पर्यावरणाचा विचार करता घराजवळील परिसर स्वच्छ असणे गरजेचे आहे. त्यानुसार १०० टक्के लाभार्थ्यांच्या घराजवळील परिसर स्वच्छ दिसून आला आहे. तसेच घरकुलाच्या लाभामुळे स्वच्छतेबाबत लाभार्थ्यांमध्ये जागृती झाल्याचेही दिसून येत आहे.

१८) कुटुंबांचे आरोग्य तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने घरकुलाभोवती किमान १० झाडे लावण्यात यावीत असे मार्गदर्शक सुचनेमध्ये सांगण्यात आले आहे. त्यानुसार १०१ (८८ टक्के) कुटुंबांनी घरकुलाच्या भोवती किमान १० झाडे लावलेली किंबहुना उपलब्ध जागेत १० पेक्षा अधिक झाडे लावली असल्याचे दिसून आले आहे. उर्वरित १२ टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलाभोवती किमान झाडे लावलेली दिसून आली नाहीत. प्रामुख्याने गावांमध्ये राहणाऱ्या लाभार्थ्यांना पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्याने तेथे झाडे लावता येत नसल्याचे दिसून आले.

१९) मार्गदर्शक सूचनेनुसार कुटुंबांचे आरोग्य व आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता यादृष्टीने लाभार्थी घरकुलांसाठी सांडपाण्याची योग्य व्यवस्था करणे आवश्यक आहे. यानुसार ३२ (२८ टक्के) लाभार्थी घरकुलांसाठी बंदिस्त गटारांची सुविधा उपलब्ध असल्याचे दिसून आले. उर्वरित ८३ (७२ टक्के) लाभार्थ्यांसाठी सांडपाण्याची योग्य सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. यामध्ये काही लाभार्थ्यांच्या घरापुढील गटारे उघडी आहेत. तसेच काही लाभार्थी असे आहेत की, ज्यांचे घरकुल गावापासून दूर वाडी-वस्तीवर, शेतात आहे. अशा ठिकाणी सांडपाणी हे घरापुढील किंवा घरामागील मोकळ्या जागेत टाकले जात असल्याचे दिसून येते.

वरील स्पष्टीकरणावरुन हे लक्षात येते की, मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलासंबंधी काहीच घटकांच्या बाबत १०० टक्के कार्यवाही झाल्याचे दिसून येते व काही घटकांबाबत १०० टक्के कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने लाभार्थी स्वतः घरकुलात राहत आहे, घराचे बांधकाम हे नैसर्गिक आपत्तीपासून बचावात्मक स्वरुपात

झाले आहे, घरकामासाठी स्थानिक हवामानास अनुरुप साहित्य तसेच संरचनेचा वापर केलेला आहे, विटा व सिमेंट कॉँक्रेटच्या सहाय्याने घरकुलांच्या भिंती बांधलेल्या आहेत, घराचे छप्पर सपाट व टिकाऊ साहित्याचे बनविण्यात आले आहे, विकलांग व्यक्तींच्या दृष्टीने घरामध्ये सुरळीत व मुक्तपणे ये-जा करण्याकरिता व्यवस्था उपलब्ध आहे इ. घटकांबाबतच योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १०० टक्के कार्यवाही झाल्याचे दिसून येत आहे.

उर्वरित घटक म्हणजेच घरकुलाच्या दर्शनीय भिंतीवर योजनेचे नामफलक असावे, किमान छताला प्लॅस्टर असावे, घराला बाहेरुन प्लॅस्टर नाही, घराचे रंगकाम, घरापुढे वऱ्हांडा, उपजिवीकेची कामे करण्यासाठी पुरेशी जागा, घरामध्ये किमान फरशी किंवा कोबा असावा, घराच्या दरवाजे तसेच खिडक्यांना शटर बसविलेले असावे, नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घराचे बांधकाम करण्यात यावे, घराजवळील परिसर स्वच्छ असावा, घराभोवती किमान १० झाडे लावणे तसेच सांडपाणी वाहून जाण्यासाठी योग्य सुविधा उपलब्ध असावी इ. घटकांच्या बाबतीत १०० टक्के पुर्तता झालेली दिसत नाही. एकूणच घरकुला संबंधीत काही घटकांची मार्गदर्शक सुचनेनुसार अंमलबजावणी झाली नसल्याचे दिसून येते.

## ४.४ घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची सामाजिक स्थिती :

'स्वतःच्या हक्काचा निवारा' प्राप्त झाल्यास व्यक्तीचा सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत होते. कारण 'स्वतःचे घर' प्राप्त झाल्याने व्यक्ती स्थिर स्वरुपाचे जीवन जगू लागतो. त्यामुळे व्यक्ती समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊन त्यास विकासाच्या संधी उपलब्ध होतात व त्यातून व्यक्तीचा दर्जा सुधारण्यास सुरुवात होते. सामाजिक दर्जा वा स्थिती सुधारण्यासाठी व्यक्तीला जसे 'स्वतःचे घर' प्राप्त होणे गरजेचे आहे त्याचबरोबर घरामध्ये काही आवश्यक व पुरेश्या सुविधाही उपलब्ध होणे गरजेचे आहे. उदा. वीज, पाणी, शौचालय इ. सुविधा. म्हणूनच 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत स्वतःचे घरकुल प्राप्त झालेल्या लाभार्थी कुटुंबाची सामाजिक स्थिती अभ्यासणे सदर संशोधन अभ्यास व योजनेची फलनिष्पती यादृष्टीने महत्त्वाचे आहे.

यानुसार योजनेशी संबंधीत सामाजिक घटक अभ्यासामध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. ज्यामध्ये प्रामुख्याने वीज, पिण्याचे पाणी, शौचालय, स्वयंपाकाची निर्धुर साधने, कुटुंबातील महिलांचे सरंक्षण, न्हाणीघराची सुविधा, कुटुंबातील सदस्यांची शैक्षणिक स्थिती इ. घटकांचा समावेश आहे. या घटकांच्या अनुषंगाने लाभार्थ्यांची सामाजिक स्थिती अभ्यासणे हे सदर संशोधन अभ्यासाचे उद्दिष्ट्य ठरविण्यात आले आहे. त्यासंबंधी लाभार्थ्यांकडून गोळा केलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारावर माहितीचे सविस्तर विश्लेषण पुढे देण्यात आले आहे.

### ४.४.१ घरकुल प्राप्तीनंतरची लाभार्थ्यांची निवाऱ्याची स्थिती :

'स्वतःचे घर किंवा निवारा' ही मानवाची मुलभूत तसेच सामाजिक गरज आहे. घरामुळे कुटुंबांना सामाजिक स्थैर्य प्राप्त होते. व्यक्तीच्या सुस्थितीकरीता तसेच व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये 'घर' हे महत्त्वपूर्ण योगदान देते. म्हणूनच 'इंदिरा आवास योजने'अंतर्गत समाजातील दुर्बल, दुर्लक्षित, वंचित घटक तसेच अनुसूचित जाती व जमाती, दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळवून देण्यात आला आहे. यानुसार मुळशी तालुक्यातील ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या जागेवर नविन घरकुल बांधण्यासाठी लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे सर्व गरजू लाभार्थ्यांची निवाऱ्याची मुलभूत व सामाजिक गरज पुर्ण झाल्याचे दिसून येत आहे.

### ४.४.२ घरकुलाचा लाभ मिळण्यापूर्वी लाभार्थ्यांची निवाऱ्याची स्थिती :

'इंदिरा आवास योजने'मुळे लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचा निवारा प्राप्त झाला. परंतु घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी लाभार्थी कोणत्या ठिकाणी तसेच कोणत्या अवस्थेत राहत होते हे जाणून घेण्यासाठी लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली. त्यानुसार प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१७**

**घरकुल लाभापूर्वीचा लाभार्थी निवाऱ्याचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल लाभापूर्वीची निवाऱ्याची स्थिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भाड्याच्या घरात | ०५ | ०४ % |
| २ | पत्र्याचे शेड/ बांबूचे शेड | २६ | २३ % |
| ३ | कच्च्या मोडकळीस आलेल्या स्वतः च्या घरात | ८४ | ७३ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१७ वरुन असे स्पष्ट होते की, घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ५ (४ टक्के) लाभार्थी भाड्याच्या घरात राहत होते. २६ (२३ टक्के) लाभार्थी पत्रा वा बांबू शेडच्या घरामध्ये राहत होते. ८४ (७३ टक्के) लाभार्थी कच्च्या मोडकळीस आलेल्या स्वतःच्या घरात राहत होते. या सर्वांना स्वतःच्या घराची इच्छा होती मात्र बिकट आर्थिक स्थितीमुळे घर बांधता आले नाही असे लाभार्थ्यांनी सांगितले.


यावरुन असे दिसून येते की, 'इंदिरा आवास योजने'मुळे मुळशी तालुक्यातील ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांना स्वतःचे घर बांधण्यासाठी एक संधी मिळाली. योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त झाल्याने गरीब/दारिद्रय रेषेखालील लाभार्थी कुटुंबांचा सामाजिक स्तर उंचावण्यास मदत झाली आहे. तसेच योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ हा ११५ लाभार्थ्यांच्या नावे मिळाला असला तरी या लाभार्थी कुटुंबातील एकूण सदस्यांची संख्या ४८६ एवढी आहे. त्यामुळे योजनेमुळे घरकुलाचा लाभ हा ११५ कुटुंबातील एकूण ४८६ सदस्यांना झाल्याचे दिसून येते. त्यामुळे पूर्वी भाड्याच्या घरात, पत्र्याचे शेड, तसेच कच्च्या मोडकळीस आलेल्या घरात राहणाऱ्या लाभार्थी कुटंबांना स्वतःचे घर मिळाले. म्हणजेच कुटुंबाच्या व्यक्तीगत तसेच सामाजिक स्थितीत सुधारणा घडून येण्यास सदर योजना उपयुक्त ठरली आहे.

### ४.४.३ घरकुलापर्यंत जाण्यासाठी पर्यायी रस्ता/पायवाटेची सुविधा :

प्रामुख्याने ग्रामीण तसेच आदिवासी भागामध्ये बहुतांशी घरे ही डोंगरात, वाडी-वस्ती, शेतात किंवा अतिशय दुर्गम ठिकाणी बांधलेली असतात. अशा ठिकाणी जाण्या-येण्यासाठी पक्का किंवा किमान सुस्थितीतील रस्त्यांची सुविधा उपलब्ध नसते. त्यामुळे अशी कुटुंबे ही समाजापासून किंवा गावापासून दूर लोटली जातात. व्यक्तींना ये-जा करण्यासाठी, दळणवळण, आरोग्य व शिक्षण इ. सुविधा सहज उपलब्ध होण्यासाठी, कुटुंबातील अपंग सदस्यांच्या दृष्टीने तसेच गावातील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचण्यासाठी पक्का रस्ता किंवा पायवाटेची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक असते. त्यानुसार किती लाभार्थ्यांना घरकुलापर्यंत पर्यायी रस्ता/पायवाटेची सुविधा उपलब्ध झाली आहे याचा सविस्तर तपशील पुढील आलेख क्र. ४.७ मध्ये देण्यात आली आहे.

**आलेख क्र. ४.७**

**शासनाकडून उपलब्ध झालेल्या पर्यायी रस्ता/पायवाटेच्या सुविधेचा तपशील**




आलेख क्र. ४.७ वरुन असे स्पष्ट होते की, 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत घरकुल बांधकाम पुर्ण झाल्यानंतर घरकुलापर्यंत जाण्यासाठी पर्यायी रस्ता/पायवाट शासना कडून उपलब्ध करून देण्यात आली आहे असे एकूण ७१ (६२ टक्के) लाभार्थी आहेत. उर्वरित ४४ (३८ टक्के) लाभार्थ्यांना शासनामार्फत पायवाट किंवा रस्त्याची सुविधा उपलब्ध झालेली नाही.

'इंदिरा आवास योजने'च्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थ्यांना प्राधान्याने राज्य व केंद्र सरकारच्या इतर योजनांच्या माध्यमातून (Convergence) घरकुलापर्यंत जाण्यासाठी रस्ता/ पायवाटेची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुसार ७१ (६२ टक्के) लाभार्थ्यांना इतर योजनांच्या माध्यमातून घरकुलापर्यंत जाण्यासाठी रस्ता/पायवाटेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये ७१ पैकी ५८ लाभार्थ्यांना प्रामुख्याने 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने' अंतर्गत ही सुविधा पुरविण्यात आली आहे. उर्वरित १३ लाभार्थ्यांना आमदार निधी तसेच ग्रामपंचायतीकडून रस्ता/पायवाटेची सुविधा पुरविण्यात आल्याचे दिसून येते.


घरकुलापर्यंत जाण्यासाठी पर्यायी रस्ता/पायवाट शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेली नाही असे म्हणणारे एकूण ४४ लाभार्थी आहेत. परंतु त्यापैकी १६ (१४ टक्के) लाभार्थी असे आहेत की, ज्यांनी स्वःखर्चाने घरकुलापर्यंत जाण्यासाठी रस्ता किंवा पायवाट तयार केली आहे. तर उर्वरित २८ (२४ टक्के) लाभार्थ्यांना अद्यापही घरकुलापर्यंत जाण्यासाठी रस्ता/पायवाटेची सुविधा उपलब्ध झालेली नाही. याबाबत लाभार्थ्यांशी चर्चा केली असता, ग्रामपंचायतीकडून लक्ष दिले जात नाही किंवा शासनाकडून रस्ता/पायवाटेची सुविधा पुरविण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले. थोडक्यात २४ टक्के लाभार्थ्यांना अद्यापही घरकुलापर्यंत जाण्यासाठी कोणामार्फतच रस्ता/पायवाटेची सुविधा उपलब्ध झालेली नाही.

### ४.४.४ घरकुलात शौचालयाची सुविधा व त्याचा वापर :

घरात शौचालय बांधणे व त्याचा वापर करणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे मानले जाते. कौटुंबिक व सामाजिक आरोग्य दृष्टीने तसेच कुटुंबातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी घरात शौचालय असणे व त्याचा वापर करणे गरजेचे आहे. त्यानुसार योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अनुदानाचा शेवटचा हप्ता देण्यापुर्वी घरामध्ये शौचालय बांधणे बंधनकारक आहे. यानुसार मुळशी तालुक्यातील किती लाभार्थ्यांनी शौचालय बांधले आहे व त्याचा वापर करत आहेत याचा तपशील पुढील आलेख क्र.४.८ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.८**

**घरकुलात शौचालयाची सुविधा व वापर यासंबंधीचा तपशील**




सोबतचा आलेख क्र. ४.८ वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ११२ (९७ टक्के) घरकुलामध्ये व्यक्तीगत शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच घरामध्ये व्यक्तीगत शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेली ३ (३ टक्के) कुटुंबे दिसून आली आहेत. मुळशी तालुक्यात २००८ ते २०१२ या कालावधीमध्ये दुर्गम भागातील काही वाडी-वस्तींवरती घरकुल लाभार्थ्यांसाठी ग्रामपंचायती मार्फत सार्वजनिक शौचालये बांधून देण्यात आलेली होती. त्यामुळे व्यक्तीगत शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या ३ लाभार्थी कुटुंबांसाठी सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. एकूणच घरकुल प्राप्त १०० टक्के लाभार्थ्यांना शौचालयाची सुविधा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे शौचालया बाबत भौतिक कामगिरीच्या आधारावर ही योजना यशस्वी झाल्याचे दिसून येते.

परंतु प्रत्यक्षात लाभार्थी शौचालयाचा वापर करत आहेत किंवा नाही हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. याबाबत लाभार्थ्यांशी चर्चा करण्यात आली होती. चर्चेनुसार प्रामुख्याने पावसाळ्यात बाहेर उघड्यावर शौचास जावे लागत होते त्यामुळे खूप गैरसोय

होत असे तसेच महिलांना अधिक त्रास सोसावा लागत होता मात्र शौचालयाचे बांधकाम झाल्याने शौचाची सुविधा उपलब्ध झाली असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले. मात्र उन्हाळ्यामध्ये शौचालयाचा वापर करण्यात अडचण येत असून त्याचे प्रमुख कारण म्हणजे पाण्याची कमतरता असल्याचे सांगण्यात आले. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत असून वापरावयास पुरेश्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत नाही. तसेच कुटुंबातील सदस्यांची संख्या, त्याप्रमाणात शौचालयाचा वापर व त्याची स्वच्छता यासर्व घटकांचा विचार करता शौचालयात पाणी खूप वापरावे लागते. त्यातुलनेत उन्हाळ्यामध्ये पाण्याचा अभाव असतो. यामुळे उन्हाळ्यामध्ये शौचालयाचा वापर केला जात नाही असे अनेक लाभार्थ्यांनी सांगितले.

थोडक्यात शौचालयाचे बांधकाम व त्याचा वापर या घटकांचा विचार करता असे दिसून येते की, योजनेअंतर्गत घरकुलासोबत सर्व लाभार्थ्यांनी शौचालयाचे बांधकाम केले आहे. याबाबत योजनेची भौतिक कामगिरी १०० टक्के यशस्वी झाली आहे. मात्र उन्हाळ्यातील पाण्याच्या कमतरतेमुळे शौचालयाचा वापर १२ ही महिने केला जात असेल याबाबत शंका निर्माण होते. मात्र भविष्यात उपाययोजनाच्या आधारे पुरेश्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाल्यास शौचालयाचा वापरही १०० टक्के केला जाऊ शकेल. त्यामुळे ही बाब लाभार्थी कुटुंबाच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून येण्यासाठी व एकूणच सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे.

### ४.४.५ घरकुलाचा लाभ मिळण्यापूर्वीची शौचालयाची उपलब्ध सुविधा :

घरकुल लाभापूर्वी कुटुंबासाठी शौचालयाची कोणती सुविधा उपलब्ध याविषयी लाभार्थ्यांकडून प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१८**

**घरकुल लाभापूर्वीचा शौचालय सुविधेचा तपशील**

| अ.क्र. | घरकुल लाभापूर्वीची शौचालय सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक शौचालय | २८ | २४ % |
| २ | उघड्यावर | ८७ | ७६ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१८ वरुन असे दिसून येते की, घरकुल लाभापुर्वी २८ (२४ टक्के) लाभार्थी कुटुंबे ग्रामपंचायती मार्फत बांधण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयाचा वापर करत होते. तर सर्वाधिक ८७ (७६ टक्के) कुटुंबे उघड्यावर शौचास जात होती.

यानुसार आकृती क्र. ४.८ व सारणी क्र. ४.१८ यांचा तुलनात्मक विचार केल्यास असे दिसून येते की, घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ७६ टक्के लोक हे उघड्यावर शौचास जात होते. ही बाब कुटुंबांच्या, सार्वजनिक तसेच सामाजिक आरोग्यावर दुष्परिणाम करणारी होती. उघड्यावर शौचास जाणे हे कुटुंबातील स्त्रीयांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक गंभीर होते. सद्यस्थितीत घरकुल प्राप्त १०० टक्के लाभार्थ्यांना शौचालयाची सुविधा उपलब्ध झाल्याने शौचालयाचा वापर करणाऱ्या लाभार्थी कुटुंबांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे लाभार्थी कुटुंबांचे तसेच सार्वजनिक व सामाजिक आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे. स्त्रीया वा मुलींनाही सुरक्षितता प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. यानुसार शौचालय बांधणे व त्याचा वापर करणे हे ‘इंदिरा आवास योजने’चे मोठे यश असल्याचे दिसून येते.

### ४.४.६ घरकुलातील न्हाणीघराची सुविधा :

घरामध्ये बंदिस्त न्हाणीघराची सुविधा उपलब्ध असणे हे घरात शौचालय असण्याइतकेच महत्त्वाचे आहे. प्रामुख्याने कुटुंबातील स्त्री सदस्यांचे सरंक्षण, आरोग्य यादृष्टीने घरकुलात बंदिस्त न्हाणीघराची सुविधा असणे गरजेचे आहे. यातून स्त्रींयाचे व पर्यायाने समाजाचे हित साधले जाते. तसेच घरकुलातील न्हाणीघराची सुविधा ही बाब लाभार्थी कुटुंबांच्या सामाजिक स्थितीतील सुधारणाही दर्शविते. म्हणूनच ‘इंदिरा आवास योजने’ अंतर्गत घरकुलामध्ये न्हाणीघर बांधणे बंधनकारक केले आहे.

यानुसार प्राप्त माहितीच्या आधारे व प्रत्यक्ष निरीक्षणातही असे दिसून येते की, मुळशी तालुक्यात घरकुल प्राप्त सर्व ११५ (१०० टक्के) लाभार्थ्यांनी घरकुलामध्ये न्हाणीघर बांधलेली आहेत. यामुळे कुटुंबातील स्त्री सदस्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घरकुल उपयुक्त ठरल्याचे दिसून येते.

### ४.४.७ घरकुल लाभापूर्वीची लाभार्थी कुटुंबातील न्हाणीघराची सुविधा :

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत घरकुलामध्ये न्हाणीघर बांधणे बंधनकारक केले आहे. परंतु घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी कुटुंबांमध्ये अंघोळीसाठी कोणती व्यवस्था होती हे लाभार्थ्यांकडून जाणून घेण्यात आले. त्यानुसार प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आलेला आहे.

**सारणी क्र. ४.१९**

**घरकुल लाभापूर्वीचा न्हाणीघर सुविधेचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल लाभापूर्वीची न्हाणीघराची सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घराच्या बाजूला उघड्यावर | २१ | १८ % |
| २ | बांबू अथवा लाकडाच्या काठ्या उभ्या करुन त्याच्या आडोशाला | २५ | २२ % |
| ३ | घर अथवा पत्र्याचे शेडच्या आत | ६९ | ६० % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.१९ वरुन असे स्पष्ट होती की, घरकुल लाभापूर्वी घराच्या बाजूला उघड्यावर अंघोळ करावी लागत होती असे म्हणणारे २१ (१८ टक्के) लाभार्थी आहेत. बांबू अथवा लाकडाच्या काठ्या उभ्या करुन त्याच्या आडोश्याला अंघोळ करावी लागत होती असे म्हणणारे २५ (२२ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच घर अथवा पत्र्याचे शेडच्या आत अंघोळीची व्यवस्था होती असे ६९ (६० टक्के) लाभार्थी आहेत.

यावरून असे दिसून येते की, घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी एकूण ४० टक्के लाभार्थी कुटुंबाना अंघोळीसाठी स्वतंत्र न्हाणीघर उपलब्ध नव्हते. त्यामुळे सदर कुटुंबातील स्त्रीयांना उघड्यावर अथवा कुठल्या तरी आडोशाला अंघोळ करावी लागत होती. तसेच पुर्वी घर किंवा पत्र्याच्या शेडच्या आतच न्हाणीघराची सुविधा उपलब्ध होती असे म्हणणारे सर्वाधिक ६० टक्के लाभार्थी असले तरी प्रत्यक्षात त्यांच्या घराची किंवा पत्र्याच्या शेडची अवस्था ही अत्यंत वाईट होती. हे सारणी क्र. ४.१७ मधील लाभार्थ्यांची पुर्वीची राहत्या ठिकाणच्या स्थितीवरुन लक्षात येते. त्यामुळे पूर्वीच्या घरातील तसेच पत्र्याच्या शेडमधील न्हाणीघरांची स्थितीही स्त्रियांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर असल्याचे दिसून येते.

न्हाणीघर बांधकामाबाबत 'इंदिरा आवास योजना' यशस्वी ठरल्याचे दिसून येते. कारण सद्यस्थितीत योजनेअंतर्गत बांधकाम झालेल्या सर्व घरकुलामध्ये स्वतंत्र व बंदिस्त न्हाणीघर बांधण्यात आलेली आहेत. यामुळे घरकुलातच सुरक्षित व बंदिस्त न्हाणीघराची सुविधा उपलब्ध झाल्याने कुटुंबातील स्त्रीयांना एकप्रकारे संरक्षण प्राप्त झाले आहे. ही बाब कुटुंबाच्या व्यक्तीगत तसेच सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे.


### ४.४.८ घरकुल लाभार्थ्यांसाठी पिण्याची पाण्याची सुविधा (उपलब्ध स्त्रोत) :

'पाणी' हा घटक व्यक्तीच्या जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. जीवनात पिण्यासाठी पाणी आवश्यक असते तसेच इतर दैनंदिन गरजा पुर्ण करण्यासाठी देखील पाणी लागते. उदा. अंघोळ, भांडी-कपडे धुणे, शौचालय, स्वयंपाक इ. त्यादृष्टीने पुरेश्या प्रमाणात व सहजपणे पाण्याची सुविधा उपलब्ध होणे हे कौटुंबिक तसेच सामाजिक प्रगतीचे द्योतक मानले जाते.

मात्र ग्रामीण भागात पाण्याच्या सुविधा सहजपणे उपलब्ध होत नसल्याचे दिसून येते. पिण्याच्या पाण्यासाठी कुटुंबातील स्त्रीयांना मैलोनमैल पायपीट करावी लागते. हातपंप किंवा विहीरीतून पाणी उपसण्यासाठी कष्ट करावे लागतात. याचा अप्रत्यक्ष परिणाम स्त्रीयांच्या आरोग्यावर होताना दिसून येतो. यामुळे घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबाना पिण्यायोग्य पाण्यासाठी कोणते स्त्रोत उपलब्ध आहेत किंवा पुरविण्यात आले आहेत यासंबंधीत लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली. प्राप्त माहितीचा सविस्तर तपशील पुढील आलेख क्र. ४.९ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.९**

**पिण्यायोग्य पाण्याच्या उपलब्ध स्त्रोतांचा तपशील**




आलेख क्र. ४.९ वरुन असे दिसून येते की, मुळशी तालुक्यामध्ये पिण्याचे पाणी विहिरीवरून तसेच हातपंपावरुन आणत असलेले अनुक्रमे ३३ (२९ टक्के) व १७ (१५ टक्के) लाभार्थी आहेत. पिण्यासाठी स्वत:च्या बोअरवेलचे पाणी वापरत असलेले २ (२ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच सर्वाधिक ग्रामपंचायतीमार्फत पुरविण्यात आलेल्या

व्यक्तीगत व सार्वजनिक नळांद्वारे पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झालेले अनुक्रमे १९ (१६ टक्के) व ३९ (३३ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच ग्रामपंचायती मार्फत एका खाजगी संस्थेच्या मदतीने जवळील विहीरीचे पाणी नळाद्वारे घरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहे असे ५ (५ टक्के) लाभार्थी आहेत. थोडक्यात यावरुन असे दिसून येते की, एकूण ५६ टक्के लाभार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा उपलब्ध झाली आहे. मात्र ४४ टक्के घरकुल लाभार्थ्यांना अद्यापही पिण्याचे विहीर व हातपंपावरुन वाहून आणावे लागत आहे.

'इंदिरा आवास योजने' अंतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल लाभार्थ्यांना राज्य व केंद्र सरकारच्या इतर योजनाच्या माध्यमातून (Convergence) पिण्यायोग्य पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुसार इतर योजनाच्या माध्यमातून (Convergence) ग्रामपंचायतीमार्फत व्यक्तीगत व सार्वजनिक नळाद्वारे पिण्यायोग्य पाण्याची सुविधा ५४ टक्के लाभार्थ्यांना पुरविण्यात आल्याचे दिसून येत आहे. ५४ टक्के लाभार्थ्यांमधील ४ टक्के लाभार्थ्यांना Convergence च्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अथवा बाहेरील खाजगी कंपनीमधील CSR निधीचा वापर करुन घरकुलामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करुन देण्यात आल्याचे दिसून येतो. उर्वरित लाभार्थी ४६ टक्के लाभार्थ्यांना अद्याप पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा उपलब्ध झाली नसल्याचे दिसून येते.

### ४.४.९ घरकुल लाभापूर्वीची पिण्याच्या पाण्याची सुविधा :

योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ मिळण्यापूर्वी लाभार्थी कुटुंबाना राहत्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कोणती सुविधा उपलब्ध होती याचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२०**

**घरकुल लाभापुर्वीची पिण्याच्या पाण्याची उपलब्ध सुविधा**

| अ. क्र. | घरकुल लाभापुर्वीची पिण्याच्या पाण्याची सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विहीरीचे पाणी | ३८ | ३३ % |
| २ | बोअरवेलचे पाणी | ०२ | २ % |
| ३ | हातपंप | १९ | १७ % |
| ४ | सार्वजनिक नळ | ५२ | ४५ % |
| ५ | ग्रामपंचायतीमार्फत व्यक्तीगत नळ व्यवस्था | ०४ | ३ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२० वरुन असे स्पष्ट होते की, घरकुलाचा लाभ मिळण्यापूर्वी ११५ लाभार्थ्यांपैकी ३८ (३३ टक्के) लाभार्थी विहीरीचे पाणी पिण्यासाठी वापरत होते. स्वत:च्या बोअरवेलचे तसेच हातपंपाचे पाणी पिण्यासाठी वापरत असलेले अनुक्रमे २ (२ टक्के) लाभार्थी व १९ (१७ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच ग्रामपंचायती मार्फत व्यक्तीगत व सार्वजनिक नळाद्वारे पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असणारे अनुक्रमे ५२ (४५ टक्के) लाभार्थी व ४ (३ टक्के) लाभार्थी होते.

थोडक्यात आलेख क्र. ४.९ व सारणी क्र. ४.२० यांचा तुलनात्मक विचार केला असता असे दिसून येते की, पुर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत घरकुल प्राप्त लाभार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या उपलब्ध सुविधांमध्ये सुधारणा घडून आली आहे. प्रामुख्याने ग्रामपंचायती मार्फत व्यक्तीगत नळाची (पुर्वी ४ व सध्या १९ लाभार्थी) सुविधा उपलब्ध झालेल्या लाभार्थ्यांमध्ये वाढ झाली आहे. तसेच पुर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक नळाचा (पुर्वी ५२ व सध्या ३९ लाभार्थी) वापर करणारे लाभार्थी कमी झालेले असून त्यापैकीच बहुतांशी लाभार्थ्यांना व्यक्तीगत नळाची सुविधा उपलब्ध झालेली आहे.

तसेच पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत हातपंप (पुर्वी १९ व सध्या १७ लाभार्थी) व विहीरीतील पाण्याचा पिण्यासाठी (पुर्वी ३८ व सध्या ३३ लाभार्थी) वापर करणारे लाभार्थीही काही अंशी कमी झालेले आहेत. म्हणजेच यापैकी काही लाभार्थ्यांना व्यक्तीगत किंवा सार्वजनिक नळाची सुविधा उपलब्ध झालेली आहे. तसेच सद्यस्थितीत योजनेअंतर्गत घरकुल बांधकाम पुर्ण झालेल्या ५ लाभार्थ्यांना ग्रामपंचायती मार्फत खाजगी संस्थेच्या मदतीने विहीरीचे पाणी नळाद्वारे घरामध्ये उपलब्ध करुन दिले आहे.

यावरुन असे स्पष्ट दिसून येते की, पुर्वीच्या तुलनेत घरकुल बांधकामानंतर लाभार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या योग्य सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे 'पाणी' या घटकाच्या आधारे लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून आल्याचे दिसून येत आहे.


### ४.४.१० घरकुल प्राप्तीनंतर स्वयंपाकासाठी उपलब्ध सुविधा : निर्धुर चुलीचा लाभ

घरामध्ये स्वयंपाकासाठी उपलब्ध असलेल्या साधनावर म्हणजेच गॅस, साधी चूल, निर्धुर चूल इ. वरुन कुटुंबांचा सामाजिक व आर्थिक स्तर लक्षात येतो. त्यामुळे घरामध्ये स्वयंपाकासाठी उपलब्ध सुविधा हा घटकही व्यक्तीची सामाजिक स्थिती दर्शवितो. तसेच घरात स्वयंपाकासाठी उपलब्ध असणारी सुविधा ही आरोग्याच्या दृष्टीने निरोगी असणे आवश्यक आहे. अन्यथा त्यामुळे प्रामुख्याने स्त्रीयांचे आरोग्य धोक्यात येते. जसे की, ग्रामीण भागात स्वयंपाकासाठी धुररहीत किंवा साधी चूल वापरली जाते त्यामुळे स्त्रीयांना गलगंड, फुफ्फसांचे आजार होण्याचा धोका संभवतो. तसेच त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हासही मोठ्या प्रमाणात होतो.

या सर्वाचा सारासार विचार करून 'इंदिरा आवास योजने'मध्ये घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना निर्धूर चूलीचे वाटप व त्याचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना निर्धुर चुलीची सुविधा उपलब्ध झाली आहे किंवा नाही, तसेच निर्धुर चूल उपलब्ध झाली नसल्यास सद्यस्थितीत स्वयंपाकासाठी कोणते साधन वापरण्यात येते याची लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली होती. प्राप्त माहितीचा सविस्तर तपशील पुढील आलेख क्र. ४.१० मध्ये देण्यात आलेला आहे.

**आलेख क्र. ४.१०**

**निर्धुर चूलीच्या उपलब्धतेचा तपशील**





सोबतचा आलेख क्र. ४.१० वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी केवळ २८ (२४ टक्के) लाभार्थ्यांनाच निर्धुर चूल उपलब्ध झालेली आहे. सर्वाधिक ८७ (७६ टक्के) लाभार्थ्यांना निर्धुर चूल उपलब्ध झालेली नाही. याबाबत लाभार्थ्यांशी चर्चा केली असता, ग्रामपंचायत स्तरावरुन निर्धुर चूल देण्यात येणार आहे किंवा नाही याविषयी काहीच माहिती दिली गेली नसल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.

याबाबत ग्रामसेवकांशी चर्चा केली असता सर्व लाभार्थ्यांना निर्धुर चूल पुरविण्यात आल्याचे सांगण्यात आले. पंचायत समितीतील यादीमध्येही लाभार्थ्यांना निर्धुर चूल पुरविली असल्याचा तपशील होकारार्थी असल्याचे दिसून येत आहे. परंतु प्रत्यक्ष निरीक्षणात एकाही लाभार्थ्यांकडे निर्धुर चूल दिसून आलेली नाही. तसेच निर्धुर चूल मिळाली असल्याचे ज्या २४ टक्के लाभार्थ्यांनी म्हटले आहे ते लाभार्थीही निर्धुर चूलीचा वापर करताना दिसून येत नाहीत. त्यामुळे योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना निर्धुर चूल मिळाली किंवा नाही तसेच पंचायत समिती स्तरावरुन निर्धुर चूल पुरविण्यात आली किंवा नाही याबाबत स्पष्ट माहिती मिळू शकलेली नाही. एकूणच या संदर्भात लाभार्थ्यांपासून पंचायत समिती स्तरापर्यंत समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते.

योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना निर्धुर चूल मिळाली आहे किंवा नाही हे स्पष्ट होत नाही. मात्र सद्यस्थितीत लाभार्थ्यांकडे स्वयंपाकासाठी कोणते साधन उपलब्ध आहे याविषयी माहिती घेण्यात आली होती. सदर माहितीचा तपशील पुढील आलेख क्र. ४.११ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.११**

**सद्यस्थितीत घरकुलात स्वयंपाकासाठी उपलब्ध सुविधेचा तपशील**




सोबतचा आलेख क्र. ४.११ वरुन हे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ४६ लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर गॅस जोडणी करुन घेतलेली आहे. उपलब्ध माहितीवरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ४६ (४० टक्के) लाभार्थ्यांकडे स्वयंपाकासाठी गॅसची सुविधा उपलब्ध आहे. मात्र उर्वरित ६९ (६० टक्के) लाभार्थी अद्यापही स्वयंपाकासाठी साधी चुल वापरत असल्याचे दिसून येते. परंतु घरकुल बांधकामानंतर किमान ४० टक्के लाभार्थ्यांनी गॅस जोडणी करुन घेतलेली असून ही बाब सकारात्मक आहे. यावरुन घरकुलाचा लाभ झाल्यामुळे लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थिती सुधारणा घडून येत असल्याचे दिसून येते.

### ४.४.११ घरकुल लाभापूर्वीची स्वयंपाकासाठी उपलब्ध सुविधेबाबतची स्थिती :

घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी लाभार्थी कुटुंबात स्वयंपाकासाठी कोणती सुविधा उपलब्ध होती याची माहिती घेण्यात आली. त्यासंबंधी सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२१**

**घरकुल लाभापुर्वी स्वयंपाकासाठी उपलब्ध सुविधेचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल लाभापुर्वीची स्वयंपाकासाठी उपलब्ध सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चूल (धूररहीत) | १०९ | ९५ % |
| २ | रॉकेलवरील स्टोव्ह | ०२ | ०२ % |
| ३ | गॅस | ०४ | ०३ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२१ वरुन असे दिसून येते की, घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी सर्वाधिक १०९ (९५ टक्के) लाभार्थी स्वयंपाकासाठी साध्या चूलीचा वापर मोठ्या प्रमाणात करत असल्याचे दिसून येते. रॉकेलवरील स्टोव्हचा वापर करणारे २ (२ टक्के) लाभार्थी असून केवळ ४ (३ टक्के) लाभार्थी गॅसचा वापर करत होते असे दिसते. एकूणच लाभार्थ्यांकडे घरकुल बांधकामापूर्वी स्वयंपाकासाठी कोणतीही सुरक्षित सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यातुलनेने घरकुल प्राप्त झाल्यानंतर घरामध्ये गॅस जोडणी घेतलेल्या लाभार्थ्यांची संख्या ४६ (४० टक्के) असून हे प्रमाण वाढलेले दिसून येत आहे. त्यामुळे घरकुलाच्या लाभाने लाभार्थी कुटुंबांच्या सामाजिक तसेच आर्थिक स्थिती सुधारणा घडून येत असल्याचे दिसून येत आहे.

### ४.४.१२ घरकुलातील वीजेची सुविधा : उपलब्धतेचा स्त्रोत

घरात 'वीजे'ची सुविधा असणे ही अत्यावश्यक बाब आहे. कुटुंबातील वयस्क सदस्य, अपंग व्यक्ती, लहान मुले तसेच कुटुंबातील सदस्यांचे शिक्षण, आरोग्य, स्त्रीयांचे व एकूणच कुटुंबाच्या संरक्षण इ. दृष्टीने घरात वीज असणे आवश्यक आहे. घरात वीज उपलब्ध असल्यास कुटुंबाची शैक्षणिक, आरोग्य, संरक्षण याबाबतीत घडून येणारी प्रगती ही सामाजिक प्रगतीशी संबंधीत आहे. एकूणच कुटुंबाची सामाजिक स्थितीतील सुधारणा दर्शविण्यासाठी वीजेची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक ठरते.

त्यानुसार घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबामध्ये वीज आहे किंवा नाही तसेच वीजेची सुविधा कोणत्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे यासंबंधी लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२२**

**घरकुलातील वीज सुविधेच्या उपलब्धतेचा स्त्रोत**

| अ. क्र. | घरकुलातील वीजेची उपलब्ध सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घरात वीज जोडणी नाही | २३ | २० % |
| २ | शासकीय योजनेअंतर्गत मोफत वीज पुरविण्यात आली आहे | ६ | ५ % |
| ३ | घरकुलात सौर दिव्यांची सुविधा उपलब्ध आहे | १६ | १४ % |
| ४ | घरकुलात पुर्वीपासून वीज जोडणी आहे (स्वतः पैसे भरुन घेतलेले) | ३२ | २८ % |
| ५ | घरकुल बांधकामानंतर स्वतः पैसे भरुन वीज जोडणी घेतली आहे | ३४ | ३० % |
| ६ | अवैधरित्या वीज घेतलेली आहे (आकडी टाकून व शेजारच्यांकडून चोरुन वीज घेतली आहे) | ४ | ३ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२२ वरुन असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी घरात वीज जोडणी नाही असे म्हणणारे २३ (२० टक्के) लाभार्थी आहेत. शासकीय योजनेअंतर्गत मोफत वीज जोडणी झालेले तसेच मोफत सौरदिव्याची सुविधा उपलब्ध झालेले अनुक्रमे ६ (५ टक्के) व १६ (१४ टक्के) लाभार्थी आहेत. तसेच घराजवळील विद्युत वाहिनीवर आकडी टाकून (छुप्या रीतीने) व शेजारच्यांकडून तात्पूरत्या स्वरुपात वीज घेतली आहे असे अनुक्रमे ४ (३ टक्के) लाभार्थी आहे. तसेच घरकुलामध्ये

पुर्वीपासूनच वीज जोडणी आहे (स्वतः पैसे भरुन घेतलेले) असे एकूण ३२ (२८ टक्के) लाभार्थी आहेत. घरकुल बांधकामानंतर स्वतः पैसे भरुन वीज जोडणी करुन घेणारे ३४ (३० टक्के) लाभार्थी आहेत.

यावरुन असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी सद्यस्थितीत एकूण ८८ (७७ टक्के) लाभार्थ्यांकडे वीजेची सुविधा उपलब्ध आहे. उर्वरित २३ (२० टक्के) लाभार्थ्यांकडे वीजेची कोणतीच सुविधा उपलब्ध नसून उर्वरित ४ (३ टक्के) लाभार्थ्यांनी घरकुलामध्ये चुकीच्या मार्गाने वीज उपलब्ध करुन घेतलेली आहे.

'इंदिरा आवास योजने'च्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रत्येक लाभार्थी घरकुलात केंद्र व राज्य सरकारच्या इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून(Convergence) वीजेची सुविधा उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. यावरून असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी एकूण ८८ (७७ टक्के) लाभार्थ्यांकडे वीजेची सुविधा उपलब्ध आहे. त्यापैकी केवळ २२ (१९ टक्के) लाभार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळालेला आहे. २२ पैकी १६ लाभार्थ्यांना शासनाकडून सौरदिवे पुरविण्यात आलेले आहेत. तसेच ६ लाभार्थ्यांना राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण या शासकीय योजनेअंतर्गत मोफत वीज सुविधा पुरविण्यात आली आहे. तसेच ८८ पैकी उर्वरित ६६ लाभार्थ्यांनी स्वतः पैसे भरुन MSEB कडून वीज जोडणी करुन घेतली आहे.

यावरुन वीजेची सुविधा उपलब्ध असलेले लाभार्थी जास्त आहेत असे दिसून येते. मात्र इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून ९३ (८१ टक्के) घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना मोफत वीजेची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत लाभार्थ्यांशी चर्चा केली असता, शासनाकडून मोफत वीजेची सुविधा उपलब्ध होऊ शकते याविषयी बहुतांशी लाभार्थ्यांना माहितीच नसल्याचे दिसून आले. तसेच घरकुलापासून वीज जोडणीची सुविधा लांब अंतरावर असल्याने वीजेची सुविधा उपलब्ध होऊ शकली नाही, वीज जोडणीसाठी पैसे भरण्याची क्षमता नाही व वीज जोडणीचा प्रस्ताव दिलेला नाही अशी विविध कारणे लाभार्थ्यांनी सांगितली. तसेच वीज बिल न भरल्याने वीज जोडणी तोडण्यात आल्याचे २ लाभार्थ्यांनी सांगितले.

याबाबत ग्रामसेवकांशी केलेल्या चर्चेनुसार ग्रामसेवकांमार्फत काही घरकुल लाभार्थ्यांचे वीज जोडणीचे अर्ज MSEB ला सादर करण्यात आले होते. परंतु MSEB कडून त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही असे ग्रामसेवकांनी सांगितले. त्यामुळे

काही लाभार्थ्यांनी वाट न पाहता स्वतः पैसे भरून वीज जोडणीची सुविधा उपलब्ध करुन घेतलेली आहे. तसेच काही लाभार्थी दुर्गम भागात राहतात त्याठिकाणी वीज जोडणी करणे अद्याप शक्य झालेले नाही. त्यामुळे दुर्गम भागातील काही लाभार्थ्यांना सौर दिवे बसवून देण्यात आले असल्याचे ग्रामसेवकांनी सांगितले.

थोडक्यात योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त सर्वच लाभार्थ्यांच्या घरामध्ये अद्यापही वीज जोडणी झालेली नाही. तसेच लाभार्थ्यांना वीजेची मोफत सुविधा उपलब्ध करुन देण्यासंबंधी जनजागृतीचा तसेच समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते.

### ४.४.१३ घरकुल लाभापुर्वीची वीजेची उपलब्ध सुविधा :

घरकुल लाभापुर्वी राहत्या ठिकाणी विजेची कोणती सुविधा उपलब्ध होती याची लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली होती. प्राप्त माहितीचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२३**

**घरकुल लाभापुर्वी वीजेच्या उपलब्ध सुविधेचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल लाभापुर्वीची वीजेची सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | राहत्या ठिकाणी वीजेची सुविधा उपलब्ध नव्हती | ५६ | ४९ % |
| २ | सौर दिवे | ११ | ९ % |
| ३ | स्वतः पैसे भरुन वीज जोडणी घेतलेली होती | ३२ | २८ % |
| ४ | घराजवळील विद्युत वाहिनीवरती आकडी टाकून तसेच इतरांकडून वीज घेतली होती | १६ | १४ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२३ वरून असे दिसून येते की, घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी सर्वाधिक ५६ (४९ टक्के) लाभार्थी राहत असलेल्या ठिकाणी वीजेची सुविधा उपलब्ध नव्हती. तर ३२ (२८ टक्के) लाभार्थ्यांनी घरकुल बांधकामापुर्वीच स्वतः पैसे भरुन वीज जोडणी घेतलेली होती. घरात वीज नसल्याने जवळील विद्युत वाहिनीवरती आकडी टाकून तसेच इतरांकडून वीज घेतलेले एकूण १६ (१४ टक्के) लाभार्थी होते. तसेच सौर दिव्यांचा वापर करत असलेले ११ (९ टक्के) लाभार्थी होते.

यावरून असे दिसून येत होते की, पुर्वी राहत्या ठिकाणी वीजेची कोणतीच सुविधा उपलब्ध नसलेले एकूण ५६ (४९ टक्के) लाभार्थी होते. तसेच १६ (१४ टक्के) लाभार्थ्यांनी चुकीच्या मार्गाने वीज सुविधा उपलब्ध करुन घेतली होती. तर केवळ ४३ (३७ टक्के) लाभार्थ्यांकडे अधिकृतरित्या वीजेची सुविधा उपलब्ध होती.

याबाबत सारणी क्र. ४.२२ व सारणी क्र. ४.२३ या दोन्हींचे तुलनात्मक विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, घरकुल बांधकामापुर्वी ५६ (४९ टक्के) लाभार्थ्यांच्या घरामध्ये वीज जोडणी नव्हती. परंतु घरकुल बांधकामानंतर २७ (२३ टक्के) घरामध्ये वीज जोडणी नसल्याचे दिसून येते. म्हणजेच घरकुल प्राप्त झाल्यानंतर घरामध्ये वीज

उपलब्ध असलेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी केवळ ४३ (३७ टक्के) लाभार्थ्यांकडे अधिकृतरित्या वीजेची सुविधा उपलब्ध होती. तर घरकुल प्राप्तीनंतर ८८ (७७ टक्के) लाभार्थ्यांकडे अधिकृतरित्या वीजेची सुविधा उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे.

घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी १६ लाभार्थ्यांनी चुकीच्या मार्गाने (आकडी टाकून, शेजारच्या घरातून वीज घेणे इ.) घरामध्ये वीज उपलब्ध करुन घेतलेली होती. घरकुल बांधकामानंतर चुकीच्या मार्गाने वीज घेतलेले केवळ ४ लाभार्थी आहेत. तसेच घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ११ लाभार्थ्यांना सौर दिव्यांची सुविधा उपलब्ध होती. तर घरकुल बांधकामानंतर १६ लाभार्थ्यांना सौर दिव्यांची सुविधा उपलब्ध झालेली आहे. थोडक्यात पुर्वीच्या तुलनेत वीजेच्या सुविधेबाबत लाभार्थ्यांच्या सद्यस्थितीत सुधारणा घडून आल्याचे दिसून येते.


### ४.४.१४ सामाजिक सुरक्षेसंबंधीत शासकीय योजनांचा लाभ :

समाजातील दुर्बल, दुर्लक्षित, मागासलेल्या तसेच दारिद्रय रेषेखालील व्यक्तींचे सामाजिक तसेच आर्थिक हित साधण्यासाठी शासन पातळीवर विविध योजना राबविल्या जात आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना, जीवन विमा महामंडळाच्या योजना, गरिबांसाठीची जनश्री विमा योजना, आम आदमी विमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना व अंत्योदय विमा योजना इ. योजना राबविल्या जात आहेत.

सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना मिळाल्यास त्यांची सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत होऊ शकते. यानुसार सदर योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळाला आहे किंवा नाही हे त्यांच्याकडून जाणून घेण्यात आले. प्राप्त माहितीचा तपशील पुढील आलेख क्र. ४.१२ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.१२**

**सामाजिक सुरक्षेसंबंधीत इतर योजनांच्या लाभाचा तपशील**




आलेख क्र. ४.१२ वरुन असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी केवळ २ (२ टक्के) लाभार्थ्यांनी सामाजिक सुरक्षेसंबंधीत योजनेचा लाभ घेतलेला असून हे प्रमाण अत्यंत कमी आहे. यामध्ये अंत्योदय विमा योजना व आम आदमी विमा योजनेचा लाभ घेणारे अनुक्रमे १-१ लाभार्थी आहे. उर्वरित ११३ (९८ टक्के) लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले दिसून येत नाही.

तसेच 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने सदर योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणतेही प्रयत्न झालेले दिसून येत नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांच्या सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने लक्ष देणे गरजेचे असून त्यासाठी लाभार्थ्यांमध्ये जनजागृती व प्रत्यक्ष प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे दिसून येते.

### ४.४.१५ घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबाची सद्य शैक्षणिक स्थिती :

'शिक्षण' हा व्यक्तीगत, कौटुंबिक व सामाजिक विकासातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुटुंबातील सुशिक्षित सदस्यांमुळे कुटुंबाची आर्थिक,सामाजिक व एकूणच सर्वांगिण प्रगती घडून येते. यानुसार 'इंदिरा आवास योजने'चे लाभार्थी म्हणजेच दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती-जमाती, इतर प्रवर्गातील कुटुंबे, बिगर दारिद्रय रेषेखालील गरीब कुटुंबे ही प्रामुख्याने 'शिक्षणाच्या अभावा' मुळेच सामाजिक दृष्ट्या मागासलेले असल्याचे दिसून येते. बहुतांशी वेळा अशा कुटुंबातील मुले ही शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळेच लाभार्थी कुटुंबांची सद्य शैक्षणिक स्थिती जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

यानुसार किती लाभार्थी कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत याची लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली. प्राप्त माहितीवरुन लाभार्थी कुटुंबात ६ ते २३ या वयोगटातील मुले शिक्षण घेत असल्याचे समजते. प्राप्त माहितीचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२४**

**घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबांच्या सद्य शैक्षणिक स्थितीचा तपशील**

| अ. क्र. | लाभार्थी कुटुंबांची सद्य शैक्षणिक स्थिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत | ६१ | ५३ % |
| २ | कुटुंबातील मुले शिक्षण घेत नाहीत | ५ | ४ % |
| ३ | कुटुंबातील सर्व मुलांचे शिक्षण पुर्ण झाले आहे | ३७ | ३२ % |
| ४ | कुटुंबात मुले नाहीत | १२ | ११ % |
| | **एकूण** | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२४ वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबापैकी ६१ (५३ टक्के) कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत. तसेच ३७ (३२ टक्के) कुटुंबातील सर्व सदस्य व मुलांचे शिक्षण पुर्ण झाले आहे. उर्वरित १२ (११ टक्के) कुटुंबात मुले नाहीत व ५ (४ टक्के) कुटुंबातील मुले शिक्षण घेत नाहीत.

लाभार्थ्यांकडून मिळालेल्या माहितीवरुन हे स्पष्ट होते की, सद्यस्थितीत ११५ लाभार्थी कुटुंबापैकी ६१ लाभार्थी कुटुंबांमधील मुले शिक्षण घेत असून यामध्ये ६ ते २३ या वयोगटातील मुले किंवा सदस्यांचा समावेश आहे. केवळ पाचच लाभार्थी कुटुंबांत मुले आहेत परंतु ते शिक्षण घेत नाहीत. तर ३७ कुटुंबातील मुलांचे शिक्षण पुर्ण झाले आहे. एकूणच सर्वाधिक ६१ लाभार्थी कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत. यावरुन लाभार्थी कुटुंबांचा शैक्षणिक स्तर उंचावल्याचा दिसून येत आहे.

### ४.४.१६ लाभार्थी कुटुंबातील सदस्यांची वयोगटानुसार शैक्षणिक स्थिती :

लाभार्थी कुटुंबांपैकी ६१ कुटुंबातील ६ ते २३ वयोगटातील मुले किंवा सदस्य शिक्षण घेत आहेत. त्यानुसार कुटुंबांतील सदस्यांच्या शैक्षणिक स्थितीविषयी लाभार्थ्यांशी चर्चा करण्यात आली होती. प्राप्त माहितीनुसार मुलांची वयोगटानुसार शैक्षणिक स्थिती पुढील सारणीमध्ये देण्यात आली आहे.

**सारणी क्र. ४.२५**

**लाभार्थी कुटुंबातील सदस्यांच्या वयोगटानुसार शैक्षणिक स्थितीचा तपशील**

| अ. क्र. | वयोगट | शिक्षण घेणारे मुले - मुली | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वयोगट ६ ते १४ (प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षण) | ४२ | ४४ % |
| २ | वयोगट १५ ते १८ (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण) | ३६ | ३८% |
| ३ | वयोगट १९ ते २३ (महाविद्यालयीन शिक्षण) | १७ | १८% |
| | **एकूण** | **९५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२५ वरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त ६१ लाभार्थी कुटुंबामध्ये ६ ते २३ वयोगटातील एकूण ९५ मुले-मुली शिक्षण घेत आहेत. यामध्ये ६ ते १४ वयोगटातील ४२ (४४ टक्के) मुले प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षण घेत आहेत. तसेच १५ ते १८ वयोगटातील ३६ (३८ टक्के) मुले माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेत आहे. १९ ते २३ वयोगटातील १७ (१८ टक्के) मुले महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. यावरुन प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींची संख्या जास्त असल्याचे स्पष्ट होते. यामध्ये प्रामुख्याने २०१० ते २०१४ या कालावधीत घरकुल बांधकाम पूर्ण झालेल्या कुटुंबातील शाळेत जाणाऱ्या मुलांचा समावेश आहे.

### ४.४.१७ प्राप्त घरकुलाचा कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी झालेला उपयोग :

मुळशी तालुक्यात घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबापैकी ६१ कुटुंबातील मुले किंवा सदस्य शिक्षण घेत आहेत. 'स्वतःचे हक्काचे घर' कुटुंबातील सदस्यांच्या शिक्षणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असते. म्हणजेच स्वतःचे घर असेल तर कुटुंबाची शैक्षणिक प्रगती साधली जाते व त्याचे रुंपातर सामाजिक प्रगतीमध्ये होत असते. त्यामुळे योजनेअंतर्गत प्राप्त झालेले घरकुल मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने कशा प्रकारे उपयुक्त ठरत आहे याबाबत लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली होती. प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील सारणीमध्ये देण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४.२६**

**घरकुलाचा मुलांच्या शिक्षणासाठी झालेला उपयोग**

| अ. क्र. | घरकुलाचा मुलांच्या शिक्षणासाठी झालेला उपयोग | संख्या (६१ पैकी) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीज असल्याने मुले घरकुलात अभ्यास करतात | ९ | १५ % |
| २ | वीज नसल्याने घरकुलात अभ्यास करता येत नाही परंतु मुलांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली | ७ | १२ % |
| ३ | घरकुलामुळे मुलांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली | १० | १६ % |
| ४ | वीज असल्याने घरकुलात अभ्यास करतात तसेच मुलांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली | ३५ | ५७ % |
| **एकूण** | | **६१** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२६ मध्ये ११५ लाभार्थी कुटुबांपैकी ६१ कुटुंबातील मुले शाळेत जात आहेत अशा कुटुंबातील लाभार्थ्यांशी झालेल्या चर्चेचा तपशील देण्यात आला आहे. त्यानुसार ९ (१५ टक्के) लाभार्थ्यांच्या मते घरकुल प्राप्ती व घरकुलात वीज जोडणी असल्याने मुलांना घरात अभ्यास करता येतो. तसेच घरकुलाचा लाभ मिळाला मात्र घरकुलात वीज नसल्याने मुलांना घरात अभ्यास करता येत नाही. मात्र मुलांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली आहे असे ७ (१२ टक्के) लाभार्थ्यांनी सांगितले. घरकुलामुळे मुलांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली असे १० (१६ टक्के) लाभार्थ्यांनी सांगितले आहे. तसेच घरकुलात वीज उपलब्ध असल्याने मुलांना घरात

अभ्यास करता येतो व मुलांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली असे सांगणारे ३५ (५७ टक्के) लाभार्थी आहेत.

थोडक्यात कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी घरकुलाचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला असल्याचे सर्वच लाभार्थ्यांनी म्हटले आहे. म्हणजेच घरकुल प्राप्त झाल्याने कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

### ४.४.१८ घरकुल लाभापुर्वी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी उपलब्ध सुविधा :

घरकुल लाभापूर्वी राहत्या ठिकाणी लाभार्थी कुटुंबातील मुलांच्या अभ्यासासाठी उपलब्ध सुविधेविषयी जाणून घेणे गरजेचे होते. याबाबत लाभार्थ्यांशी चर्चा करण्यात आली. प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२७**

**घरकुल लाभापुर्वी मुलांच्या शिक्षणासाठी उपलब्ध सुविधेचा तपशील**

| अ. क्र. | घरकुल लाभापुर्वी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी उपलब्ध सुविधा | संख्या (९३ पैकी) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | घरात वीज असल्याने मुले घरात अभ्यास करतात | २२ | २४ % |
| २ | घरात वीज असल्याने मुले घरात अभ्यास करत परंतु अभ्यासासाठी पुरेश्या जागेचा अभाव होता | २८ | ३० % |
| ३ | घरात वीज नव्हती तसेच पुरेश्या जागेअभावी मुलांना घरात अभ्यास करता येत नव्हता | ४३ | ४६ % |
| **एकूण** | | **९३** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२७ वरुन असे स्पष्ट होते की, योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ११५ पैकी ९३ लाभार्थी कुटुंबातील मुले शिक्षण घेत होते. यानुसार घरकुल प्राप्तीपुर्वी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुविधेविषयी सदर ९३ लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार घरात वीज असल्याने मुले घरात अभ्यास करत होती असे २२ (२४ टक्के) लाभार्थ्यांनी सांगितले. घरात वीज असल्याने मुले घरात अभ्यास करत होती परंतु अभ्यासासाठी पुरेशी जागा नव्हती असे २८ (३० टक्के) लाभार्थ्यांनी सांगितले. तसेच घरात वीज नव्हती व अभ्यासासाठी पुरेशी जागाही नसल्याने मुलांना घरात अभ्यास करता येत नव्हता असे ४३ (४६ टक्के) लाभार्थ्यांनी सांगितले.

थोडक्यात घरात वीज होती पण जागेचा अभाव होता, तसेच घरात वीज नव्हती व अभ्यासासाठी पुरेशी जागाही नव्हती असे सांगणारे ९३ पैकी ७१ (७६ टक्के) लाभार्थी आहेत. म्हणजेच त्यांच्या मतावरुन असे लक्षात येते की, पुर्वी कुटुंबातील मुलांना अभ्यासासाठी कोणती ना कोणती अडचण येत होती. त्यामुळे मुलांना घराबाहेर किंवा शेजारी ज्यांच्याकडे वीज आहे तिथे अभ्यासासाठी जावे लागत होते असे काही

लाभार्थ्यांनी सांगितले. म्हणजेच घरकुल प्राप्त होण्यापूर्वी लाभार्थी ज्याठिकाणी राहत होते (पूर्वीची राहत्या ठिकाणची स्थिती वरील सारणी क्र. ४.१७ मध्ये दर्शविलेली आहे) त्या ठिकाणची स्थिती अतिशय बिकट होती. त्यामुळे पुर्वीच्या ठिकाणी मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने योग्य सुविधा तसेच पोषक वातावरण उपलब्ध नव्हते हे स्पष्ट होते.

सारणी क्र. ४.२६ व सारणी क्र. ४.२७ चे तुलनात्मक विश्लेषण केले असता असे लक्षात येते की, घरकुल प्राप्त झाल्याने पुर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत लाभार्थी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी अधिक पोषक वातावरण उपलब्ध होऊ शकले आहे. कारण सद्यस्थितीत ११५ लाभार्थी कुटुंबापैकी ६१ कुटुंबातील मुले शाळेत जात आहेत. या सर्व ६१ (१०० टक्के) लाभार्थी कुटुंबांना मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने घरकुलाचा फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच पुर्वी एकूण ९३ लाभार्थी कुटुंबातील मुले शाळेत जात होती व त्यापैकी ७१ कुटुंबातील मुलांना अभ्यासासाठी वीज किंवा पुरेश्या जागेचा अभाव यासारख्या अडचणी येत होत्या.

यावरुन असे स्पष्ट होते की, योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे घर मिळाले व या गोष्टीचा सकारात्मक परिणाम कुटुंबातील मुलांच्या शिक्षणावर होताना दिसून येतो. कारण घरकुलामुळे मुलांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली. घरात वीज असल्याने मुले रात्रीच्या वेळीही घरात अभ्यास करतात. त्यामुळे घरकुलामुळे लाभार्थी कुटुंबांच्या शैक्षणिक स्थितीत सुधारणा घडून येत असल्याचे दिसून येत आहे.

## ४.५ घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबाची आर्थिक स्थिती :

'स्वतःचे घर' जसे व्यक्तीच्या सामाजिक जीवनाशी निगडीत आहे तसेच ते आर्थिक जीवनाशाही संबंधीत आहेत. हक्काचे घर प्राप्त झाल्याने व्यक्तीस स्थिर स्वरुपाचे जीवन प्राप्त होते. त्यामुळे भंटकती संपवून व्यक्ती स्थानिक रोजगाराच्या संधी मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहतो. मिळणारे उत्पन्न हे घराव्यतिरिक्त इतर पायाभूत गरजा पूर्ण करण्यासाठी खर्च करु लागतो, तसेच बचतीतही वाढ होते. यामुळे एकप्रकारे व्यक्तीच्या आर्थिक स्थितीत बदल होऊन आर्थिक पत सुधारते.


'इंदिरा आवास योजने' अंतर्गत आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबांना घरकुलाचा लाभ दिला जातो. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या लाभार्थी कुटुंबाच्या उत्पन्नाची साधने, त्यांचे उत्पन्न जाणून घेणे आवश्यक ठरते. तसेच घरकुल प्राप्तीनंतर लाभार्थ्यांच्या स्थितीत काही बदल घडून आला आहे किंवा नाही हे पाहणेही उपयुक्त ठरते. यानुसार घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती जाणून घेण्यासंदर्भात लाभार्थ्यांकडून प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली होती. प्राप्त माहितीचे सविस्तर विश्लेषण पुढे देण्यात आलेले आहे.

### ४.५.१ लाभार्थी कुटुंबातील सदस्यांच्या रोजगाराची स्थिती :

कुटुंबातील कमावते सदस्य, उत्पन्नाची साधने, त्यातून प्राप्त होणारे उत्पन्न व यावरुन कुटुंबाची एकूणच आर्थिक स्थिती लक्षात येते. या अनुषंगाने घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबातील काम करणाऱ्या सदस्यांची माहिती लाभार्थ्यांकडून घेण्यात आली होती. प्राप्त माहितीचा तपशील पुढील आलेख क्र. ४.१३ मध्ये देण्यात आलेला आहे.

**आलेख क्र. ४.१३**

**लाभार्थी कुटुंबातील सदस्यांच्या रोजगार स्थितीचा तपशील**



आलेख क्र. ४.१३ वरुन असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबामध्ये स्त्री व पुरुष असे एकूण ४८४ सदस्य आहेत. त्यामध्ये २४४ पुरुष सदस्य असून २४० स्त्री सदस्या आहेत. यानुसार ४८४ सदस्यांपैकी २८६ (५९ टक्के) सदस्य काम करणारे असून १८८ (३९ टक्के) सदस्य काम न करणारे आहेत. तसेच कुटुंबामध्ये ० ते ५ वयोगटातील एकूण १० (२ टक्के) सदस्य आहेत व ते कुटुंबाच्या आर्थिक स्थिती किंवा उत्पन्न वाढीत कोणतेच योगदान देऊ शकत नाहीत. एकूणच लाभार्थी कुटुंबात काम करणाऱ्या सदस्यांचे प्रमाण ५९ टक्के असून ते सर्वाधिक आहे.

### ४.५.२ लाभार्थी कुटुंबातील ६ ते २३ वयोगटातील मुलांच्या रोजगाराची स्थिती :

घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबातील ६ ते २३ हा वयोगटातील काही मुले प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेणारी आहेत. त्यामुळे या गटातील मुले किंवा सदस्य काम करत आहेत किंवा नाही हे लाभार्थ्यांकडून जाणून घेण्यात आले. प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२८**

**६ ते २३ वयोगटातील मुलांच्या रोजगार स्थितीचा तपशील**

| अ. क्र. | लाभार्थी कुटुंबातील मुलांची रोजगार स्थिती | संख्या (५० पैकी) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ६ ते १४ वयोगटातील काम करणारे सदस्य | ०३ | ६ % |
| २ | १५ ते १८ वयोगटातील काम करणारे सदस्य | १३ | २६ % |
| ३ | १९ ते २३ वयोगटातील काम करणारे सदस्य | ३४ | ६८ % |
| **एकूण** | | **५०** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२८ वरुन असे स्पष्ट होते की, लाभार्थी कुटुंबातील ६ ते २३ वयोगटातील मुलांनाही कामे करावी लागत आहे अशी एकूण ५० मुले किंवा सदस्य आहेत. यामध्ये ६ ते १४ वयोगटातील ३ सदस्य असून १५ ते १८ वयोगटातील १३ सदस्य व १९ ते २३ वयोगटातील १७ सदस्य काम करत आहेत. यामध्ये शाळा व काम असे दोन्ही करत असलेल्या किंवा शाळेत न जाणाऱ्या मुलांचाही समावेश असू शकतो.

थोडक्यात बिकट आर्थिक स्थितीमुळे उदरनिर्वाहासाठी कुटुंबातील लहान मुलांनाही काम करावे लागते असे लाभार्थी कुटुंबातील पालकांनी सांगितले.

### ४.५.३ सद्यस्थितीत लाभार्थी कुटुंबांतील सदस्यांच्या रोजगाराचे स्वरुप :

आलेख क्र. ४.१३ वरुन घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबातील काम करणाऱ्या सदस्यांची संख्या लक्षात येते. यानुसार लाभार्थी कुटुंबातील एकूण २८६ सदस्य हे कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करत आहेत. या सर्व सदस्यांच्या उत्पन्नांचा नेमका स्त्रोत कोणता आहे म्हणजेच कोणत्या स्वरुपाचा रोजगार करत आहेत याविषयी लाभार्थ्यांकडून माहिती घेण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२९**

**सद्यस्थितीत कुटुंबातील सदस्यांच्या रोजगार स्वरुपाचा तपशील**

| अ. क्र. | कुटुंबातील सदस्यांच्या रोजगाराचे स्वरूप | संख्या (सदस्य संख्या) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वतःची शेती | ४८ | १७ % |
| २ | शेतमजुरी | ८३ | २९ % |
| ३ | इतर मजुरीची कामे (बिगारी काम, प्लंबरची कामे, गवंडीकाम, घरकामे इ.) | ३७ | १३ % |
| ४ | हंगामी व्यवसाय (झाडू व्यवसाय, पेंटिग काम, मासेमारी इ.) | ०६ | २ % |
| ५ | नोकरी (कंपनी काम करणारी, सुरक्षारक्षक, शिक्षक, ड्रायव्हरचे काम इ.) | ५१ | १८ % |
| ६ | स्वतःच्या शेतीबरोबरच इतर कामे करणारी | ६१ | २१ % |
| **एकूण** | | **२८६** | **१०० %** |

सारणी क्र. ४.२९ वरुन असे दिसून येते की, लाभार्थी कुटुंबातील काम करणाऱ्या २८६ सदस्यांपैकी ४८ (१७ टक्के) सदस्यांकडे स्वतःची शेती असल्याने ते शेती करतात. शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांचा उरनिर्वाह होतो. त्यातील ८३ (२९ टक्के) सदस्य हे दुसऱ्यांच्या शेतावर शेतमजुरी करत असून व हे प्रमाण सर्वाधिक आहे. इतर ३७ (१३ टक्के) सदस्य मजुरीची कामे करत आहेत. ज्यामध्ये बिगारी काम, प्लंबरची कामे, गवंडीकाम, घरकामे इत्यादी प्रकारच्या कामांचा समावेश होतो.

हंगामी व्यवसाय जसे की, झाडू व्यवसाय, पेंटिग काम, मासेमारी इ. कामे करणारी ६ (२ टक्के) सदस्य आहेत. एकूण ५१ (१८ टक्के) सदस्य गावामध्ये व इतर ठिकाणी जाऊन नोकरी करत आहेत. उदा. कंपनीमध्ये काम, सुरक्षारक्षक, शिक्षक, ड्रायव्हरची नोकरी करणारे आहेत. स्वतःची शेती आहे परंतु त्यातुन मिळणारे उत्पन्न पुरेसे नाही. त्यामुळे उत्पन्न वाढीसाठी शेतीबरोबर इतरही कामे करणारी ६१ (२१ टक्के) सदस्य आहेत. यामध्ये प्रामुख्याने स्वतःच्या शेतीबरोबरच शेतीजोड व्यवसाय (चिकन शॉप, पशुपालन इ.) करणारे, शेतमजुरीची कामे व इतर मजुरीची कामे करणारे, रोजगार हमी योजनेची कामे करणारे, हंगामी कामे तसेच मिळेल ती मजुरीची कामे करणारे, नोकरी करणारे इ. सदस्यांचा समावेश होतो.

यावरुन असे लक्षात येते की, घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबातील सर्वाधिक २९ टक्के सदस्यांना उदरनिर्वाहासाठी शेतमजुरीची कामे करावी लागत आहेत. त्याखाली २१ टक्के सदस्य आहेत जे स्वतःची शेती करतात परंतु त्यातून मिळणाऱ्या अपुऱ्या उत्पन्नामुळे इतरही कामे करताना दिसून येतात. तसेच रोजगारासाठी नोकरी करत असलेले केवळ १८ टक्के सदस्य असल्याचे दिसून येते.

थोडक्यात लाभार्थी कुटुंबातील एकूण २८६ सदस्यांपैकी १९२ ( ६७ टक्के) सदस्य शेती, शेतमजुरी व शेती अधारित व्यवसाय करताना दिसून येतात. यावरुन लाभार्थी कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ घडून येईल या दृष्टीने आवश्यक रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या दिसून येत नाहीत.

### ४.५.४ घरकुल लाभापुर्वी कुटुंबांच्या रोजगाराचे स्वरूप :

घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी लाभार्थी कुटुंबांसाठी रोजगाराची कोणती साधने किंवा व्यवसाय उपलब्ध होते याविषयी लाभार्थ्यांशी चर्चा करण्यात ली होती. त्यानुसार प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आलेला आहे.

**सारणी क्र. ४.३०**

**घरकुल लाभापूर्वी कुटुंबांच्या रोजगार स्वरूपाचा तपशील**

| अ. क्र. | लाभार्थी कुटुंबांच्या रोजगाराचे स्वरूप | संख्या (लाभार्थी कुटुंबे) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वतःची शेती | २९ | २५ % |
| २ | शेतमजुरी व त्याबरोबरच इतर कामे | ५६ | ४९ % |
| ३ | रोजंदारीवरील इतर कामे (गवंडी काम, बिगारी काम, मजुरीची कामे) | ०५ | ४ % |
| ४ | स्वतःची शेती व त्याबरोबरच इतर कामे | २५ | २२ % |
| **एकूण** | | **११५** | **१०० %** |

सारणी क्र. ४.३० मध्ये घरकुलाचा लाभ मिळण्यापूर्वी ११५ लाभार्थी कुटुंबांना उत्पन्नाची कोणती साधने उपलब्ध होती याचा तपशील देण्यात आलेला आहे. लाभ मिळण्यापुर्वी कुटुंबातील सदस्यनिहाय रोजगाराच्या स्थितीचा तपशील उपलब्ध नाही. म्हणून सदर तपशील हा कुटुंबनिहाय देण्यात आलेला आहे.

वरील सारणीतील उपलब्ध माहितीवरुन असे दिसून येते की, घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी २९ (२५ टक्के) कुटुंबांतील सदस्य स्वतःची शेती करत होते. सर्वाधिक ५६ (४९ टक्के) कुटुंबातील सदस्य शेतमजुरी व त्याबरोबरच पशुपालन, भटक्या स्वरुपाची कामे, कंपनी काम, शेतीजोड व्यवसाय तसेच हंगामी व्यवसाय करत होते. तसेच ५ (४ टक्के) कुटुंबातील सदस्य रोजंदारीवरील इतर कामे उदा. गवंडी काम, बिगारी काम, मजुरीची कामे करत असल्याचे दिसून येते. तसेच २५ (२२ टक्के) कुटुंबातील सदस्य हे स्वतःची शेती व त्याबरोबर शेतमजुरी, शेतीजोड व्यवसाय, पशुपालन, भटक्या स्वरुपाची कामे तसेच कंपनीत काम करत होती. म्हणजेच घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ११५ लाभार्थी कुटुंबांपैकी सर्वाधिक ११० (९६ टक्के) कुटुंबे ही स्वतःची शेती, शेतमजुरी व शेतमजुरी बरोबर इतर कामे करणारी म्हणजेच शेतीशी संबंधीत कामे करत होती.

सारणी क्र. ४.२९ व सारणी क्र. ४.३० चा तुलनात्मक विचार करता असे दिसून येते की, घरकुल लाभापुर्वी व लाभानंतर कुटुंबांच्या रोजगाराच्या स्थितीमध्ये विशेष फरक पडलेला नाही. कारण पुर्वीही सर्वाधिक ९६ टक्के लाभार्थी कुटुंबे ही शेती, शेतमजुरी व त्यासंबंधीत इतर कामे करत होती. तसेच सद्यस्थितीतही लाभार्थी कुटुंबांतील सर्वाधिक १९२ (६७ टक्के) सदस्य हीच कामे करत आहेत. म्हणजेच लाभार्थ्यांच्या पूर्वीची व आत्ताची उत्पन्नाची साधने ही एकसारखीच असल्याचे दिसून येते. तसेच पुर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत कुटुंबातील सुशिक्षित सदस्य स्वतःच्या शैक्षणिक पात्रतेनुसार शेती व्यतिरिक्त नोकरी वा इतरत्र वेगवेगळ्या स्वरुपाची कामे करत असल्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. सद्यस्थितीत लाभार्थी कुटुंबातील ५१ सदस्य कंपनीत कामे करत आहेत हे प्रमाण पुर्वीच्या तुलनेत अधिक आहे.

प्रामुख्याने मुळशी तालुका शेतीबहुल तालुका असल्याने बहुतांशी लोक हे शेती व शेतमजुरीवर अवलंबुन असल्याचे दिसून येते. परंतु स्वतःची शेती किंवा शेतमजुरीची कामे ही हंगामी स्वरुपाची असतात. त्यामुळे या तालुक्यात शेती सोडून लोकांना स्थिर स्वरुपाच्या रोजगाराच्या इतर संधी उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त झाले असले तरी लाभार्थी कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढीस लागेल, त्यांचा आर्थिक स्तर उंचावेल अशा रोजगाराच्या संधी उपलब्ध होताना दिसून येत नाहीत.

### ४.५.५ लाभार्थी कुटुंबातील काम करणाऱ्या सदस्यांच्या वेतनाचे स्वरुप :

सद्यस्थिती ११५ लाभार्थी कुटुंबांमध्ये २८६ सदस्य काम करत आहेत. काम करणाऱ्या सदस्यांना मिळणाऱ्या वेतनाचे स्वरुप कसे आहे हे जाणून घेण्यात आले. कारण त्यावरुनही कुटुंबाची आर्थिक स्थिती समजण्यास मदत होते. यानुसार लाभार्थ्यांशी केलेल्या चर्चेचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.३१**

**लाभार्थी कुटुंबातील काम करणाऱ्या सदस्यांच्या वेतनाचे स्वरूप**

| अ. क्र. | सदस्यांच्या वेतनाचे स्वरुप | संख्या (२८६ पैकी) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रोजची मजुरी | १७९ | ६२ % |
| २ | आठवड्याला मजुरी/वेतन किंवा काम होईल त्याप्रमाणे पैसे मिळतात | ०२ | १ % |
| ३ | मासिक वेतन | ५७ | २० % |
| ४ | स्वतःची शेती करणारे यांना रोज/ आठवड्याला/मासिक अशा स्वरुपात वेतन वा मजुरी मिळत नाही | ४८ | १७ % |
| **एकूण** | | **२८६** | **१०० %** |

सारणी क्र. ४.३१ वरुन असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबातील काम करणाऱ्या २८६ सदस्यांपैकी रोजची मजुरी (Daily Wages) मिळणारे एकूण १७९ (६२ टक्के) सदस्य आहेत व हे प्रमाण सर्वात जास्त आहे. आठवड्याला मजुरी/वेतन किंवा काम होईल तसे पैसे मिळत असल्याचे २ (१ टक्के) सदस्यांनी सांगितले. तसेच ५७ (२० टक्के) सदस्यांना मासिक वेतन (दरमहा वेतन) मिळते. मासिक वेतन मिळणाऱ्या सदस्यांमध्ये कंपनीमध्ये काम करणारे सदस्य येत असून यामध्ये स्वतःच्या शेतीबरोबरच कंपनी काम करणाऱ्या सदस्यांचाही समावेश आहे. उर्वरित ४८ (१७ टक्के) सदस्य हे स्वतःची शेती करणारे आहेत. स्वतःची शेती करणाऱ्या सदस्यांना रोज/आठवड्याला/मासिक स्वरुपात वेतन/मजुरी मिळत नाही. ते पीकाच्या उत्पादनावर अवलंबून असून एकहाती रक्कम शेतकऱ्यांना मिळत असते. परंतु शेती पावसावर अवलंबून असल्याने त्यांच्या उत्पन्नामध्ये नेहमीच चढ-उतार होताना दिसून येतो.

एकूणच लाभार्थी कुटुंबातील सदस्यांच्या वेतनाचे स्वरुप पाहता असे दिसून येते की, प्रामुख्याने सदस्य शेतमजुरी किंवा इतर मजुरीची कामे, जोड व्यवसाय अशा स्वरुपाची कामे करत असल्याने त्यांना रोजच्या मजुरीच्या स्वरुपात वेतन मिळते. जे कदाचित कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने पुरेसे नसते. त्यामुळे 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत लाभ देण्यात येणाऱ्या कुटुंबांना आवश्यक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. कारण त्यातून त्यांच्या उत्पन्नात वाढ घडून येण्यास तसेच लाभार्थी कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होऊ शकेल असे दिसून येते.

### ४.६ **योजनेसंदर्भात लाभार्थ्यांच्या समस्या** :

योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळविताना, घरकुल बांधकाम करताना तसेच घरकुल बांधुन झाल्यानंतर, विविध टप्प्यावर आलेल्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी लाभार्थ्यांशी चर्चा करण्यात आली होती. सदर चर्चेनुसार लाभार्थ्यांना आलेल्या अडचणींचे स्पष्टीकरण पुढे देण्यात आले आहे.

१. योजनेअंतर्गत २६९ चौ.फु. क्षेत्रात घरकुलाचे बांधकाम करण्यास परवानगी आहे. मात्र २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल हे कुटुंबांच्या गरजेनुसार पुरेसे ठरत नाही.

२. २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल बांधकामासाठी शासनाकडून मिळालेले अनुदान पुरेसे नसून ते वेळेत मिळत नाही. त्यामुळे बँकेतून कर्ज काढावे लागले व या कर्जामुळे कुटुंबांवरील आर्थिक बोजा अधिकच वाढला असल्याचे अनेक लाभार्थ्यांनी सांगितले.

३. शासनाकडून मिळणारे अनुदान कमी पडत असल्याने घरकुलाची विविध कामे करावयाची राहून गेल्याचे सांगण्यात आले. जसे की, घराचे रंगकाम, प्लॅस्टर, फरशी किंवा कोबा इ. कामे.

४. शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे मात्र उन्हाळ्यामध्ये पुरेश्या पाण्याअभावी शौचालय वापरता येत नाही. त्यामुळे उघड्यावरच शौचास जावे लागते. तसेच सार्वजनिक शौचालयांच्या ठिकाणी स्वच्छता, पुरेसे पाणी, देखभाल या समस्या येत असल्याचे सांगण्यात आले.

५. काही घरकुल प्राप्त लाभार्थ्यांनी घरकुलामध्ये किंवा घरकुलाच्या जवळ पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा तसेच घरकुलामध्ये वीजेची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक अडचणी येत असल्याचे सांगितले.

६. MSEB तसेच ग्रामपंचायतीकडे वारंवार पाठपुरावा करुन देखील अद्याप वीज उपलब्ध झाली नसल्याचे काही लाभार्थ्यांनी सांगितले.

७. वाडी-वस्तीवरील तसेच शेतात राहणाऱ्या लाभार्थ्यांना घरातील कचरा व सांडपाणी हे घराच्या पुढे-मागे किंवा मोकळ्या जागेतच टाकावा लागतो. त्यामुळे कचरा व सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीच सुविधा उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले.

८. घरकुलामुळे राहण्यासाठी जागा मिळाली मात्र कुटुंबाच्या आर्थिक स्थितीनुसार आवश्यक रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या नाहीत. रोजगारासाठी अद्यापही मजुरीची कामे करावी लागतात तसेच रोजगारासाठी भटकंती करावी लागते.

अशा प्रकारे योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ मिळाला असला तरी प्रत्यक्षात घरकुल बांधकाम होईपर्यंत तसेच बांधकामानंतरही लाभार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे दिसून येत आहे.

## ४.७ **योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेच्या समस्या** :

मुळशी तालुक्यात योजनेची कार्यवाही करताना ग्रामस्तर ते पंचायत समिती स्तरावर कार्यकारी यंत्रणेस येणाऱ्या समस्या देखील जाणून घेण्यात आल्या. यासाठी ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यांच्या मताप्रमाणे योजनेची कार्यवाही करताना पुढील प्रमुख समस्या किंवा अडचणी येतात.

१. मनुष्यबळाचा अभाव तसेच योजनेसाठी तालुका स्तरावर स्वतंत्र यंत्रणा नसल्याने तालुक्यातील सर्व लाभार्थी घरकुलांची पाहणी करणे, तसेच बांधकामासाठी वापरलेले साहित्य व बांधकामाचा दर्जा तपासणे शक्य होत नाही.

२. योजनेअंतर्गत पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने लाभार्थी तसेच मिस्त्रींना घरकुल बांधकामासंबंधी प्रशिक्षण देण्यामध्ये अडचणी येतात.

३. इतर शासकीय योजनांच्या (Convergence) माध्यमातून घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यामध्ये अडचणी येतात. जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत असलेल्या सदर योजनांच्या अंमलबजावणी यंत्रणेकडून आवश्यक सहकार्य मिळत नाही.

## ४.८ सारांश :

सदर प्रकरणामध्ये प्राथमिक माहितीचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. प्रकरणातील एकूण विवेचनावरुन मुळशी तालुक्यातील ‘इंदिरा आवास योजने’ची कार्यवाही लक्षात येते. घरकुल प्राप्तीनंतरची लाभार्थी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती व त्यातील सुधारणा वा बदल इ. बाबत माहिती मिळते. तसेच यातून योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात लाभार्थी व कार्यकारी यंत्रणेच्या असलेल्या समस्यांचा तपशीलही उपलब्ध होतो. एकूणच सदर माहिती विश्लेषणाच्या आधारे योजनेची फलनिष्पती (निष्कर्ष) स्पष्ट करणे शक्य झाले आहे. ज्याची सविस्तर मांडणी प्रकरण ५ मध्ये करण्यात आली आहे.

# प्रकरण पाचवे
# निष्कर्ष, गृहितकृत्यांची पडताळणी, शिफारशी व संशोधन अभ्यासाचा सारांश

## ५. संशोधन अभ्यासातील निष्कर्ष : प्रस्तावना

संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार संकलित करण्यात आलेल्या प्राथमिक माहितीचे विश्लेषण प्रकरण ४ मध्ये करण्यात आले आहे. सदर प्रकरणातील माहितीच्या आधारे पुढील निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार आलेल्या निष्कर्षांची मांडणी पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

## ५.१ लाभार्थी कुटुंबाच्या सर्वसामान्य स्थिती विषयक निष्कर्ष :

१. मुळशी तालुक्यामध्ये 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत नविन घरकुलांचा लाभ देण्यात आलेले १०० टक्के लाभार्थी हे तेथील स्थायिक आहेत.

२. मुळशी तालुक्यात निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांमध्ये ६७ टक्के लाभार्थी खुल्या प्रवर्गातील, २१ टक्के लाभार्थी इतर मागास प्रवर्गातील आहेत. अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती प्रवर्गातील अनुक्रमे ९ टक्के व ३ टक्के लाभार्थी आहेत.

३. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ८७ टक्के लाभार्थी हे हिंदू धर्मीय, ४ टक्के लाभार्थी मुस्लिम धर्मीय व ९ टक्के लाभार्थी हे बौध्द धर्मीय आहेत. यामध्ये हिंदु धर्मीय लाभार्थ्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

४. योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांमध्ये पुरूष लाभार्थींची संख्या ७० टक्के व स्त्री लाभार्थींची संख्या ३० टक्के इतकी आहे.

५. घरकुल प्राप्त लाभार्थ्यांमध्ये पुरुष लाभार्थींचे प्रमाण अधिक असले तरी योजने अंतर्गत स्त्री लाभार्थ्यांनाही लाभ देण्यात आला आहे ही बाब महत्त्वाची ठरते.

६. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबामध्ये एकूण ४८४ सदस्य आहेत. एकूण ४८४ सदस्यांपैकी २४४ (५०.४१ टक्के) पुरूष सदस्य असून स्त्री सदस्यांची संख्या २४० (४९.५८ टक्के) इतकी आहे.

७. योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबातील ४८४ स्त्री व पुरुष सदस्यांना घरकुलाचा लाभ झालेला आहे. या सर्वांनाच 'हक्काचा निवारा' मिळालेला आहे.

## ५.२ योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रियेसंबंधीत निष्कर्ष :

१. योजनेअंतर्गत घरकुलासंबंधी माहिती ग्रामसेवक तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्यामार्फत ९७ (८४ टक्के) लाभार्थ्यांना मिळालेली आहे. उर्वरित १८ (१६ टक्के) लाभार्थ्यांना योजनेविषयी ग्रामसभेमध्ये माहिती मिळालेली आहे.

२. मुळशी तालुक्यात प्रामुख्याने ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य यांच्यामार्फत सदर योजनेची जनजागृती मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

३. मुळशी तालुक्यामध्ये 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना इतर कोणत्याही शासकीय योजनेतून घरकुलाचा लाभ मिळालेला नाही.

४. 'इंदिरा आवास योजने'चा लाभ घेतलेले सर्वच ११५ (१०० टक्के) लाभार्थी ग्रामसभेमध्ये सहभागी होत आहेत.

५. प्रतिक्षा यादी संदर्भात ग्रामसभेत चर्चा झाली होती असे सांगणारे एकूण ९३ टक्के लाभार्थी आहेत. यावरून ग्रामसभेमध्ये प्रतिक्षा यादी संदर्भात वाचन केले जात होते किंवा केले जात असल्याचे स्पष्ट होते.

६. योजनेच्या कार्यवाहीमध्ये ग्रामसभेला अनन्य साधारण महत्त्व आहे व त्यानुसार लाभार्थ्यांचाही ग्रामसभेतील सहभाग वाढत असल्याचे दिसून येत आहे.

७. मुळशी तालुक्यातील घरकुल प्राप्त लाभार्थ्यांमध्ये ८८ टक्के लाभार्थी हे दारिद्रय रेषेखालील इतर प्रवर्गातील आहे. अनुसूचित जाती व जमातीतील अनुक्रमे ९ टक्के व ३ टक्के लाभार्थी आहेत.

८. मुळशी तालुक्यामध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांमध्ये दारिद्रय रेषेखालील खुला व इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे. तुलनेने दारिद्रय रेषेखालील अनुसूचीत जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांचे प्रमाण कमी आहे.

९. मुळशी तालुक्यात 'इंदिरा आवास योजने'च्या मार्गदर्शक सूचनेमधील पात्रता निकषांच्या आधारावरच लाभार्थी निवड प्रक्रिया आलेली आहे.

१०. इंदिरा आवास योजने अंतर्गत २००८ ते २०१४ या कालावधीत मुळशी तालुक्यामध्ये स्वतःची जागा असलेल्या स्थानिक (१०० टक्के) लाभार्थ्यांनाच नवीन घरकुल बांधण्यासाठी लाभ देण्यात आला आहे.

## ५.३ योजनेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत निष्कर्ष

१. योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मुळशी तालुक्यात २८ टक्के लाभार्थ्यांचा घरकुल बांधकाम विषयी रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केलेला आहे. उर्वरित ७२ टक्के लाभार्थ्यांचा करारनामा झाला नसल्याचे दिसून येते.

२. ग्रामसेवक तसेच विस्तार अधिकारी यांच्यामते रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवरील करारनामे पंचायत समिती स्तरावर प्रत्येक लाभार्थ्यांच्या नावे स्वतंत्र फाईलमध्ये ठेवण्यात आलेले आहेत.

३. प्रत्यक्षात मात्र घरकुल प्राप्त ७२ टक्के लाभार्थ्यांना स्टॅम्प पेपरवरील करारनाम्याविषयी काहीही माहिती नसून याबाबत लाभार्थ्यांमध्ये जाणीव जागृतीचा अभाव दिसून येतो.

४. करारनामाच्या महत्त्वाविषयी कार्यकारी यंत्रणेकडून लाभार्थ्यांना किमान माहिती दिली जात नाही किंवा समजावून सांगितले जात नसल्याचे दिसून येते. तसेच योजनेअंतर्गत समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते.

५. सन २००८ ते २०१४ या कालावधीत घरकुल बांधकाम पुर्ण झालेल्या ११५ लाभार्थ्यांमध्ये २०१३-१४ मधील ५१ (४४ टक्के) व २०१२-१३ मधील २७ (२४ टक्के)लाभार्थी आहेत. सन २०११-११ मधील २९ (२५ टक्के) व २०१०-११ या कालावधीतील ८ (७ टक्के) लाभार्थी आहेत.

६. मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेअंतर्गत सन २००८ ते २०१३ या कालावधीत घरकुल बांधकामासाठी प्रति लाभार्थी मंजुर रक्कम रू. ६८५००/- प्रमाणे ६४ (५६ टक्के) लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

७. मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेअंतर्गत सन २०१३ ते २०१४ या कालावधीत घरकुल बांधकामासाठी प्रति लाभार्थी मंजुर रक्कम रू. ९५०००/- प्रमाणे ५१ (४४ टक्के) लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

८. मार्गदर्शक सुचनेनुसार ९८ टक्के लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी एकूण तीन टप्प्यात रक्कम मिळालेली आहे. केवळ २ टक्के लाभार्थ्यांना दोन टप्प्यात रक्कम मिळालेली आहे.

९. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकामासाठी शासकीय अनुदाना व्यतिरिक्त स्वतःचा हिस्सा खर्च करणारे ८६ टक्के लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांनी ठरवून दिलेल्या हिस्स्यापेक्षा अधिक रक्कम खर्च केलेली आहे.

१०. घरकुल बांधकामासाठी शासनाच्या अनुदाना व्यतिरिक्त लाभार्थी हिस्सा म्हणून रू. १० ते ५० हजार खर्च करणारे सर्वाधिक ४८ टक्के लाभार्थी आहेत.

११. घरकुल बांधकामासाठी ५० हजार ते ४ लाखाच्या दरम्यान खर्च करणारे एकूण ३७ टक्के लाभार्थी आहेत. तसेच शासनाकडून प्राप्त झालेल्या रक्कमेतच खर्च करणारे १४ टक्के लाभार्थी असून हे प्रमाण कमी आहे.

१२. मार्गदर्शक सूचनेनुसार २६९ चौ.फु.या क्षेत्रामध्ये घरकुलाचे बांधकाम करणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात मात्र २६९ चौ.फु. क्षेत्रामध्येच बांधकाम केलेले केवळ ६ टक्के लाभार्थी आहेत.

१३. सर्वाधिक ९४ टक्के लाभार्थ्यांचे घरकुल हे २६९ चौ.फु. क्षेत्रापेक्षा अधिकच्या जागेत झालेले आहे. कारण २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल लाभार्थी कुटुंबाच्या गरजेनुसार पुरेसे ठरत नाही.

१४. मात्र २६९ चौ.फु. या क्षेत्रातील तसेच त्यापेक्षा अधिकच्या जागेत कुटुंबाच्या गरजेनुसार घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेसे ठरत नाही.

१५. सर्वाधिक ८६ टक्के लाभार्थ्यांनी बँकेकडून मोठ्या रकमेचे कर्ज काढून कुटुंबांच्या गरजेनुसार आवश्यक जागेत घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे.

१६. मार्गदर्शक सुचनेनुसार घरकुल बांधकामाचे अनुदान मिळविण्यासाठी सर्वाधिक ९८ टक्के लाभार्थ्यांनी सरकारी बॅंकेत खाते उघडलेले आहे. त्यानुसार अनुदान प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेले आहे.

१७. मार्गदर्शक सूचनेनुसार मुळशी तालुक्यामध्ये १०० टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम हे दोन टप्प्यांमध्ये (१८ महिन्याचा कालावधीत) पूर्ण झालेले नाही.

१८. सर्व १०० टक्के घरकुलांचे बांधकाम हे १८ महिन्यांपेक्षा कमी कालावधीत पुर्ण झालेले आहेत. त्यामध्ये ३ ते ६ महिने कालावधीत घरकुल बांधकाम पुर्ण करणारे ८५ टक्के लाभार्थी असून हे प्रमाण जास्त आहे.

१९. लाभार्थ्यांच्या मते तसेच २६९ चौ.फु.तील बांधकामासाठी ३ ते ६ महिन्याचा कालावधी पुरेसा असतो. तसेच पहिला हफ्ता मिळाल्यानंतर घरकुलाचे बांधकाम सुरु केल्यास ते पूर्ण होईपर्यंत थांबविणे शक्य होत नाही.

२०. तसेच घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांनी बँकेचे कर्ज काढलेले असते. या कारणास्तव घरकुलाचे बांधकाम १८ महिन्यापेक्षा कमी कालावधीत पूर्ण होत असल्याचे दिसून येते.

२१. योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मुळशी तालुक्यात १०० टक्के लाभार्थ्यांना शौचालयाची सुविधा उपलब्ध झालेली आहे.

२२. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी सर्वाधिक ६० (५२ टक्के) लाभार्थ्यांनी 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत प्राप्त रकमेतूनच शौचालयाचे बांधकाम केलेले आहे.

२३. 'निर्मल भारत अभियान' अंतर्गत शौचालय बांधकामासाठी आर्थिक सहाय्य मिळालेले ४५ टक्के लाभार्थी आहेत. तर ३ टक्के लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीने स्वनिधीतून सार्वजनिक शौचालये बांधून दिलेली आहेत.

२४. मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व लाभार्थ्यांना निर्मल भारत अभियानांतर्गत (Convergence) माध्यमातून शौचालय बांधकामासाठी आर्थिक सहाय्य मिळवून देणे अपेक्षित आहे. परंतु हे प्रमाण ४५ टक्के असून खूप कमी आहे.

२५. मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेअंतर्गत घरकुल बांधकामाविषयी ५७ टक्के लाभार्थ्यांना प्रशिक्षण मिळालेले आहे. उर्वरित ४३ टक्के लाभार्थ्यांना प्रशिक्षण मिळाले नसल्याचे दिसून येते.

२६. मात्र मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकामासंबंधी झालेल्या प्रशिक्षणामध्ये आवश्यक सर्व घटकांचा समावेश नव्हता. लाभार्थ्यांना केवळ घरकुलाचे क्षेत्रफळ, आर्थिक लाभाची रक्कम व टप्पे इ. विषयी माहिती देण्यात आली होती.

२७. योजनेअंतर्गत गावनिहाय लाभार्थ्यांची संख्या जास्त असते तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक निधीचा अभाव यामुळे लाभार्थ्यांसाठी सविस्तर अशा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे शक्य होत नसल्याचे सांगण्यात आले.

२८. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल प्राप्त १०० टक्के लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर गरजेनुसार तसेच वेळोवेळी ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य यांचे मार्गदर्शन मिळालेले आहे.

२९. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल प्राप्त लाभार्थ्यांपैकी सर्वाधिक ९८ टक्के लाभार्थ्यांनी अनुभवी मिस्त्री किंवा गवंडीकडून योजनेतील संकल्प चित्राप्रमाणे घरकुलाचे बांधकाम पुर्ण करुन घेतलेले आहे.

३०. घरकुल प्राप्त सर्वाधिक ६८ टक्के लाभार्थ्यांच्या मते घरकुल बांधकामाविषयी मिस्त्रीला प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. उर्वरित ३२ टक्के लाभार्थ्यांना याबाबत काही माहिती नसल्याचे दिसून येते.

३१. मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेअंतर्गत मुळशी तालुक्यात घरकुल बांधकामाविषयी मिस्त्रींना प्रशिक्षण देण्यात आलेले नाही.

३२. विखुरलेल्या स्वरुपातील मिस्त्रींना एकत्रित करुन प्रशिक्षणाचे आयोजन करणे शक्य होत नाही. तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने मिस्त्रींना प्रशिक्षण दिले गेले नसल्याचे सांगण्यात आले.

३३. योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार उप अभियंता, पंचायत समिती यांच्या स्वाक्षरीचा घरकुल पुर्णत्वाचा दाखला मिळाल्याचे १७ टक्के लाभार्थींनी सांगितले आहे. परंतु त्यांच्याकडे दाखल्याची प्रत उपलब्ध नाही.

३४. उर्वरित ८३ टक्के लाभार्थ्यांना उप अभियंता यांचेकडून पुर्णत्वाचा दाखला मिळालेला नाही. पुर्णत्वाच्या दाखल्याबाबत लाभार्थ्यांना काहीच माहिती नसून लाभार्थ्यांमध्ये जाणीव जागृतीचा अभाव दिसून येतो.

३५. पंचायत समिती स्तरावर सर्व लाभार्थ्यांचे पुर्णत्वाचे दाखले व करारनामे स्वतंत्र फाईलमध्ये ठेवण्यात आल्याचे ग्रामसेवकांनी सांगितले आहे. मात्र याविषयी ८३ टक्के लाभार्थ्यांना काहीही माहिती नाही.

३६. पुर्णत्वाच्या दाखल्याच्या महत्त्वाविषयी कार्यकारी यंत्रणेकडून लाभार्थ्यांना किमान माहिती दिली जात नाही किंवा समजावून सांगितले जात नसल्याचे दिसून येते.

३७. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलाचा लाभ देण्यात आलेले १०० टक्के लाभार्थी स्वतः त्या घरामध्ये राहत असल्याचे दिसून आले.

३८. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलाच्या दर्शनीय भिंतीवर ऑईलपेंटने ‘इंदिरा आवास योजने’चे कायमस्वरुपी नामफलक करणे आवश्यक आहे. मात्र ५७ टक्के घरकुलांच्या दर्शनीय भिंतीवर योजनेचे नामफलक दिसून आले. त्यातही काही घरांवरील नामफलक हे तात्पुरत्या स्वरुपात लिहीले आहे.

३९. मार्गदर्शक सूचनेनुसार १०० टक्के लाभार्थ्यांच्या घराचे बांधकाम हे नैसर्गिक आपत्तीपासून बचावात्मक स्वरुपाचे असल्याचे दिसून आले.

४०. मुळशी तालुक्यात आदिवासी क्षेत्र व डोंगरी भागात पावसाचे प्रमाण जास्त असून तेथे आवश्यकतेप्रमाणे घरांची रचना व बांधकाम झाल्याचे दिसून आले आहे.

४१. मार्गदर्शक सूचनेनुसार १०० टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलाच्या बांधकामासाठी स्थानिक हवामानास अनुरुप साहित्य तसेच संरचनेचा वापर केलेला आहे.

४२. मुळशी तालुक्यात प्रामुख्याने डोंगरी व आदिवासी भागामध्ये तेथील हवामानाचा विचार करुन आवश्यक साहित्य तसेच स्थानिक उपलब्ध साहित्यांचा वापर बांधकामासाठी करण्यात आला आहे.

४३. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल प्राप्त १०० टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलाच्या भिंती विटा व सिमेंट काँक्रेटच्या सहाय्याने बांधलेल्या आहेत. म्हणजेच सर्व घरकुलांच्या भिंती पक्क्या स्वरुपात बांधलेल्या आहेत.

४४. मार्गदर्शक सूचनेनुसार १०० टक्के घरकुल लाभार्थ्यांच्या घराला छप्पर असून ते सपाट व टिकाऊ साहित्याचे असल्याचे दिसून आले.

४५. मार्गदर्शक सूचनेनुसार किमान घराच्या छताला प्लॅस्टर करणे आवश्यक असून त्यानुसार ८३ टक्के लाभार्थ्यांच्या घराच्या छताला प्लॅस्टर करण्यात आले आहे.

४६. एकूण ५६ टक्के लाभार्थ्यांच्या छताला प्लॅस्टर करण्यात आलेले नसून हे प्रमाण जास्त आहे. कारण ५६ टक्के लाभार्थ्यांच्या घराला पत्र्याचे छप्पर बसविण्यात आले आहे. ते छप्पर मजबुत असून दिर्घकाळ टिकू शकेल या स्वरुपाचे आहे.

४७. योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार घरकुलाला बाहेरुन प्लॅस्टर असणे आवश्यक आहे. यानुसार ८३ टक्के लाभार्थ्यांच्या घराला बाहेरुन प्लॅस्टर करण्यात आलेले आहे. तसेच १७ टक्के लाभार्थ्यांच्या घराला बाहेरुन प्लॅस्टर केलेल नाही.

४८. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल प्राप्त ८२ टक्के लाभार्थ्यांच्या घराला रंगकाम करण्यात आले आहे. उर्वरित १८ टक्के लाभार्थ्यांच्या घराचे रंगकाम झाले नसल्याचे दिसून आले.

४९. मार्गदर्शक सूचनेनुसार घरातील सदस्यांना विश्रांतीसाठी घराबाहेर बसता येईल, मुलांना खेळण्यासाठी जागा मिळले, तसेच इतर कामे करता यावीत यादृष्टीने घरापुढे वऱ्हांडा असणे आवश्यक आहे. त्यानुसार ९३ टक्के लाभार्थ्यांच्या घरापुढे वऱ्हांडा असून उर्वरित ७ टक्के लाभार्थ्यांच्या घरापुढे वऱ्हांडा नाही.

५०. मार्गदर्शक सूचनेनुसार घरामध्ये फरशी किंवा कोबा असलेले ९३ टक्के लाभार्थी आहेत. तसेच घरात अद्यापही फरशी किंवा कोबा नसून शेणामातीचे सारवण केले जात असलेले ७ टक्के लाभार्थी आहेत.

५१. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल प्राप्त ६९ टक्के घराच्या दरवाजे तसेच खिडक्यांना शटर बसविलेले दिसून आले. उर्वरित ३६ (३१ टक्के) लाभार्थ्यांच्या घरात दरवाजे तसेच खिडक्यांना शटर बसविलेले नव्हते.

५२. मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यकतेप्रमाणे नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घराचे बांधकाम झालेले एकही घरकुल बांधण्यात आलेले नाही (हायब्रिक वॉल, रॅट-ट्रफ बाँड, जाळीची भिंत, फिलर स्लॅब इ.).

५३. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलाच्या बाहेर उपजिवीकेची कामे करण्यासाठी आवश्यक जागा असावी. यानुसार ८२ टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलापुढे पुरेशी जागा उपलब्ध असल्याचे दिसून आले.

५४. मार्गदर्शक सूचनेनुसार १८ टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलापुढे उपजिवीकेची कामे करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. प्रामुख्याने गावांमध्ये राहत असलेल्या लाभार्थ्यांना उपजिवीकेसाठी पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्याचे दिसून येते.

५५. मार्गदर्शक सूचनेनुसार १०० टक्के घरकुलांमध्ये विकलांग व्यक्तींच्या दृष्टीने सुरळीत व मुक्तपणे ये-जा करण्याची व्यवस्था असल्याचे दिसून आले.

५६. मार्गदर्शक सूचनेनुसार कुटुंबांचे आरोग्य तसेच पर्यावरणाचा विचार करता घराजवळील परिसर स्वच्छ असणे गरजेचे आहे. त्यानुसार १०० टक्के लाभार्थ्यांच्या घराजवळील परिसर स्वच्छ दिसून आला. तसेच घरकुलाच्या लाभामुळे स्वच्छतेबाबत लाभार्थ्यांमध्ये जागृती झाल्याचे दिसून येते.

५७. मार्गदर्शक सुचनेनुसार पर्यावरणाच्या दृष्टीने घरकुलाभोवती किमान १० झाडे लावण्यात आलेली ८८ टक्के लाभार्थी कुटुंबे आहेत.

५८. घरकुलाच्या भोवती किमान १० झाडे लावलेली किंबहुना उपलब्ध जागेत १० पेक्षा अधिक झाडे लावली आहेत असेही काही लाभार्थी कुटुंबे दिसून आली आहेत.

५९. मार्गदर्शक सूचनेनुसार १४ लाभार्थ्यांच्या घरकुला भोवती किमान झाडे लावलेली दिसून आली नाहीत. प्रामुख्याने गावांमध्ये राहणाऱ्या लाभार्थ्यांना पुरेश्या जागेचा अभाव असल्याने झाडे लावता येत नसल्याचे दिसून आले.

६०. मार्गदर्शक सूचनेनुसार कुटुंबांचे आरोग्य व आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता यादृष्टीने ३२ (२८ टक्के) लाभार्थी घरकुलांसाठी सांडपाणी वाहून नेण्यासाठी बंदिस्त गटारांची सुविधा उपलब्ध आहे. उर्वरित ८३ (७२ टक्के) लाभार्थ्यांसाठी सांडपाण्याची योग्य सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते.

## ५.४ **घरकुल प्राप्त लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थितीविषयी निष्कर्ष** :

१. मुळशी तालुक्यामधील १०० टक्के लाभार्थ्यांना स्वतःची जागा आहे व त्यावर नविन घरकुल बांधण्यासाठी योजनेअंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे.

२. घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी स्वतःच्या कच्च्या मोडकळीस आलेल्या घरात राहणारे ७३ टक्के लाभार्थी होते. तसेच पत्र्याचे शेड/बांबू शेडच्या घरात राहणारे २३ टक्के लाभार्थी होते. उर्वरित ५ टक्के लाभार्थी भाड्याच्या घरात राहत होते.

३. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी स्वतःच्या जागेवर दयनीय अवस्थेत राहणाऱ्या सर्वच लाभार्थ्यांनी स्वतःच्या जागेवर घरांचे बांधकाम पुर्ण केले आहे.

४. पुर्वीच्या तुलनेत घरकुलाचा लाभ मिळाल्यामुळे लाभार्थ्यांची निवाऱ्याची मुलभूत व सामाजिक गरज पुर्ण झाल्याचे दिसून येत आहे.

५. घरकुल पुर्ण झाल्यानंतर केंद्र व राज्य सरकारच्या इतर योजनांच्या माध्यमातून (Convergence) ६२ टक्के लाभार्थ्यांना रस्ता किंवा पायवाटेची सुविधा पुरविण्यात आली आहे. यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व आमदार निधी तसेच ग्रामपंचायत यांचा समावेश आहे.

६. घरकुल पुर्ण झाल्यानंतर ३८ टक्के लाभार्थ्यांना इतर योजनेच्या माध्यमातून पर्यायी रस्ता/पायवाट सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. यातील १६ लाभार्थ्यांनी स्व: खर्चाने पर्यायी रस्ता तयार केलेला आहे.

७. योजनेअंतर्गत घरकुल बांधकाम पुर्ण झालेल्या सर्वच लाभार्थ्यांना शासनाकडून पर्यायी रस्ता/पायवाटेची सुविधा उपलब्ध झालेली नाही.

८. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ९७ टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलामध्ये व्यक्तीगत शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच ३ टक्के लाभार्थी कुटुंबांसाठी ग्रामपंचायतीमार्फत बांधलेल्या सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे.

९. शौचालयाची सुविधा उपलब्ध झाली असल्याने याबाबतीत भौतिक कामगिरीच्या आधारावर सदर योजना १०० टक्के यशस्वी ठरलेली आहे.

१०. घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ७६ टक्के लोक उघड्यावर शौचास जात होते. तर २४ टक्के लाभार्थी सार्वजनिक शौचालयाचा वापर करत होते. सद्यस्थितीत १०० टक्के लाभार्थ्यांना शौचालयाची सुविधा प्राप्त असून त्याचा वापर केला जात आहे.

११. योजनेअंतर्गत १०० टक्के लाभार्थ्यांना शौचालयाची सुविधा उपलब्ध झाली असली तरी प्रत्यक्षात १२ ही महिने शौचालयाचा वापर केला जाऊ शकत नसल्याचे दिसून येते. कारण उन्हाळयामध्ये पाण्याच्या कमतरतेमुळे शौचालयाचा वापर केला जात नसल्याचे सांगण्यात आले.

१२. पूर्वीच्या तुलनेत शौचालयाचा वापर करणाऱ्या लाभार्थी कुटुंबांचे प्रमाण वाढले असून ते १०० टक्के आहे. ही बाब कुटुंबाच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून येण्यासाठी व एकूणच सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे.

१३. योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त १०० टक्के लाभार्थी कुटुंबांनी घरकुलाच्या आत बंदिस्त व स्वतंत्र असे न्हाणीघर बांधलेले दिसून येते.

१४. घरामधील स्वतंत्र न्हाणीघरामुळे प्रामुख्याने कुटुंबातील स्त्री सदस्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घरकुल उपयुक्त ठरले आहे.

१५. घरकुला लाभापूर्वी सर्वाधिक ६० टक्के लाभार्थी कुटुंबांमध्ये अंघोळीसाठी घर किंवा पत्र्याचे शेडच्या आत जागा उपलब्ध होती. परंतु पुर्वी बहुतांशी लाभार्थी कच्च्या व मोडकळीस आलेल्या घरामध्ये राहत होते. त्यामुळे अंघोळीसाठी घराच्या आत जागा उपलब्ध असली तरी ती बंदिस्त व सुरक्षित नव्हती.

१६. घरकुलाचा लाभ मिळण्यापूर्वी ४० टक्के लाभार्थी कुटुंबाना घराच्या बाजुला उघड्यावर तसेच बांबु-काठयांच्या आडोशाला अंघोळ करावी लागत होती.

१७. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थिती १०० टक्के लाभार्थी कुटुंबांमध्ये घरकुलाच्या आत बंदिस्त न्हाणीघर उपलब्ध झाले आहे. ही बाब कुटुंबांतील स्त्रीयांची सुरक्षितता तसेच सामाजिक स्थितीतील सुधारणा दर्शविते.

१८. व्यक्तीगत व सार्वजनिक नळांद्वारे तसेच बोअरवेलच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा उपलब्ध झालेले सर्वाधिक ५६ टक्के लाभार्थी आहेत.

१९. अद्यापही ४४ टक्के घरकुल लाभार्थ्यांना पिण्याचे पाणी विहीर व हातपंपावरुन वाहून आणावे लागत आहे.

२०. सर्वाधिक ३४ टक्के लाभार्थ्यांना सार्वजनिक नळांद्वारे पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे.

२१. घरकुल बांधकाम पुर्ण झालेल्या ५ लाभार्थ्यांना ग्रामपंचायती मार्फत एका खाजगी संस्थेच्या (CSR) मदतीने जवळील विहीरीचे पाणी नळाद्वारे घरांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

२२. घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ४८ टक्के लाभार्थ्यांना व्यक्तीगत व सार्वजनिक नळांद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होत होते. तसेच ५० टक्के लाभार्थ्यांना विहीर व हातपंपावरुन पिण्याचे पाणी आणावे लागत होते.

२३. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत व्यक्तीगत व सार्वजनिक नळांद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध झालेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण वाढलेले आहे (पूर्वी ४८ टक्के व सध्या ५४ टक्के). तसेच विहीर व हातपंपावरुन पिण्याचे पाणी आणावे लागत असलेल्या लाभार्थ्यांच्या प्रमाणात घट झालेली आहे (पूर्वी ५० टक्के व सध्या ४४ टक्के).

२४. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थिती घरकुलात व्यक्तीगत नळाद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध झालेल्या लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे.

२५. पूर्वीच्या तुलनेत घरकुल बांधकामानंतर अधिक लाभार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा उपलब्ध झाली असून त्यामुळे लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थितीतही फरक (सुधारणा) पडत असल्याचे दिसून येते.

२६. मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेअंतर्गत सर्व घरकुल लाभार्थ्यांना राज्य व केंद्र सरकारच्या इतर योजनाच्या माध्यमातून (Convergence) पिण्यायोग्य पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

२७. इतर योजनाच्या माध्यमातून (Convergence) केवळ ५४ टक्के लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीमार्फत व्यक्तीगत व सार्वजनिक नळाद्वारे पिण्यायोग्य पाण्याच्या सुविधा पुरविण्यात आली आहे.

२८. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी केवळ २४ टक्के लाभार्थ्यांनाच निर्धुर चूल उपलब्ध झालेली आहे. परंतु प्रत्यक्षात यापैकी एकाही लाभार्थ्याच्या घरकुलामध्ये निर्धुर चूल वा त्याचा वापर होताना दिसून आलेला नाही.

२९. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ७६ टक्के लाभार्थ्यांना निर्धुर चूल उपलब्ध झालेली नसून हे प्रमाण जास्त आहे.

३०. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ४६ (४० टक्के) लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर गॅस जोडणी करून घेतली आहे. मात्र अद्यापही ६९ (६० टक्के) लाभार्थी कुटुंबांमध्ये स्वयंपाकासाठी साधी चूल वापरली जात आहे.

३१. गॅस जोडणीमुळे ४६ लाभार्थी कुटुंबांना स्वयंपाकासाठी निर्धुर साधन उपलब्ध झाल्याचे दिसून येते. त्यामुळे कुटुंबातील स्त्रीयांच्या आरोग्याच्या स्थितीत सुधारणा घडून येण्यास मदत झालेली आहे.

३२. घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ९५ टक्के लाभार्थी कुटुंबात स्वयंपाकासाठी साधी चूली वापरली जात होती. तसेच पुर्वी स्वयंपाकासाठी स्टोव्हचा वापर करणारे २ (२ टक्के) लाभार्थी असून गॅस वापरणारे केवळ ४ (३ टक्के) लाभार्थी होते.

३३. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थिती स्वयंपाकासाठी गॅस (निर्धुर साधन) उपलब्ध झालेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांच्या आरोग्य व सामाजिक स्थितीत बदल झाल्याचे दिसून येत आहे.

३४. मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना स्वयंपाकासाठी निर्धुर चूल उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मात्र केवळ २४ टक्के लाभार्थ्यांना निर्धुर चूली प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

३५. निर्धुर चुलीविषयी लाभार्थी तसेच कार्यकारी यंत्रणा स्तरावर समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते.

३६. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ७७ टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलामध्ये वीजेची सुविधा उपलब्ध आहे. तसेच २० टक्के लाभार्थ्यांकडे वीजेची कोणतीच सुविधा उपलब्ध नसून ३ टक्के लाभार्थ्यांनी घरामध्ये अनधिकृतपणे वीज घेतलेली आहे.

३७. घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ४९ टक्के लाभार्थ्यांकडे वीजेची कोणतीच सुविधा उपलब्ध नव्हती व हे प्रमाण सर्वाधिक होते. पुर्वी केवळ ३७ टक्के लाभार्थ्यांकडे अधिकृतरित्या वीजेची सुविधा उपलब्ध होती.

३८. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत घरकुलात वीजेची सुविधा उपलब्ध झालेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे. तसेच वीजेची कोणतीच सुविधा उपलब्ध नसलेल्या लाभार्थी कुटुंबांचे प्रमाण कमी झाले आहे.

३९. पूर्वीच्या तुलनेत घरकुलात वीजेची सुविधा उपलब्ध झालेल्या लाभार्थ्यांची संख्या वाढलेली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होत असल्याचे दिसून येत आहे.

४०. योजनेअंतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनांच्या माध्यमातून (Convergence) घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना वीजेची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

४१. मात्र केवळ २२ (१९ टक्के) लाभार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ देण्यात आला असून हे प्रमाण खूप कमी आहे. त्यामध्ये १६ लाभार्थ्यांना सौरदिवे पुरविण्यात आले आहे. उर्वरित ६ लाभार्थ्यांना वीज जोडणी करुन देण्यात आली आहे.

४२. घरकुलामध्ये मोफत वीज जोडणीची सुविधा उपलब्ध होऊ शकते याबाबत लाभार्थ्यांमध्ये जनजागृतीचा अभाव तसेच लाभार्थ्यांना मोफत वीज जोडणी करुन देण्यामध्ये कार्यकारी यंत्रणेचे प्रयत्न कमी पडत असल्याचे दिसून येते.

४३. सामाजिक सुरक्षतेच्या दृष्टीकोनातून ११५ लाभार्थ्यांपैकी केवळ २ लाभार्थ्यांना आम आदमी विमा योजना व अंत्योदय विमा योजनेचा लाभ मिळाला आहे.

४४. उर्वरित ११३ (९८ टक्के) लाभार्थ्यांना सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणतेही प्रयत्न झालेले दिसून येत नाहीत.

४५. सद्यस्थितीत घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी ६१ कुटुंबामध्ये ६ ते २३ या वयोगटातील मुले किंवा सदस्य शिक्षण घेत असून हे प्रमाण अधिक आहे. केवळ ५ कुटुंबात मुले आहेत परंतु ते शिक्षण घेत नसल्याचे दिसून येते.

४६. घरकुल प्राप्त ६१ लाभार्थी कुटुंबात ६ ते २३ या वयोगटातील एकूण ९५ मुले प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत.

४७. शिक्षण घेत असलेल्या ९५ मुलांमध्ये ६ ते १४ वयोगटातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षण घेणारी ४४ टक्के मुले असून हे प्रमाण सर्वाधिक आहे.

४८. तसेच १५ ते १८ वयोगटातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या ३८ टक्के आहे.

४९. यामध्ये १९ ते २३ वयोगटातील महाविद्यालयीन शिक्षण घेणारी केवळ १८ टक्के मुले असून हे प्रमाण जास्त आहे.

५०. घरकुलाचा लाभ मिळाल्यामुळे प्रामुख्याने घरात अभ्यासासाठी जागेची व्यवस्था उपलब्ध झाली. तसेच घरामध्ये वीज आल्याने कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते.

५१. घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ११५ पैकी ९३ कुटुंबातील मुले किंवा सदस्य शिक्षण घेत असल्याचे दिसून येते.

५२. पूर्वी सर्व ९३ कुटुंबातील मुलांना किंवा सदस्यांना घरात जागेचा अभाव, वीजेची सुविधा नाही तसेच वीज आहे परंतु पुरेशी जागा नाही, अशा अनेक अडचणी येत असल्याचे दिसून येते.

५३. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत लाभार्थी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने घरकुल अत्यंत उपयोगी ठरत आहे. घरकुल प्राप्तीमुळे कुटुंबांच्या शैक्षणिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांचा सामाजिक स्तर सुधारण्यासही मदत होत आहे.

## ५.५ घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबाच्या आर्थिक स्थितीविषयी निष्कर्ष :

१. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबात स्त्री व पुरुष असे एकूण ४८४ सदस्य आहेत.

२. घरकुल प्राप्त ११५ लाभार्थी कुटुंबामधील ४८४ सदस्यांपैकी २८६ (५९ टक्के) सदस्य काम करणारे असून १८८ (३९ टक्के) सदस्य काम न करणारे आहेत.

३. लाभार्थी कुटुंबातील ६ ते २३ हा वयोगट शिक्षण घेणाऱ्या मुलांचा किंवा सदस्यांचा वयोगट आहे. मात्र या वयोगटातील शिक्षण घेत असलेल्या व शिक्षण घेत नसलेल्या मुलापैंकी ५० मुलांना काम करावे लागत असल्याचे दिसून येते.

४. कुटुंबांची बिकट आर्थिक स्थितीमुळे उदरनिर्वाहासाठी कुटुंबातील लहान मुले किंवा सदस्यांनाही काम करावे लागत असल्याचे दिसून येते.

५. घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबातील सर्वाधिक २९ टक्के सदस्य शेतमजुरीची कामे करत आहेत. रोजगारासाठी नोकरी करणारे केवळ १८ टक्के सदस्य आहेत.

६. लाभार्थी कुटुंबातील १७ टक्के लाभार्थी फक्त स्वतःची शेती करत आहेत. तसेच २१ टक्के सदस्य स्वतःची शेती करतात परंतु शेतीतील अपुऱ्या उत्पन्नामुळे त्यासोबत शेतमजुरी व इतरत्र मजुरीची कामे, हंगामी कामे, नोकरी तसेच शेतीजोड व्यवसाय करताना दिसून येतात.

७. काम करत असलेल्या २८६ सदस्यांपैकी सर्वाधिक १९२ (६७ टक्के) सदस्य शेती, शेतमजुरी व शेती अधारित व्यवसाय करताना दिसून येतात.

८. घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी ११५ कुटुंबापैकी सर्वाधिक ४९ टक्के कुटुंबातील सदस्य शेतमजुरी तसेच शेतमजुरी बरोबरच पशुपालन, भटक्या स्वरुपाची कामे, कंपनी काम, शेतीजोड व्यवसाय तसेच हंगामी व्यवसाय करत होते.

९. पूर्वी २५ टक्के कुटुंबांतील सदस्य स्वतःची शेती करत होते. तसेच २२ टक्के कुटुंबातील सदस्य हे स्वतःच्या शेती बरोबरच शेतमजुरी, शेतीजोड व्यवसाय, पशुपालन, भटक्या स्वरुपाची कामे व कंपनीत काम करत होती.

१०. पूर्वी ४ टक्के कुटुंबातील सदस्य रोजंदारीवरील इतर कामे करत होती. उदा. गंवडी काम, बिगारी काम, मजुरीची इतर कामे.

११. घरकुलाचा लाभ मिळण्यापूर्वी सर्वाधिक ९६ टक्के लाभार्थी कुटुंबे ही शेती व शेतमजुरी संबंधीत कामे करत होती.

१२. पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत लाभार्थी कुटुंबातील ५१ सुशिक्षित सदस्य शेती व्यतिरिक्त केवळ नोकरी वा इतरत्र वेगवेगळ्या स्वरुपाची कामे करत असून हे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.

१३. परंतु 'इंदिरा आवास योजने' अंतर्गत घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी व घरकुलाचा लाभ मिळाल्यानंतर लाभार्थी कुटुंबांच्या रोजगाराच्या स्थितीमध्ये विशेष फरक पडल्याचे दिसून येत नाही.

१४. सद्यस्थितीत लाभार्थी कुटुंबातील २८६ सदस्य उदरनिर्वाहासाठी काम करत आहेत. त्यापैकी सर्वाधिक १७९ (६२ टक्के) सदस्यांना रोजच्या मजुरीच्या (Daily Wages) स्वरुपात त्यांचे उत्पन्न मिळत असल्याचे दिसून येते.

१५. नोकरी करत असलेल्या २० टक्के सदस्यांना मासिक वेतन (दर महा वेतन) मिळते. तर १७ टक्के सदस्य हे स्वतःची शेती करणारे असून त्यांना मिळणारे उत्पन्न अनिश्चित स्वरुपाचे असते.

१६. योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त झाल्याने लाभार्थी कुटुंबांना राहण्यासाठी जागा मिळाली आहे. मात्र लाभार्थी कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न वाढीस लागेल, त्यांचा आर्थिक स्तर उंचावला जाऊ शकेल अशा स्वरुपाच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होताना दिसून येत नाहीत.

## ५.६ योजनेसंदर्भात घरकुल प्राप्त लाभार्थ्यांच्या प्रमुख समस्या : निष्कर्ष

योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळविताना, घरकुल बांधकाम करताना तसेच घरकुल बांधून झाल्यानंतर विविध समस्या आल्याचे आढळून येते. लाभार्थ्यांना आलेल्या अडचणींचे स्पष्टीकरण पुढे देण्यात आले आहे.

१. योजनेअंतर्गत २६९ चौ.फु. क्षेत्रात घरकुलाचे बांधकाम करण्यास परवानगी आहे. मात्र २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल हे कुटुंबांच्या गरजेनुसार पुरेसे ठरत नाही.

२. लाभार्थ्यांच्या दृष्टीने २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल बांधकामासाठी शासनाकडून मिळालेले अनुदान पुरेसे नसून ते वेळेत मिळत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना बँकेतून कर्ज काढावे लागले आहे व या कर्जामुळे कुटुंबांवरील आर्थिक बोजा वाढला असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.

३. शासनाकडून मिळणारे अनुदान कमी पडत असल्याने घरकुलाची विविध कामे करावयाची राहून गेल्याचे सांगण्यात आले. जसे की, घराचे रंगकाम, प्लॅस्टर, फरशी किंवा कोबा इ. कामे.

४. शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे मात्र उन्हाळ्यामध्ये पुरेश्या पाण्याअभावी शौचालय वापरता येत नाही. त्यामुळे उघड्यावरच शौचास जावे लागते.

५. तसेच सार्वजनिक शौचालयांच्या ठिकाणी स्वच्छता, पुरेसे पाणी, देखभाल या समस्या येत असल्याचे सांगण्यात आले.

६. काही घरकुल प्राप्त लाभार्थ्यांनी घरकुलामध्ये किंवा घरकुलाच्या जवळ पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा उपलब्ध नाही. तसेच घरकुलामध्ये वीजेची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक अडचणी येत असल्याचे सांगितले.

७. MSEB तसेच ग्रामपंचायतीकडे वारंवार पाठपुरावा करुन देखील अद्याप वीज उपलब्ध झाली नसल्याचे काही लाभार्थ्यांनी सांगितले.

८. वाडी-वस्तीवरील तसेच शेतात राहणाऱ्या लाभार्थ्यांना घरातील कचरा व सांडपाणी हे घराच्या पुढे-मागे किंवा मोकळ्या जागेतच टाकावा लागतो. त्यामुळे

कचरा व सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीच सुविधा उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले.

९. घरकुलामुळे राहण्यासाठी जागा मिळाली मात्र कुटुंबाच्या आर्थिक स्थितीनुसार आवश्यक रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या नाहीत. रोजगारासाठी अद्यापही मजुरीची कामे तसेच रोजगारासाठी भटकंती करावी लागत आहे.

## ५.७ योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेच्या समस्या : निष्कर्ष

१. मनुष्यबळाचा अभाव तसेच इंदिरा आवास योजनेसाठी तालुका स्तरावर स्वतंत्र यंत्रणा नसल्याने तालुक्यातील सर्व लाभार्थी घरकुलांची पाहणी करणे, तसेच बांधकामासाठी वापरलेले साहित्य व बांधकामाचा दर्जा तपासणे शक्य होत नाही.

२. योजनेअंतर्गत पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने लाभार्थी तसेच मिस्त्रींना घरकुल बांधकामासंबंधी प्रशिक्षण देण्यामध्ये अडचणी येतात.

३. इतर शासकीय योजनांच्या (Convergence) माध्यमातून घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मात्र सदर योजनांच्या कार्यवाहीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत असलेल्या अंमलबजावणी यंत्रणेकडून आवश्यक सहकार्य मिळत नाही.

## ५.८ गृहितकृत्यांची पडताळणी :

संशोधन अभ्यासासाठी मांडण्यात आलेल्या गृहितकृत्यांची पडताळणी SPSS (Statistical Package for the Social Sciences) च्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्या आधारे गृहितकृत्यांचे सविस्तर विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

### ५.८.१ मुळशी तालुक्यात योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड व घरांचे वाटप हे मार्गदर्शक सूचनेनुसार झाले आहे.

सदर गृहितकृत्य पडताळणीसाठी इंदिरा आवास योजनेचे पात्रता निकष व लाभार्थ्यांचा सामाजिक प्रवर्ग यातील सहसंबंध पडताळून पाहण्यात आला आहे.

**योजनेचे पात्रता निकष व लाभार्थ्यांचा सामाजिक प्रवर्ग यातील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

**Correlations**

| | | पात्रता निकष | सामाजिक प्रवर्ग |
|---|---|---|---|
| पात्रता निकष | Pearson Correlation | 1 | .935** |
| | Sig. (2-tailed) | | .000 |
| | N | 115 | 115 |
| सामाजिक प्रवर्ग | Pearson Correlation | .935** | 1 |
| | Sig. (2-tailed) | .000 | |
| | N | 115 | 115 |

**. Correlation is significant at the 0.01 level (2-tailed).

वरील सारणी योजनेचे लाभार्थी पात्रता निकष व सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थ्यांची निवड यातील सहसंबंध दर्शविते. प्रामुख्याने इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये घरकुलाचा लाभ देण्यासाठी काही पात्रता निकष देण्यात आलेले आहेत. यामध्ये प्रतिक्षा यादीनुसार दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती व जमाती, बिगर अनुसूचित जाती व जमाती, दारिद्रय रेषेखालील खुला व इतर मागासवर्ग तसेच विशेष प्राधान्य क्रम (उदा. वेठबिगार, विधवा) ठरविण्यात आलेल्या लाभार्थ्यांनाच घरकुलाचा लाभ देणे अपेक्षित आहे. त्यानुसार योजनेचे पात्रता निकष व सामाजिक प्रवर्गनिहाय घरकुलाचा लाभ देण्यात आलेले लाभार्थी यांच्यातील सहसंबंध दर्शविण्यासाठी संशोधकाने **Correlation (2-tailed)** चाचणीचा वापर केला आहे.

सदर चाचणीवरुन असे दिसून येते की, लाभार्थी पात्रता निकष व सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थ्यांची निवड यातील सहसंबंध हा **Less than 0.05** च्या तुलनेत **0.01**

इतका आलेला आहे. म्हणजेच योजनेचे लाभार्थी पात्रता निकष व सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थ्यांची निवड या दोन्ही चलामधील सहसंबंध सकारात्मक असल्याचे स्पष्ट होते.

यावरुन असे निष्कर्षास येते की, मुळशी तालुक्यात इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनेतील पात्रता निकषानुसार लाभार्थ्यांची निवड व घरांचे वाटप झालेले आहे हे गृहितकृत्य सिध्द होते.

### ५.८.२ घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत काही घटकांची मार्गदर्शक सूचनेनुसार अंमलबजावणी झालेली नाही.

१) याकरीता प्रामुख्याने सामाजिक प्रवर्गनिहाय निवड झालेले लाभार्थी व घरकुल बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध पडताळून पाहण्यात आलेला आहे.

**सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थी व घरकुल बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

**सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थी * घरकुल बांधकामाचा कालावधी Crosstabulation**

Count

| | | घरकुल बांधकामाचा कालावधी (मार्गदर्शक सूचना) | | | | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 3 महिने | 4 ते 6 महिने | 7 ते 9 महिने | 10 ते 13 महिने | |
| सामाजिक प्रवर्ग निहाय लाभार्थी | दारिद्रय रेषेखालील अनुसूचीत जाती | 6 | 4 | 1 | 0 | 11 |
| | दारिद्रय रेषेखालील अनुसूचीत जमाती | 2 | 1 | 0 | 0 | 3 |
| | दारिद्रय रेषेखालील इतर प्रवर्ग | 39 | 40 | 14 | 2 | 95 |
| | विधवा | 3 | 3 | 0 | 0 | 6 |
| Total | | 50 | 48 | 15 | 2 | 115 |

**Chi-Square Tests**

| | Value | Df | Asymptotic Significance (2-sided) |
|---|---|---|---|
| Pearson Chi-Square | 3.032[a] | 9 | .963 |
| Likelihood Ratio | 4.481 | 9 | .877 |
| Linear-by-Linear Association | .532 | 1 | .466 |
| N of Valid Cases | 115 | | |

a. 13 cells (81.3%) have expected count less than 5. The minimum expected count is .05.

वरील सारणी योजनेअंतर्गत निवड झालेले सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थी व त्यांच्या घरकुल बांधकामाचा कालावधी यांच्यातील सहसंबंध दर्शविते. इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलाचे बांधकाम पहिल्या ९ महिन्यात लिंटेनपर्यंत व पुढील ९ महिन्यात शौचालयासह म्हणजेच दोन टप्प्यांमध्ये १८ महिन्याच्या कालावधीत बांधकाम पूर्ण करणे अपेक्षित आहे. या कालावधीनुसार लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचे अनुदान दिले जाते.

यानुसार सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थी व घरकुल बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध दर्शविण्यासाठी संशोधकाने **Chi Square** चाचणीचा वापर केला आहे. यातील Crosstab सारणीवरुन असे स्पष्ट होते की, सामाजिक प्रवर्गनिहाय  घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांमध्ये दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जातीतील एकूण ११ लाभार्थी आहेत. या सर्व ११ लाभार्थ्यांनी ३ ते ९ महिन्याच्या कालावधीत घरकुलाचे बांधकाम पूर्ण कलेले आहे. तसेच दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जमातीचे ३ लाभार्थी असून त्यांनी ३ ते ६ महिन्याच्या कालावधीत घरकुल बांधकाम पुर्ण केलेले आहे. यामध्ये दारिद्रय रेषेखालील इतर प्रवर्गातील ९५ लाभार्थी आहेत. सर्व ९५ लाभार्थ्यांनी ३ महिने ते १३ महिन्यांच्या कालावधीतच घरकुलाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. तसेच योजनेच्या पात्रता निकषानुसार निवड झालेल्या ६ विधवा लाभार्थिंनीनी ३ ते ६ महिन्याच्या कालावधीत बांधकाम पूर्ण केलेले आहे.

यानुसार वरील **Chi Square** चाचणीवरुन असे दिसून येते की, योजनेअंतर्गत निवड झालेले सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थी व घरकुल बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध हा **Less than 0.05** च्या तुलनेत **0.05** इतका आलेला आहे. म्हणजेच सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थी व घरकुल बांधकामाचा कालावधी या दोन्ही चलामधील सहसंबंध सकारात्मक असल्याचे स्पष्ट होते.

यावरुन असे दिसून येते की, सामाजिक प्रवर्गनिहाय घरकुल प्राप्त लाभार्थ्यांनी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दोन टप्प्यांमध्ये म्हणजेच १८ महिन्याच्या कालावधीत घरकुलाचे बांधकाम पुर्ण केलेले नाही. सर्व लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामाचा कालावधी वेगवेगळा असून सर्व लाभार्थ्यांचे घरकुल हे १८ महिन्यापेक्षा कमी कालावधीत (३ ते १३ महिने)  पूर्ण झालेले आहे.

यावरुन असे निष्कर्षास येते की, घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत काही घटकांची मार्गदर्शक सूचनेनुसार अंमलबजावणी झालेली नाही हे संशोधन अभ्यासासाठी मांडण्यात आलेले गृहितकृत्य सिध्द होते.

२) तसेच सदर गृहितकृत्याच्या पडताळणीसाठी घरकुल अनुदानाचे टप्पे व घरकुल बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध पडताळून पाहण्यात आला.

**घरकुल अनुदानाचे टप्पे व घरकुल बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

**अनुदान प्राप्तीचे टप्पे * घरकुल बांधकामाचा कालावधी Crosstabulation**

Count

| | | घरकुल बांधकामाचा कालावधी | | | | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 3 महिने | 4 ते 6 महिने | 7 ते 9 महिने | 10 ते 13 महिने | |
| निधीचे टप्पे | तीन टप्पे | 49 | 48 | 15 | 2 | 114 |
| | दोन टप्पे | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| Total | | 50 | 48 | 15 | 2 | 115 |

**Chi-Square Tests**

| | Value | df | Asymptotic Significance (2-sided) |
|---|---|---|---|
| Pearson Chi-Square | 1.311[a] | 3 | .726 |
| Likelihood Ratio | 1.677 | 3 | .642 |
| Linear-by-Linear Association | .949 | 1 | .330 |
| N of Valid Cases | 115 | | |

a. 5 cells (62.5%) have expected count less than 5. The minimum expected count is .02.

मागील सारणी घरकुल बांधकामासाठी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाचे टप्पे व घरकुल बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध दर्शविते. योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलाचे बांधकाम १८ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करणे अपेक्षित आहे. यानुसार घरकुल बांधकामासाठी अनुदान हे तीन टप्प्यांमध्ये देण्यात येते. योजनेअंतर्गत घरकुल मंजुर झाल्यानंतर अनुदानाची २५ टक्के रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येते. त्या रकमेचा वापर करुन लाभार्थ्यांना ९ महिन्याच्या आत लिंटेनपर्यंत घरकुलाचे बांधकाम करावे लागते. ९ महिन्यानंतर लाभार्थ्यांना अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यात येतो. त्यानंतर पुढील ९ महिन्यात शौचालयासह घरकुलाचे बांधकाम पूर्ण

झाल्यानंतर अनुदानाचा शेवटचा हप्ता लाभार्थ्यांना देण्यात येतो. म्हणजेच एकूण १८ महिन्याच्या कालावधीत घरकुलाचे बांधकाम पूर्ण करणे अपेक्षित असून त्याप्रमाणे तीन टप्प्यात अनुदान दिले जाते.

यानुसार लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्राप्त झालेले अनुदानाचे टप्पे व बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध दर्शविण्यासाठी **Chi Square** चाचणीचा वापर केला आहे. यातील Crosstab सारणीवरुन असे स्पष्ट होते की, घरकुल बांधकामाचे अनुदान तीन टप्प्यात प्राप्त झालेले एकूण ११४ लाभार्थी आहेत. यामधील ४९ लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम ३ महिन्याच्या कालावधीत पूर्ण झाले आहे. ४ ते ६ महिन्यात घरकुलाचे बांधकाम पुर्ण झालेले ४८ लाभार्थी असून १५ लाभार्थ्यांचे बांधकाम ७ ते ९ महिन्यात पूर्ण झाले आहे. तसेच १० ते १३ महिन्यात घरकुलाचे बांधकाम पुर्ण झालेले २ लाभार्थी आहेत. त्याचबरोबर दोन टप्प्यात अनुदान मिळालेला १ लाभार्थी असून त्याच्या घरकुलाचे बांधकाम ३ महिन्याच्या आतच पूर्ण झालेले आहे.

यानुसार वरील **Chi Square** सारणीवरुन असे स्पष्ट होते की, घरकुल बांधकामासाठी मिळणाऱ्या अनुदानाचे टप्पे व घरकुल बांधकामाचा कालावधी यातील सहसंबंध हा **Less than 0.05** च्या तुलनेत **0.02** इतका आलेला आहे. यानुसार अनुदानाचे टप्पे व घरकुल बांधकामाचा कालावधी या दोन्ही चलामधील सहसंबंध सकारात्मक असल्याचे स्पष्ट होते.

यावरुन असे दिसून येते की, योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम हे १८ महिन्याच्या आत म्हणजेच ३ ते १३ महिन्यांच्या आतच पूर्ण झालेले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना तीन टप्प्यात मिळालेले अनुदान हे घरकुल बांधकामानुसार प्राप्त झालेले नाही. म्हणजेच अनुदानाच्या टप्प्यांनुसार १८ महिन्याच्या कालावधीत घरकुलांचे बांधकाम झालेले नाही. त्यामुळे घरकुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी सर्वाधिक लाभार्थ्यांना बँकेतून मोठ्या रकमेचे कर्ज काढावे लागले आहे हे प्राथमिक माहितीवरुन स्पष्ट होते.

यावरुन असे निष्कर्षास येते की, घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत काही घटकांची मार्गदर्शक सूचनेनुसार अंमलबजावणी झालेली नाही हे संशोधन अभ्यासासाठी मांडण्यात आलेले गृहितकृत्य सिध्द होते.

### ५.८.३ घरकुल प्राप्त झाल्यामुळे लाभार्थी कुटुंबांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून येण्यास मदत झाली आहे.

याकरीता सामाजिक स्थितीअंतर्गत पाण्याची उपलब्ध सुविधा व शौचालयाची सुविधा (वापर) यातील सहसंबंध पडताळून पाहण्यात आला आहे.

**पाण्याची उपलब्ध सुविधा व शौचालयाची सुविधा (वापर) यातील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

**पाण्याची सुविधा * शौचालय सुविधा व त्याचा वापर Crosstabulation**

Count

| | | शौचालय सुविधा व त्याचा वापर | | Total |
|---|---|---|---|---|
| | | व्यक्तीगत शौचालय | सार्वजनिक शौचालय | |
| पाण्याची सुविधा | विहिरीतून पाणी | 30 | 3 | 33 |
| | बोअरवेलचे पाणी | 2 | 0 | 2 |
| | हातपंप | 17 | 0 | 17 |
| | सार्वजनिक नळ | 39 | 0 | 39 |
| | व्यक्तीगत नळ | 19 | 0 | 19 |
| | संस्थांच्या मदतीने व्यक्तीगत नळ | 5 | 0 | 5 |
| Total | | 112 | 3 | 115 |

**Chi-Square Tests**

| | Value | df | Asymptotic Significance (2-sided) |
|---|---|---|---|
| Pearson Chi-Square | 7.654[a] | 5 | .176 |
| Likelihood Ratio | 7.693 | 5 | .174 |
| Linear-by-Linear Association | 4.621 | 1 | .032 |
| N of Valid Cases | 115 | | |

a. 8 cells (66.7%) have expected count less than 5. The minimum expected count is .05.

वरील सारणी घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबासाठी उपलब्ध असलेली पाण्याची सुविधा व शौचालयाची सुविधा (वापर) यातील सहसंबंध दर्शविते. इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुल प्राप्तीबरोबरच लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा वा बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने अनेक सुविधा पुरविण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने पाणी, वीज, घरकुलापर्यंत जाण्यासाठी पायवाट किंवा रस्ता, निर्धूर चूल, स्वतंत्र व सुरक्षित न्हाणीघर व शौचालय इ. प्रमुख सुविधांचा समावेश आहे. या सर्व सुविधा इतर शासकीय

योजनांच्या (Convergence) माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे योजनेच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये नमुद आहे. तसेच योजनेअंतर्गत शौचालयासह घरकुलाचे बांधकाम करणे हे आवश्यक आहे त्याशिवाय घरकुल बांधकाम अनुदानाचा शेवटचा हप्ता लाभार्थ्यांना दिला जात नाही.

यानुसार घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना उपलब्ध झालेली पाण्याची सुविधा व शौचालयाची सुविधा (वापर) यातील सहसंबंध दर्शविण्यासाठी संशोधकाने **Chi Square** चाचणीचा वापर केला आहे. यातील crosstab सारणीवरुन असे स्पष्ट होते की, घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांपैकी पिण्यासाठी तसेच वापरण्यासाठी विहीरीच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असलेले एकूण ३३ लाभार्थी आहेत. यामधील ३० लाभार्थ्यांकडे व्यक्तीगत शौचालयाची सुविधा उपलब्ध असून उर्वरित ३ लाभार्थी सार्वजनिक शौचालयाचा वापर करत आहेत. पिण्यासाठी व वापरण्यासाठी बोअरवेलचे पाणी वापरणारे २ लाभार्थी असून दोन्ही लाभार्थ्यांकडे व्यक्तीगत शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच पाण्यासाठी हातपंपाची सुविधा उपलब्ध असलेले १७ लाभार्थी आहेत. सर्व १७ लाभार्थ्यांकडे व्यक्तीगत शौचालये आहेत. सार्वजनिक व व्यक्तीगत नळाची सुविधा उपलब्ध असणारे अनुक्रमे ३९ व १९ लाभार्थी असून यांच्याकडे व्यक्तीगत शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच खाजगी संस्थेच्या मदतीने घरकुलात पाण्यासाठी व्यक्तीगत नळाची सुविधा प्राप्त झालेले एकूण ५ लाभार्थी असून यातील सर्वांकडे व्यक्तीगत शौचालये आहेत.

यानुसार वरील **Chi Square** चाचणीवरुन असे दिसून येते की, घरकुल प्राप्त एकूण ११५ लाभार्थ्यांकडील पाण्याची उपलब्ध सुविधा व शौचालयाची सुविधा (वापर) यातील सहसंबंध हा **Less than 0.05** च्या तुलनेत **0.05** इतका आलेला आहे. म्हणजेच पाण्याची उपलब्ध सुविधा व शौचालयाची सुविधा (वापर) या दोन्ही चलामधील सहसंबंध सकारात्मक असल्याचे स्पष्ट होते.

यावरुन असे दिसून येते की, योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांना पाण्यासाठी विहीर, बोअरवेल, हातपंप, सार्वजनिक तसेच व्यक्तीगत नळ इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत किंवा उपलब्ध आहेत. तसेच शौचालयाचे बांधकाम अत्यावश्यक असल्याने सर्व लाभार्थ्यांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे पाण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने लाभार्थ्यांकडून शौचालयाचा वापर केला जात आहे. यावरुन असे निष्कर्षास येते की, घरकुल प्राप्त झाल्यामुळे लाभार्थी कुटुंबाच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून येण्यास मदत झाली हे गृहितकृत्य सिध्द होते.

## ५.९ प्रमुख शिफारशी :

वरील प्रमुख निष्कर्ष लक्षात घेता ‘इंदिरा आवास योजने’च्या मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेची अधिक यशस्वीपणे अंमलबजावणी करता येईल. यादृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने पुढील काही प्रमुख शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

१. मुळशी तालुक्यात स्वतःच्या जागेवर नविन घरकुल बांधण्यासाठी सर्व लाभार्थ्यांना आर्थिक लाभ देण्यात आला आहे. मात्र योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकामासाठी स्वतःची जागा उपलब्ध नसलेल्या एकाही कुटुंबाला घरकुलाचा लाभ देण्यात आलेला नाही. त्यामुळे अशा गरजू कुटुंबांनांही सदर योजनेअंतर्गत जागा उपलब्ध करुन देणे व त्यावर घरकुल बांधण्याची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

२. तालुका पातळीवर दारिद्रय रेषेखाली नसलेले परंतु आर्थिक स्थिती बिकट असलेल्या गरीब कुटुंबाना योजनेअंतर्गत घरकुलांचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

३. योजनेअंतर्गत २६९ चौ.फु. क्षेत्रात घरकुल बांधकामास परवानगी आहे. प्रत्यक्ष पाहता २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल हे कुटुंबांच्या गरजेनुसार पुरेसे ठरत नाही. त्यामुळे योजनअंतर्गत घरकुल बांधकामाच्या क्षेत्रामध्ये वाढ करणे आवश्यक असून त्यादृष्टीने शासन पातळीवर पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

४. २६९ चौ.फु. क्षेत्रातील किंवा त्यापेक्षा अधिकच्या जागेतील घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी ३ ते ६ महिन्यांचा कालावधी पुरेसा ठरतो. त्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये घरकुल बांधकामासाठी नमुद असलेला १८ महिन्यांचा कालावधी कमी करण्याबाबत प्रयत्न केला जाऊ शकतो व त्यानुसार निधी वाटपाच्या टप्प्यांच्या कालावधीमध्येही बदल होणे आवश्यक वाटते.

५. सद्यस्थितीत योजनेअंतर्गत २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुल बांधकामासाठी मिळणारे अनुदान लाभार्थ्यांच्या दृष्टीने कमी पडत आहे. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात कर्ज काढावे लागत असल्याचे दिसून येत आहे. त्यानुसार योजनेअंतर्गत २६९ चौ.फु. घरकुलासाठी मंजुर अनुदानामध्ये वाढ करणे गरजेचे वाटते. त्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेकडून प्रयत्न केले जाऊ शकतात.

६. लाभार्थ्याला योजनेचे महत्त्व व कार्यवाही समजण्यासाठी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. केंद्र शासनाच्या बहुतांशी योजनेमध्ये प्रशिक्षण व क्षमता बांधणी या घटकासाठी निधी राखून ठेवला जातो. त्याप्रमाणे 'इंदिरा आवास योजने' अंतर्गतही 'प्रशिक्षणा'साठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत विचार करता येईल.

७. इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनांच्या (Convergence) माध्यमातून घरकुलामध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. उदा. पर्यायी रस्ता/पायवाट, वीज, पाणी, शौचालय इ.

८. जिल्हा व तालुका स्तरावरील योजनेच्या कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत वेळोवेळी क्षेत्रीय भेटीचे आयोजन होणे गरजेचे वाटते. जेणेकरून लाभार्थ्यांना आवश्यकतेप्रमाणे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळू शकेल.

९. घरकुल प्राप्त लाभार्थ्यांमध्ये ५० वर्षे व त्यापुढील वयोगटातील लाभार्थींची संख्या जास्त असल्याचे दिसून येत आहे. अशा सदस्यांसाठी सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्यांना इतर आवश्यक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठीही प्रयत्न होणे गरजेचे आहे.

१०. योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त विधवा महिलांना प्राधान्याने केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनांच्या (Convergence) माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

११. घरकुल प्राप्त लाभार्थ्यांमध्ये शेती व शेतमजुरी करणारे लाभार्थी जास्त आहेत. अशा लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ घडून आणण्यासाठी शेतीजोड व्यवसाय, शेतीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर इ. घटकांवर आधारित प्रोत्साहनपर कार्यक्रमांचे आयोजन करणे. तसेच शेतीसंदर्भातील सर्व शासकीय योजनांची माहिती व त्यांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर लाभार्थी कुटुंबांना कुटुंबातील शेतीव्यतिरिक्त इतरत्र रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील यादृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. जेणेकरुन लाभार्थी कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडून येऊ शकेल.

१२. योजनेअंतर्गत घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना अनेक अडचणी येत असल्याचे दिसून येते. तसेच तालुका व ग्रामपंचायत स्तरावर मनुष्य बळाचा अभाव यामुळे योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही विविध अडचणींना तोंड द्यावे लागत

आहे. त्यामुळे योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर स्वतंत्र यंत्रणा स्थापन करणे गरजेचे आहे.

## ५.१० **सारांश** :

प्राप्त प्राथमिक माहितीचे सारणीकरण व विश्लेषणावर आधारित संशोधन अभ्यासाची काही प्रमुख निष्कर्ष निदर्शनास येतात. ज्याची सविस्तर मांडणी सदर प्रकरणामध्ये करण्यात आलेली आहे. यावरुन मुळशी तालुक्यातील सदर योजनेची कार्यवाही, फलनिष्पती तसेच योजनेच्या अंमलबजावणीतील विविध अडचणी या सर्वाची माहिती प्राप्त होते. त्यानुसार योजनेची अंमलबजावणी अधिक यशस्वीपणे व प्रभावीपणे करता यावी याकरीता प्राप्त निष्कर्षावर आधारित महत्त्वाच्या शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत. तसेच संशोधन अभ्यासासाठी मांडण्यात आलेल्या गृहितकृत्यांची पडताळणी करण्यात आलेली असून त्याचेही सविस्तर विश्लेषण सदर प्रकरणात देण्यात आले आहे.

## ५.११ संशोधन विषयाचा सारांश

मानवाच्या प्रमुख मुलभूत गरजांपैकी एक 'निवारा' या घटकासाठी भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तत्कालीन परिस्थितीनुसार आवासाच्या विविध योजना व त्यासंबंधी शासकीय प्रयत्न झाल्याचे दिसून येते. सद्यस्थितीतही अनेक आवसाच्या योजना शासनामार्फत राबविल्या जात आहेत. त्यापैकीच एक महत्त्वाची योजना आहे ती म्हणजे 'इंदिरा आवास योजना' होय. सन १९९६ पासून इंदिरा आवास योजना ही स्वतंत्र योजना म्हणून अस्तित्वात आली. प्रामुख्याने अनुसूचित जाती व जमातीचे सदस्य, मुक्त वेठबिगार व ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचित जाती व जमातीच्या गरीब व्यक्ती यांना सहाय्यक अनुदान देऊन त्यांच्या राहत्या घराच्या बांधकामासाठी मदत करणे हे योजनेचे मुळ उद्दिष्ट्य आहे.

सदर योजनेअंतर्गत सन १९९६ ते जुलै २०१४ पर्यंत भारतामध्ये एकूण ३२०.५५ लाख कुटुंबांना घरे पुरविण्यात आलेली असून महाराष्ट्रात १६,२६,६०९ कुटुंबांना घरकुलांचा लाभ देण्यात आला आहे. तसेच सन २००८ ते २०१४ या कालावधीत महाराष्ट्रामध्ये एकूण ८,१३,४०० इतक्या घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. परंतु केवळ भौतिक कामगिरीच्या आधारे कोणत्याही योजनेचे यश व अपयश निश्चित करता येत नाही. यासाठी योजनेचे सविस्तर मुल्यमापन होणे गरजेचे असते. यानुसार राष्ट्रीय स्तरावर काही निवडक राज्यांमध्ये योजनेचे मुल्यमापन झाल्याचे दिसून येते. मात्र या अहवालावरुन हे स्पष्ट होते की, सन २००४ नंतर महाराष्ट्रामध्ये इंदिरा आवास योजनेचे सविस्तर मुल्यमापन झालेले नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील योजनेची नेमकी स्थिती जाणून घेणे आवश्यक असल्याने सदर संशोधन विषय हाती घेण्यात आला. यासाठी पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्याची निवड करण्यात आलेली आली.

प्रामुख्याने २००८ ते २०१४ या कालावधीत मुळशी तालुक्यात योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थी निवड प्रक्रिया व घरकुल बांधकाम प्रक्रिया पार पडली आहे किंवा नाही, घरकुलामुळे लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये झालेला बदल तसेच योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी अभ्यासणे इ. महत्त्वाची उद्दिष्ट्ये ठरवून सदर संशोधन अभ्यास करण्यात आला आहे.

मुळशी तालुक्यात २००८ त २०१४ या कालावधीमध्ये ८५८ लाभार्थ्यांचे घरकुल बांधून पूर्ण झालेल आहे. त्यानुसार सदर संशोधन अभ्यासासाठी नमुना आकार तंत्राचा

वापर करुन ८५८ लाभार्थ्यांपैकी ११५ लाभार्थी म्हणजे एकूण उपलब्ध संख्येच्या १३ टक्के इतका नमुना आकार ठरविण्यात आला होता. सदर ११५ लाभार्थ्यांची नमुना निवड करण्यासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दती (Probability Sampling) वापरण्यात आली. या पध्दतीमधील साधा यादृच्छिक नमुना पध्दती व त्याअंतर्गत नियमित अंकन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. तसेच योजनेच्या अंमलबजावणी व अडचणींच्या संदर्भात शासकीय यंत्रणेकडून प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांची निवड करण्यात आली होती.

प्राथमिक माहितीचे संकलन करण्यासाठी मुलाखत अनुसूची, निरीक्षण अनुसूची व कुटुंब तक्ता या संशोधन साधनांचा वापर करण्यात आला. तसेच दुय्यम आधार सामग्रीमध्ये संशोधन अभ्यासासाठी उपयुक्त असे विविध संशोधन अहवाल, शासननिर्णय, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील कायदेशीर तरतुदी, विविध शासकीय योजनांचा तपशील, शासकीय वेबसाईटस् तसेच अभ्यासाशी संबंधीत व उपयुक्त वेबसाईटवरील माहिती इ. चा संदर्भ घेण्यात आला आहे.

प्राप्त प्राथमिक माहितीचे संकलन करून त्याआधारे विश्लेषण करण्यात आले आहे. सदर विश्लेषणावरुन असे स्पष्ट झाले की, मुळशी तालुक्यात ११५ लाभार्थी कुटुंबातील ४८४ स्त्री व पुरूष सदस्यांना हक्काचा निवारा मिळालेला आहे. घरकुल प्राप्त सर्वच (१०० टक्के) लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेमार्फत प्रतिक्षा यादी तयार करून करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच ११५ लाभार्थ्यांमध्ये ८८ टक्के लाभार्थी हे दारिद्रय रेषेखालील इतर प्रवर्गातील असून अनुसूचित जाती व जमातीतील अनुक्रमे ९ टक्के व ३ टक्के लाभार्थी आहेत. यावरुन मुळशी तालुक्यात योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया पार पडल्याचे दिसून येते. तसेच मुळशी तालुक्यात स्वतःची जागा उपलब्ध असणाऱ्या स्थानिक लाभार्थ्यांनाच नविन घरकुल बांधण्यासाठी लाभ देण्यात आला आहे.

योजनेअंतर्गत घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधात काही मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलाचे बांधकाम पूर्ण होणे आवश्यक होते किंवा असते. याबाबत लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेली माहिती तसेच प्रत्यक्ष निरीक्षणात असे आढळून आले की, घरकुलासंबंधी काही घटकांबाबत मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेची कार्यवाही झालेली नाही. यामध्ये प्रामुख्याने घरकुलाचा लाभ देताना प्रथमतः

लाभार्थ्यांकडून रू. १०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येतो. मात्र मुळशी तालुक्यातील ७२ टक्के लाभार्थ्यांना याबाबत काहीच माहिती नसल्याचे दिसून येते. तसेच घरकुल बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यासंबंधीत पूर्णत्वाचा दाखला लाभार्थ्यांना दिला जातो. मात्र ८३ टक्के लाभार्थ्यांना याविषयी काहीही माहिती नसल्याचे दिसून आले. या संदर्भात लाभार्थी व योजनेची कार्यकारी यंत्रणा यांच्यात समन्वयाचा अभाव दिसून आला.

तसेच सर्व लाभार्थी घरकुलांचे बांधकाम १८ महिन्यापेक्षा कमी कालावधीमध्ये (३ ते ६ महिने कालावधी) पुर्ण झाले आहे. त्यामुळे ९८ टक्के लाभार्थ्यांना बांधकामासाठी तीन टप्प्यामध्ये अनुदानाची रक्कम मिळालेली असली तरी मात्र ही रक्कम घरकुल बांधकामाच्या गरजेनुसार मिळालेली नाही. तसेच ९४ टक्के लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम २६९ चौ.फुटापेक्षा जास्त क्षेत्रामध्ये केले आहे. लाभार्थ्यांच्या मते २६९ चौ. फुट क्षेत्रातील घरकुल हे कुटुंबाच्या गरजेनुसार पुरेसे ठरत नाही व त्यासाठी मिळणारे अनुदानही पुरेसे नाही. त्यामुळेच सर्वाधिक लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम कर्ज काढून पुर्ण करावे लागले आहे व यामुळे लाभार्थी कर्जबाजारी झाल्याचे दिसून येतात. यामध्ये अनुदानाच्या हिस्स्यापेक्षा अधिक खर्च करणारे ८६ टक्के लाभार्थी आहेत. घरकुल बांधकामासाठी स्वतःचा हिस्सा म्हणून लाभार्थ्यांनी १० हजार ते ४ लाखापर्यंत खर्च केल्याचे दिसून येत आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल लाभार्थी व गावातील अनुभवी मिस्त्री यांना घरकुल बांधकामाविषयी प्रशिक्षण दिले गेल्याचे दिसून येत नाही. त्याचबरोबर घरकुलाच्या दर्शनीय भिंतीवर योजनेचे कायमस्वरुपी नामफलक करणे, छताला प्लॅस्टर व रंगकाम करणे, दरवाजे व खिडक्यांना शटर बसविणे, नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घराचे बांधकाम करणे, उपजिवीकेच्या कामांसाठी घराबाहेर पुरेशी जागा असणे इ. भौतिक घटकांबाबत मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेची १०० टक्के कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

तसेच घरकुल प्राप्त बहुतांशी लाभार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनांच्या माध्यमातून शौचालय बांधकामासाठी आर्थिक सहाय्य पुरविणे, पर्यायी रस्ता/पायवाट, व्यक्तीगत व सार्वजनिक नळाद्वारे पाणी, मोफत वीज, निर्धुर चूल इ. सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. असे असले तरी घरकुल बांधकामासाठी स्थानिक हवामानास अनुरुप साहित्य व संरचनेचा वापर, विटा व सिमेंट कॉंक्रेटच्या सहाय्याने

घरकुलांच्या भिंती बांधणे, घराचे छप्पर सपाट व टिकाऊ साहित्याचे आहे, विकलांग व्यक्तीसाठी घरामध्ये सुरळीत व मुक्तपणे ये-जा करण्याची व्यवस्था असणे इ. घटकांबाबत योजनेची कार्यवाही यशस्वी झाल्याचे दिसून येते.

घरकुल प्राप्त झाल्यामुळे कुटुंबांच्या सामाजिक स्थितीत मोठ्या प्रमाणात सुधारणा वा बदल झाल्याचे दिसून येत आहे. प्रामुख्याने मुळशी तालुक्यातील १०० टक्के लाभार्थ्यांची निवाऱ्याची मुलभूत व सामाजिक गरज पूर्ण झाली आहे. घरकुल प्राप्त ६२ टक्के लाभार्थ्यांना घरापर्यंत जाण्यासाठी रस्ता/पायवाटेची सुविधा उपलब्ध झाल्याने या कुटुंबांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी मिळाली आहे. पूर्वी सर्वाधिक ७६ टक्के कुटुंबे उघड्यावर शौचास जात होती. मात्र योजनेअंतर्गत १०० टक्के लाभार्थी कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध झालेली आहे. सर्व घरकुलामध्ये स्वतंत्र न्हाणीघर बांधण्यात आलेली आहेत. अशा बंदिस्त शौचालय व न्हाणीघरांमुळे प्रामुख्याने कुटुंबातील स्त्रियांना सुरक्षितता प्राप्त झाली आहे.

तसेच पूर्वीच्या तुलनेत सद्यस्थितीत लाभार्थी घरकुलांमध्ये व्यक्तीगत व सार्वजनिक नळाद्वारे पिण्यायोग्य पाण्याची सुविधा उपलब्ध झाल्याचे प्रमाण वाढले आहे. पूर्वी सर्वाधिक कुटुंबात साध्या चुलीवर स्वयंपाक करण्यात येत होता मात्र घरकुलाचा लाभ मिळाल्यानंतर ४६ (४० टक्के) लाभार्थ्यांनी गॅस जोडणी करुन घेतलेली आहे. घरकुलामुळे उपलब्ध झालेल्या सर्व सुविधांमुळे कुटुंबातील सदस्यांच्या व प्रामुख्याने स्त्रीयांच्या आरोग्य स्थितीत सुधारणा घडून येण्यास मदत झाल्याचे स्पष्ट होते. तसेच घरकुलात वीजेची सुविधा व पुरेशी जागा उपलब्ध झाल्याने कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी देखील पोषक वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते.

एकूणच घरकुल प्राप्त झाल्याने आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, सामाजिक पत व दर्जा, स्त्रियांची सुरक्षितता इ. घटकांवर आधारित कुटुंबांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा घडून येण्यास मदत झाल्याचे स्पष्ट होते.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ मिळण्यापुर्वी व नंतर लाभार्थी कुटुंबांच्या रोजगाराच्या स्थितीमध्ये विशेष फरक पडलेला नाही. कारण पुर्वीही सर्वाधिक ९६ टक्के लाभार्थी कुटुंबे ही शेती, शेतमजुरी व त्यासंबंधीत इतर कामे करत होती. तसेच घरकुलाच्या लाभानंतरही सर्वाधिक ६७ टक्के कुटुंबे शेती, शेतमजुरी व त्यासंबंधीत इतर कामे करताना दिसून येत आहेत.

योजनेअंतर्गत लाभार्थी कुटुंबाना तसेच शासकीय कार्यकारी यंत्रणेला येणाऱ्या समस्या जाणून घेण्यात आल्या होत्या. यानुसार २६९ चौ.फु. क्षेत्रातील घरकुलाचे बांधकाम व त्या बांधकामासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेसे ठरत नाही. त्यासाठी बँकेतून कर्ज काढावे लागते. तसेच शौचालयाची सुविधा उपलब्ध झाली मात्र उन्हाळ्यामध्ये पुरेशा पाण्याआभावी शौचालयाचा वापर करता येत नाही. MSEB कडून मोफत वीज उपलब्ध करून दिली जात नाही इ. समस्या येतात किंवा आल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले. पुरेश्या निधीअभावी लाभार्थी तसेच मिस्त्रींना घरकुल बांधकामासंबंधी प्रशिक्षण देता येत नाही. लाभार्थ्यांना इतर शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावरील सबंधीत यंत्रणेकडून आवश्यक सहकार्य मिळत नाही. तसेच पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने योजनेच्या कार्यवाहीत अनेक अडचणी येत असल्याचे शासकीय यंत्रणेकडून सांगण्यात आले आहे.

एकूणच सदर संशोधन अभ्यासावरुन हे स्पष्ट होते की, इंदिरा आवास योजनेमुळे लाभार्थ्यांना हक्काचा निवारा प्राप्त होतो ही अतिशय समाधानाची बाब आहे. मात्र योजनेच्या अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर लाभार्थी तसेच कार्यकारी यंत्रणेस अनेक अडचणी येत आहेत. यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेची कार्यवाही व फलनिष्पत्ती ही १०० टक्के यशस्वी होऊ शकलेली नाही. यानुसार योजनेची प्रभावीपणे व यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याकरीता अधिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे दिसून येते.

# परिशिष्ट 'अ'
# संदर्भ सूची

## १ संदर्भ साहित्य : शासन निर्णय, पुस्तके व वेबसाईटस्


१.१ आवासाच्या विविध योजना : शासकीय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या आवास योजनांची माहिती www.maharahtra.gov.in, www.rdd.maharashtra.in

१.२ Census of India (जनगणना अहवाल) २०११, www.censusindia.gov.in

१.३ डॉ. प्रदिप आगलावे (२०१५), "सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे", श्री संत प्रकाशन, नागपूर.

१.४ ग्रामीण विकास मंत्रालय, ग्राम विकास विभाग, नवी दिल्ली (१९९८), "इंदिरा आवास योजना : मागदर्शक सूचना", भारत सरकार, नवी दिल्ली मार्फत.

१.५ घराचा अर्थ : http://en.wikipedia.org, http://www.quora.com

घराचे प्रकार Let's Learn: Types of Houses, shyamathanniyil.blogspot.com

१.६ ग्रामप विकास व जलसंधारण विभाग (२०१३), यांचे शासन निर्णय क्र.ईआयो-२०१३/प्र.क्र. २९६/योजना-१०, दिनांक ७ नोव्हेंबर २०१३.

१.७ Human Rights - United Nations - "मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा" www.un.org, http://hi.wikipedia.org

१.८ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद (२०१४-१५), पुणे. "इंदिरा आवास योजना : प्रगती अहवाल" (संख्यात्मक), सन २००६ ते २०१४.

१.९ List of Block Having Scheduled Area in Maharashtra, sr.no. District full Scheduled Area portly Rajbhavan Maharashtra. rajbhavan-maharashtra.gov.in

१.१० Ministry of Rural Development, GoI (July 2014), "IAY Briefing Note" www.iay.nic.in

१.११ तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर (जाने २०११), "भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया - खंड १", युनिक ॲकॅडमी प्रकाशन, पुणे.

## २.२ इंदिरा आवास योजना : राष्ट्रीय व राज्य स्तरीय मुल्यमापन अहवाल

२.१ Department of Economics and statistical Analysis, Hariyana State (2011), “Evaluation Study of Indira Awaas Yojna”, 2007-2011.

२.२ NIRD, Ministry of Rural Development, GoI (2005), “Implementation of IAY : Issues and Achievement : A Nation-Wide Study”, Hyderabad. www.nird.org.in

२.३ Program Evaluation Organization, Planning Commission, GoI, New Delhi (2013), “Evaluation Study of Indira Awaas Yojna” New Delhi.

२.४ Program Implementation and Evaluation Department of Meghalaya (2012), Evaluation Study on “Indira Awaas Yojna(IAY)” In Meghalay.

# परिशिष्ट ‘ब’

# मुळशी तालुका नकाशा



# परिशिष्ट ‘क’

## लाभार्थीसाठी प्रश्नसूची

---

**सूचना : योग्य उत्तराच्या पर्यायासमोरील रकान्यात (✓) अशी खूण करावी.**

---

**लाभार्थ्याचे नाव-** ..........................................................................................................

**अ) लाभार्थी निवड व मार्गदर्शक सूचनाप्रमाणे घरकुलाच्या बांधकाम प्रक्रियेसंबंधी प्रश्न**

**प्रश्न १) इंदिरा आवास योजनेची माहिती कोणाकडून मिळाली?**

१. ग्रामस्थ २. ग्रामपंचायत ३. ग्रामसभा

४. नातेवाईक ५. पंचायत समिती ६. प्रसार माध्यमाव्दारे

७. इतर (नमूद करणे)

**प्रश्न २) इंदिरा आवास योजनेव्यतिरिक्त आवासाच्या सुविधेचा लाभ इतर कोणत्या योजनेतून मिळाला आहे का? असल्यास कोणत्या?**

१. रमाई आवास योजना २. राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-१ व २

३. इतर कोणत्याही योजनेतून लाभ मिळालेला नाही ५. इतर (नमूद करणे)

**प्रश्न ३) ग्रामसभेमध्ये सहभागी होता का?**

१. होय २. नाही

३. गावात ग्रामसभाच होत नाही ४. इतर (नमूद करणे)

**प्रश्न ४) ग्रामसभेत योजनेच्या प्रतिक्षा यादीसंदर्भात चर्चा झाली होती का?**

१.होय २. नाही ३. माहिती नाही

**प्रश्न ५) योजनेचे लाभार्थी म्हणून खालील कोणत्या पात्रतेचे निकष पूर्ण केले आहे?**

१. दारिद्रय रेषेखालील बेघर कुटुंबाच्या प्रतिक्षा यादीतील (क्रमांक नमूद करावा)

२. अनुसुचीत जाती ३. अुनसुचीत जमाती ४. अल्पसंख्यांक

५. अपंग ६. वन हक्क कायदेअंतर्गत लाभार्थी

७. अस्वच्छ व्यवसाय करणारे/डोक्यावर मैला वाहून नेणारे

८. मुक्त वेठ बिगार कामगार ९. तृतीयपंथी

१०.पोलिस, सैन्य, व अर्ध सैनिक दलातील शहिदांचे वारसदार

११.कुटुंबातील सदस्य कर्करोग, कुष्ठरोग, व एड्स ने आजारी आहेत

१२.विधवा/ परित्यकत्या, अत्याचारग्रस्त महिला, ३ वर्षापासून पती बेपत्ता असलेल्या महिला, महिला कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे व एकच मुलगी/अपत्य असणारी कुटुंबे

१३. नैसर्गिक आपत्तीग्रस्त १४. इतर (नमूद करणे)

**प्रश्न ६) योजनेअंतर्गत लाभ खालीलपैकी कोणत्या स्वरुपात मिळाला आहे?**

१. स्वतःची जागा उपलब्ध असून त्यावर नवीन घराचे बांधकाम

२. बेघर असल्याने जागा संपादीत करून त्यावर घराचे बांधकाम

३. मोडकळीस आलेल्या घराचे पुर्ननिर्माण/दुरूस्ती

**प्रश्न ७) बेघर असल्यास योजनेअंतर्गत घर बांधणीसाठी जागा कशी उपलब्ध झाली?**

१. स्वतः व्यक्तीगत पैसे खर्च करून जागा विकत घेतली

२. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जागा उपलब्ध करून देण्यात आली

३. स्वतः जागा विकत घेत असल्याने त्यात शासनाचे आर्थिक सहाय्य प्राप्त झाले

४. ग्रामपंचायतीकडून (गायरान/गावठाण मधून) जागा उपलब्ध झाली

**प्रश्न ८) बेघर असल्यास घरासाठी किती जागा उपलब्ध झाली?** (नमूद करावे)

१)............................................................................ २) लागु नाही

**प्रश्न ९) बेघर असल्यास जमीन खरेदीसाठी शासनाकडून किती अर्थिक सहाय्य प्राप्त झाले?**

१. रुपये १०,०००/- २. रुपये २००००/- ३. कमी असल्यास किती रू......

४. जास्त असल्यास किती रू. ...... ५. लागू नाही

**प्रश्न १०) बेघर असल्यास घरकुलासाठी जागा उपलब्ध होण्यास काही अडचणी आल्या का?**

१. होय २. नाही ३. लागू नाही

**प्रश्न १०.१) होय असल्यास कोणत्या अडचणी आल्या?**

---------------------------------------------------------------------------

**प्रश्न ११) घरकुलाचे बांधकाम मुदतीत पुर्ण करण्या संदर्भात रू. १०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात आला होता का?**

१. होय २. नाही ३. सांगता येत नाही

**११.१) नसल्यास कारणे?**

१.......................................................................................................................................................

२. लागू नाही.

**प्रश्न १२) घरकुलासाठी अर्ज सादर केलेला दिनांक :**-------------------------

**१२.१) घरकुल मंजूरीचा दिनांक :**-------------------------

**प्रश्न १३) घरकुलाचे काम सुरू केलेला महीना व वर्ष :**

**१) महीना** .................... **२) वर्ष** ........................

**प्रश्न १४) घरकुलाचे बांधकाम पुर्ण झालेला महीना व वर्ष:**

**१) महीना ............ २) वर्ष ......................**

**प्रश्न १५) शासनाकडून घरकुल बांधकामासाठी प्राप्त लाभाची एकूण रक्कम किती होती?**

१. रुपये ६८,५००/- २. रुपये ९५,०००/-

३. या व्यतिरिक्त असल्यास किती रू. ..................)

**प्रश्न १६) योजनेचा आर्थिक लाभाचे एकूण टप्पे? (२०१२-१३ पूर्वीच्या लाभार्थ्यांसाठी)**

१. तीन टप्प्यात – १) रु. १७१२५ २. रु. ४११२५ ३) रु. १०१७५

२. तीनपेक्षा अधिक टप्प्यात – ...............

३. इतर (स्पष्टपणे नमूद करणे)

**प्रश्न १६.१) आर्थिक लाभाची रक्कम पहिल्या तीन टप्प्यात न मिळाल्यास(इतर) किंवा तीन पेक्षा अधिक टप्प्यात मिळाली असल्यास त्याची कारणे सांगा? (२०१३ पूर्वीच्या लाभार्थ्यांसाठी)**

१.........................................................................................................................................

२. लागु नाही

**प्रश्न १७) योजनेचा आर्थिक लाभाचे एकूण एकूण टप्पे? (२०१३ नंतरच्या लाभार्थ्यांसाठी)**

१. तीन टप्प्यात – १) रु. २३७५० २) रु. ५७००० ३) रु. १४२५०

२. तीनपेक्षा अधिक टप्प्यात – ...............

३. इतर (स्पष्टपणे नमूद करणे)

**प्रश्न १७.१) आर्थिक लाभाची रक्कम पहिल्या तीन टप्प्यात न मिळाल्यास(इतर) किंवा तीन पेक्षा अधिक टप्प्यात मिळाली असल्यास त्याची कारणे सांगा? (२०१३ नंतरच्या लाभार्थ्यांसाठी)**

१.........................................................................................................................................

२. लागु नाही

**प्रश्न १८) घरकुल बांधकामासाठी लाभार्थी हिस्सा म्हणून किती खर्च करावा लागला?**

१. रक्कम रु. ..........................................

**प्रश्न १८.१) केलेल्या खर्चाचे स्वरुप?**

१. रोख स्वरुपातील रक्कम रु. ………………….. 

२. स्वतः बांधकाम करुन श्रमदान केल्याने झालेला खर्च रक्कम रु. …………………

३. साहित्य खरेदीसाठी (दगड, माती, पत्रे इ.) झालेला खर्च रक्कम रु. ……………

४. इतर (स्पष्टपणे नमुद करावे)

**प्रश्न १९) योजने अंतर्गत घरकुल मंजुरीनंतर कोणत्या बँकेत खाते उघडण्यात आले होते?**

.……………………………………………………………………………………………

**प्रश्न २०) घरकुल बांधकाम योजनेच्या पुढील मार्गदर्शक सूचनेनुसार पुर्ण करण्यात आले आहे का?**

१. पहिल्या हप्ता दिल्यापासून ९ महिन्यात लिंटेन पर्यंत बांधकाम पुर्ण झाले होते.

२. दुस-या हप्ता दिल्यापासून ९ महिन्यात शौचालयासह बांधकाम पुर्ण झाले होते.

३. घरकुल बांधकाम पुर्ण करण्यासाठी १८ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागला

४. इतर (स्पष्टपणे नमुद करावे)

**प्रश्न २०.१) घराचे बांधकाम १८ महिन्यात पुर्ण झाले नसल्याची कारणे?**

१. ………………………………………………………………………

२. लागु नाही.

**प्रश्न २१) घरकुलाचे बांधकाम पुर्ण करण्यामध्ये कोणाचे मार्गदर्शन मिळाले?**

१. ग्रामसेवक /शाखा अभियंता २. फक्त ग्रामसेवक

३. फक्त शाखा अभियंता ४. गट विकास अधिकारी

५. गट विकास अधिकारी /ग्रामसेवक /शाखा अभियंता

**प्रश्न २२) घरकुलाच्या बांधकामासंबंधी प्रशिक्षण देण्यात आले होते का?**

१. होय २. नाही.

**प्रश्न २२.१) असल्यास प्रशिक्षणतील समाविष्ट घटक कोणते होते?**

१. घरकुल कशा पध्दतीने बांधावे २. अर्थिक व्यवहार कसे करावे

३. साहित्य खरेदी करताना करावयाची काटकसर ४. निर्धुर चुलीचे महत्त्व

५. संकल्प चित्राप्रमाणे घरकुलाचे बांधकाम करणे ६. वरील सर्व

७. इतर (नमुद करावे……………………) ८. लागु नाही

**प्रश्न २२.२) संबंधित प्रशिक्षण मिळाले नसल्यास त्याची कारणे?**

१.------------------------------------------------------------

२. लागु नाही.

**प्रश्न २३) घरकुलाचे बांधकाम कोणामार्फत पुर्ण करुन घेण्यात आले?**

..............................................................................

**प्रश्न २४) घरकुलाचे बांधकाम मिस्त्रीकडून पूर्ण करुन घेण्यात आले असल्यास मिस्त्रीला बांधकामाचे प्रशिक्षण देण्यात आले होते का?**

१. होय २. नाही

**प्रश्न २५) घरकुलाचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर उपअभियंता यांचे स्वाक्षरीने पुर्णत्वाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात आले आहे का?**

१. होय २. नाही ३. सांगता येत नाही

**प्रश्न २५.१) नसल्यास का नाही?**

१. ..........................................................................

२. लागु नाही

**प्रश्न २६) घरकुलाचे बांधकाम करते वेळी कोणकोणत्या अडचणी किंवा समस्या आल्या होत्या किंवा येत आहेत?** (वाळू, वीटा इ. साहित्य मिळविण्यातील समस्या, अनुदान प्राप्तीतील समस्या यासारख्या व इतर सर्व समस्या)

..................................................................................

..................................................................................

---

## ब) योजनेचा लाभ : सामाजिक व आर्थिक स्थिती विषयक प्रश्न

**प्रश्न २७) घरकुल पुर्ण झाल्यानंतर घरकुलापर्यंत जाण्यासाठी पर्यायी रस्ता/पायवाट याची व्यवस्था शासनाकडून करून देण्यात आली आहे का?**

१. होय २. नाही.

**प्रश्न २७.१) असल्यास ही सुविधा कोणत्या योजनेमार्फत करून देण्यात आली आहे?**

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत

२. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

३. राज्य शासनाच्या इतर योजनेतर्गत (योजनेचे नाव.....................................)

४.स्वः खर्चाने व्यक्तीगतरित्या रस्ता/पायवाट तयार केली.

५. इतर (नमुद करावे)

**प्रश्न २८) शासनाकडून पर्यायी रस्ता/पायवाटेची व्यवस्था झाली नसल्यास त्याची कारणे?**

१. ........................................................................ .............................

२. लागु नाही

**प्रश्न २९) घरात शौचालय आहे का?**

१. होय २. नाही

**प्रश्न २९.१) नसल्यास का नाही?**

१. ........................................................................

२. लागु नाही

**प्रश्न ३०) घरात शौचालय असल्यास शौचालयाच्या बांधकामासाठी आर्थिक सहाय्य कोठून मिळाले?**

१. शासनाकडून अर्थिक सहाय्य मिळाले नसून स्वःखर्चातुन बांधण्यात आले

२. स्वच्छ भारत मिशन (पुर्वीचे निर्मल भारत अभियान) अंतर्गत अर्थिक सहाय्यातून

३. इतर शासकीय योजनांच्या अर्थिक सहाय्यातून (योजनेचे नाव----------)

४. लागु नाही

**प्रश्न ३१) न्हाणीघर बांधण्यात आले आहे का?**

१. होय २. नाही

**प्रश्न ३२) घरात पिण्याच्या पाण्यासाठी कोणती व्यवस्था आहे?**

१. विहीरीतून पाणी आणले जाते २. बोअरवेलचे पाणी

३. हातपंप ४. सार्वजनिक नळ

५. व्यक्तीगत स्वरूपाची नळ व्यवस्था ६. NRDWP या योजनेअंतर्गत

७. शासकीय जलस्वराज्य योजनेअंतर्गत ८. शासकीय महाजल योजना

९. इतर (नमुद करावे)

**प्रश्न ३३) शासनाकडुन निर्धुर चुल उपलब्ध करून देण्यात आली आहे का?**

१. होय २. नाही

**प्रश्न ३३.१) नसल्यास कारणे?**

१. ..........................................................................

२. लागु नाही

**प्रश्न ३४) घरकुलात वीज जोडणी कशा मार्फत करण्यात आली आहे?**

१. घरकुलात वीज जोडणी नाही २. सौर दिवे

३. घरकुलात शासनाच्या राजीव गांधी ग्रामीण विदयुतीकरण योजनेअंतर्गत

४. घराजवळील विदयुत वाहीनीवर आकडी टाकुन (छुप्या रितीने) वीज घेण्यात येते

५. इतर (स्पष्टपणे नमुद करावे.........................................)

**प्रश्न ३४.१) शासकीय योजनेअंतर्गत वीज जोडणी झाली नसल्याची कारणे?**

१. ................................................................................

२. लागु नाही

**प्रश्न ३५) सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने इतर योजनांतर्गत कोणते लाभ मिळाले आहेत?**

१. राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना २. जीवन विमा महामंडळाची योजना

३. गरिबांसाठीची जनश्री विमा योजना ४. आम आदमी विमा योजना

५. प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना ६. अटल पेन्शन योजना

७. राज्यांतर्गत इतर आरोग्य विमा योजना ८. वरीलपैकी एकही नाही

**प्रश्न ३६) घरकुलाचा लाभ मिळाल्यानंतर कुटुंबातील सदस्यांचे स्थलांतर थांबले आहे का?**

१. होय २. नाही

**प्रश्न ३७) नसल्यास त्याची कारणे कोणती?**

........................................................................................................................

**प्रश्न ३८) घरकुल लाभानंतर कुटुंबातील मुले शाळेत जात आहेत किंवा जात होती का?**

१. होय २. नाही

**प्रश्न ३८.१) शाळेत जात असल्यास मुलांच्या अभ्यासासाठी कोणती व्यवस्था होती वा आहे?**

१. वीज असल्याने घरात अभ्यास करतात/ करत होती

२. वीज नसल्याने घराबाहेर (अंधार पडेपर्यंत) अभ्यास करतात/ करत होती

३. घरकुलामुळे मुलांना स्वतंत्रपणे अभ्यासासाठी जागा उपलब्ध झाली

४. गावातील स्वाध्याय केंद्र किंवा शाळेतील अभ्यास वर्ग

५. कुटुबातील सर्व सदस्यांचे शिक्षण पुर्ण झाले होते किंवा झालेले आहे

६. इतर (स्पष्टपणे नमुद करावे.........................................)

**प्रश्न ३९) मागील काही दिवसात कुटुंबातील सदस्यांच्या आजारपणाची स्थिती काय आहे? कुटुंबातील सदस्य किती वेळा आजारी पडले आहेत? आजारी पडले असल्यास आजाराचे स्वरुप काय होते/आहे/असते?**

..........................................................................................................................

..........................................................................................................................

**प्रश्न ४०) घरकुल लाभामुळे खालील स्थितीमध्ये कोणकोणते बदल घडून आलेले आहेत?**

**४०.१) कुटुंबातील मुलांमुलींच्या शैक्षणिक स्थितीतील बदल :** (कुटुंबातील बालके शाळेत जाऊ लागली , आर्थिक प्रगतीमुळे शिक्षणावरती खर्च करता आला, मुलांच्या अभ्यासाची सोय झाली इ.)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

**४०.२) कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत झालेला बदल :** (बचतीतील वाढ, जीवनावश्यक गरजांची पुर्तता झाली, उपभोग्य वस्तुंवर खर्च करता आला, स्थिर स्वरुपाचा किंवा रोजगार उपलब्ध झाला इ.)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

**४०.३) सामाजिक स्थिती बदल :** (समाजात मान-सन्मान मिळाला, समाजातील/ग्रामसभेतील सहभाग वाढला इ.)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

**४०.४) स्त्रियांच्या स्थितीत झालेला बदल :**(स्त्रियांचे संरक्षण, अंघोळीची, शौचालयाची व्यवस्था, निर्धुर चुलीमुळे आरोग्य विषयक स्थितीत सुधारणा, शैक्षणिक प्रगती, इ.)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

**४०.५) घरकुलाच्या आजुबाजूच्या परिसराची स्वच्छता व कुटुंबाच्या आरोग्य स्थितीत झालेला बदल :**

..........................................................................................................................

..........................................................................................................................

**४०.६) इतर बदल :**

..........................................................................................................................

..........................................................................................................................

**क) योजनेचा लाभ मिळण्यापुर्वीची लाभार्थ्याच्या सामाजिक व आर्थिक स्थिती विषयक प्रश्न**

**प्रश्न ४१) योजनेचा लाभ मिळण्यापुर्वी कुठे/कशा स्थितीत राहत होता?**

१. भाडयाच्या खोलीत २. पाल/तंबु टाकुन

३. पत्र्याचे शेड/बांबुचे शेड ४. कच्चा मोडकळीस आलेल्या घरात

५. इतर (स्पष्टपणे नमूद करणे)

**प्रश्न ४२) राहण्याचे ठिकाण नेमकी कोठे होते?**

१. गावामध्ये २. गावाबाहेर(गावच्या वेशी बाहेर)

३. गावापासून दूर डोंगराळ भागात ४. इतर (नमूद करणे)

**प्रश्न ४३) राहत्या ठिकाणी विजेची व्यवस्था कशी होती?**

१. राहत्या ठिकाणी वीज जोडणी नव्हती. २. सौर दिवे

३. घराजवळील विदयुत वाहीनीवरती आकडी टाकून वीज घेतील जाते

४. महावितरणकडून वीज जोडणी उपलब्ध होती

५. इतर शासकीय योजनांच्या मार्फत वीज जोडणी होती (योजनेचे नाव)

६. इतर (स्पष्टपणे नमुद करावे)

**प्रश्न ४४) राहत्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कोणती सोय उपलब्ध होती?**

१. विहीरीचे पाणी २. बोअरवेलचे पाणी

३. हातपंप ४. सार्वजनिक नळ

५. ग्रामपंचायतीमार्फत व्यक्तीगत स्वरूपाची नळ व्यवस्था

६. शासकीय योजनेअंतर्गत पाणी व्यवस्था उपलब्ध होती(योजनेचे नाव)

७. इतर (स्पष्टपणे नमुद करावे)

**प्रश्न ४५) राहत्या ठिकाणी शौचालयाची कोणती व्यवस्था होती?**

१. शौचालय नव्हते २. सार्वजनिक शौचालय ३. उघडयावर

४. इतर (नमूद करावे)

**प्रश्न ४६) राहत्या ठिकाणी आंघोळीची कोणती व्यवस्था होती?**

१. उघडयावर २. बांबुच्या वा लाकडाच्या काटया उभ्या करून

३. घरामध्ये किंवा तंबु अथवा पालाच्या आत ४. नदीवर अथवा तलावावर

५. इतर (स्पष्टपणे नमुद करावे)

**प्रश्न ४७) राहत्या ठिकाणी स्वयंपाकासाठी कोणती सुविधा उपलब्ध होती?**

१. चुल (धुर रहीत) २. रॉकेलवरील स्टोव्ह ३. निर्धुर चुल

४. गॅस ५. इतर (नमुद करावे)

**प्रश्न ४८) योजनेचा लाभ मिळण्यापुर्वी रोजगारासाठी काय काम करत होता?**

१. स्वतःची शेती २. शेतमजुरी ३. पशुपालन

४. भटक्या स्वरूपाची कामे/हंगामी व्यवसाय ५. शेतीजोड व्यवसाय

६. स्थिर स्वरुपाचा व्यवसाय ७. रोजंदारीवरील इतर कामे (उदा. गवंडी काम)

८. इतर (नमुद करावे)

**प्रश्न ४९) योजनेच्या लाभापुर्वीचे मासिक उत्पन्न किती होते? मिळणारे उत्पन्न कसे व कोठे खर्च केले जात होते? उत्पन्नातून बचत केली जात होती का?**

.................................................................................................................................

**प्रश्न ५०) कुटुंबातील स्त्रिया तसेच लहान मुले काम करत होती का? असल्यास कोणत्या स्वरुपाची कामे करत होती? त्यांना मिळणारे उत्पन्न किती होते?**

.................................................................................................................................

**प्रश्न ५१) कुटुंबातील मुले-मुली शाळेत जात होती का?**

१. होय २. नाही

**प्रश्न ५२) कुटुंबातील मुले-मुली शाळेत जात असल्यास कोणत्या शाळेत जात होती?**

१. जिल्हा परिषद २. खाजगी शाळा ३. महाविद्यालय

४.व्यावसायिक शिक्षण ५. इतर(नमुद करावे )

**प्रश्न ५३) कुटुंबातील मुला-मुलींसाठी अभ्यासाची कोणती व्यवस्था उपलब्ध होती?**

१. घरात वीज असल्याने मुले घरात अभ्यास करत

२. वीज नसल्याने घराबाहेर

३. गावातील स्वाध्याय केंद्रात किंवा शाळेत

४. मुले घरी अभ्यासच करत नव्हती

५. अपु-या जागेच्या अभावी मुलांना घरात अभ्यास करता येत नव्हता

६. कुटुंबातील कुणीही शाळेत जात नव्हते

७. इतर (नमुद करावे)

**प्रश्न ५४) राहत्या घराच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छतेच्या दृष्टीने कसा होता?**
(सांडपाण्याची कोणती व्यवस्था होती, कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जात होती, इतर)

.................................................................................................................................

**प्रश्न ५५) इतर बाबी / निरीक्षणे :**

.................................................................................................

# परिशिष्ट 'ड'

## ग्रामसेवकासाठी प्रश्नसूची

१. ग्रामसेवकाचे नाव :- ..........................................................

२. संपर्कासाठी मोबाईल / ऑफीसचा क्रं. :- ..................................................

प्र.३) इंदिरा आवास योजनेसंदर्भात आपल्याला प्रशिक्षण देण्यात आलेले आहे का?

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.४) प्रशिक्षण घेतले असल्यास कोणामार्फत व किती दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे? प्रशिक्षण झाले नसल्यास त्याची कारणे सांगा.

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.५) सदर योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रिया कशी राबविण्यात येते ते सांगा.

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.६) प्रतिक्षा यादीतील प्राधान्य क्रमानुसार लाभार्थ्यांना लाभ दिला जातो का? नसल्यास का नाही?

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.७) योजनेअंतर्गत मंजुर निधीनुसार खर्च झाला नसल्यास किंवा होत नसल्यास त्याची कारणे/त्यातील अडचणी कोणत्या ते सांगा.

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.८) गावपातळीवर ग्रामपंचायत कार्यालयात दर्शनी भागात सदर योजनेची प्रत्यक्ष यादी ऑईलपेंटद्वारे लिहून प्रसिध्द करण्यात आली आहे का? नसल्यास का नाही?

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.९) दारिद्रय रेषेखालील लाभार्थी यादी व प्रतिक्षा यादीचे बाईंडिग केलेले रजिस्टर ठेवण्यात आले आहे का? तसेच ते रजिस्टर दरवर्षी गटविकास अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करुन अद्ययावत ठेवण्यात येते का? नसल्यास का नाही?

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.१०) योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यांकडून रु.१०० स्टॅम्प पेपरवर विहीत अटी व शर्ती नमुद करुन करारनामा करण्यात आलेला आहे का? नसल्यास का नाही?

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.११) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे शाखा अभियंता यांच्यासमवेत प्रत्येक लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष जागेवर जाऊन घरकुलाचे मार्कआऊट करण्यात आले आहे किंवा करण्यात येते का? नसल्यास का नाही?

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

प्र.१२) निधी प्राप्ती संदर्भात काही समस्या निर्माण होतात का? असल्यास त्याचे स्वरुप सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्र.१३) शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी गावपातळीवर करताना कोणत्या अडीअडचणी येतात त्या सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्र.१४) सदर योजनेत नमुद असलेल्या आपल्या भूमिकेसंबंधीच्या काही समस्या/ अडचणी आहेत का? असल्यास कोणत्या ते सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्र.१५) सदर योजना गावपातळीवर राबविताना येणाऱ्या अडचणी दूर करुन ही योजना यशस्वीपणे राबविता यावी, याकरीता काय करणे आवश्यक असल्याचे आपणास वाटते ते सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

# परिशिष्ट ‘इ’

## विस्तार अधिकाऱ्यांसाठी प्रश्नसूची

---

१. विस्तार अधिका-याचे नाव :- ------------------------------------------------------------------

२. संपर्कासाठी मोबाईल / ऑफीसचा क्रं. :-----------------------------------------

प्र.३) जिल्हास्तरावरून इंदिरा आवास योजने संदर्भात लक्ष्य व साध्य देण्यात येते?

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.४) ग्रामपंचायत निहाय घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची यादी अदयावत ठेवण्यात आली आहे का?

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.५) सदर योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रिया कशी राबविण्यात येते ते सांगा.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.६) निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची प्रत्यक्ष भेट देऊन जागेची तपासणी केली आहे का?

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.७) प्रतिक्षा यादीतील प्राधान्य क्रमानुसारच लाभार्थ्यांना लाभ दिला जातो का? नसल्यास का नाही?

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.८) योजनेअंतर्गत मंजुर निधीनुसार खर्च झाला नसल्यास किंवा होत नसल्यास त्याची कारणे/त्यातील अडचणी कोणत्या ते सांगा.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.९) योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यांकडून रु.१०० स्टॅम्प पेपरवर विहीत अटी व शर्ती नमुद करुन करारनामा करण्यात आलेला आहे का? नसल्यास का नाही?

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.१०) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे शाखा अभियंता यांच्यामार्फत प्रत्येक लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष जागेवर जाऊन घरकुलाचे मार्कआऊट करण्यात आले आहे किंवा करण्यात येते का? नसल्यास का नाही?

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.११) निधीच्या प्राप्ती संदर्भात काही समस्या निर्माण होतात का? असल्यास त्याचे स्वरुप सांगा. --------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

प्र.१२) शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी गावपातळीवर करताना कोणत्या अडीअडचणी येतात त्या सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्र.१३) घरकुलाचा लाभ देण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांना सर्वसाधारणपणे कोणत्या समस्या येतात व त्याचे निरसन कशाप्रकारे करण्यात येते ते थोडक्यात सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्र.१४) पंचायत समिती स्तरावरून घरकुल प्राप्त लाभार्थ्यांना निर्धूर चूलीचे वाटप करण्यात आले आहे का? नसल्यास त्याची कारण?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्र.१५) सदर योजनेत नमुद असलेल्या आपल्या भूमिकेसंबंधीच्या काही समस्या/ अडचणी आहेत का? असल्यास कोणत्या ते सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्र.१६) सदर योजना गावपातळीवर राबविताना येणाऱ्या अडचणी दूर करुन ही योजना यशस्वीपणे राबविता यावी, याकरीता काय करणे आवश्यक असल्याचे आपणास वाटते ते सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

प्र.१७) इतर बाबी :

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

# परिशिष्ट 'ई'

## निरीक्षण सूची

**सूचना : सर्वेक्षकाने खालील सर्व बाबींचे निरिक्षण करावे व त्यापुढे लागु असलेल्या योग्य त्या रकान्यात (✓) अशी खूण करावी.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. घराचे स्वरुप व्यक्तिगत/दुमजली/तीन मजली | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २. घराचे बांधकाम २६९ चौ.फु.(२५ चौ.मी.) क्षेत्रात | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ३. घर गावठाण/वस्ती/गायरान/ गावाच्या बाहेर | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ४. घराचे बांधकाम नैसर्गिक आपत्तीतून बचावात्मक स्वरुपाचे | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ५. घराकामासाठी स्थानिक हवामानास अनुरुप साहित्य तसेच सरंचनेचा वापर केला | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ६. घराच्या भिंती (विटा व सिमेंट काँक्रेट ) पक्क्या स्वरुपाच्या | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ७. घराचे छप्पर सपाट व टिकाऊ साहित्याचे | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ८. घराला बाहेरुन प्लॅस्टर करण्यात आले | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ९. घराचे रंगकाम केलेले | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १०. किमान घराच्या छताला प्लॅस्टर करण्यात आले | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ११. वऱ्हांडा | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १२. गच्चीवर जाण्यासाठी जिन्याची सोय | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १३. घराला रंग दिलेला | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १४. घरात फरशी/कोबा | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १५. घराच्या दरवाज्यांना, खिडक्यांना शटर बसविलेले | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १६. नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घराचे बांधकाम झालेले (हायब्रिक वॉल, रॅट-ट्रफ बाँड, जाळीची भींत, फिलर स्लॅब इ.) | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १७. घराबाहेर उपजिवीकेची कामे करण्यासाठी पुरेसी जागा उपलब्ध | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १८. विकलांग व्यक्तींच्या दृष्टीने घरामध्ये सुरळीत व मुक्तपणे ये-जा करण्याकरिता व्यवस्था | आहे | ( ) | नाही | ( ) |
| १९. घराच्या दर्शनीय भिंतीवर आईलपेंटने योजनेचे नामफलक लावण्यात आले | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २०. न्हाणीघर घराच्या आत/घराच्या बाहेर | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २१. शौचालयाचे बांधकाम झाले | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २२. शौचालय वापरले जात | आहे | ( ) | नाही | ( ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. घरात वीज जोडणी | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २४. घरात वीज मीटर | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २५. घरामध्ये लाभार्थी स्वतः राहत | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २६. पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २७. घरामध्ये निर्धर चुल/गॅस | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २८. घराकडे जाण्यासाठी रस्ता/पायवाट | आहे | ( ) | नाही | ( ) |
| २९. घरामध्ये स्वच्छता | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ३०. गटार बंदिस्त | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ३१. गटार उघडी | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ३२. घराजवळील परिसर स्वच्छ | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ३३. घराभोवती किमान १० झाडे लावण्यात आली | आहे | ( ) | नाही | ( ) |
| ३४. घरातील मुलांच्या अभ्यासाची व्यवस्था झाली | आहे | ( ) | नाही | ( ) |

# परिशिष्ट 'उ'
## कुटुंब तक्ता

**सूचना :** योग्य पर्यायाचा इंग्रजी क्रमांक समोरील चौकटीत (☐) नोंदवावा.

१) तालुका : मुळशी

२) गाव/वाडी/वस्ती/वॉर्ड/ठिकाणाचे नाव : ------------------------------------

३) घरकुलाचा लाभ मिळालेले वर्ष : ------------------------------------

४) लाभार्थ्याचे नाव : ----------------------------------------------------------------------------------------------

मोबाईल नं. : ------------------------------------

५) बीपीएल क्रमांक : ------------------------------------

६) रेशनकार्ड क्रमांक(रंग) : ------------------------------------

७) कुटुंबाची जात (एस.सी-1, एस.टी.-2, एन.टी.-3, ओ.बी.सी.-4, ओपन-5, इतर(नमूद करा)-6) : ☐

८) कुटुंबाचा धर्म (हिंदु-1, मुस्लिम-2, शिख-3, बौध्द-4, ख्रिश्चन-5, जैन-6,इतर(नमूद करा)-7) : ☐

९) कुटुंबाचे एकूण मासिक उत्पन्न : ------------------------------------

| अ.क्र. | कुटंबातील सदस्यांची नावे | लिंग (पुरुष-1, स्त्री-2) | वय (वर्षे) | वैवाहिक स्थिती (होय-1, नाही-2) | शैक्षणिक स्थिती (कोड मागे पहावेत) | काम करतात का ? (होय-1, नाही-2) | असल्यास कामाचे स्वरूप (कोड मागे पहावेत) | काम करत असल्यास मिळणारे वेतन कसे मिळते (कोड मागे पहावेत) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) |
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | |

**प्रश्न क्र. १५ साठी कोड खालील प्रमाणे :**

१) शाळेत जातो/जाते - 1

२) शाळेत जात नाही - 2

३) अंगणवाडीत जातो/जाते - 3

४) अंगणवाडीत जात नाही - 4

५) महाविद्यालयात जातो/जाते- 5

६) महाविद्यालयात जात नाही - 6

७) निरक्षर - 7

८) नापास (असल्यास कोणत्या इयत्तेत ते नमुद करावे) - 8

९) ० ते ३ वर्षांच्या मुलांसाठी - 99 (लागू नाही)

**प्रश्न क्र. १७ साठी कोड खालीलप्रमाणे :**

१) शेती - 1

२) शेतमजूरी - 2

३) इतर मजूरीची काम - 3

४) रोजगार हमी योजनेचे मजूर - 4

५) हंगामी व्यवसाय - 5

६) नोकरी - 6

७) पशुधन विकास/पशुपालन - 7

८) शेतीजोड व्यवसाय - 8

९) लागू नाही - 99 (लागू नाही)

**प्रश्न क्र. १८ साठी कोड खालीलप्रमाणे :**

१) रोजची मजूरी/वेतन मिळते - 1

२) आठवडयाला मजूरी/वेतन मिळते - 2

३) मासिक वेतन मिळते - 3

४) लागू नाही - 99 (लागू नाही)

# संशोधन विषयाचा सारांश

**१. अभ्यास विषयाची ओळख** :

समाजातील अनुसूचित जाती व जमातीचे सदस्य, दुर्बल, दुर्लक्षित, वंचित घटक आणि दारिद्रय रेषेखालील बिगर अनुसूचित जाती व जमातीतील गरिब कुटुंबांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळवून देण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक घरकुल प्रकल्प राबविण्यात आले आहेत. त्यापैकी भारतातील 'इंदिरा आवास योजना' ही सर्वात व्यापक व अत्यंत महत्त्वाची घरकुल योजना आहे.

देशातील ग्रामीण दारिद्रय निर्मुलनाचा मोठा भाग म्हणून ग्रामीण विकास मंत्रालयातर्फे १ जानेवारी १९९६ पासून 'इंदिरा आवास योजना' हा एक मोठा कार्यक्रम संपूर्ण भारतात राबविण्यास सुरुवात झाली. सदर योजनेअंतर्गत नवीन घरे बांधण्यासाठी सहाय्य, कच्च्या किंवा मोडकळीस आलेल्या घरांची सुधारणा (दर्जावाढ) तसेच घराच्या जागांची तरतूद यासाठी सहाय्य पुरविण्यात येते. यामध्ये लाभार्थ्यांना रुपये १ लाख इतके अनुदान ३ टप्प्यामध्ये वितरीत करण्यात येते. योजनेची अंमलबजावणी पंचायतराज यंत्रणेमार्फत केली जाते व त्यामध्ये ग्रामपंचायतींची अत्यंत महत्त्वाची भुमिका आहे.

**इंदिरा आवास योजना : भारतातील व महाराष्ट्रातील कामगिरी**

सदर योजनेअंतर्गत सन २००७ ते २०१४ या कालावधीत भारतात एकूण १६४.४५ लाख घरकुलांचे उद्दिष्ट्य पुर्ण झाले आहे. महाराष्ट्रात १९९६ ते जुलै २०१४ पर्यंत एकूण १६,२६,६०९ कुटुंबाना घरकुलांचा लाभ देण्यात आला. तसेच सन २००८ ते २०१४ या कालावधीत महाराष्ट्रात ८,१३,४०० इतक्या घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

**२. संशोधन पध्दती** :

**अ. समस्यासूत्रण** : राष्ट्रीय स्तरावर सन २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था व पंचायतराज तर्फे योजनेचे मुल्यमापन करण्यात आले होते. त्यामध्ये महाराष्ट्रातील वर्धा व नांदेड या दोन जिल्ह्यांचा समावेश होता. तथापि, २००५ नंतर सदर योजनेचे मूल्यमापन झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळेच महाराष्ट्रात इंदिरा आवास योजनेची मार्गदर्शक

सूचनेनुसार अंमलबजावणी झाली आहे किंवा नाही, घरकुल प्राप्तीमुळे लाभार्थ्यांच्या समाजिक व आर्थिक स्थितीमध्ये झालेला बदल इ. बाबी अभ्यासणे गरजेचे आहे.

**ब. अभ्यास विषयाची व्याप्ती** : संशोधन अभ्यासासाठी पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुका निवडण्यात आलेला आहे. संशोधन अभ्यासासाठी २००८ ते २०१४ या कालावधीतील नविन घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. संशोधन अभ्यास घरकुल प्राप्त लाभार्थ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासणे यापुरता मर्यादित राहील.

**क. संशोधन अभ्यासाचे महत्व** : सन २००५ नंतर महाराष्ट्रामध्ये 'इंदिरा आवास योजने'चे मुल्यमापन झालेले नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया, लाभार्थी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती, लाभार्थ्यांच्या समस्या तसेच क्षेत्रीय स्तरावर उद्भवणाऱ्या समस्या इ. चा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. सदर संशोधन अभ्यास अंमलबजावणी यंत्रणेस तसेच भविष्यात इतर संशोधकांना संदर्भासाठीही उपयोगी ठरेल.

**३. संकल्पनांच्या कार्यवाही व्याख्या** :

**अ. इंदिरा आवास योजना** : ग्रामीण भागातील अनुसूचित जाती-जमाती, मागासलेले, दुर्बल व दुर्लक्षित घटकांना घरकुलासाठी सहाय्यक अनुदान उपलब्ध करुन देणे होय.

**ब. मुल्यमापन** : इंदिरा आवास योजनेची कार्यवाही व योजनेची फलनिष्पत्ती जाणून घेणे.

**क. सामाजिक स्थिती** : वीज, पिण्याचे पाणी, घरकुलापर्यंत जाण्यासाठी पायवाट किंवा रस्ता, शौचालय, न्हाणीघर, सांडपाणी व्यवस्था, स्वयंपाकाची साधने (निधुर्र चूल किंवा गॅस) इ. पायाभूत सुविधा. तसेच कुटुंबांचे व प्रामुख्याने महिलांचे सरंक्षण, कुटुंबांची शैक्षणिक स्थिती म्हणजे सामाजिक स्थिती होय.

**ड. आर्थिक स्थिती** : घरकुल प्राप्त कुटुंबातील कमावते सदस्य, उपलब्ध उत्पन्नाची साधने, वेतनाचे स्वरुप, कुटुंबांचे मासिक उत्पन्न म्हणजे आर्थिक स्थिती होय.

**४. संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये** :

१. योजनेअंतर्गत मुळशी तालुक्यातील लाभार्थी निवड प्रक्रियेबाबत माहिती घेणे.

२. योजनेअंतर्गत मार्गदर्शक सूचनांप्रमाणे घरकुल बांधकाम प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे किंवा नाही याचा शोध घेणे.

३. घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबांची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासणे.

४. योजनेसंदर्भात लाभार्थ्यांच्या अडचणी जाणून घेणे.

५. योजनेची अमंलबजावणी करणाऱ्या यंत्रणेस आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

**५. संशोधनाची गृहीतकृत्ये** :

१. मुळशी तालुक्यात योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड व घरांचे वाटप हे मार्गदर्शक सूचनेनुसार झाले आहे.

२. घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत काही घटकांची मार्गदर्शक सूचनेनुसार अंमलबजावणी झालेली नाही.

३. घरकुल प्राप्त झाल्यामुळे लाभार्थी कुटुंबांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून येण्यास मदत झाली आहे.

**६. नमुना आकार व निवड पध्दती** :

**अ. संशोधन आराखडा** : वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

**ब. समग्र** (Universe) : मुळशी तालुक्यामध्ये २००८ ते २०१४ या कालावधीत नविन घरकुलाचे बांधकाम पूर्ण झालेले ८५८ लाभार्थी हे एकूण समग्र आहे.

**क. घरकुल लाभार्थी** : नमुना आकार तंत्रानुसार घरकुल प्राप्त ८५८ लाभार्थ्यांपैकी ११५ लाभार्थी (१३%) इतका नमुना आकार ठरविण्यात आला. लाभार्थी नमुना निवडीसाठी संभाव्यता नमुना पध्दतीमधील साधा यादृच्छिक नमुना पध्दती व त्याअंतर्गत नियमित अंकन पध्दती वापरण्यात आली आहे.

**ड. शासकीय अधिकारी** : संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने इंदिरा आवास योजनेशी संबंधीत माहिती घेण्यासाठी ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांची सहेतूक नमुना निवड पध्दतीने निवड केली आहे.

**७. माहिती संकलन : साधने व माहितीचे स्त्रोत**

संशोधन अभ्यासांतर्गत मुलाखत अनुसूची, कुटुंब तक्ता, निरीक्षण अनुसूची ही प्राथमिक साधने वापरण्यात आली आहेत. तसेच विविध संशोधन अहवाल, शासननिर्णय, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कायदेशीर तरतुदी, शासकीय योजना, शासकीय व इतर उपयुक्त बेवसाईटवरील माहिती इ. दुय्यम संदर्भ साहित्यांचा समावेश आहे.

**८. प्रमुख निष्कर्ष :**

**८.१ योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रियेसंबंधीत निष्कर्ष :**

१) घरकुल प्राप्त ११५ लाभार्थ्यांमध्ये पुरूष लाभार्थींची संख्या ७०% व स्त्री लाभार्थींची संख्या ३०% इतकी आहे. स्वतःची जागा असलेल्या स्थानिक (१००%) लाभार्थ्यांना नवीन घरकुल बांधण्यासाठी लाभ देण्यात आला आहे.

२) योजनेअंतर्गत ८४% लाभार्थ्यांना घरकुलासंबंधीत माहिती ग्रामसेवक तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्याकडून व उर्वरित १६% लाभार्थ्यांना ग्रामसभेमध्ये मिळालेली आहे. तसेच योजनेच्या प्रतिक्षा यादीसंदर्भात ग्रामसभेत चर्चा करण्यात आल्याचे दिसून येते (९३%)

३) घरकुल प्राप्त लाभार्थ्यांमध्ये ८८% लाभार्थी हे दारिद्रय रेषेखालील इतर प्रवर्गातील आहे. अनुसूचित जाती व जमातीतील अनुक्रमे ९% व ३% लाभार्थी आहेत.

**८.२ योजनेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत निष्कर्ष :**

१) घरकुल प्राप्त लाभार्थ्यांपैकी ७२ टक्के लाभार्थ्यांचा रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा झालेला नसल्याचे दिसून येते. तसेच ८३ टक्के लाभार्थ्यांना उप अभियंता यांचेकडून पुर्णत्वाचा दाखला मिळालेला नाही.

२) सर्वाधिक ९४ टक्के लाभार्थ्यांचे घरकुल हे २६९ चौ.फु. क्षेत्रापेक्षा अधिकच्या जागेत झालेले आहे. तसेच १०० टक्के घरकुलांचे बांधकाम हे १८ महिन्यांपेक्षा कमी कालावधीत पुर्ण झालेले आहे.

३) सर्वाधिक ८६ टक्के लाभार्थ्यांनी बँकेकडून मोठ्या रकमेचे कर्ज काढून कुटुंबांच्या गरजेनुसार आवश्यक जागेत घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे.

४) घरकुल प्राप्त १०० टक्के लाभार्थ्यांना शौचालयाची सुविधा उपलब्ध झालेली आहे. यामध्ये सर्वाधिक ६० (५२ टक्के) लाभार्थ्यांनी योजनेअंतर्गत प्राप्त रकमेतूनच शौचालयाचे बांधकाम केलेले आहे. तसेच ४५ टक्के लाभार्थ्यांना निर्मल भारत अभियानांतर्गत (Convergence) लाभ देण्यात आला आहे मात्र हे प्रमाण कमी आहे.

५) घरकुलाच्या बांधकामाबाबत काही घटकांची पुर्तता झाली असल्याचे दिसून येते. जसे की, घरांच्या भिंती (विटा व सिमेंट) पक्क्या स्वरूपाची आहेत, घराचे छप्पर बनविण्यासाठी टिकाऊ साहित्याचा वापर, इ. मात्र काही घटकांची पुर्तता झाली नसल्याचे दिसून येते. जसे की, घराच्या दर्शनिय भिंतीवर योजनेचे नामफलक, घराजवळील गटारे बंधिस्त असणे इ.

## ८.३ घरकुल प्राप्त लाभार्थ्यांच्या सामाजिक स्थितीविषयी निष्कर्ष :

१) एकूण ६२ टक्के लाभार्थ्यांना इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून (Convergence) रस्ता किंवा पायवाटेची सुविधा पुरविण्यात आली आहे. तसेच ७७ टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलामध्ये वीजेची सुविधा उपलब्ध आहे.

२) घरकुल प्राप्त ९७ टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलामध्ये व्यक्तीगत शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच १०० टक्के लाभार्थी कुटुंबांनी घरकुलाच्या आत बंदिस्त व स्वतंत्र न्हाणीघर बांधले आहे.

३) व्यक्तीगत व सार्वजनिक नळ व बोअरवेलच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची योग्य सुविधा उपलब्ध झालेले सर्वाधिक ५६ टक्के लाभार्थी आहेत. तसेच ७६ टक्के लाभार्थ्यांना निर्धुर चूल उपलब्ध झालेली नाही. मात्र ४० टक्के लाभार्थ्यांनी गॅस जोडणी केलेली असून ही बाब सकारात्मक आहे.

## ८.४ घरकुल प्राप्त लाभार्थी कुटुंबाच्या आर्थिक स्थितीविषयी निष्कर्ष :

१) काम करत असलेल्या २८६ सदस्यांपैकी सर्वाधिक १९२ (६७ टक्के) सदस्य शेती, शेतमजुरी व शेती अधारित व्यवसाय करताना दिसून येतात.

२) घरकुलाचा लाभापुर्वी व घरकुल लाभ मिळाल्यानंतर लाभार्थी कुटुंबांच्या रोजगाराच्या स्थितीमध्ये विशेष फरक पडल्याचे दिसून येत नाही. कारण कुटुंबांच्या आर्थिक उत्पन्न वाढीसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या नाहीत.

**९. गृहितकृत्यांची पडताळणी :**

**९.१ मुळशी तालुक्यात योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड व घरांचे वाटप हे मार्गदर्शक सूचनेनुसार झाले आहे.**

**Correlations**

| | | पात्रता निकष | सामाजिक प्रवर्ग |
|---|---|---|---|
| पात्रता निकष | Pearson Correlation | 1 | .935** |
| | Sig. (2-tailed) | | .000 |
| | N | 115 | 115 |
| सामाजिक प्रवर्ग | Pearson Correlation | .935** | 1 |
| | Sig. (2-tailed) | .000 | |
| | N | 115 | 115 |

**. Correlation is significant at the 0.01 level (2-tailed).

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थी पात्रता निकष ठरविलेले आहेत. यात प्रतिक्षा यादीनुसार दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती व जमाती, बिगर अनुसूचित जाती व जमाती, दारिद्रय रेषेखालील खुला व इतर मागासवर्ग तसेच विशेष प्राधान्य क्रम (उदा. वेठबिगार, विधवा) ठरविलेल्या लाभार्थ्यांनाच घरकुलाचा लाभ देणे अपेक्षित आहे. सदर चाचणीवरुन असे दिसून येते की, लाभार्थी पात्रता निकष व सामाजिक प्रवर्गनिहाय लाभार्थ्यांची निवड यातील सहसंबंध हा Less than ०.०५ च्या तुलनेत ०.०१ इतका आलेला असून दोन्ही चलातील सहसंबंध सकारात्मक असल्याचे स्पष्ट होते.

**९.२ घरकुल बांधकाम प्रक्रियेसंबंधीत काही घटकांची मार्गदर्शक सूचनेनुसार अंमलबजावणी झालेली नाही.**

मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुल बांधकाम प्रक्रियेसबंधीत काही घटकांची १०० टक्के अंमलबजावणी झालेली नाही. जसे की, घरकुल पुर्णत्वाचा दाखला, रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवरील करारनामा, इतर शासकीय योजनांच्या (Convergence) माध्यमातून लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य, घरकुलाच्या दर्शनीय भिंतीवर योजनेचे कायमस्वरुपी

नामफलक नसणे, दरवाजे व खिडक्यांना शटर बसविणे, छताला प्लॅस्टर व रंगकाम नसणे इ. वरुन सदर गृहितकृत्य सिध्द होते.

## ९.३ घरकुल प्राप्त झाल्यामुळे लाभार्थी कुटुंबांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून येण्यास मदत झाली आहे.

घरकुल प्राप्तीमुळे बहुतांशी लाभार्थी कुटुंबांना पिण्याचे पाणी, घरात वीज, निर्धुर चूल इ. सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. योजनेअंतर्गत १०० टक्के लाभार्थ्यांना शौचालयाची तसेच घरकुलाच्या आत बंदिस्त व स्वतंत्र न्हाणीघराची सुविधा उपलब्ध झाली आहे. बांधले गेले आहे. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांची, प्रामुख्याने स्त्री सदस्यांची सुरक्षितता तसेच व्यक्तीगत व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने घरकुल उपयुक्त ठरले आहे. यातून लाभार्थी कुटुंबांच्या सामजिक स्थितीत सुधारणा घडून येत असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच सदर गृहितकृत्य सिध्द होते.